२२
म. ग्रं. सं. ठाणें
सन
विषय
लेखक
संग्रहालय क्रमांक
पुस्तकाचें नांव
२२

# श्रीहरिविजय कथारत

Krishnaji Sakharam Sathe
10/12/87

# श्री हरिविजय कथारस

आणि

## श्री कृष्णाविषयीं ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांच्या कुतर्कांचें खंडन.

हें पुस्तक

## एका हिंदूनें

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. १२८
ठाणें सन १८[illegible]

मुंबईंत

जाइन्ट स्टॉक प्रिंटिंग प्रेसमध्यें छापविलें.

सन १८८७.

( ग्रंथकर्त्यानें सर्व प्रकारचे हक ठेविले आहेत. )

किंमत १ रुपया.

# प्रस्तावना.

आलिकडे बहुतकरून कल्पित कादंबऱ्या व संगीत नाटकें यांची बरींच पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत. त्यापेक्षां आमचे विद्वानलोक जर भारत भागवतादि पुराण ग्रंथांतील बोधपर व मनोरंजक कथानकें सरळ गोष्टीच्या रूपानें प्रसिद्ध करण्याचें मनावर घेतील तर आमच्या नूतन शिकलेल्या स्त्रीपुरुषांस त्यांचा चांगला उपयोग होऊन तीं मनोरंजनासही कारणीभूत होतील.

हा विचार मनांत आणून श्रीमद्भागवतावरून श्रीधर कवीनें केलेल्या 'श्री हरिविजय' ग्रंथाधारें आह्मी हा "श्री हरिविजय कथारस" ग्रंथ तयार केला आहे. त्या योगानें आमच्या जुन्या मताच्या लोकांस बोध व नव्या मताच्या लोकांचें मनोरंजन होईल अशी आशा आहे.

जोंपर्यंत आमच्या हिंदु लोकांस ख्रिस्ती लोकांचा विटाळ झाला नव्हता, तोंपर्यंत आमचे लोक आपले वेदशास्त्र, पुराणादि ग्रंथ पूज्य मानून तदनुसार आचरण करून धर्मनिष्ट असत. व त्यांच्या मनांत आपल्या कोणत्याही ग्रंथाविषयीं कोणतीही शंका येत नसे.

परंतु जेव्हां ख्रिस्ती लोकांनीं स्वधर्म वाढविण्याचा प्रयत्न हिंदुस्थानांत चालू केला, तेव्हां अर्थातच त्यांनीं परधर्म-निंदा * करण्याची सुरवात करून आमच्या लोकांच्या मनांत वेदशास्त्र पुराणादि ग्रंथासंबंधीं नाना प्रकारच्या कुत्सित शंका उत्पन्न केल्या. पण शेवटीं त्या पासून ख्रिस्ती लोकांस विशेष फायदा न होतां कांहीं निराळे पंथ मात्र उत्पन्न झाले. तेव्हांपासून ख्रिस्ती इत्यादि मतवाद्यांच्या आमच्या धर्मावर ज्या शंका उत्पन्न झाल्या, त्यांत मुख्यत्वें करून श्री कृष्णाविषयीं तर फारच कुतर्क निघाले आहेत. ते कुतर्क किती अविचाराचे आहेत हें दाखवून देणें आमच्यांतील सुज्ञ विचारी लोकांचे कर्तव्य आहे.

आह्मी हा ग्रंथ लिहून तयार केल्यावर आमच्या मनांत वरील विचार येऊन श्री कृष्णाविषयीं ख्रिस्ती

---

* 'मूर्तिपुजा' हा शब्द ख्रिस्ती लोकांनींच आमच्या 'देवपूजे' कडेस लाविला आहे. ख्रिस्ती लोकांस जर त्यांचें धर्मशास्त्र 'बैबल' हें ईश्वरप्रणित आहे असें वाटतें, तर त्यांनीं खुशाल आपल्या पंथानुयायी लोकांपुढें त्याचे पोवाडे गावे; त्याजविषयीं आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु तसें न करितां पर धर्माची निंदा केल्यानें त्यांच्या धर्माची प्रतिष्ठा वाढते असें ते समजतात हें अगदीं वेडेपण होय. जरी ते आमच्या दैवतादिकांची मन मानेल तशी द्वेशानें थट्टा करितात तरी पण आह्मीं ह्या पुस्तकांत त्यांच्या अथवा अन्य कोणत्याही धर्मपंथाविषयीं निंदा केली नाहीं हें येथें निराळें सांगणें नलगे.

नं.
ठाणे.

# श्री हरिविजय कथासार

## अध्याय १ ला.

### ग्रंथारंभ, दैत्यकुलोत्पत्ति व त्रास.

प्रथमारंभीं सर्व आदि दैवतांस, ऋषिश्रेष्टांस व साधु संतांस वंदन करून श्रीधरकवि ह्मणतात कीं, ज्याप्रमाणें रहाटाची माळ व तिचे मणी वरचेवर खालवर होतात तद्वतच ही जगदीश्वराच्या मत्स्य कूर्मादि अवताराची माळा आहे. ज्या ज्या वेळीं साधुसंत व इतर जन आणि धर्म यांस पीडा होऊन दुष्टांचें प्राबल्य झालें, त्या त्या वेळीं देवानें मानवावतार धारण करून त्यांचा संहार केला, हें सर्वांस पुराण प्रसिद्ध असल्याचें विश्रुतच आहे. मागील ह्मणजे रामावतारीं ज्या वेळीं रावणादि अनेक दुष्ट अशा राक्षसांचें प्राबल्य झालें, त्या वेळीं देवानें श्रीरामचंद्ररूप मानवावतार घेऊन अक्षौहिणी सैन्य बाळगणारा जो रावण त्याचा गर्व परिहार वानरहस्तें करविला. त्यांस कांहीं काळ गेला नाहीं तों कंस, चाणूर, मुष्टिक, अघासूर, बकासूर, केशी, प्रलंब, शिशुपाळ, वक्रदंत, चैद्यनायक, भौमासूर, काळयवन, इत्यादि अनेक दुष्ट राक्षस उन्मत्त होऊन गोब्राह्मणाचा संहार करूं लागले, यज्ञयागादि सत्कर्मांचा विध्वंस करूं लागले, धर्माचा पाडाव करूं लागले, तसेंच दुर्योधनादि कौरव हे ही धर्माविरुद्ध चालून पृथ्वीवर फार अनाचार

करूं लागले, अर्थात पृथ्वीवर ब्रह्महत्या, गोहत्या, स्त्रीहत्या व बालहत्यादि अनेक अघोर पातकें होऊन व यज्ञयागादि पुण्य कर्मांचा भंग होऊन धर्म रसातळास गेला; त्यावेळीं पृथ्वी गाईचें रूप धारण करून इंद्रादि देव, ऋषि इत्यादिकांसह ब्रह्मदेवास शरण गेली; तेव्हां त्यास दया येऊन सर्वांसह ब्रह्मदेव क्षीरसागरतीरीं श्री विष्णूजवळ गेले.

---

# अध्याय २ रा.

## श्री विष्णूची आज्ञा व देवकी पुत्र संहार.

ब्रह्मदेवानें नम्रतापूर्वक कर जोडून विष्णूची स्तुति केली कीं, " हे दयानिधे, सुरासुरवंद्या, त्रिजगत्प्रभो, हे जगदीशा, आह्मांस जर संकट प्राप्त झालें तर आह्मीं तुजवांचून कोणास बरें शरण जावें ? कांकीं 'साधुसंरक्षणार्थाय संभवामि युगे युगे' असें तुझें वचन आहे. आणि तूं अनाथ पालक व सज्जन संरक्षक ह्मणवितोस तेव्हां तुझ्या चरणावांचून आह्मांस दुसरें स्थळच नाहीं. ज्यावेळीं रावणादिकांपासून आह्मांस त्रास झाला, त्यावेळीं आह्मीं सर्व तुला शरण आलों; व त्वां राम अवतार घेऊन आमचें रक्षण केलेंस. आतां कंसादि दैत्य प्रबळ होऊन त्यांनीं पृथ्वीवर आकांत मांडिला आहे. ऋषि आदिकरून जे विप्र त्या सर्वांचीं स्थानें व अनुष्ठानें त्यांनीं भ्रष्ट केलीं आणि रहाण्यासही स्थळ नाहीं ह्मणून सर्व ऋषि, देव व पृथ्वी इत्यादि आह्मीं सर्व मिळून आपणास शरण आलों आहों. आपण जर कृपा कराल तरच आह्मांस सुख होणार." अशी स्तुति केली.

वं अभय वचन काय मिळतें तें ऐकण्याकरितां सर्व स्वस्थ मनानें उभेच राहिले. इतक्यांत सागरांतून अशी वाणी निघाली कीं, "भक्तानों, तुह्मीं स्वस्थ रहावें. आपण जें बोललां तें सर्व मी ऐकिलें. मी मानवावतार घेऊन सर्व दैत्यांचा संहार करीन, परंतु तुह्मांस आज्ञा करितों ती सर्वांनीं श्रवण करून त्या त्या प्रमाणें करावें. मी यादव कुळांत अवतार घेतों. तुह्मीं सर्व देवांनीं मजबरोबर यादव व्हावें; उपदेवांनीं गोपाळ व्हावें; ऋषींनीं गाई व्हावें; इंद्र, वायु, यम, व अश्विनीकुमार यांनीं कुंती व माद्री यांच्या पोटीं अवतार घ्यावेत ( पांडव व्हावें.) ; बृहस्पतीनें द्रोणाचार्य होऊन पांडवांस विद्यादान द्यावें ; पार्वतीनें द्रौपदी व्हावें ; पांचाळाच्या घरीं अग्नीनें धृष्टद्युम्न व्हावें. लक्ष्मी व रुक्मिणी यांनीं वैदर्भ राजाच्या पोटीं अवतार घ्यावे ह्मणजे मी सर्वांस साह्य करून एकंदर कार्य भाग करीन, व दुष्टांचें पिष्ट करीन." हें अभिवचन ऐकतांच श्री विष्णूची आज्ञा शिरसा वंद्य करून सर्वत्र आनंदानें आपआपल्या स्थानाप्रत गेले.

इकडे गोकुळांत शूरसेन यादवाच्या पोटीं वसुदेव नांवाचा पुत्र झाला. तो पुण्यवान, सुरूप व तेजःपुंज होता; तो मोठा झाल्यावर त्याचा विवाह मथुरेचा राजा उग्रसेन याची कन्या देवकी इशीं पुर्व संचिताप्रमाणें ठरला, व मोठ्या तयारीनिशीं शूरसेन वसुदेवासह लग्नाकरितां मथुरेस आला. उग्रसेन राजाचा पुत्र कंस यानें ज्यावेळीं आपल्या बहिणीचा नवरा पाहिला, त्यावेळीं त्याच्या अप्रतिम गुण रूपावर तो फारच खुष होऊन त्या लग्नसमारंभासंबंधीं पुष्कळ श्रम आपण स्वतः घेऊन तो समारंभ फारच चांग-

त्या रीतीनें त्यानें तडीस नेला. असा लग्नसमारंभ पूर्वी मथुरेंत कधींच झाला नव्हता. कंस आपल्या शालकाजवळ अहोरात्र उभाच राहून त्याच्या इच्छे प्रमाणें वागे. यामुळें उग्रसेनासही फारच आनंद होई. पुढें मोठ्या अलौकिक थाटानें ज्या वेळीं वसुदेव देवकीची वरात निघाली, त्या वेळीं मंगलवाद्यें, रणवाद्यें ठिकठिकाणी नीट बेतानें योजून जागोजाग उल्लाट यंत्राचे ( तोफांचे ) भडीमार चालविले व सर्वत्र सुवर्ण पुष्पवृष्टी केली. आणखी चित्रविचित्र दारू काम रस्त्यांतून सुटूं लागलें, व दीपिका तर त्या समारंभांत इतक्या कांहीं पुष्कळ होत्या कीं ज्याची आकुंचित दृष्टि असेल त्यानेंही सूई शोधून घ्यावी. ज्या रथांत तीं वधुवर होतीं, त्या रथाच्या घोड्यांचे वाद्दोरे कंसानें स्वतः आपल्या हातीं धरिले आणि मागें पुढें हजारो रथ, हत्ती, घोडे, पालख्या यांची दाटी होती, त्यांतच अश्वारूढ असे मोठमोठे संस्थानिक व इतर सैन्यांतील मोठमोठे सेनापती होते व लक्षावधि पदाति होते. त्या दाटींत मुंगीलाही चालण्यास वाट उरली नाहीं असा थाटानें समारंभ चालला असतां, आणि सर्व लोक अति आनंदोत्सवांत निमग्न असतां अकस्मात अशी आकाशवाणी झाली कीं " अरे कंसासुरा, आपल्या ह्या बहिणीच्या लग्नसमारंभांत तूं मुख्य होऊन मोठ्या आनंदांत अगदीं निमग्न झाला आहेस, परंतु या देवकीच्या पोटीं जो आठवा पुत्र होईल तो तुझा प्राण हरण करणारा होईल." ही आकाशवाणी कंसानें ऐकतांच त्याचा सर्व सौख्यसागर शाघून जाऊन त्यास इतका राग आला कीं त्यानें ते वाग्दोरे सोडून एकाएकीं रथाखालीं सशस्त्र उडी टाकिली,

आणि त्या उभयतांपुढें तो आरक्त डोळे करून रथावर च-
ढून काळा सारखा उभा राहिला ! त्या वेळीं तेथें सर्वांस
फारच भय वाटलें. त्यानें तत्क्षणी बहिणीची वेणी धरून
व तिला आसडा देऊन रथाखालीं पाडिलें, व तिच्या मा-
नेवर शस्त्र टेऊन बोलूं लागला "अगे चांडाळणी, तुझ्या
रूपाला अनुरूप तुला नवरा मिळावा ह्मणून मी अतिशय प्रय-
त्न केले व तसा रूपवान नवराही मिळविला, यामुळें मला फा-
रच हर्ष होऊन त्या आनंदाच्या योगानें या तुझ्या लग्नसमारं-
भांत मीच मुख्य झालों; परंतु या इष्ट कार्याचा परिणाम नष्ट
ह्मणून अशा दुष्ट संकटाचें आतांच पिष्ट करून टाकावें
ह्मणजे अरिष्टाचा संभव मुळींच राहणार नाहीं. मात्र एक
बहिणीलाच मारल्याचा दोष लागेल! परंतु 'आपलें कल्याण
चिंतनारानें ज्या अडचणी त्यांत उद्भवतील त्यांचें निरसन
करावें' अशी नीति आहे ह्मणून तुझा मी वधंच करितों,
ह्मणजे तुला संतति होईल कोठून ?" असें ह्मणून शस्त्रानें
तिची मान तोडणार, तों भयग्रस्त देवकीने विनंती केली
कीं, "दादा ! जो तूं महा काळासही भिणारा नव्हेस तो तूं
आज य:कश्चित आकाश वाणीला भ्यावेंसना ? असो, हीं
एक माझ्या प्रारब्धहीनत्वाचीच गोष्ट आहे. माझ्या लग्ना-
ची तयारी मोठ्या उत्सुकतेनें तूं केलीस त्याचप्रमाणें त्या-
चा अंतही जर तुझ्याच हातून होणार तर यांत ह्मणजे मला
असंतोष आहे असें नाहीं. आणि तुझ्यापासून जें हें भय
मला प्राप्त झालें आहे, त्यापासून रक्षण करण्यास विनंती
करणें तीही तुलाच केली पाहिजे, कां कीं तुजपुढें दुसऱ्याची
मुळींच शक्ति नाहीं. ह्मणून या वेळीं तूं वेडयासारखें कांहीं
न भितां मला जिवदान द्यावें." कंस बोलला, 'हे प्रियभगिनी,

तुझ्यावर किंवा तुझ्या नवऱ्यावर माझा रोष तिळमात्र नाहीं आणि शत्रुत्वही नाहीं. परंतु माझें मन जें भयग्रस्त झालें आहे तें भय तुझा वध केल्यावांचून जाणेंच नाहीं. ह्मणून निरुपायानें तुझा प्राण मला घेतलाच पाहिजे.' कंसाचे आरक्त डोळे पाहून व आपलाही प्राण यावेळीं जाणार असें जाणून, व ुदेव बोलला कीं, 'अरे, स्त्रीहत्या हा दोष शास्त्रांत मोठा सांगितला आहे. तूं सुज्ञ असून हें असें नीच कर्म करावें हें फारच अयोग्य!' कंस ह्मणाला, 'शालका, ज्या योगानें मला लेशाही भीति नाहीं, अशी जर गोष्ट तूं मला सांगशील, तर मी शपथपूर्वक "सांगतों कीं, मी भगिनीचा वध कधींही करणार नाहीं. कारण कीं, मी निर्दय नाहीं. परंतु काय करावें? असें केल्या शिवाय उपायच नाहीं ह्मणून या घोर कर्मास मी प्रवृत्त झालों.' वसुदेव बोलला कीं, इच्या पोटीं जी संतति होईल ती तूं घ्यावीस म्हणजे तुला भीति राहिली नाहीं. कंसासूर बोलला मी तर घेईनच परंतु तुम्हीही विश्वासानें व संतोषानें ती मला द्यावी, ह्मणजे मोठ्या आनंदानें मी तुमच्या प्राणांचें रक्षण करितों. याप्रमाणें कंसास तें वचन मान्य होऊन त्या उभयतांचें वचन घेतलें. तसेंच कित्येकांनीं सांगितलें त्यावरही भरंवसा टेऊन देवकीस त्यानें जीवदान दिलें, आणि अलंबासूर दैत्यास बोलाऊन आज्ञा केली कीं, या उभयतांच्या पायांत बिड्या ठोकून यांस बंदीशाळेंत ठेव आणि देवकी गरोदर झाल्यावर प्रहरा प्रहराची मला वदा देत जा. याप्रमाणें बंदोबस्त करून मार्गांतूनच त्या उभयतांस बंदीशाळेंत पाठवून त्या समारंभाचा विध्वंस करून आपण घरीं गेला.

कंस हा उग्रसेनाचा मुलगा असतां, हा राक्षस कसा झाला, ही लोकशंका निवारण करण्यास त्याची मूळकथा अशी आहे कीं, उग्रसेनाची स्त्री अरण्यांत असतां एका राक्षसानें तिला बलात्कारें भोगिली होती म्हणून तिच्या पोटीं हा चांडाळ दैत्यरूपी कंस झाला.

उत्साह भंग होऊन सर्व दुःखभरित होत्साते आपापल्या स्थानीं गेले व उदास अंतःकरणानें कंसही राजवाड्यांत जाऊन स्तब्ध बसला. इकडे वसुदेव देवकीस कारागृहांत ठेवून द्वारें बंद केल्यावर उभयतां स्वस्थ मनानें आनंदांत निमग्न झालीं. वसुदेव बोलला ' प्रिये, आतांच पाहिलेंसना ! काय भयंकर प्रसंग तुझ्या जीवावर आला होता तो ? जो काळाचेंही ऐकून मन फिरविणारा नव्हे अशा दुष्ट कंसानें माझ्या वचनावर विश्वास ठेवून तुझा जिव वांचविला म्हणून त्या जगन्नियंत्याचेच मोठे आभार मानले पाहिजेत.' देवकी ह्मणाली, 'प्राणपते, पतिसन्मुख, बंधु हस्तानें, धारा तीर्थीं माझा प्राण जर आज जाता तर जिवाचें सार्थकच झालें असतें. परंतु हें संकट आपण आपल्या दृष्टीनें पाहण्याचा प्रसंग चुकला व आपलाही प्राण वांचला यांतच मला मोठा आनंद आहे.' वसुदेव बोलला कीं, ' प्रिये वेळ चुकली कीं काळ चुकला ' ही प्रसीद्ध ह्मण सर्वांस ठाऊक आहे. या साठीं ज्या जगदीशानें ही मरणाची वेळ चुकविली, तो ईश्वर पुढें यत्किंचितूही संकट येऊं देणार नाहीं, हें पूर्णपणें समजलें पाहिजे. आतां आपण स्वस्थांतःकरणानें प्राप्त काळांत सुखानें काळ क्रमण करूं.

याप्रमाणें कांहीं काळ त्या बंदीशाळेंत लोटला. इत-

क्यांत पूर्वसंचिताप्रमाणें देवकी गरोदर राहिली. त्यावेळीं उभयतांच्या चित्तांत फारच खेद झाला.

कंसासूर आपल्या बहिणीच्या समाचारासाठीं बंदीशाळेंत नेहमी येत असे. पुढें एके दिवशीं नियमित काळीं ती प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचें रूप पाहून उभयतांसही मूर्च्छा आली. इतक्यांत वसुदेव मूर्च्छा सांवरून तिला बोलला प्राणप्रिये शुद्धीवर ये. ( ती सावध झाली ) आतां मोह सोडून दे 'झाड जगलें तर फळें' या न्यायावर सांप्रत आपण लक्ष देऊन, जो आपला युक्त विचार तो करूं. ती बोलली, ह्या न्यायापेक्षां 'पतीची आज्ञा प्रमाण हेंच स्त्रियांचें निदान' या वचनावर मी लक्ष देतें. आपण आतां जो कार्य भाग करणें तो करावा. असें ह्मणून ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. इकडे वसुदेवानें दरवाजाजवळ येऊन जो द्वाररक्षक होता त्यास हाक मारून सांगितलें कीं बाबा, कंसासुरास जाऊन देवकीस पुत्र झाला आहे तो तुला बघावयास वसुदेव बोलावितो म्हणून सांग. त्याणें तत्क्षणीं धांवत धांवत जाऊन हें वर्तमान कंसास कळविलें. कंस भयाभित व क्रोधानें संतप्त होऊन बंदीशाळेंत आला. तेथें कंसाची मुद्रा भयंकर न दिसतां आनंदभरित दिसल्याने त्या उभयतांस संतोष होऊन हा पुत्र आपणास पचेल अशी थोडी आशा उत्पन्न झाली. कंस येतांच त्यानें देवकीस क्षेम विचारिलें. देवकी म्हणाली आतां क्षेमाचें तुला कशास विचारणें हवें. प्राणपतीनें तुला कां बोलाविलें आहे हें तूं जाणतच आहेस. असें बोलून तें बालक त्याच्या हातांत दिलें व आपण फारच रडूं लागली. कंसानें तिचें शांतवन केलें व विनंती केली कीं, प्रियभगिनी, तुझें हें बाळ मारावें याच

हेतूनें मी येथें येत होतों असा अर्थ नाहीं; फक्त तुझी प्रकृति पाहण्याकरितां नेहमीं येत असें. ( बालकाच्या रूपाकडे पाहून व त्याचे मुके घेऊन ) हा घे आपला पुत्र; तुझा तुला अक्षयी असो. असें बोलून संतुष्ट मनानें तो राजवाड्यांत निघून गेला. हें वर्तमान इंद्रास समजून तो नारदास बोलला कीं, महाराज, परमेश्वरानें अवतार घेण्याचा निश्चय सांगून, उपदेव व ऋषि या सर्वांस अवतार घेण्यास सांगितलें, परंतु कंसासुराच्या हातून भयंकर पातकें झाल्यावांचून ही गोष्ट सिद्धीस जाणार नाहीं. म्हणून कंसाचें मन फिरवून त्याच्या हातानें बालहत्या करवाव्या म्हणजे पातक संचय होईल. हें ऐकून नारद कंसाकडे गेला. त्यानें नारदाचें मोठे आतिथ्य करून षोडशोपचारीं पूजन केलें व आपण हस्तद्वय जोडून पुढें उभा राहिला. असें पाहून नारद बोलला कीं, कंसासुरा, तुझ्या सारखा प्रतापि मी कोणीच पाहिला नाहीं. सर्व गोष्टींनें तूं निर्भय वागतोस. वाहवा ! सार्वभौमा ! वैभव असावें तर असेंच असावें. कंस बोलला महाराज, आपल्या कृपेनें मी सतत धन्य आहे. परंतु 'चिंतासम नास्ति शरीरशोषणं' अशी अवस्था माझी आहे. त्या आकाश वाणीनें माझें रात्रंदिवस चित्त भ्रमण होत आहे. नारद बोलला, राजा, त्याविषयीं तर तू सर्व बंदोबस्त ठेविला आहेस व त्याप्रमाणें देवकीच्या प्रथम पुत्राचा संहार केलाच अससील! कंस म्हणाला, महाराज, माझा शत्रु तिचा आठवा पुत्र. मग मी निरर्थक सात अर्भकांचा संहार कशासाठीं करावा. नारद बोलला अरे, ज्या ठिकाणीं ज्ञान विशेष असतें त्या स्थळीं अज्ञानानें वास केलेलाच असतो, म्हणून तुझ्या चित्तांत हा मोठाच भ्रम झाला आहे. अरे,

तूं या प्रथम मुलापासून आठवा तो आपला शत्रु गणला असशील, व तसेंही कदाचित् असेल, परंतु जर उलटें मोजित आलें तर त्यापासून आठवेपण पहिल्यावर पण येतें. म्हणून एकंदर बालकें मारल्या शिवाय कालत्रयींही तुला निर्भयत्व प्राप्त होणार नाहीं.

कंसास हें वचन चातक मुखीं मेघ बिंदुवत वाटून तो सविनय म्हणाला 'महाराज, मी वृथा या भ्रम चक्रांत मोह पाश ग्रंथीमुळें पडून आपल्या जीविताच्या नाशास प्रवृत्त झालों होतों, परंतु मध्य समुद्रीं जसा एखादा बुडत असतां अकस्मात तेथें नौका उत्पन्न होऊन त्याला वर घ्यावें या सारिखें मला आज झालें. व माझी खात्री झाली कीं आतां मी या दुःख सागरांतून पार पडून पैल तीरावर जाईन. आपल्याच चरणाची शपथ वाहून मी प्रतिज्ञा करितों कीं, वांचविलेलें पोर आतांच जाऊन मारून नंतर तिचे सर्व पुत्र मारून मी निर्भय होईन.' हें ऐकून आपलें कार्य झालें असें मानून आनंदानें नारद परत इंद्र सभेंत आला व सर्व झालेला वृतांत सांगून सर्वांस सुखी करिता झाला. नारद जातांच काळा सारिखा संतप्त झालेला कंस बंदिशाळेप्रत जाण्यास निघाला.

कंसाची येण्याची ही वेळ नसतां अवेळींच तो आला असें पाहून वसुदेव देवकीचें चित्त भयग्रस्त झालें, इतक्यांत कंसानें देवकी जवळील मूल आपल्या मांडीवर घेऊन तिच्या जवळ आपल्या मनांतील कपट भाव न जाणवितां बसला. आणि बाळास कुरवाळूं लागला व मुके घेऊं लागला. कंस म्हणाला, ताई, तुझे मुलावर माझा लोभ फार आहे म्हणून यास पहाण्यास मी वरचे वर येतों. त्या मुलाच्या अंगास कठोर

पणानें कंसाचे हात लागतात ! असें पाहून देवकी म्हणते, दादा, असेरे काय करितोस ? तुझे हात त्याला लागणार नाहींत काय? वसुदेव पुढें येऊन तें पोर त्यापासून स्नेहानें घेऊं लागला. त्याचा हात हिसाडून कंस त्या पोरास ह्मणतो, अरे लुच्चा, पुढील आठव्यापासून पहिला तूं आठवा होऊन माझा प्राण घेणार होतास काय? अरे दुष्टा ! असें बोलून तो बंदीशाळे बाहेर जेथें पोरें आपटून मारण्या करितां एक शिळा पूर्वीच ठेविली होती तेथें येऊन त्या पोरास गरगरां फिरविलें; त्या वेळीं देवकी म्हणते, दादा असारे कसा त्या पोरास फिरवितोस? त्यास भोंवळ येणार नाहीं का ? कंस ह्मणाला, चांडाळानों, तुह्मी माझें मन मोहून माझा प्राण घेणार होतां. आतां मी या पोरास आपटूनच मारितों. खबरदार जवळ याल तर, नाहीं तर तुमचीही तीच दशा होईल. आपल्या पुत्रास जीवदान द्यावें ह्मणून देवकीनें कंसाची बहुत विनवणी केली परंतु त्या निष्ठुरास तिळमात्रही दया न येतां त्यानें त्या बालकास त्या शिळेवर आपटून छिन्नभिन्न केलें व लागलाच राजवाड्यांत निघून गेला.

देवकीचे सहा पुत्र अशाच रीतीनें त्या चांडाळानें आपटून मारले व तेणेंकरून वसुदेव देकीस पराकाष्टेचें दुःख झालें परंतु करतात काय! कंसासुरानें येणारा प्रळय जाणून आपल्या जवळ महान प्रबळ दैत्यांचा संग्रह केला व त्यांस मोठमोठ्या हुद्यांवर नेमिले व त्यांच्या हस्तें गाई, ब्राह्मण, ऋषि इत्यादिकांस पिडा देण्याचा क्रम जारी चालविला, कंसापासूनही अनेक बालहत्त्या व अघोर पातकें झालीं. हें पाहून देव, ऋषि इत्यादिकांस फारच आनंद

झाला व आतां मात्र परमात्मा लवकरच अवतार धारण करील अशी त्यांची खात्री झाली.

---

# अध्याय ३ रा.

## बळराम व कृष्ण जन्मकथन.

मागील अध्यायांत बालहत्येचा वृत्तांत झाला. पुढें कंसाकडून गाई, ब्राम्हण, ऋषि यांस फारच पीडा होऊं लागली. यज्ञयागादि महा कर्मांचा भंग होऊन महत्पाप झालें. धर्म रसातळास गेला. त्यावेळीं श्री विष्णूनें शेषास देवकीच्या उदरीं अवतरण्याची व लक्ष्मीस भीमक गृहीं अवतरण्याची आज्ञा केली. शेष बोलला कीं, महाराज, रामावतारीं आपणासमागमें मला फारच कष्ट झाले म्हणून ह्या अवतारीं कनिष्ठपणाचें नातें मला देण्याची क्षमा करावी. श्री विष्णु हास्य करून बोलले, तूं आज्ञा मान्य कर आणि देवकीच्या उदरीं जा, मग तेथून तुला योग्य माया बळानें गोकुळांत वसुदेवपत्नी कंस धाकानें जाऊन राहिली आहे, तिच्या उदरांत घालीन. याप्रमाणें तुला जेष्ठ बंधु करून लागलाच मी देवकीच्या उदरांत येतों. आपण बालक्रीडेंत नाना प्रकाचे खेळ गोकुळांत खेळूं व खेळांतच अनेक दुष्टांचें मर्दन करून साधुजन रक्षण करूं. आज्ञेप्रमाणें शेषानें देवकीच्या पोटीं अवतार धारण केला. तिला सहा महिनें झाले, तेव्हां तिचें रूप व तेज लोकोत्तर दिसूं लागल्यावरून कंसास फारच भीति वाटून याचा माझ्या हातून कधीं संहार होईल अशी आशा करूं लागला. इकडे वसुदेव देवकी तर दुःख

सागरांत गटंगळ्या खाऊं लागलीं. इतक्यांत योगमायेनें गर्भाशयांत शिरून तो गर्भ तेथून काढिला व गोकुळांत रोहिणी उदरीं नेऊन घातला. कंसास तर क्षणोक्षणीं बंदीशाळेंतील बातमी कळत होती. त्यास बंदीशाळेच्या रक्षकानें जाऊन सांगितलें कीं, देवकीचा गर्भ एकाएकीं जिराला. तसेंच देवकीनें एकाएकीं जागृत झाल्यावर असा प्रकार पाहून व हर्षयुक्त खेद मानून तीं उभयतां स्वस्थ राहिलीं. कारण त्यापासून त्यांस विशेष हित नव्हतें. कंस तर अंतर्यामी परमानंद पावला. कांकीं आतां आपण निर्भय झालों. कारण गर्भ एकायकीं जिरणें हें सामान्य नव्हे. आपल्या दर्पानेंच असें झालें असें त्यास वाटलें. तथापि बंदीशाळेंत जाऊन बाह्यात्कारें आपल्याला दुःख झालें असें दर्शवून प्रत्यक्ष खरा प्रकार अवलोकन केला.

इकडे गोकुळांत रोहिणी निद्रिस्त असतां, योगमायेनें तिच्या उदरीं गर्भ घातला तें तिला बिलकूल समजलें नाहीं. ज्या वेळीं ती जागृत झाली त्यावेळीं तिनें हें अवलोकन करितांच, सलज्ज होऊन, उदर वस्त्रानें झांकू लागली. परंतु सहा महिन्याचा गर्भ झांकतो कसा ? ह्मणून ती गोष्ट बाहेर फुटतांच त्याबद्दल लोकांत वाईट चर्चा चालली. शेवटीं नंदानें असा निश्चय केला कीं, तिला घरांतून बाहेर घालवून द्यावी. आणि असें करणार तों आकाशवाणी झाली कीं, 'रोहिणी ही महा सती आहे. इच्या गर्भाविषयीं जो कोणी वाईट गोष्ट मनांत आणील, व तसें दुसऱ्यांस सांगेल त्याची जिव्हा छेदन होईल. नंदा, इला बाहेर न घालवितां, घरांत ठेवून उत्तम प्रकारें इचें प्रतिपालन करावें.' ह्या आज्ञेवरून सर्वांनीं संतुष्ट होऊन

पूर्वींचा बेत रहित केला. पुढें तो गर्भ यथाकाळीं वाढून, नियमीत दिवशीं प्रसूत होऊन रोहिणीस देदीप्यमानपुत्र झाला. त्याचें नांव बलिभद्र ठेवून नंदानें मोठा मंगलोत्सव केला. गोकुळांत या जन्मदिवशीं सुचिन्हें व मथुरेंत दुश्चिन्हें झालीं.

इकडे गोकुळांत यशोदेच्या उदरीं योगमायेनें अवतार घेतला, व मथुरेंतील बंदीशाळेंत देवकीच्या उदरीं श्री विष्णूनें अवतार घेतला. यथाकाळीं दोघीही प्रसूत झाल्या. यशोदेस कन्या व देवकीस पुत्र झाला. देवकी निद्रिस्त असतां कोणत्याही जन रीतीच्या वेदनेशिवाय कृष्ण अवतार श्रावण वद्य ८ रोजीं मध्य रात्रीं रोहिणी नक्षत्रीं झाला. तिनें अकस्मात जागृत होऊन कृष्णमूर्ति पाहिली. व लागलेंच वसुदेवास जागृत करून उभयतां त्या रूपास पाहत भ्रम व उल्हास समुद्रांत ब्रह्मानंद नौकेंत बसलीं आहेत, व भोंवतीं पाहतात तों त्यांस ती बंदीशाळा न दिसतां एक सुशोभित राजवाडा दिसला; व जागोजाग सेवक जन उभे आहेत असें पाहिलें. आकर्णनयन, हास्य-वदन, हिऱ्यासारखे दांत, कुरळकेश, हात पाय गोंडस व कोटी सूर्यासारखा ज्याचा प्रकाश, असें कृष्णाचें रूप पाहून उभयतांसही वाटलें कीं हा खरोखर परमात्मा आपल्या पोटीं अवतरला आहे. इतक्यांत भय वाटून वसुदेव ह्मणतो प्रिये, हें रत्न आपल्यास पचणार कोठून? कंसास हें वर्तमान समजल्यावर तो काळासारखा यास ग्रासण्यास येईल. हीं अक्षरें एकतांच देवकीनें निर्भय मनानें तत्क्षणी एक भयंकर आरोळी मारून म्हटलें कीं, त्या चांडाळास मी आतांच मारितें. तुम्हांस त्याचें भय कां? आतांच मी त्याचें कंदन करून देव ऋषि इत्यादिकांचे रक्षण करीन. त्या चांडाळ दुर्योधनास

मारून मद्भक्त पांडव यांस रक्षीन. तूं मला कंसाची भीति दाखवितोस काय ? वसुदेव ह्मणाला प्राण प्रिये, कंसास मारण्याची व पांडवांस तारण्याची गोष्ट तर लांबच राहिली, पण तूं किंचित हळू बोल. जर तझे हे शब्द रक्षकांनीं ऐकिले तर आतांच आपल्या सर्वांच्या प्राणावर येऊन मोठा अनर्थ होईल. हें ऐकून कृष्णानें कांहीं जाणतें रूप घेऊन आपल्या मातापितरांस सांगितलें कीं, श्री विष्णू अवतार ह्मणतात तो मी तुमच्या पोटीं आलों आहें; व यापेक्षांही आपला शब्द मोठ्यानें जरी आला तथापि त्याची कांहींच भीति नाहीं व तो कोणास ऐकूंही जाणार नाहीं. परंतु अवतार चरित्राप्रमाणें कृत्य केलें पाहिजे ह्मणून, सांगतों त्याप्रमाणें तुह्मीं मनांत कोणतेंही भय न आणितां करावें. ज्या दुष्टाच्या मनांत माझा घात करण्याचा निश्चय, त्याच्या नगरांत मी एक क्षणही राहूं इच्छित नाहीं; ह्मणून तुह्मीं मला गोकुळांत नेऊन नंद गृहीं त्याची पत्नी यशोदा तिला जी मुलगी झाली आहे ती याच वेळीं इकडे आणावी व मला तिचे ऐवजीं तेथें नेऊन ठेवावें. माझ्या कृपेनें या कृत्यास येणाऱ्या सर्व अडचणीं व भय हीं नाहींशीं होतील. यमुना तुडुंब भरली होती. मध्य रात्रीचा समय असून एक सारखा पाऊस पडतच होता. बंदीखान्यास कुलुपें होतीं व रक्षकांचा खडा पहारा इतक्या संकटां तून कसें निभाऊन जातां येईल, अशा अनेक कल्पना प्रथम वसुदेवाच्या मनांत आल्या. परंतु ज्या ईश्वराच्या नाम मात्रें करून दुस्तर भवसागरही तरला जातो व भव बंधनही तुटतें, तो प्रत्यक्ष हातांत असतां यमुना नदी पार जाण्याचें व यः कश्चित कुलुपें व बिड्या तुटण्याचें संकट

कां पडणार आहे असें त्यानें नंतर देवकीस दर्शविलें. तिलाही ईश्वर कृपेनें ज्ञान होऊन संतोषानें तें कार्य करण्यास सांगतांच वसुदेवानें श्री कृष्णास घेऊन जों उठला तों पायांतील बिडी तुटून खालीं पडली. कांहींसा पुढें गेला तों कुलुपें गळून दरवाजे खाडकन उघडले. आणखीं पुढें गेला तों शेषानें आपला फणा श्रीकृष्ण मस्तकावर पर्जन्य रक्षणार्थ धरला. जेव्हां तो यमुना नदींतून चालला व कृष्णाच्या पायास पाणी लागूं नये ह्मणून त्यास वर वर उचलून धरी, तों तों यमुना नदी आपल्या उदकास श्रीकृष्णाच्या अलभ्य पदांचा स्पर्श व्हावा ह्मणून अधिकच वर येऊं लागली. वसुदेवाच्या गळ्यापर्यंत पाणी लागल्यामुळें तो मोठ्या संकटांत पडला, तेव्हां आकाशवाणी झाली कीं, 'वसुदेवा, कृष्णाचे पाय पाण्यास लागूं दे, ह्मणजे सर्व यथास्थित होईल.' त्याप्रमाणें करितांच यमुना दुभंग होऊन वसुदेवापुढें एक पाय वाट झाली. त्या वाटेनें निर्भयांत:करणानें गोकुळांत नंदगृहीं जाऊन तेथें यशोदेजवळ कृष्णास ठेविलें व तिजजवळची कन्या घेऊन परत मथुरेंत बंदिशाळेंत आला तों पूर्वीप्रमाणें त्याच्या पायांत बिड्या व दरवाज्यांस कुलुपें इत्यादि त्यानें पाहिलीं.

इतकें होत आहे तों प्रातः काळ झाला. इकडे बंदिशाळेंत कन्येच्या रडण्याचा आवाज ऐकतांच व त्यामुळें सावध झालेल्या सेवकांस, आणखी हें वसुदेवाकडूनही समजतांच, ते धांवत धांवत राजवाड्यांत गेले व कंसास हें वर्तमान् कळविलें. तें ऐकतांच त्यास मोठी भीति वाटली कांकीं, उत्तरोत्तर आठवा त्याच्या मनांतच खिळला होता.

इकडे यशोदा ज्यावेळीं गरोदर होती, त्यावेळीं ज्योति-

षांनीं हिच्या पोटीं ईश्वरी अवतार होईल अशी सूचना त्यांनीं सुचिन्हावरून केली होती; ह्मणून सर्व मंगलोत्साहाची नंदानें तयारीच ठेवून जागरणास कित्येक दासदासींची योजना करून आपणही जागत बसला होता. परंतु सर्वांस झोंप लागली. आणि वसुदेव यशोदेजवळ पुत्रास ठेऊन तिजजवळील कन्या घेऊन गेल्यानंतर ते सर्व जागे झाले यशोदेस आपल्यास पुत्र झालेला पाहून मोठा आनंद वाटला. व हें बाहेर समजतां सर्वांनीं आपला आनंद दर्शविला. नंद हा गोकुळांतील एक मोठा सर्वमान्य पाटील असे. त्यायोगानें त्याची मान्यता गोकुळांत व मथुरेंत चांगली होती.

सेवकांकडून देवकीस कन्या झाल्याचें वर्तमान ऐकून कंसास कांहींसें आश्चर्य वाटलें. परंतु जसा गर्भ जिराला त्याप्रमाणें हें आपल्या ऐश्वर्यतेजामुळें असेंही होऊं शकेल, असें त्यास वाटून तो बंदीशाळेंत आला. व ती मुलगी निर्दयतेनें देवकीच्या हातांतून ओढून तिला शिळेवर आपटून मारण्याकरितां बंदिशाळेबाहेर नेली. देवकीच्या पायांत जरा जड बिड्या होत्या तरी तशीच रडत हळू हळू कंसाजवळ जाऊन त्याच्या हातास बिलगून ह्मणते, दादा, तुला मुलीपासन मुळींच भीति नाहीं; आणि मुलांपेक्षां मुलींवर बायकांचें मन कसें असतें, तें सर्व तूं जाणतोस. या साटीं कृपा करून ही मुलगी मला दान दे. कंस बोलला, चांडाळिणी, या सर्व पोरांपेक्षां तूंच माझ्या प्राणाची गिऱ्हाईक आहेस. मला मरण आलें तरी तुला कांहीं भीति नाहीं. परंतु माझी मला फार काळजी आहे. या करितां, मी या पोरीस मारल्याशिवाय कधींही रहाणार नाहीं.

आणि जर तूं या वेळीं पलीकडे न झालीस, तर तुझाही शिरच्छेद केल्या शिवाय रहाणार नाहीं. चालती हो! देवकी निरूपायानें मागें सरली. आणि कंस त्या कन्यला गरगरां फिरवून शिळेवर जों आपटणार, तों त्याच्या हातांतून ती निसटून आकाशांत विजेसारखी कडकडत गेली. आणि आकाशवाणीनें बोलली कीं, 'अरे शतमूर्खा, तूं आतां शहाणा हो. कोणाच्या घातास प्रवृत्त होऊं नको. तुझा शत्रू गोकुळांत अनंत कोटी सूर्य प्रभेसारिखा वाढत आहे. व जशी मी तुझ्या हातून वांचलें, अशाच रीतीनें तुझ्या कोणत्याही उपायानें तो मरणार नाहीं. पण तुझ्या जीविताचा नाश तो करील.' हे ऐकतांच, कंस भयाभित होऊन कोणास कांहीं न बोलतां घरीं गेला.

---

## अध्याय ४ था.

### श्रीकृष्ण जातकवर्णन, महाबळभट विटंबना व पूतना अंत.

नंदास पुत्र झाला, या वर्तमानानें तेहतीस कोटी देवांस महा हर्ष होऊन ते सर्व त्यास गुप्तरूपें भेटून गेले. मथुरा व गोकुळवासी वहुत जन गोकुळांत नंदगृहीं येऊन उत्साहानें पुत्रास भेटले. नंदानें मुलाचा मोटाच उत्साह बारा दिवस पर्यंत केला व याचक जन सुखी केले. ज्या दिवशीं जन्म झाला, त्या दिवशीं गोकुळांत पर्जन्य वृष्टि, मथुरेंत रक्त वृष्टि, गोकुळांत भारद्वाज शब्द, व मथुरेंत उलूक व भालू यांचे शब्द. गोकुळांतील वाळलेले वृक्ष

प्रफुल्लित झाले, व मथुरेंतील फळानें भरलेले सुंदर वृक्ष वाऱ्यानें मोडून जमीनदोस्त झाले. कंसाचें मन निरंतर सचिंत होऊन, जणू त्यास वेडच लागल्या सारखें झालें.

मुलाचें जातकवर्णन ऐकावें, असें नंदास वाटून त्याणें एक विस्तीर्ण मंडप उभारून मोटमोठ्या संभावितांस बोलाविलें; व सहस्रावधि बायकाही बोलाविल्या. तसेंच गांवोगांवाहून, ही बातमी ऐकिल्यामुळें बहुत मंडळीही आली. त्या नंदाच्या पूर्व भाग्यामुळें सर्व देव विमानारूढ होऊन तेथें आले. गण गंधर्वही तें जातक ऐकण्यास आले. गर्गमुनि नंदाचे कुळ गुरु, या समाजांत मुख्यस्थानीं बसून, खालीं लिहिल्या प्रमाणें त्यानें मुलाचें जातक वर्णन केलें.

१ गर्गमुनि बोलतात, " या मुलाचा जन्मकाळ असा उत्तम आहे कीं, तो काळ सुजनास आल्हादरूपी, व दुर्जनास काळरूपी होणार. २ यास मारण्याकरितां एक राक्षसी येईल, व ती ह्याजकडून विष स्तनपान करवील; परंतु हा तिचा प्राण घेईल. ३ हा मुलगा खेळत असतां अकस्मात् वायुनें उडून जाईल, व बहुत राक्षस मारून परत येईल. ४ हा खेळत असतां, एक दैत्य गाडा होऊन याच्या आंगावर येईल, त्या दैत्यास हा मारील. ५ हा खेळत असतां, दोन वृक्षांजवळ जाईल, व पाय लागतांच ते वृक्ष पडून त्यांतून दोन गंधर्व निघून त्यांचा उद्धार होईल. ६ काळिया सर्पाचें हा मर्दन करील. नंदास अजगरापासून सोडवील. ८ वज्रधारा पर्जन्य गोवर्धन पर्वत उचलून टाळील, व सारें गोकुळ रक्षील; त्या वेळीं इंद्राचा गर्व परिहार होऊन, तो यास शरण येईल. ९ एका वेळीं मोठा अग्नि लागेल, व या मुलास याच्या खेळगड्यासह त्यांत

कोंडील, परंतु त्या वेळीं हा बारा गांवें अग्नि भक्षण करून सर्वांस सोडवील. १० मेलेला पुत्र सजीव करून आपल्या गुरूस देऊन त्यास संतोषवील. ११ याच्या हस्तें असंख्य असुर संहार होउन, शेवटीं कंसासुराचे प्राण हरण करून तेहतीस कोटी देवांस बंदीतून हा सोडवील, व सर्व जनास सुख होईल. १२ हा मुलगा एक मुख्य व सोळा हजार एकशें सात बायका करील. १३ पांडवांचें रक्षण करून, हा मुलगा, दुर्योधन, दुःशासन, शिशुपाळ, वक्रदंतादि दुष्टां-चा वध करील. १४ हा मुलगा एक्या अडचणीच्या प्रसं-गीं समुद्रांत एक नगरी वसवील. १५ ह्याच्या हातून लहानपणींच अशीं मोठीं मोठीं कृत्यें घडतील, व हा शेवटीं सर्व गोकुळ उद्धरून नेईल.

या वेळीं सर्व मंडळी अत्यानंद भरित होऊन टाळ्या पिटूं लागली. इकडे कृष्ण स्तनपान करीत होता. त्याणें मुनीकडे पाहून हास्य केलें. ती खूण जाणून गर्ग-मुनींनें उठून विनंती केली कीं, देवादिकांस जें वर्णन हो-णार नव्हे, तें जातक म्यां काय वर्णावें! परंतु आपण मला तो अधिकारच दिला, तेव्हां ब्रह्मदेवासही जें अवर्णनीय तें माझ्याच मुखांतून वदविलें व असें वर्णन आपण मान्य केलें यावरून मला अत्यानंद झाला.

इकडे मथुरेकडील वर्तमान असें कीं, कन्या निसटून गगनांत गेली त्या दिवसापासून कंसाचें मन धाकानें असें व्यापिलें कीं, बंदिशाळेंतून घरीं गेल्यापासून ध्यानीं, मनीं, स्वप्नीं त्या कंसास आठवा दिसूं लागला. शेवटीं त्याणें एक मोठी सभा करून महा बलाढ्य पृथ्वींतील असुर व कित्येक नागरिक जन त्या सभेस बोलाविले, व सर्वांस

मराठी ग्रंथ संग्रहालय

विनंती केली कीं, प्रजेस सुख राजानें द्यावें, व प्रजेनें राजा सुखी ठेवण्याविषयीं झटावें. मलातर आकाशवाणीचा निजध्यास लागला आहे. जो कोणी खरा स्वामिभक्त असेल, त्याणें कोणत्याही रीतीनें, गोकुळांत जाऊन माझा वैरी शोधून जिवें मारावा. ह्मणजे माझा हा जीव मला दान दिल्यासारखें होईल व त्याची मजकडून कशी सेवा होईल याविषयीं मी आतां कांहींच बोलत नाहीं. अशीं दीन वचनें ऐकतांच एक बलाढ्य महाबळ नामक दैत्य उठून, त्याणें या कृत्याचा अंगिकार केला. व ब्राह्मण रूपानें हें कार्य साधण्याची प्रतिज्ञा केली. व त्या रूपानें त्यानें गोकुळांत जाऊन, ज्योतिषाचा आव घातला. व घरोघर फिरून आपल्या नादास बऱ्याच बायका व पुरुष लाविले. कित्येक नंदाचे ओळखीचे व हितचिंतक होते, त्यांणीं त्या महाबळ भटास नंदाच्या घरीं नेलें. त्या वेळीं जरी नंद घरीं नव्हता, तथापि यशोदेनें भटजीचें आगत स्वागत करून, कृष्णाचें जन्म टिपण त्याचे हातांत दिलें. व त्यांत जें जातक वर्णन केलें आहे, तें पहाण्या विषयीं विनंती केल्या वरून तो भट कृष्णाचें जातक सांगूं लागला.

'ह्या मुलाच्या जन्म नक्षत्रावरून, हा शहाणा, चतुर, आणि प्रतापी होईल यांत संशय नाहीं. हा आपल्या सामर्थ्यानें अनेक राक्षस व राक्षसीणी मारील. देवादिकांस न होणारीं कृत्यें हा क्षणमात्र करील. मथुरावासी जनांस दुःख, व गोकुळवासी यांस सुख देईल, हे निःसंशय आहे. हा कित्येक राजांचा गर्व परिहार करील. हा सोळा हजार स्त्रिया करील. व संतति, संपत्ति याचा अनुभव यास फारच येईल.' या सर्व गोष्टी गर्गमुनीस अनुसरून महाबळ

भटजींनें सांगितल्या, आणि पुढें कपाळास आठी घालून कांहींवेळ स्तब्ध राहून बोलला कीं, जनहो, येथपर्यंत गर्ग मुनी कोठेंच चुकले नाहींत. परंतु पुढें एक गोष्ट सांगणें राहिली, ती रहावी कशी? या गोष्टीचा विचार करितां नानाप्रकारें तर्क ध्यनांत येतात. तुमचे मन कदाचित दुखवेल ह्मणून त्यांणीं सांगितलें नसेल असा तर्क करावा, तर तो संभवत नाहीं. कारण कीं, "आलें उरूस तें न चुकवावें गुरूस" असें शास्त्र आहे. त्याप्रमाणें करणें त्यांस उचित होतें, व दुसरें असें कीं, ते सूज्ञ आहेत, कोणत्याही अन्य प्रकारें ते दर्शवितील. परंतु त्यांणीं ही मोठी गोष्ट अगदींच कां गाळली, याबद्दल तर्क करण्यास मी लाचार असून, नसती पंचाईत आपल्या आंगावर घेण्यासही मी इच्छित नाहीं. ह्मणून मीही इतकेंच पुरें करितों. असें ह्मणून जाण्याचे तयारींत होता इतक्यांत सर्वांच्या विनंतीवरून तो वेषधारी महाबळभट आणखी पुढें सांगूं लागला. या मुलाचे कांहीं ठिकाणीं ग्रह उलटे सुलटे आले आहेत. त्यामुळें हा चोर व शिंदळ होईल. कपटी फार होईल. सगळ्या गोकुळांतील स्त्रिया भ्रष्ट करील. आतां या कृत्यासही भीतीची गरज नाहीं, परंतु हा मुलगा स्वकुळ घातकी होऊन, सर्वांचा संव्हार करील. यासाठीं या पोरास मनांत दया न आणितां खाड्यांत पुरा, अगर महासागरांत बुडवा, नाहीं पेक्षां अन्ययुक्तीनें याचा संव्हार करावा; न केला तर तुह्मांस हें पोर पुढें घातक होईल.

महाबळ भटाच्या तोंडांतून 'बुडवावा' व 'मारावा' अशीं अक्षरें निघतांच, असा चमत्कार झाला कीं, सर्व घरांतील संसारी निर्जीव वस्तूंस जीवित्व आलें. प्रथम

लाटणें येऊन, त्याणें शेंपन्नास प्रहार त्याच्या कपाळावर केले. नंतर पोळपाट येऊन धाडकन मस्तकावर बसला. उखळी येऊन कंबर दडपूं लागली. सुपें, रोवळ्या, मडकीं, भांडीं यांचा भडभडां प्रहार त्याच्या आंगावर होऊन, त्याची तडतडां आंतडीं तुटूं लागलीं. ताह्मानें येऊन फडफडां तोंडांत मारूं लागलीं; सुया दाभणें तर्वांग टोचूं लागलीं; मुसळानें तर गुदद्वारांत प्रवेश करण्याचा क्रम चालविला. असा त्यास विव्हळ करून भ्रमित केला. त्या व्यथेंत तो चहूंकडे धांवत असतां धोत्रही फिटूं लागलें, तथापि प्रहार बंद होईनात. शेवटीं राक्षसाचें रूप धरून त्यानें कृष्णास साष्टांग नमस्कार घातला; आणि लोकांसही विनंती केली कीं, कृष्णास मारण्याच्या हेतूनें मी कंसाज्ञेनें येथें आलों होतों. आतां कृपा करून तुह्मी मला सोडवा. इतकें झालें तथापि त्याचा मार बंद होईना. सर्वांस आश्चर्य वाटलें. इतक्यांत कृष्णाकडे पाहून त्याची स्तुति केली, व कृत अपराधाची क्षमा मागितल्यावरून त्याचा मार आपोआप बंद झाला. या दैत्यास कृष्णानें जिवंत सोडण्याचें कारण इतकेंच कीं गोकुळांत शत्रू काळा सारिखा वाढत आहे ही बातमी कंसास कळावा. महाबळ भट तेथून सुटतांच तसाच कंसाकडे गेला; व त्यास झालेला वृतांत सांगून, खाल्लेला मार दाखविला. कंस भयानें व्यापला. तें पाहून पूतना राक्षसीणीनें, त्यास स्त्रीरूपानें मारण्याचें पतकरून उत्तम रूपानें नटून ती गोकुळांत गेली. व आपलें स्तन विषानें भरून अनुमानानें तेथील चांगलीं चांगलीं बरीच पोरें मारिलीं. तिच्या रूपावरून व कोमलपणावरून ही ह्मणजे वेषधारी आहे असें कोणांसच

भासलें नाहीं. अशी ती पूतनाबाई नंदगृहीं आली. तेथें तिचें लावण्य रूप पाहून ही कोणीतरी स्वर्ग लोकींची देवांगना असेल असें वाटून, यशोदेनें तिचा चांगला आदर सत्कार केला व विचारितांच, तिणें सांगितलें कीं, यशोदावाई, आह्मी स्वार्गिच्याच राहणार. व आपला कृष्ण जो परब्रह्म अवतार, तोही आह्मांतलाच. तेव्हां आपणांस आमची ओळख कोठून ? (कृष्णाकडे पाहून) बाळा, अरे ओळख विसरलास काय ? अरे इकडे ये ! असें ह्मणत आहे तों कृष्णानें तिजकडे पाहून हास्यवदन केलें. मग काय एकच टाळी झाली. सर्वांनीं कृष्णास बोलाविला. परंतु त्यानें तिकडे दुर्लक्ष दर्शवून, त्या पूतनेंकडेसच ध्यान ठेवून आपल्या आईच्या कडेवरून तिजकडे उडी घेतली. तेव्हां यशोदेनें तिच्याजवळ कृष्णास दिलें आणि ह्मणाली कीं, कृष्ण आपलाच खरा. आपण क्षणभर तरी घ्यावा. अरे मुला, तला आमा पाहिजे काय ? असें ह्मणून आपला पदर काढीत आहे तों कृष्णानें तिची चोळी फाडून स्तनास मुख लाविलें; आणि विष शोषण्यास आरंभ केला. ती वज्रमिठी जाणून पूतनेनें मनांत जाणिलें आणि ह्मणाली, कृष्णा, एवढा कांरे हावरा झालास कीं स्तनापासून सुटतच नाहींस. अरे कांहीं तरी माया ? कृष्णानें विष शोषून रक्त शोषलें असें पाहून, अंगास आळे पिळे देऊन, तोंड वेडें वांकडें करून त्यास सोडवूं लागली. परंतु तो सुटतो कसा ? कित्येक गौळणिनींही त्यास सोडविण्याचा यत्न केला. परंतु सर्व व्यर्थ जाऊन, यशोदा पुढे येऊन तिणें कृष्णास हात घालून ह्मणते, कीं, हा बेटया लबाडा, दुसरीचा कांरे आम्म घ्यावा ? मजजवळ ये मी तुला देतें. परंतु तो सु-

टेना असें पाहून, भयानें सर्व चकित झाले. नंद मथुरेस गेला होता. मुख्य मुख्य पाटील कुळकर्णी हेही तेथें नसल्यानें सर्वांस भय वाटलें. इतक्यांत इनें राक्षसीरूप घेऊन कृष्णस्तुति केली कीं, तूं परब्रह्म अवतार, तुझ्या हस्तें सर्व सृष्टीचा लय होणार, त्या तुला मारण्यासाठीं मी आलें. परंतु देवा, आतां मला जीवदान दे. तथापि तो सुटेना असें पाहून त्याचे पाय धरून सोडवूं लागली, आणि अकस्मात गगनांत उडाली. त्या वेळीं सर्वांस भीति वाटली. इतक्यांत पुनः खालीं कोसळली, तेव्हां सर्वांनीं तो देह पाहिला; आणि कृष्ण तिच्या उरावर स्तनपान करीत आहे असें ही दिसलें. त्या वेळीं पूतनेच्या भयानें कृष्णाजवळ जाण्याची प्रथम कोणाची छाती होईना. शेवटीं येशोदा आली. आणि तिच्या समागमें चार बळकट गवळी ही भीत भीत आले. व ती मेली असें पाहून, यशोदेनें तो कृष्ण वर उचलतांच सहज सुटून आला. व सर्वांस आनंद झाला.

इतक्या अवकाशांत मथुरेहून नंद ही आला. त्यास हें भयंकर वर्तमान सांगितलें. व त्या सर्वांनीं अनुमान केलें कीं, पूर्वीं महाबळ दैत्य विटंबन झालें, व आतां या राक्षसीणीचे प्राण हरण झाले. हीं दोनही कृत्यें गर्गमुनीच्या भविष्याप्रमाणें उतरलीं. मग त्या पूतनेच्या देहाचीं खंडें करून, तो देह जाळून टाकिला.

---

## अध्याय ५ वा.

### शकटासूर व तृणावर्त वध.

पूतनेस मारल्याचा वृत्तांत ऐकून कंस तर फारच घाबरला. ज्याच्या त्याच्या आंगावर जाई, व मारावयास धांवे.

एके दिवशीं शकटासूर नांवाचा दैत्य कंसाकडून कृष्ण-वधार्थ गोकुळांत आला. कृष्ण आंगण्यांत खेळत असतां, तो एका गाड्याच्या वेषानें कृष्णाचा चुराडा करण्याकरितां त्याच्या आंगावर आला. तो समोरून येत आहे असें पाहून, कृष्णानें त्याला एक लाथ मारिली. त्यासरसा त्याचा देह शत चूर्ण होऊन सहस्रावधि योजनें लांब जाऊन पडला.

तसेंच एके दिवशीं कृष्ण घराबाहेर खेळत असतां, कंसाकडून आलेला तृणावर्त राक्षस वाऱ्याच्या रूपानें गोकुळावर आला. तेणेंकरून हें गोकूळ आतां आकाशांत जातें किंवा होतें तरी काय? असें सर्वांस वाटलें. सर्वांनीं आपापले दरवाजे लाविले. यशोदा कृष्णास आंगण्यांतून घरांत आणण्यास बाहेर गेली, तों त्या दैत्यानें कृष्णास वरच्यावर गगनांत उडाविलें. त्याच्या मनांत असें होतें कीं, परभारें हें पोर कंसास नेऊन द्यावें; परंतु वर जातांच, तृणावर्ताचे खऱ्या रूपाप्रमाणें कृष्णानेंही विराट रूप घेऊन त्याचा वध केला व आपण हळूच आंगणांत येऊन पडला. सर्व ठिकाणीं कृष्णास शोधूं लागले, इतक्यांत वाराही शांत झाला. त्यावेळीं पहातात तों कृष्ण तर आंगण्यांतच खेळत आहे. त्यास घेऊन यशोदा घरांत गेली. पुष्कळ बायकांनीं चाली प्रमाणें कृष्ण मुखावरून निंबलोण उतरून यशोदेनें त्याला आपल्या पोटाशीं धरिला. व कित्येक केलेले नवस फेडले.

एके वेळीं यशोदा कृष्णास पाळण्यांत घालून झोंके देत असतां, रामायणाच्या ओंव्या ह्मणत बसली होती. तेव्हां रावणानें सीता नेली, असें अनुसंधान आलें. ही ओवी ऐकतांच कृष्णानें पाळण्यांत उभें राहून आवेशानें ह्मटलें कीं, कोठें आहे तो रावण, धनुष्य आणून दे. आतांच

त्याचा वध करितों. व माझ्या बिभीषण भक्तास राज्यावर बसवितों. हें ऐकून यशोदा मूर्छित पडली. कांहीं वेळानें सावध होऊन तिला कित्यक संशय कृष्णाच्या अवताराविषयीं आले, परंतु मायाजाळाच्या भ्रांतींत पुनः गर्क होऊन आपला कृष्ण पाळण्यांत निजला होता तसाच आहे असें पाहून, त्याच्या तोंडावरून हात फिरविला.

एके दिवशीं यशोदा कृष्णाविषयीं विचार करीत असतां हें अवतारी रत्न आपणास पचेल काय? असा विचार तिच्या मनांत येऊन, ती कृष्णमुखाकडे पाहूं लागली. इतक्यांत कृष्णानें जांभई दिली, तों त्याच्या तोंडांत सप्त पाताळें, सप्त सागर, सप्त महासागर, ब्रह्मा, विष्णू आदिकरून सकल तेहतीस कोटि देव, तसेंच कंस चाणूरासह रामकृष्ण त्यांच्या सिंहासनावर चढून मारित आहेत असें पाहून ती मूर्छित पडली. परंतु पुनः सावध होऊन कृष्णाकडे पूर्ववत पाहून जे तिच्या मनांत अवचट विचाराचे तरंग आले होते, ते सर्व गेले. नंतर तिनें त्याचा मुका घेऊन तोंड कुरवाळिलें.

---

# अध्याय ६ वा.

## बाळलिला.

मागील अध्यायांत तृणावर्त व शकटासूर वध वर्णन झालें. पुढें बळराम व कृष्ण रांगूं चालूं लागले. त्यावेळीं नंदानें मोठा उत्साह केला. ते चांगले चालूं लागल्यानंतर खेळाकारितां संवगडी गोपाळ मिळवून प्रथम गौळणीच्या घरीं जाऊन तेथे दहीं दुधाच्या चोऱ्या कराव्या असा कृष्णानें निश्चय केला. या कृत्याला बळरामाचा रुकार येईना,

तेव्हां त्यास नकळत कृष्णानें एकदां रात्रीं एका गौळणीकडे जाऊन गोपाळांसह दहीं दूध भक्षण केलें. हीच पहिली चोरी. ती गवळण जागी होऊन, तिणें कृष्णास तेथेंच पकडलें. सर्व गोपाळ पळाले. कृष्णाच्या तोंडांत दूध असतां त्यास तिणें अडविलें. तेव्हां दुधाची गुळणी त्यानें तिच्या डोळयावर टाकिली, त्याबरोबर ती डोळे चोळूं लागली. त्यावेळीं तिचे हात अर्थातच कृष्णापासून सुटले. अशी संधी साधून कृष्ण तेथून पळाला, व धांवत जाऊन आपल्या सोबत्यांस मिळाला.

तेथून ते सर्व दुसऱ्या एका गौळणीच्या घरीं जाऊन यथेच्छ दहीं, दूध, लोणी भक्षण केल्यानंतर सर्व दरवाजे लावलेले असतां बाहेर पडले. आणि एक लोण्याचें गाडगें तिच्या सुनेच्या अंथरूणाजवळ आणून टेविलें व कांहीं लोणी कृष्णानें तिच्या तोंडास लावून आपण रस्त्यावर उभा राहिला. पहाटेस जेव्हां सासुनें उठून दिवा लाविला, त्यावेळीं घरांत सर्व विरजणाची दाणादाण करून टाकलेली व त्यांत दूध दह्यांचा लेशही नाहीं असें तिला आढळलें. तिणें दिवा घेऊन दरवाजे पाहिले, परंतु ते सर्व लावलेलेच होते. त्याचवेळीं सुनेजवळ एक गाडगें पाहून, इणेंच हें खाल्लें असा तर्क करून, ती निद्रिस्थ असतांच तिला लत्ताप्रहार केला व एकसारखी बडबूं लागली. तितक्यांत सुनेनें कृष्ण दाराशीं उभा आहे असें पाहून दीनपणानें विनंती केली कीं, देवा, मलारे हा छळ कां? हें ऐकून कृष्णास दया आली, व तो तिच्या सासूस ह्मणाला, अग थेरडे, तुझ्या दूध दह्यांचा चोर कांहीं तुझी सून नव्हे, तो मी आहें. तिची प्राज्ञा काय आहे कीं, ती तेथें हात लावील. मी एके

दिवशीं तिची थट्टा केली ह्मणून तिणें मला शिव्या दिल्या होत्या. तो सूड उगविण्याकरितां, हें कर्म मी करून तिजवर आणलें आहे. हें ऐकतांच सुनेला सोडून कृष्णास पकडण्याकरितां सासूनें धांव मारिली. तों कृष्ण पळून गेला.

एके दिवशीं उजाडतांच कृष्णानें एका गौळणीकडे जाऊन तिच्या घरांतील सर्व गोरस भक्षण करून सर्व गाडग्यांत विंचू भरून ठेविले. गवळण उठून एक मोठें दह्यांचें गाडगें ताक करण्यासाठीं एका मोठ्या डेऱ्यांत ओतिलें. ओततांना सहस्रावधि विंचू तिचे आंगास डसले, आणि ती त्या वेदनेनें मूर्छित पडली. घरांतील मनुष्यांची धांवाधांव झाली, व कांहीं उपाय करूं लागले. इतक्यांत पांच चार विंचू हातीं घेऊन कृष्ण बाहेर उभा राहून बोलला कीं, अगे गवळणी, तूं आपला प्राण जरी दिलास, तथापि हे विंचू उतरणार नाहींत. जर मी सांगेन तसें ऐकशील तर आतां सर्व नीट होईल. हें भाषण एका पोरानें कबूल केलें, तेव्हां कृष्णानें त्या म्हातारीकडे कृपादृष्टीनें पाहतांच, एकंदर त्या वेदना कमी झाल्या. ही शांतता झाल्यावर कबूल केलेल्या तिच्या सुनेस आपल्या बरोबर खेळावयास उघडपणें मागूं लागला. त्यावेळीं ती म्हातारी त्याच्या पाठीस लागली, इतक्यांत कृष्ण पळाला.

एक्या पहाटेस कृष्णास आंथरुणावरच ठेवून यशोदा घरांत येऊन ताक करूं लागली. त्याचा आवाज ऐकतांच कृष्ण तेथें जाऊन, यशोदेच्या हातची रवी धरून रडूं लागला. आईनें विचारितांच, कृष्ण बोलला कीं, जर तूं मला मी मागेन ती वस्तु देणार, तर या डेऱ्यांत जो आवाज होतो तो दे. यशोदा ह्मणाली, मुला, भलताचरे काय हा छंद.

त्यांतला आवाज मी कसा देऊं. कांहीं तरी वस्तु सांग म्हणजे ती देतां येईल. कृष्ण बोलला कीं, तर आकाशांतील सूर्य चंद्र दे. यशोदेनें कृष्णाचा मुका घेऊन म्हटलें कीं, बाळा अरे लाडक्या, चंद्र सूर्य खालीं आणणें हें मनुष्यांच्या हातांत नाहीं. अरे, आपण मनुष्यें ना रे? उगा रहा, रडूं नको. मी तुला आतां लोणी निघालें म्हणजे खाशील तितकें देईन. कृष्ण म्हणाला तूं अशीच खोटारी आई आहेस. तूं मला कधींही पोटभर लोणी देतच नाहींस. आतां तुला जो सूर्य खालीं येत नाहीं तो पहा मी आणतों. तूं डोळे मीट, उघडूं मात्र नको. तिणें डोळे मिटले, तों असहानिय सूर्य प्रकाश पडला. यशोदा तर लागलीच मूर्छित पडली. ती हरि कृपेनें उठतांच तिणें कृष्ण जवळच पाहिला, तेव्हां ती त्यास म्हणते, बाळा, तूं परब्रह्म अवतार आहेस. तुझी मी आई असें म्हणण्यासही मला लाज वाटते. अरे आतां केवढा रे प्रकाश पडला होता. मला तुझें फारच भय वाटलें. कृष्ण बोलला, आई तूं निजली होतीस, त्यावेळीं चंद्र सूर्य हे दोघेही माझ्या बरोबर खेळत होते. त्यांणीं तर मला तुझा निरोप सांगितला कीं, त्यांणीं नेहमीं येऊन मजबरोबर खेळावें, अशी तूं त्यांस आज्ञा केली आहेस. असें ऐकून येशोदेनें पुनः मायाजाळांत गुंतून, कृष्णास पोटाशीं धरून, प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें.

---

## अध्याय ७ वा.

### बाळलीला.

मागील अध्यायांत बालक्रीडेच्या कित्येक गोष्टींचें लेखन झालें. व पुढेंही तोच कथाभाग आहे. एके दिवशीं

कृष्णानें सर्व गोपाळ एकत्र करून, जो कोणी आपला शत्रु असेल त्याचा सूड घ्यावा, असा बेत केला. त्यानंतर अमुक गवळणीनें आपणास छळिलें आहे असें ध्यानांत आणून कृष्ण त्या गवळणीच्या घरांत गुप्त रूपानें गेला. आणि जेथें तीं उभयतां निजलीं होतीं तेथें जाऊन, नवऱ्याच्या दाढीशीं बायकोची वेणी बांधली, आणि आपण बाहेर पडला. पहाटेस जेव्हां ती गवळण उठूं लागली, तेव्हां नवऱ्याच्या दाढीस आंचका बसला. तो ह्मणाला, मी सत्तर वर्षांचा वृद्ध झालों तरी माझी तूं थट्टा, वीस वर्षांच्या तरुणा सारखी करतेस! अग, ही कुठें बायकांनीं थट्टा करावी! सोड लवकर. बायको म्हणते, ह्या वृद्धपणाला शोभेल असें तरी कांहीं बोला. आपणच माझी वेणी अटकविली आणि आतां तिकडूनच उलटी थट्टा होत आहे. आतां लवकर कशीतरी सोडा आणि मला घर धंद्याला लागूं द्या. शेवटीं त्यांचीं भाषणें निकरावर आलीं. आणि दोघेंही हिसकाहिसक करूं लागलीं. परंतु ती गांठ कांहीं केल्यानें सूटेना. मग त्यांनीं फारच लज्जित होऊन शस्त्र प्रयोगही केला, तथापि ती त्यांस सुटली नाहीं. इतक्यांत उजाडलें. मग तीं उभयतां निरुपायामुळें एकांतांतून लोकांतांत आलीं. त्यांची अशी अवस्था पाहून शेकडों मनुष्यें तेथें मौज पहाण्यास जमलीं. मग त्यांत उठला तो कारभारी होऊन त्या गांठीची हिसकाहिसक करूं लागला. त्या तमासगीर मंडळींत कृष्णही आपल्या सवंगड्यांसह येऊन गम्मत पाहत होता. त्याणें सर्वांस त्रास व दुःख झालेलें पाहून सदय मन केलें. व पुढें येऊन ह्मणाला, अग बायांनो, तुह्मी सगळ्या मंडळींनीं हिसका हिसक चालवून

त्या बिचाऱ्या नवरा बायकोचा फजिता मात्र मांडला आहे. कोण्या एखाद्या देवास किंवा साधूस यांनीं छळलें तर नाहींना ? किंवा यांच्याकडून एखादा नवस तर फेडायाचा राहिला नसेलना ? त्याची अगोदर आठवण करा. मला सांगाल तर मीही कांहीं पाहतों. यावरून सगळ्यांनीं एक ठराव करून कृष्णास पुढें आणिलें. त्यानें प्रथम उभयतांची मन मानेल तशी थट्टा करून नंतर त्यांस आकाशाकडे तोंड करून उभें राहण्यास सांगितलें, नंतर कृष्णानें कांहीं शब्द देवस्तुति केल्यासारखे करून त्या उभयतांकडून वदविलें कीं, इतःपर आम्हीं कोणास छळणार नाहीं, व पोरांची तर गोष्टच काढणार नाहीं. त्यानंतर कृष्णानें त्यांवर कृपादृष्टीनें पाहतांच ती गांठ सुटून, उभयतां सलज्ज होऊन घरांत पळून गेलीं. व कित्येक लोक कृष्णाची स्तुति करूं लागले.

कोणे एके दिवशीं प्रातःकाळीं एका गवळणीच्या घरीं कृष्ण जाऊन डोळे चोळीत उभा राहिला. तें पाहून ती गवळण ह्मणाली, लबाडा, सकाळींच रे कां येथें आलास? कांहीं खटला तर आणला नाहींसना ? कृष्ण बोलला, अग, मी रात्रीं कोठें गेलों होतों, तेथें सर्व रात्र जागरण झालें. असाच घरीं गेलों, तर आई लाल डोळे पाहून रागवेल ह्मणून येथें आलों आहें. जर तूं थोडें आंगावरील दूध डोळ्यांत घालावयास देशील तर तुझे मजवर फारच उपकार होतील. गवळण ह्मणाली, बाबा, एवढीच गोष्ट जर असेल तर याच वेळीं मी सहस्र कामें टेवून हें काम अगत्य पाहिल्यानें करितें. पण तुह्मी फारच प्रख्यात खोडयाळ आहां. तुझ्या आईस टाऊक आहेना ? नाहीं तर आतांच माझ्या

येथें घोळ पडेल. कृष्ण बोलला, अग तूं निर्धास्त ऐस. क्षण एक येथें पडून आतांच घरीं जातों. हें कृष्णाचें भाषण ऐकून ती बिचारी गवळण एकीकडे जाऊन एका लहान भांड्यांत आपला स्तन पिळूं लागली, हें पाहून कृष्ण बोलला, अग, असें दूध माझ्या उपयोगी नाहीं. वैद्यशास्त्रांत असें आहे कीं, जें दूध स्त्रियेच्या आंगावरील काढून डोळ्यांत घालावयाचें तें स्वहस्तेंच जर मिळेल, तरच त्याचा चांगला गुण नाहींपेक्षां कांहीं नाहीं. ह्मणून इकडे ये, मी आपल्या हातानें तुझ्या स्तनाचें दूध पिळतों. मजवर उलटें तुझेच उपकार होणार मग तुला काय. कृष्णाचें हें बोलणें ऐकतांच ती त्याचे पाठीस लागली. कृष्ण आंगण्यांत जाऊन ह्मणाला कीं, जर तुझ्या स्तनास दुसऱ्याचा हात लागता ना, तर तें मी तुझ्याच हातून घेतलें असतें. पण जर तेथें तुझ्या भ्रताराच्या हस्तानें मर्दन होत आहे, तर मी हात लावल्यास काय चिंता? ह्या शब्दावर ती गवळण कृष्णाच्या आंगावर धोंडे घेऊन धांवली; तेव्हां कृष्णानें तेथून पलायन केलें.

---

# अध्याय ८ वा.

## बाळलीला

आपल्याजवळ कृष्णाविषयीं गौळणींच्या अतर्क्य, अग्राह्य व असंभाव्य अशा अनेक कागाळ्या येतात, व त्याकरितां आपल्यास फारच त्रास पडून मुलगा खोडयाळ ठरतो; यास उपाय तरी काय करावा? ह्या विचारांत एके दिवशीं यशोदा स्तब्ध झाली असतां, पुराणाची वेळ झाली; तेव्हां तेथें ती कृष्णास घेऊन बसली. पुराणांत अशी गोष्ट निघाली

कीं, जर गणपतीचें व्रत केलें तर निपुत्रिक स्त्रियेस सगुण-संपन्न असा पुत्र होतो. आणि दुर्गुणी मुलाच्या आईनें जर हें व्रत केलें, तर तो मुलगा सुगुणी होतो. असें ऐकून यशोदेनें गजानन व्रत करण्याचें मनांत आणून उपाध्याकडून त्या व्रताचा निश्चय ठरविला. व कृष्णास बोलली कीं, कृष्णा, तुझ्यासाठीं मी हें व्रत करणार. तो गणपती विद्येचा व सद्गुणाचा दाताच आहे. तो तुला चांगला करील. कृष्ण बोलला कीं, खरेंच गं आई, हा वांकड्या सोंडीचा देव, खरेंच चांगला आहे, असें माझ्या ऐकण्यांत ही आलें आहे. आई बोलली, मुला, व्रत करून ज्या देवाजवळ क्षमा मागणार, त्या देवाच्याच थट्टेला त्वां आतां पासूनच प्रारंभ केला आहेस. कृष्ण बोलला, जसें तुह्मी माझीं वडील, तुह्मास मी कांहीं वेडेंवांकडें बोललों तर मी लेंकरूं ह्मणून माझा राग येत नाहीं, तसेंच देव हा आपला मायबाप, त्यास आपण लेंकरांनीं कसेंही बोललों, तथापि राग येईल असें कधींही होणार नाहीं. यशोदेची हें भाषण ऐकतांच खात्री झाली कीं, ही बुद्धि कांहीं सामान्य मनुष्याची नव्हे. हा परमेश्वर अवतारच आहे. इतक्यांत पुनः मायेनें भ्रमित होऊन कृष्णाचें चुंबन घेतलें. कृष्णानें देवाची पूजा मी करीन असें आईस सांगितल्यावर तिणें त्याचे फारच लाड केले. यशोदेनें व्रतास आरंभ केला, व मोठ्या खर्चानें उत्साह समारंभ केला. ही पूजा एकसारखी आठ दिवस चालली होती. त्यावेळीं कृष्णानें आईजवळ निचांत बसून ही पूजा केली. आईस बरें वाटावें, व तिचा विश्वास देवावर बसावा याकरितां कृष्णानें प्रौढपणा धरून खोड्या करणें अगदीं सोडून दिलें. यशोदेनेंही अशाकरितांच व्रत समाप्त कर-

ण्पाचें काम एक महिन्याच्या लांबणीवर घातलें. कृष्ण चांगला गुणी झाला असें पाहून, बहुत ब्राह्मण बोलावून त्या व्रताची समाप्ति केली. त्या दिवशीं प्रिय पक्वान्न मोदक लाडू करवून गणपतीची पूजाही फार चांगल्या रीतीनें केली. एक सहस्त्र लाडूंचा नैवेद्य गणपतीस समर्पण करावा ह्मणून एक हारा भरून लाडू मंदिरांत नेले व सर्वांस देवघरांतून बाहेर लाविलें. परंतु कांहीं वस्तु घरांत विसरल्यामुळें कृष्णास आंत ठेवून यशोदा घरांतगेली. कृष्णानें ही संधी राखून ते सर्व मोदक एकदम गट्ट केले. आई आल्यावर तो हारा रिकामा पाहून, कृष्णाच्यानें तर एवढे लाडू खाववणार नाहींत व तसेंच देवही खाणार नाहीं आणि लाडू तर गेले, अशा जरी कित्येक गोष्टी तिच्या मनांत आल्या, तथापि ती भ्रांतिपाशांत पडली; आणि कृष्णास बोलली कीं, अरे, या पाटींतील लाडू रे काय झाले? खरें बोल. कृष्ण ह्मणाला, आई, तू बाहेर गेलीस न गेलीस इतक्यांत एक बुवा उंदरावर बसून कित्येक मंडळी बरोबर घेऊन आला. आणि त्याणें ते लाडू आपण खाल्ले व सर्वत्रांसही वांटले. मी त्यास मला आई मारील, तुह्मी खाऊं नका, अशा रीतीनें बहुत प्रकारें बोललों; परंतु तो बोलला कीं, माझें नांव गणपती, हे सर्व मजकरितांच आहेत. आईस सांग कीं, गणपतीनें ते लाडू खाल्ले. आणि इतक्यावर जर तुझ्या आईनें तुला मारिलें, तर मी सोडवीन. असेंही त्याणें सांगितलें. यशोदा बोलली, अरे लबाडा, तुला तुझा गणपती सोडविणार तर ही मी तुला आतांच मारितें, येऊं दे सोडवायाला तुझा गणपती. कृष्ण हें ऐकतांच रडूं लागला. त्यानें रडण्याकरितां आपलें तोंड उघडिलें, तेव्हां त्याच्या

तोंडाकडे यशोदेच्यानें पहावेना. तोंडांत विराट स्वरूप व त्यापासून सर्व अवतार पाहिले. कौरव पांडव, गवळणी, गवळी, देव, दैत्य, ऋषि, व मोठमोठे सैन्यासह राजे तोंडांत आहेत, कंसास कृष्ण मारीत आहे, गोपी गोपाळांसह कृष्ण निराळेंच जागेंत खेळत आहे. ब्रह्मा, विष्णू व महादेव हात जोडून उभे आहेत. चंद्र सूर्य तर नेत्रतेजांत बुचकळ्याच देत आहेत. असें स्वरूप पाहिल्यावरून यशोदा घाबरून निचेष्टित पडली. कृष्णानें तिला सावध करून असा चमत्कार दाखविला कीं, लक्षावधि गणपती येऊन मोदक मोठ्या रुचीनें खात आहेत. हें पाहून यशोदा फारच घाबरली. इतक्यांत त्यांतून एका गणपतीनें यशोदेस सांगितलें कीं, मी तर मंगलमूर्ति खरा, पण माझी मंगलमूर्ति कृष्ण आहे. त्यास गुण मी काय आणावा. आईस कांहींशी भीति वाटून स्तब्ध राहिली आणि कृष्णावरून निंबलोण केलें. कृष्ण म्हणतो, सगळें खरें. देवानें लाडू खाल्ले. ब्राह्मणांकरितां तर केलेच आहेत. पण मला भूक लागली आहे, त्याचें काय करणार? यशोदेनें कृष्णास आंत नेलें आणि सर्व ब्राह्मणांस मोदक भोजन घालून कृष्णासही भरीवलें.

एके दिवशीं प्रातःकाळीं यशोदेजवळ बहुत गवळणी जमल्या असतां कृष्ण रडूं लागला. त्यास समजविण्याकरितां पुष्कळ इलाज केले, परंतु तो कांहीं केल्यानें ऐकेना. शेवटीं सर्व गवळणी त्यास घेऊं लागल्या परंतु कोणाजवळ जाईना. त्या वेळीं राधेनें कृष्णास बोलाविलें, त्यावेळीं कृष्णानें हास्यमुख केलें व तिजजवळ गेला. आईनेंही तिला सांगितलें कीं, कृष्णास घरीं घेऊन जा. दोन घटकांनीं घेऊन ये. रा-

घेनें कृष्ण घरीं नेला. आणि उभयतां एका खोलींत बसलीं असतां कृष्णरूपाकडे पाहून राधेस काम वासना होऊन बोलली, देवा, जर तूं मोठा असतास तर माझी इच्छा तृप्त करतास. तिची ही इच्छा जाणून कृष्णानें मोटें रूप घेतलें. मग त्या ब्रह्मानंदास काय विचारावें? उभयतां मनाप्रमाणें विषयसुखांत क्रीडत असतां, अकस्मात तिचा नवरा अनया बाहेरून आला, व कवाड बंद पाहून त्याणें तें टोकून हांक मारिली. हांक ऐकतांच राधा घाबरून कृष्णास लहान होण्याविषयीं विनंती केली. कृष्ण बोलला कीं, लहानाचें मोटें हें कधीं तरी कोणी होइलच, पण मोठ्याचें लहान होणें कठीण. हें ऐकून राधा खिन्न मनानें समोर दीन वदन उभी राहिली. नवरा तर दरवाजा उघडण्याची जलदी करूं लागला, तरी ही दार उघडीत नाहीं असें पाहून, 'कोण्या याराला रांडे घेऊन बसली आहेस, आतां दरवाजा फोडून तुह्मां उभयतांस मारितों.' अशीं वचनें कृष्णानें ऐकल्यावर आपण लहान रूप घेतलें. तेव्हां राधा त्यास दहींभात भरवीत बसली आणि ओरडून नवऱ्यास सांगितलें कीं, कृष्णास मी भरवीत आहें; क्षणभर दम धरा ह्मणजे मी त्यास आंचवून कडी उघडतें. राधेनें कित्येक चिमकुलीं भांडीं व खेळणीं तेथें मांडून कृष्णास आंचवल्यासारखें केलें. तिकडे अनया निरुपायानें स्तब्ध उभाच होता. नंतर त्यास दरवाजा उघडतांच तो संशयी मनानें क्रोधसंतप्त होत्साता मोठ्या आवेशानें घरांत आला. परंतु राधेच्या कडेवर कृष्ण पाहून त्याचेंही मन मोहानें द्रवलें, आणि कृष्णाचे मुके घेऊन बायकोसमागमें त्यास यशोदेजवळ पोहोंचविला. आणि नित्य कृष्णास जेवायास आणण्याची राधेस

ताकीद दिली. त्याप्रमाणें कृष्ण अनयाच्या घरीं नित्य येऊन मोठा होऊन राधेला भोग देत असे. परंतु ही गोष्ट बाहेर कोणासच ठाऊक नव्हती.

एके दिवशीं कित्येक गौळणींनीं यशोदेकडे जाऊन तिला सांगितलें कीं, राधेच्या घरीं कृष्ण मोठा होतो व तीं उभयतां विषय क्रीडा करितात. यशोदेनें न्यायाच्या जोरानें सर्वांस सांगितलें कीं, अशी वेड्यासारखी गोष्ट बोलून माझ्या मुलाविषयीं कागाळ्या आणूं नका. सर्व गवळणीस तर असें ह्मणून लाऊन दिल्या, परंतु त्या दिवसापासून कृष्णास राधेकडे पाठविण्याचें बंद केलें. व राधेनेंही कामाखेरीज आपल्या घरीं येऊं नये अशी तिला ताकीद दिली. त्यांच्या वियोगास फार दिवस झाले, असें एके दिवशीं राधेनें कृष्णास त्याच्या घरावरून जातां येतां खिन्न मुद्रेनें जाणविलें. एकदां राधा व कित्येक मवळणी दारावरून गेल्या असें पाहून आईची दृष्टी चुकवून, राधे मागें हळूच कृष्ण धांवत गेला व त्यांस यमुना तटीं गांटलें. तेथें मोठा होऊन त्या सर्व गवळणींशीं थट्टा आरंभिली. तो त्या सर्व मंडळींशीं थट्टेंत निमग्न आहे तों यशोदेस कोणी, कृष्ण यमुनेवर गेल्याची बातमी सांगितली. ती तेथें लगबगीनें गेली, परंत परब्रह्मरूप कृष्ण त्यास मानव यशोदेनें काय करावयाचें? ती येण्यापूर्वींच कृष्ण लहान होऊन राधेचें लुगडे ओढून 'माझा चेंडू चेंडू दे' असें मोठमोठ्यानें बोलून रडत होता. यशोदेनें विचारिलें कीं, लबाडा, तूं कां रे येथें आलास? कृष्ण बोलला कीं, आई, माझा चेंडू या राधेनें आपल्या घराजवळच घेतला. त्या साठीं मी तिचें नाना प्रकारें आर्जव करीत आहें तथापि ती तो देत नाहीं. राधा

बोलली, यशोदा बाई, हा लबाड बोलतो. याची आमची आज किती एक दिवस भेटच नाहीं. यशोदा ह्मणाली कीं, अग तुह्मी गवळणीच मोठ्या कंवटाळिणी आहां. तुह्मीच अपराध करून माझ्या मुलाच्या कागाळ्या आणतां. कृष्ण ह्मणाला, आई, जेव्हां तू आलीस कीं नाहीं, तेव्हां या राधेनें चेंडू आपल्या चोळींत लपविला. यशोदेनें तिजकडून चोळी सोडविली. त्यावेळीं कृष्ण टाळ्या पिटून हांसूं लागला. परंतु तेथें न सांपडल्यामुळें कृष्णास आई बोलली कीं, लबाडा, तूंच खोटें बोलतोस. तुलाच शिक्षा केली पाहिजे. कृष्ण बोलला कीं, इच्या चोळींत सांपडला नाहीं; कां कीं तो इणें लुगडयांत ठेविला असेल. जर तिच्या जवळ चेंडू नच सांपडला तर मी खोटें बोललों खरा. आतां इचें लुगडें फेड. यशोदेनें लुगडें झटकतांच चेंडू खालीं पडला. तो पडतांच कृष्ण आनंदानें टाळ्या पिटूं लागला. यशोदा राधेवर रागावली व त्या सर्व गवळणी अगदीं थक्क झाल्या. यशोदा कृष्णास घेऊन घरीं गेली. कृष्णानें राधेस खुणाविलें कीं, मी तुझा आहें. मी तुला अंतर देणार नाहीं. यशोदेनें कृष्ण घरीं आल्यावर त्यावरून मीठ मोहऱ्या उतरल्या.

एके वेळीं दिवसाचाच कृष्ण एके गवळणीच्या घरांत शिरला. आणि लोणी एकटाच खात आहे तों घरची मालकीण पाण्याला गेली होती, तिणें यास हळूच बसलेला पाहतांच मागून येऊन हातीं धरिला; आणि ह्मणाली, कीं, अरे लबाडा, नित्य अशा तू खोडया करून आह्मीच खोटें बोलतों असा उलटा दोष आह्मावर लावतोस. पण आतां तुला मुद्यावरच धरिला आहे; आतां तूं जाशील कोठें! चल आतांच

तुला यशोदेकडे नेतें. कृष्ण ह्मणाला, आईकडे नेणार त्यापेक्षां तूंच दोन तोंडांत मार, आणि मला सोड. पुन्हा मी तझ्या वाटेस कधींही जाणार नाहीं. ती बोलली कीं, ही गोष्ट आतां व्हावयाची नाहीं. तुला थेट तेथें पोहोंचविल्याशिवाय टेवीत नाहीं. कृष्ण बोलला, आतां तूं कशाला इतकी मेहनत घेतेस. तझ्या सुनेसच माझ्याबरोबर देईनास ! ती गवळण कृष्णास घेऊन यशोदेकडे चालली. वाटेंत पुष्कळ गवळणी मिळाल्या. त्याही नंद गृहीं निघाल्या. व कित्येक गवळीही गेले. आपल्या सुटकेविषयीं कृष्णानें त्या सर्वांचे बहुत आर्जव केले परंतु ते सर्व व्यर्थ गेले असें पाहून कृष्णानें अशी माया दाखविली कीं, तेणेंकरून सर्व चकित झाले. ह्मणजे जिकडे तिकडे कृष्णाच कृष्ण झाले. प्रत्येक गवळणीच्या हातांत एक एक कृष्ण. सर्वच यशोदेकडे फिर्यादीस आल्या असून, सर्व कृष्णांच्या मुखांस लोणी लागलेलें, व प्रत्येक गवळणीच्या हातांत एक एक गाडगें आहे. इकडे आंगण्यांत कृष्ण गोपाळांबरोबर विटी दांडू खेळतच आहे. दुसरे कित्येक नंदाचे आप्त आले. त्या सर्वांच्या हातांतही एकेक कृष्ण आहेच. यशोदेच्या मांडीवर ही कृष्ण. असें सर्व कृष्णमय पाहून सर्वांच्या मनाचा कांहीं चमत्कारिक ग्रह झाला; आणि सर्व गवळणी खिन्न होऊन आपापल्या घरास निघून गेल्या.

---

## अध्याय १ वा.

### नळ कुबेर उद्धार, कृष्ण लीला व नौका क्रीडा.

एके दिवशीं यशोदा कृष्णास घेऊन बसली असतां, घरांतील चुलीवर दूध तापत टेविलें होतें, तें उतल्याचा वास

आला. त्यासरिसेंच यशोदा लगबगीनें कृष्णास खालीं ठेवून आपण आंत जाऊन पहाते तों दूध सर्व फुकट गेलें. पुढें बाहेर आली. त्या अवकाशांत कृष्णानें सर्व दुभत्याचीं भांडीं उपडी घालून ठेविलीं. हें कृष्णाचें कृत्य पाहून यशोदेस फारच राग आला. आणि त्यास बांधून ठेवावा ह्या हेतूनें दोऱ्यांनीं त्यास ती उखळाशीं बांधूं लागली. परंतु त्रैलोक्यांतही यास कोणी बांधण्यास समर्थ नाहीं, हा विचार न करतां ती त्यास बांधूं लागली. पण दोऱ्या पुरेनात. शेवटीं रागानें घरांतील एकंदर दोऱ्या काढल्या, तथापि कार्य होईना. ह्मणून श्रमित झाली. हें पाहून कृष्णानें ती शेवटील दोरीच पुरविली. यशोदेनें या रीतीनें कृष्णास बांधून गच्च गांठ दिली. व आपण घरांत गेली. इकडे कृष्ण रांगत रांगत त्या उखळीसुद्धां आंगण्यांत गेला. तेथें दोन मोठे वृक्ष होते. त्यांमधून तें उखळ जातांच त्याचा धक्का त्या दोन्हीं वृक्षांस लागून, ते उन्मळून खालीं पडले आणि त्यांतून दोन ददीप्यमान पुरुष उत्पन्न होऊन कृष्णासमोर हातजोडून उभे राहिले. इकडे मोठा ध्वनि झाला, असें ऐकतांच यशोदा बाहेर येऊन पाहते तों दोन झाडें पडून कृष्णापुढें दोन पुरुष हात जोडून उभे आहेत; असें पाहून ती स्तब्ध राहिली.

त्यावृक्षांतून जे दोन पुरुष निघाले, त्यांणीं कृष्णास विनंती केली कीं, महाराज, आह्मी नळ व कुबेर या नांवाचे दोन उन्मत्त गंधर्व होतों. आह्मांस अति गर्व झाल्यामुळें नारद ऋषीचाही एक वेळ आह्माकडून अपमान झाला, त्यावेळीं त्यांणीं आह्मांस 'वृक्ष व्हाल' असा शाप दिला. परंतु आह्मी शरण गेल्यावर, जेव्हां आपल्यास आपली यशोदा माता बांधील व आपल्या पायाचा धक्का त्या वृक्षांस लागेल त्यावेळीं पूर्व देह

पावाल असा त्यांनीं उःशाप दिला. त्याप्रमाणें आज आम्ही आपल्या मातुश्री देखत पावन झालों. इतकें बोलून त्यांणीं स्वस्थळीं जाण्यास कृष्णाची आज्ञा मागितली. व कृष्णानेंही उजवा हात उचलून माननें खुणाविलें. त्यासरिसे दोघेही गंधर्व यशोदेस व कृष्णास साष्टांग नमस्कार करून दिव्य विमानांतून स्वर्गास गेले. यशोदेचें मन या वेळेस असें काहीं झालें कीं, तिजला कांहींच सुचेना. हस्तपादादि अवयवांची गति ही राहिली. असें पाहून कृष्णानें तिजकडे पाहिलें तों यशोदा पुनः पूर्वस्थितीवर येऊन मायाजाळांत गुंतल्यासारखी झाली. आणि कृष्णास कांहीं तरी अपाय झाला असेल, ते केवढे मोठे पुरुष आले होते, त्यांणीं काय त्या मुलास केलें असेल, तें पहाण्याकरितां जवळ आली. कृष्णास कांहीं लागलें नाहीं असें पाहून त्यास आंत घेऊन गेली व त्याजकडून देवास नमस्कार करविला व त्यावरून मीठ मोहऱ्या ओंवाळून टाकल्या.

एके रात्रीं सर्व गोपाळ चोरीस निघाले, त्यावेळीं सर्वांनीं कृष्णावर रुसवा करून विनंती केली कीं, ज्या त्या वेळीं आह्मास श्रम व मार सोसावा लागतो ; व तूं आपला गारोड्यासारखा पळून जातोस. ह्मणून आह्मी तुझ्या समागमें येतच नाहीं. परंतु कृष्णानें सर्वांचें समाधान करून त्यांस माध्यान्हीस एका गवळणीकडे नेलें, आणि सर्व कवाडें बंद असतां गोपाळांस डोळे मिटण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सर्वांनीं करतांच जेथें दुभत्याचीं भांडीं होतीं तेथें सर्व गोपाळ आहेत असें सर्वांनीं पाहिलें. मग मोठ्या आनंदानें यथेच्छ दूध, दहीं, ताक, लोणी, व साई इत्यादि खाऊन ढेकर दिले. व पुनः डोळे मिटण्यास सांगून एकंदर

मडळी रस्त्यावर जाऊन उभी राहिली. त्या वेळीं कृष्णाचा एक परम मित्र पेंदा या नांवाचा होता. त्याचे मनांत कृष्ण डोळे मिटण्यास सांगितल्यावर मग काय कपट करितो तें आपण पहावें, असें येऊन येते वेळीं किंचित डोळे उघडे ठेविले. तेव्हां वरकड सर्व बाहेर गेले व तो मात्र आंत राहिला. इतक्यांत कांहीं आवाज ऐकून गवळणी जाग्या झाल्या, तों त्यांणीं पेंद्यास दुभत्याच्या खोलींत पाहून सर्व मिळून त्यास मारूं लागल्या. त्या वेळीं त्यानें कृष्ण स्मरण करितांच तोही मंडळींत बाहेर आला. इकडे गवळणींनीं दुधादह्यांचीं भांडीं सर्व फोडून छिन्न भिन्न केलीं आहेत, व गोरसही जिकडे तिकडे उडविलें आहे असें पाहून तेवढ्या रात्रीं त्या मडक्याच्या खापऱ्या हातांत घेऊन नंदाकडे फिर्यादी आल्या. मध्य रात्रीचा समय असून सर्व लोक सुस्त निजलेले अशा संधीस गवळणी नंद गृहीं आल्या असें पाहून पहारेकऱ्यांनीं नंदास व यशोदेस उठवून त्यांची दाद लाविली. त्या सर्वांची फिर्याद ऐकल्यावर नंदानें कृष्ण पाहिला तों आंथरूणावर आहे. तसेंच कित्येक सेवकांकडून गोपाळ, पेंदा इत्यादि सर्वांचा शोध त्यांच्या घरांत करविला तों ते सर्व घरींच आहेत असें ऐकून त्या गवळणींचा त्यानें निषेध केला. नंतर कित्येक लोकांनिशीं नंद त्या गवळणीकडे गेला, व पहातो तों दारांस कुलुपें लागलीं आहेत. नंतर आंत जाऊन पहातात तों सर्व भांडीं बरोबर असून सर्वांत दूध, दहीं, लोणी, गच्च भरलेलें आहे. तेव्हां त्या खापऱ्या अर्थात दुसऱ्या मडक्याच्या फोडून कृष्णाच्या आंगीं लबाडी लावावी याचकरितां गौळणींनीं आणल्या असें झालें. पेंद्यास मारलें असें त्यांणीं सांगितलें हो-

तें, परंतु पेंद्यानें ह्मटलें कीं, मी काल रात्रौ मुळींच घराबाहेर पडलों नाहीं. तशांत त्याच्या घरच्या मनुष्यांनीं देखील तशी साक्ष दिली. तेव्हां सर्वच म्हणणें खोटें पडलें. व गवळणी घाबरल्यासारख्या होऊन नंदास शरण आल्या. नंदानें त्यांस चांगला उपदेश केला व आपल्या घरीं आला.

एके रात्रीं कृष्ण एका गवळणीकडे जाऊन सर्व निद्रिस्त आहेत असें पाहून तिच्या सुनेशीं व्यभिचार कर्म करूं लागला. बांगड्यांचा आवाज ऐकून ती म्हातारी गवळण जागी झाली. आणि तिनें सुनेच्या व्यभिचाराविषयीं मनांत आणिलें. तिनें हळू हळू अंधारांतून त्या अंथरुणावर जाऊन कृष्णास हातीं धरिलें, आणि यथेच्छ ताडण करून बांधून ठेविलें. कृष्णानें तिचे फारच आर्जव केले परंतु तिणें त्यास सोडलें नाहीं. तिणें सांगितलें कीं एक तुह्मी तरी अपराधी, नाहीं पेक्षां आह्मी तरी अपराधी होऊन गोकुळां-तून निघून जाऊं. प्रातःकाळ झाल्यावर एका हातांत आपल्या सुनेस व दुसऱ्या हातांत कृष्णास धरून लगबगीनें चावडीवर चालली. वाटेंत शेंकडों गवळी व गवळणी ति-च्या मागें जमल्या. त्या सर्वांस वाटलें कीं, ही ह्मातारी गवळण आपल्या मुलास व सुनेस घेऊन चावडीवर कां चालली आहे. इकडे या गवळणीस वाटलें कीं, आपली आज फजिती झाली तरी चिंता नाहीं. पण एवढ्या मंडळी समक्ष कृष्ण अपराधी अशी खात्री एक वेळ यशोदेची हो-ऊं द्या. अशा थाटानें ती ह्मातारी यशोदेजवळ जाऊन उभी राहिली. तिला यशोदेनें विचारिलें कीं, कां बाई, तु-झ्या मुलानें व सुनेनें काय तुझा अपराध केला कीं त्यांस तू चावडीवर आणिलेंस. ह्मातारी ह्मणते, हा माझा मुलगा

नव्हे. हा तुमचाच चोरटा व छिनाल कृष्ण आहे. आजच्या माझ्या फजीतीवर ही लक्ष न देतां माझ्या सुनेशीं व्यभिचार कर्म करीत असतां धरून दोघांसही मी येथें आणिलीं आहेत. हें ऐकून शेकडों मनुष्यें त्या ठिकाणीं जीं जमलीं होतीं त्यांस आश्चर्य वाटलें. आणि कित्येकांनीं तिला फजीत केल्यावर, यशोदा ह्मणाली, कीं, बायांनो, आतां मात्र तुमची पराकाष्ठाच झाली. अग हा कृष्ण नव्हे, तुझा मुलगाच आहे, हें आतां तुला चौघां देखत आणखीं दाखवितें. असें ह्मणून कृष्णास आंतून हांक मारून तिच्या पुढें उभा केला. त्या वेळीं ती ह्मातारी आपल्या हातीं धरलेल्या कृष्णाकडे पाहूं लागली, तेव्हां तिलाही तो तिचाच मुलगा, व दुसऱ्या हातीं तिचीच सून दिसली. मुलास नंदानें विचारतां त्याणें सांगितलें कीं महाराज, मी आपल्या बायकोशीं रात्रौ रममाण असतां माझ्या आईनें कृष्ण कृष्ण ह्मणून मला धरून बडविलें; व रात्रभर बांधून ठेवून सकाळीं मला या फजीतीस पात्र केलें. पुढें असेंही ह्मणाला कीं, आपल्या जवळ जर मथुरेहून अशी राजाज्ञा आली असेल कीं नवऱ्यानें आपल्या बायकोशीं संग करूं नये; तर मात्र मी अपराधी खरा. इतकी फजिती झाल्यावर ती ह्मातारी गवळण निमूटपणें खालीं मान घालून यशोदेच्या पायांवर मस्तक ठेवून घरीं चालती झाली.

एके दिवशीं कृष्णाच्या मनांत असें आलें कीं, गवळणींसह नौकेंत बसून जलक्रीडा करावी. ह्मणून यमुना तिरावर कित्येक तरुण व सुंदर गोपी जमवून, त्यांसह एका नौकेजवळ तो गेला. परंतु तेथें नावाडी नव्हता, या साठीं कृष्णानेंच तें कृत्य स्वतःवर घेऊन गोपींस आंत बसवून

नाव पाण्यांत लोटली. ती नौका मध्य भागीं गेल्यावर अकस्मात मोठा वारा सुटून पाण्याचा भयंकर उसाळा चालला. तेव्हां सर्वांनीं घाबरून नानाप्रकारें देवांची आर्जवयुक्त गाणीं ह्मटलीं व सर्वांस आश्वासन ही कृष्णानें दिलें; तथापि जेव्हां घाबरून गोपींनीं आकांत मांडला, तेव्हां कृष्ण बोलला कीं, पहा भयंकर अडचणीचा प्रसंग जर प्राप्त झाला, तर मनुष्यानें आपल्या लज्जेचाही त्याग केला पाहिजे. तोच समय हा आहे. ह्मणून तुह्मी सर्व गोपींनीं आपलीं लुगडीं फेडून व चोळ्याही काढून नावेच्या फुटक्या भागांत भराव्या, ह्मणजे सर्व अरिष्ट टळेल. गोपींनीं विनंती केली कीं महाराज, आपणच विघ्न कर्ते व हर्ते, व आपलें वचन मोडील असा प्राणी या त्रिभुवनांत नाहीं. मग आमची कथा काय! आम्ही हात वर करून उभ्या राहतों. आणि आपण आपल्या इच्छेप्रमाणें पाहिजे तर स्वहस्तें आमचीं वस्त्रें सोडून घ्यावीं. लज्जा हरण करणें किंवा राखणें हीं दोन्हीं आपणाकडेसच आहेत. असें ह्मणतांच कृष्णानें कृपादृष्टीनें पाहिलें, तों वायु शांत होऊन नौका क्षणांत तीरास येऊन लागला. तेव्हां सर्व गवळणी उतरून घरोघर गेल्या.

---

## अध्याय १० वा.

### यमुना व ब्रम्हदेव गर्वहरण.

कृष्णानें सवंगडे जमवून नित्य नवे नवे डाव योजून तितकेही खेळावे, व गोपाळांचीं मनें खुष राखावीं. तसेंच सर्व खेळगड्यांच्या शिदोऱ्या एके ठिकाणीं करून मोठ्या स्वादानें खाव्या. एके दिवशीं गोपाळ यमुनेच्या तटाकीं खेळत असतां, कृष्णाचा आवडता मित्र पेंदा यास तहान

लागल्यामुळें, तो यमुनेवर येऊन पाणी पीत असतां पाण्याचा खळाळ ऐकून त्यास वाटलें कीं, पाणी हें निर्जीव असून आपल्या पेक्षां शब्द अधिक मोठ्यानें करितें! तर आपण हीं त्यास हटवूं, असें ह्मणून त्या आवाजासारखी आपण सर्व सोबत्यांस विसरून हुंबरी घालूं लागला. त्यास फार वेळ झाला ह्मणून त्याच्या शोधास कृष्णानें कित्येक गोपाळ पाठविले. तेही येऊन पेंद्याबरोबर हुंबरी घालूं लागले. हें पाहून राहिलेल्या संवगड्यांनिशीं कृष्ण तेथें आला. तोही त्यां-समागमें हुंबरी घालूं लागला. अशी हुंबरी फार वेळ चालली, आणि अशीच कांहीं वेळ चालेल तर सर्वांचे प्राण जा-तील, असें कृष्णास वाटून त्याणें आपल्या मुरलीचा मंजुळ ध्वनी केला. तो ऐकतांच यमुनेचें पाणी अगदीं स्थिर झालें. तेव्हां हें कृत्य आपण हुंबरीनें केलें असें सर्व गोपाळांस वाटून ते आनंदानें निघून गेले.

एके वेळीं ब्रह्मदेवास असें वाटलें कीं, श्रीकृष्ण हा पूर्ण अवतार आहे किंवा कसें याची परीक्षा पहावी. मग ज्या वनांत कृष्ण, गाई, गोप व वासरें गेलीं होतीं, त्या वनांत तो गेला. सर्व गोपाळ दोनप्रहरीं निद्रिस्त झाले ह्मणजे त्यांस कृष्णानें तिसऱ्या प्रहरीं जागें करून नंतर सर्वांनीं शिदोऱ्या खाव्या ही त्यांची वहिवाट असे. त्याप्रमाणें ते एके दिव-शीं निद्रिस्त होते, ही संधी पाहून, ब्रह्मदेवानें ते गोप, गाई, वासरें इत्यादि सर्वांस सत्य लोकास नेऊन ठेविलें. इकडे कृष्ण त्या जागेजवळ येऊन पहातो तों कोणीच तेथें नाहीं. व गाईही नाहींत. तेव्हां हें कृत्य ब्रह्मदेवानें केलें असें जा-णून कृष्णानें, जितकें नेलेलें तितकें नूतन निर्माण केलें. व नेहमीप्रमाणें गोपाळांस उठवून न्याहाऱ्या खाऊन झाल्या-

वर गोपाळ व गाई घरोघर लागल्या. या रीतीनें एक संवत्सर लोटला. ब्रह्मदेवास हें सर्व कळलें. व त्याणें नंदाच्या घरीं येऊन कृष्णचरणीं मस्तक ठेवून त्याच्या हस्तगत सर्व गोपाळ व गाई केल्या.

एकाएकीं ब्रह्मदेव येऊन कृष्णाच्या पायां पडला, यावरून, व त्यानें आणलेले गोपाळ सत्यलोकांतील आपली बरदास्त ठेवण्याच्या व मिष्टान्नाच्या गोष्टी सांगत त्या ऐकून नंद यशोदा भ्रमसागरांत पडलीं. इतक्यांत नूतन उत्पन्न केलेले गोपाळ व गाई सर्व एकाएकीं गुप्त झाल्या. ब्रह्मदेवानें नंद यशोदेस सर्व वर्तमान सांगितलें.

---

## अध्याय ११ वा.

### काळिया मर्दन व अग्नि भक्षण.

एके दिवशीं कृष्ण आपल्या गोपाळांसह यमुनेवर खेळत असतां दोनप्रहरची वेळ होऊन खेळाच्या श्रमानें गोपाळ तृषित झाले. परंतु कृष्णानें सर्वांस सांगितलें कीं, या यमुनेंत एक दुष्ट काळिया सर्प रहातो म्हणून तें पाणी पिऊं नका, प्यालेत तर अनर्थास कारण होईल. कित्येकांनीं या वचनावर भरंवसा ठेविला आणि कित्येकांस वाटलें कीं, आपलीं सर्व संकटें कृष्णाचे परिहार करणार, तेव्हां आपणास त्याची काळजी कशास पाहिजे? अशा विचारानें त्यांणीं तें प्राशन केलें. तें मुखांत जातांच लागलेच ते गत प्राण झाले. त्यांच्या समाचारास कृष्ण संगड्यांसह तेथें आला, आणि आपल्या संगड्यांची या प्रमाणें अवस्था पाहून त्यास क्रोध आला. जरी हे गोपाळ आपलें न ऐकतां पाणी प्याले, तथापि माझ्या भक्तांस काळियानें मारावें कसें? या करितां

कृष्णानें कालियाचा सूड उगविण्याचा निश्चय केला, आणि पितांबराची कांस मारून कळंबाच्या झाडावर चढून डोहांत उडी टाकण्याची तयारी केली. हें पाहून सर्व गोपाळांनीं त्याच्या सभोंवती मिळून विनंती केली कीं, कृष्णा, असें तूं सहास कर्म करूं नको. एक तर तूं मरशील व आह्मांला अंतरशील. आणखी तुझ्या आईबापांचाही आह्मांस शब्द लागेल. कृष्ण ह्मणाला कोणतीच गोष्ट विपरीत होणार नाहीं. तुह्मी मला जाऊं द्या. मी आतांच जाऊन त्या दुष्टाचा संहार करून परत येतों. कृष्ण वारंवार मोठाच नेट करितो असें जाणून सर्वांनीं त्यास घट्ट मिठ्या मारिल्या. परंतु कृष्ण परमात्मा त्यास या गोपाळांची धरण्याची शक्ति काय! त्याणें जोरानें आपली मुक्तता करून त्या कळंबाच्या झाडावर चढला, व आपल्या गळ्यांतील माळ सांवरून धरिली. गोपाळांनींही झाडावर चढून व कृष्णास धरण्याचा निरुपाय पाहून कृष्णास शेवटची विनंती केली कीं, गड्या, गेले ते तर मुक्तच झाले; परंतु आह्मींही तजवरून आपला प्राण ओंवाळून टाकतों. परंतु आतां तूं हें भयंकर कर्म न करितां परत येऊन आह्मांस यश दे. कृष्णानें हें कांहींच न ऐकतां त्या भयंकर डोहामध्यें उडी टाकिली. गोपाळांनीं हें पहातांच रडून मोठा हलकल्लोळ केला. कित्येकांनीं आपलीं मस्तकें जमिनीवर आपटलीं. व कित्येकांनीं मोठाच शोक केला. याप्रमाणें कित्येक तेथेंच राहिले व कित्येकांनीं शहरांत जाऊन यशोदा, नंद, बळिराम इत्यादिकांस यमुना तीरीं आणिलें. तेव्हां तेथें इतकी गर्दी झाली कीं, गोकुळांतील सर्व पुरुष व बायका ज्यांस हें वर्तमान कळलें, तीं सर्व तेथें आलीं. व एकच दुःखाची आरोळी झाली.

यशोदा आपलें वक्षस्थळ बडवून ह्मणाली कीं, लाडक्या कृष्णा, तुझें आईपण मला अगदीं शोभत नाहीं. मजपासून तुला वारंवार ताडन झालें ह्मणून, किंवा माझ्या वाईट शब्दानें तला राग येऊन हें अघोर कर्म केलें असशील, परंतु खचित सांगतें कीं, या वेळेस माझा अपराध क्षमा कर. फिरून तुझ्या अंगास मी बोटही लावणार नाहीं. नंद बोलला, माझ्या कृष्णा, तं देवाचा अवतार. अनेक अलौकिक असे प्रकार मला दाखविलेस. आणि मी यःकश्चित् गोकुळाचा पाटील तझा बाप ह्मणवितों. ह्मणून तुला वाईट वाटून हें कर्म केलेंस असें मला वाटतें, पण आतां मजवर दया करून एक वेळ भेट दे. गोपाळ बोलले, हे भगवंता, तुझी माया व लीला न जाणतां आह्मी हीन जात गवळट यांणीं तुजजवळ खेळावें, व खेळतां खेळतां तुला मारलें ही असेल, त्यासाठीं आह्मांस तूं टाकून गेलास. अरे, आमच्या मैत्रीची कांहींच तुला आठवण नाहींशी झाली काय? बरें, तूं एक वेळ आह्मांस क्षमा कर. फिरून आह्मी तुझा मान राखूं. गवळणी बोलूं लागल्या अरे कृष्णनाथा, आह्मीं यःकश्चित गवळणींनीं तुजवर नानाप्रकारचीं बालंटें घेतलीं व तुझ्या आईजवळ चहाड्या सांगितल्या, त्यासाठीं आह्मांवर राग धरला असशील; तर तूं एक वेळ भेट मात्र आह्मांस द्यावी. तुझी पुनः कधींच आह्मी गोष्ट बोलणार नाहीं. सर्वांची प्रार्थना झाल्यावर बळरामानें सप्रेम प्रार्थना केली कीं, गोपाळकृष्णा, तुझ्यासमागमें मी कांहीं खेळ खेळण्यास आपली संमती न दिल्यामुळें, तूं मजवर इतका रुष्ट झालास काय? तुझीं आईबापें दीनवदन होत्सातीं येथें रडत आहेत, कारण तुजखेरीज त्यांस दुसऱ्या कोणाचीच आशा नाहीं आणि

तुझ्या संगती खेळणारे बाळ गोपाळ येथें कसे म्लान वदन होऊन उभे आहेत. असे सर्वांचीच दृष्टि त्या पाण्यावर लागली आहे. तुझे गुण, तुझी लीला, तुझी कीर्ति व तुझें अवतार-चरित्र हें कोणीच जाणत नाहीं. परंतु बांधवा, आतां अंत कोणाचाच न पाहतां, आपण अवतार कोणत्या कारणासाठीं घेतला आहे, याचा तरी विचार करावा. कंस, चाणूर, मुष्टिक आदिकरून दुष्ट राक्षस अति उन्मत्त झाले आहेत. सद्भक्त ही संधी लक्षून तुझा स्तव करीत आहेत. तात्पर्य आपणांस अझून पुष्कळ कृत्यें करावयाचीं आहेत, तेव्हां आतां विलंब न लावितां वर येऊन सर्वांचें दुःख दूर करावें. बळराम हे असे मार्मिक शब्द बोलत होता परंतु सर्वांस ती नुसती प्रार्थनाच वाटली. आणि सर्वांचे कान त्याच्या स्तुतीकडे व डोळे पाण्याकडे होते. ही प्रार्थना संपत आहे, इतक्यांत पाण्यास एक वेळ उसाळा येऊन त्यांतून रक्ताचा लोट बाहेर आला. सर्वांनीं तो रक्त प्रवाह पाहतांच, हा काय चमत्कार आहे हें बळिरामाशिवाय कोणाच्याच मनांत न येतां, कृष्णाच्या मरणाची सर्वांस कल्पना येऊन दुःखाची एकच आरोळी झाली. बळरामानें सर्वांस सांगितलें कीं, आतां आपलें काम झालें. तुह्मी मजवर विश्वास ठेवून स्वस्थ असा. बळरामाच्या वचनावर विश्वास ठेवून एकंदर मनुष्यें त्याच स्थळीं दुःख निद्रेनें व्याप्त झालीं. बळरामाच्या मार्मिक भाषणावर कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं.

आतां डोहांतील वृत्तांत असा झाला कीं, ज्यावेळीं कृष्णानें उडी टाकिली त्यासरसा तो काळिया गृहीं गेला. त्याचें रूप पहातांच मुरली असलेली व कोटी सूर्यासारखी प्रभा पाहून नाग कन्या अति लुब्ध झाल्या. आणि त्यास मो-

ल्या मानानें बसवून आगतस्वागत केलें व आपण कोण व या घोरस्थळीं येण्याचें कारण विचारिलें. कृष्ण बोलला कीं, मी गोकुळांतील एका गवळ्याचा पोर आहे. माझे सवंगडी या डोहाचें पाणी पिऊन मृत्यु पावले, त्याचा सूड उगविण्याकरितां मी येथें आलों आहें. नागकन्यांनीं हात जोडून विनंती केली कीं, आपलें अल्प वय आहे व आपण या दुष्ट सर्पाचा प्रताप न जाणतां अशी हाव धरून येथें आलां असाल; परंतु हा हेतु सोडून आपण आल्या मार्गानें काळमुखीं न पडतां मागें जाऊन आपल्या मातापितरांस भेटावें. कदाचित परत जाण्यास आपल्यास संकट व भीति वाटत असल्यास आह्मांतील एक आपल्यासमागमें येऊन आपल्यास वर पोहोंचवील. आपल्या लावण्य रूपाच्या दर्शनाने आज आमचें खरोखर जन्म साफल्य झालें असें जाणून, आपला जीव दुःखांत न पडावा याकरितां ही विनंती करितो. आपली इच्छा असल्यास येथील कांहीं उत्तम वस्तुही आपल्यास देतों. तेव्हां कृष्णानें त्यांस सांगितलें कीं, माझे संवगडी मेलेले जर तुह्मी जीवंत करीत असाल तर मात्र मी आल्या मार्गानें परत जातों, कारण मला दुसरी इच्छाच नाहीं. मग बिचारा काळिया राहिना कां जिवंत! परंतु जर अशी गोष्ट न होईल तर त्याशीं युद्ध करून त्याचा प्राण घेतल्याशिवाय मी येथून जाणार नाहीं. नाग कन्या ह्मणाल्या कीं, ती गोष्ट काळाच्या तर काय परंतु ब्रह्मदेवाच्याही हातीं नाहीं. एक परमेश्वर मात्र ती करील. आणि आपण मोटमोठ्यानीं बोलतां, या शब्दाच्या आवाजानें जर तो चांडाळ उठला तर आपली विपत्ति आह्मांस आतांच पहावी लागेल; याकारितां हा नाद सोडा. याजवर कृष्णानें कांहींच

उत्तर न करितां आपला वेणू वाजविला. तो ध्वनि ऐकतांच कालिया मोठ्या क्रोधानें बाहेर आला, परंतु कृष्णाची गोजिरवाणी सांवळी मूर्ति पहातांच त्याची दुष्ट बुद्धि जाऊन त्यास मोठ्या नम्रपणानें विचारितो कीं, मुला, तूं कोण आहेस व येथें कां आलास? आणि तू मोटा पराक्रमी व साहसी दिसतोस. तुला मारण्यासाटीं मी बाहेर आलों, परंतु मला तुला तारण्याची बुद्धि झाली आहे; ह्मणून जी तुला प्रिय माझ्या घरची वस्तु पाहिजे ती घेऊन आल्या मार्गानें जा. मी तुला स्वतः वर नेऊन पोहोंचवितों. कृष्ण बोलला कीं, मला आवडती वस्तु देण्यास तुझ्या स्वाधीन काय आहे? आतां तुलाच मी काय देतों तें पहा. कालिया हे शब्द ऐकतांच काळासारिखा खवळून मोठ्यानें फूत्कारून कृष्णावर धांवून आला. परंतु त्या मुरलीच्या मोहक ध्वनीनें मोहित व भ्रमित होऊन भलत्याच दिशेस जाऊं लागला. शेवटीं मोठ्या त्वेशानें त्याणें कृष्णाच्या अंगास वेढे घातले. कृष्णानें आपलें अंग फुगविलें, त्यासरसे सगळे अंगांतील मणी विगलित होऊन व तो गर्भगलित होऊन तोंडानें गरळ वमूं लागला. त्याच्या श्वासोश्वासांनें पाणी अत्युष्ण झालें, व तो कासावीस झाला. त्यावेळीं कृष्णानें उडी मारून त्याच्या मस्तकीं आरोहण केलें. आणि लागलाच एक पाय मस्तकावर व एक पाय पुच्छावर दिला. हातानें त्यास धरून मरली वाजवीत त्याणें तांडवनृत्य आरंभिलें. त्यावेळीं मात्र कालियाचे पंच प्राण व्याकूळ होऊं लागले. अशी आपल्या पतीची अवस्था पाहून नाग पत्न्यांनीं आपल्या हातांत पंचारती घेऊन मोठ्या प्रेमानें कृष्णास ओंवाळिलें, व विनंती केली कीं, देवा, तूं परमेश्वर असतां तला यःकश्चित मानून

आह्मीं आपल्या पतीची तुजजवळ प्रतिष्ठा वर्णन केली. परंतु परिणामीं पतिप्राण कामावीस झाला असें पाहून विशेष वर्णन न करितां प्रथम येवढीच प्रार्थना करितों कीं, आमच्या पतीस प्राण दान व आह्मांस चुडे दान द्यावें. कृष्णास त्यांची दीन वाणी ऐकून दया आली, व काळियास सोडिला. तो मोकळा होतांच कृष्ण चरणीं मस्तक ठेवून आज्ञेची वाट पाहूं लागला. कृष्णानें त्यास तेथून एका दुसऱ्या स्थळीं जाण्याची आज्ञा केली. व ज्या गरुडाच्या भयानें काळिया यमुना डोहांत लपून होता त्यापासूनही त्याचें भय दूर केलें. नंतर काळियावर बसून कृष्ण जळा बाहेर आला.

इकडे यशोदा, नंद, बळराम, गोप, गोपी व गोकुळांतील सर्व लोक मोठा शोक करून कृष्णाची वाट पहात होते. त्यांपैकीं सर्वांस दुःख निद्रेनें व्यापिलें. एकटा बळराम मात्र जागा होता. इतक्यांत पाण्यांतून मुरलीचा मंजूळ ध्वनि श्रवणीं पडतांच कृष्णाचें आगमन ओळखून त्यानें सर्वांस सावध करून उठविलें, तों कृष्ण भुजंगावर तांडव नृत्य करीत आहे, मुखानें मुरली वाजवीत आहे आणि नागपत्न्या कृष्णस्तुति करीत आहेत असें सर्वांनीं पाहिलें. मग ज्याप्रमाणें कमला भोंवतीं भ्रमर जमतात त्याप्रमाणें गोपाळांनीं प्रथम कृष्णास वेष्टिलें आणि ह्मणूं लागले अरे, खालीं उतर, तो साप तुला चावेल. तुझ्या मुरलीच्या ध्वनीनें तो भुलला आहे तों उडी टाकून आमचेकडे ये. कृष्णानें सर्वांस सांगितलें कीं, तुह्मीं स्वस्थ येऊन मला भेटावें, याला कांहीं एक भिऊं नका. हा काळिया आपला आहे. यानंतर कृष्णास सर्व भेटले. गवळणींनीं चरणीं मस्तक ठेविलें. यशोदा ह्मणाली, कृष्णा, अरे तुला भेटण्याकरितां माझे बाहु स्फुरण पावत

आहेत. हें प्रेमवाक्य ऐकून कृष्णानें खालीं उडी टाकून आईबापांस कडकडून भेटला. बळरामाच्या गळ्यास मिठी मारिली. आणि काळिया गृहाचें वर्तमान सर्वांस सांगितलें. तें ऐकत व आनंदांत डुलत सर्व जन त्या रात्रीं तेथेंच राहिले.

तीन प्रहर रात्रीच्या सुमारास कित्येक उठून गोकुळांत जाण्याची तयारी करितात, तों चहूंकडून मोठा अग्नि लागून आपण आंत सांपडलों आहों असें पाहून सर्वांस भीतीनें उठविलें; आणि गोकुळांत जाण्यास कोठूनच मार्ग नाहीं असें पाहून सर्व कृष्णास शरण गेले. आणि ह्मणाले हे सर्वेश्वरा, तूं भक्त भयनाशक व करुणासागर आहेस. आह्मीं पामरांनीं तुझे अनंत गुण काय वर्णावे! नंतर कृष्णानें सर्वांस डोळे मिटण्यास सांगितलें. तसें होतांच विशाळ मुख पसरून कृष्णानें बारा गांवें अग्नि गिळून मार्ग मोकळा केला. त्या वाटेनें सर्व जन आनंदानें घरीं आले. कृष्णानें काळियास व त्याच्या स्त्रियांस आशिर्वाद देऊन सांगितलेल्या ठिकाणीं पाठवून दिलें.

---

# अध्याय १२ वा.

## गोवर्धनोद्धारण व व्योमासुरादि वध.

एकदां गोकुळांत नानाप्रकारचीं दुःश्चिन्हें व्हावयास लागलीं. अग्नि लागले, अवर्षण पडलें, तेव्हां याचें कारण काय असें कृष्णानें विचारिलें असतां सर्वांनीं सांगितलें कीं, ह्या सर्व अरिष्टांचा कर्ता इंद्र आहे. त्यास प्रति वर्षी आपण वनांत जाऊन नैवेद्य अर्पण करीत असतों. ह्या वर्षी ती वेळ चुकून कांहीं दिवस गेले आहेत, ह्मणून हीं दुःश्चिन्हें

होतात. कृष्ण आपल्या संवगड्यांसहवर्तमान खेळत असतां, किती एक संवगड्यांनीं येऊन कृष्णास सांगितलें कीं, आज घरोघरच्या बायका पक्वान्नें करण्याच्या उद्योगांत आहेत; आणि तुझी आईही करंज्या लाडू इत्यादि पदार्थांचे हारेच्या-हारे तयार करवीत आहे. कृष्णानें हें लागलेंच जाऊन आईस विचारिलें. तेव्हां तिनें सांगितलें कीं उद्यां वनभोजन इंद्रास अर्पण करण्यास, वार्षिक सांप्रदायाप्रमाणें, सर्वांस रानांत जाणें आहे. कृष्णानें विनंती केली कीं, गोवर्धन पर्वतापासून आपल्यास व आपल्या सर्व जनावरांस फार हित होतें: ह्मणून इंद्रापेक्षां त्या पर्वतासच नैवेद्य समर्पण करावा व आपण तेथेंच जेवावें हें मला चांगलें दिसतें. या-वेळीं तेथें जितकी मंडळी होती तितक्यांस ही गोष्ट चांगली वाटून सर्वांनीं त्याप्रमाणें बेत ठरविला. कृष्णानें लागलीच ही गोष्ट घरोघर सर्वांस कळविली. त्याप्रमाणें सर्वांनीं दुसरे दिवशीं अरण्यांत जाऊन गोवर्धन पर्वतास नैवेद्य दाखवून यथेच्छ भोजन केलें. ही गोष्ट इंद्रास कळल्यावर त्यास फारच राग आला. व वरुणास वज्रधारेसारखा पाऊस गोकु-ळावर पाडण्याची आज्ञा केली. इकडे कृष्ण, बळराम, नंद, यशोदा आणि इतर ग्रामवासी बायका व पुरुष अत्यानं-दानें भोजनोत्तर विडे खात बसले असतां एकाएकीं इतका मोठा पाऊस कोसळला कीं, वस्त्रप्रावरणें तर सर्व भिजलीं, परंतु अशी धास्ती पडली कीं, हीं सर्व मनुष्यें व एकंदर गोकूळ आतां वाहून जाईल कीं काय! यावेळीं कृष्ण व बळराम यांस पर्जन्यापासून कांहीं अपाय होऊं नये याकरितां सर्वांनीं आपल्या आंगानें आच्छादन केलें. कृष्णानें हें सर्व इंद्राचें कपट जाणून सर्व संवगड्यांस सांगितलें कीं, जर तुह्मीं

मला साह्य कराल तर आपण हा गोवर्धन पर्वत वर उचलून त्या खालीं सर्व आश्रयास बसूं; ह्मणजे सर्व विघ्न टळेल. हें ऐकतांच सर्व लोकांनीं आपापल्या काठ्या डोंगरांत रोव-ल्या. व कृष्णानेंही आपली करंगळी लाविली. आणि तो मोटा पर्वत सर्वांनीं आपल्या मस्तकावर सांवरून धरिला. बाहेर पाऊस तर पूर्वीप्रमाणें पडतच होता. असा कांहीं वेळ गेल्या-वर सर्व गोकुळांतील पुरुष, बायका व मुलें त्या पर्वताखालीं सुखानें बसून आपलीं वस्त्रें वाळवून आनंदानें कालक्रमण करीत आहेत. आणि मोठ्या नेटानें आपल्या काठ्यांचे टेंके सर्व गोपाळांनीं दिले असून कृष्णानें आपली एक करंगळी मात्र पर्वतास लाविली आहे असें पाहून गोपाळ बोलले कीं, कृष्णा, आह्मीं मात्र श्रमानें मरत आहों आणि तूं आपला निर्धास्त उभाच आहेस. उगाच करंगळीचा तरी टेंका कशाला देतोस? ती आपली घे काढून. हें ऐकून कृष्णानें आपला हात पर्वतापासून हळूच सोडल्यासारखा केला तों लागलाच पर्वत खालीं पडूं लागला व सर्वांचे प्राण कासा-वीस झाले. नंतर सर्वांनीं कृष्णास नमस्कार करून प्रार्थना केल्यावर कृष्णानें पर्वत पुनः वर धरिला. इंद्रास फारच राग येऊन त्याणें सात दिवस अहोरात्रही पर्जन्य वृष्टि तशीच चालविली. त्या योगानें जरी ही सर्व मंडळी पर्वता-खालीं निर्भय राहिली तरी गोकुळाची अगदीं दाणादाण झाली. गोकुळची बातमी यांस व यांची गोकुळास कळेना.

अशी पराकाष्ठा केल्यानेंही आपलें कांहींच चालत नाहीं, कारण गोपाळ व कृष्ण वगैरे मंडळी आनंदानें सात दिवस पर्यंत नित्य नवे नवे पदार्थ करून भक्षण करीत आहे, पर्ज-न्याचा एक थेंबही त्यांच्या अंगास उपद्रव करीत नाहीं,

तशांत गोकुळांतही देवानें बंदोबस्त टेविल्यामुळें सर्वत्र स्वस्थता राहिली असें पाहून, इंद्र स्वतः कित्येक इतर देवांसहवर्तमान कृष्णास शरण आला. व त्याच्या चरणावर मस्तक ठेवून आपल्या कृत अपराधाची क्षमा मागितली; व ह्मणाला हे जगन्नायका, तुझा पराक्रम मी न जाणतां हें कर्म केलें. नंतर यशोदा, राम, व नंद आदिकरून मंडळीस इंद्रानें सांगितलें कीं तुह्मांस देवांपासूनही भय नाहीं. मग कंसाचा व इतरांचा तर कथा काय! हा तुमच्या पोटीं परब्रह्म अवतारच आला आहे. असें बोलून ती अवेळीं झालेली पर्जन्य वृष्टि नाहींशी केली. नंतर गोपी, गोप, व मातापितरांसहवर्तमान बळराम व कृष्ण गोकुळांत गेले.

कंसास तर रात्रंदिवस कृष्णाची मोटीच धास्ती पडली होती. एकदां त्याणें व्योमासुर नांवाचा एक प्रबळ दैत्य कृष्ण वधार्थ पाठविला. तो एका गोपाळाचें रूप घेऊन जेथें बळराम, कृष्ण व गोपाळ खेळत होते त्याच मेळ्यांत आला. व सर्वांशीं स्नेहानें वागून खेळूं लागला. तो शरीरानें चांगला दांडगा असल्यामुळें, त्याणें एका मागून एक अशा सर्व गोपाळांवर डाव आणून एकेकाच्या खांद्यावर बसून त्यास लांब नेऊन एका भयानक प्रचंड पर्वत गुहेंत एक जागा करून टेविली होती, त्या टिकाणीं नेऊन ठेवी. अशा प्रकारें त्या दैत्यानें बहुतेक गोपाळ, गाई आणि वासरें त्या स्थळीं नेऊन टेविलीं. हा सर्व प्रकार बळरामानें अवलोकन करून कृष्णास सांगितलें कीं, हा दैत्य आहे, गोपाळ नव्हे. कृष्णानेंही तें जाणलेंच होतें, परंतु उगीच मौज पहात होता. जेव्हां त्याणें बहुतेक गोपाळ लांब-

विलें, त्या वेळीं कृष्णानें त्याशीं खेळतांना त्यावर डाव आणून त्याजवर घोडी घेतली. आणि त्या दैत्यास तो बराच लांब गेल्यावर विचारिलें कीं, अरे चोरा, माझे गोपाळ व गाई कोठें ठेविल्या आहेस त्या मला दाखीव. तेव्हां त्याणें लागलेंच कृष्णास खालीं उतरून आपलें दैत्यरूप प्रगट केलें. कृष्णानें तत्क्षणींच त्याच्या मस्तकावर एक मुष्टिप्रहार करून त्यास मूर्छित केलें. इतक्यांत जवळच पर्वताच्या आंत जे गाई व गोपाळ होते त्या सर्वांच्या दीन वाणी आरोळ्या कृष्ण कर्णीं आल्या. तेव्हां कृष्णानें एका पायाखालीं त्या असुरास दाबून आपल्या सुंदर मुरलीचा ध्वनि केला, आणि सुदर्शन प्रेरणा करून तो पर्वत दुभांग केला. तेव्हां त्यांतून गाई व गोपाळ सर्व आनंदानें येउन रामकृष्णास भेटले. मग त्या दाबलेल्या असुरास सर्वांनीं एक एक लाथ व एक एक बुक्की देऊन ठार मारिलें.

या राक्षसाच्या मरणानंतर एकदां दोन प्रतापी असुर कीं ज्यांच्या लोखंडासारख्या भुजा, मोठे पराक्रमी व त्या समागमें अक्षा हजार राक्षस देऊन कृष्णवधार्थ कंसानें पाठविले. ते सर्व रामकृष्ण गोपाळांसह ज्या ठिकाणीं क्रीडा करीत होते, त्या ठिकाणीं जाऊन कृष्णास कंसाचा एक निरोप सांगितला. कृष्णानें तो निरोप मान्य करून दोघां मुख्यांस सांगितलें कीं तुह्मी दोघे आह्मांजवळ रक्षणार्थ राहून एके गंधर्व गृहांत तुह्मांकरितां भोजन सामग्री तयार करून ठेविली आहे त्या ठिकाणीं सर्वांस भोजन करण्यास पाठवावें. आणि तुह्मांकरितांही येथें भोजन आणून त तुह्मी येथेच्छ भक्षण केल्यानंतर मग तुह्मी आह्मी मिळून मथुरेस जाऊं. हें गर्भित भाषण त्या मूर्ख असुरांस

खरें वाटून ते दोन राक्षस कृष्णाजवळ राहून बरकड सर्व त्या गंधर्व स्थानांस गेले. तेथें पूर्वींच कृष्णानें तयारी करून ठेविली होती, त्याप्रमाणें त्या गंधर्वांनीं राक्षस पोहों- चतांच एकेकास दोन दोन असामींनीं असा मार दिला कीं, त्यांच्या शरीरांत एकही हाड मोडल्याशिवाय राहिलें नाहीं. असे चांगलें बडवून नंतर त्यांनां बांधून कृष्णाजवळ उच- लून आणिले. इकडे जे मोठे दोन प्रबळ राक्षस होते, त्यांच्या मस्तकांवरही दोघांनीं दोन मुष्टाटोळे मारून ठार मारिलें. बाकीच्यांस अभय देऊन कृष्णानें सोडतांच त्यां- णीं शंखध्वनि करीतच मथुरेस जाऊन झालेलें वर्त- मान कंसास सांगितलें. तें ऐकून कंसास फारच भीति वाटूं लागली.

---

## अध्याय १३ वा.

### देवांतक, पित्रृद्रोही, जळासुर व मुरासुर वध.

एके दिवशीं सकल गोपाळांसह कृष्ण वनांत धेनु चारीत असतां सर्व गोष्टीनें निर्धास्त जे गोप ते रानांत विश्रांती स्थानीं सुस्त निजले, अशी संधि पाहून कृष्णानें मायापाश योगानें सर्व गाई व वासरें नाहींशीं केलीं. गोप उठून तीं नाहींतशीं पाहून हें संकट निरसनार्थ त्या सर्वांनीं कृष्ण स्तुति केली. तेव्हां कृष्णानें आपल्या वेणूंतून मंजुळ ध्वनि काढून सर्व गाईस बोलाविलें. त्या बरोबर सर्व गाई व वा- सरें येऊन कृष्णाकडे लक्ष्य लावून ती ध्वनि ऐकत स्तब्ध उभीं राहिलीं. तें पाहून सर्वांस आनंद झाला.

एके वेळीं कोणीच गोकुळांत विष्णुपूजा करीत नाहीं, व उपदेश केला असतां नाना कुतर्क घेऊन मोड करितात

ह्मणून मायालाघव योगानें कृष्णानें नंद व यशोदा शिवाय करून एकंदर गोकुळवासी जनांस वेड लाविलें. हा चमत्कार पाहून नंद यशोदेनें कृष्ण स्तुति केली, तेव्हां तें वेड नाहींसें होऊन सर्वत्र पूर्ववत झालें.

अकरा सहस्त्र राक्षसांस यथेच्छ मुष्ठिमोदकांची मेजवानी देऊन कृष्णानें वाटेस लाविल्यावरून अति कोपायमान होऊन कृष्ण वधार्थ देवांतक व पितृद्रोही दैत्यांस कंसानें पाठविले. त्या उभयतांनीं भयंकर व्याघ्रांचीं रूपें घेऊन बळराम, कृष्ण व त्यांचे संवगडी यांच्या आंगावर आले; व भयंकर गर्जना करून गोकुळांतील सर्व जनाला फार भेडसावलें. ते वेळीं कृष्णानें व बळरामाने जाऊन त्या दोनही व्याघ्रांचा एक एका मुष्टी प्रहारें करून संहार केला व सर्व गोपजनांस भयमुक्त केलें. लोकांनीं हा प्रकार नंद यशोदेस सांगून उभयतांस आईजवळ नेल्यानंतर, त्या दोघांवरून यशोदेनें मीठ मोहऱ्या ओंवाळून त्यांस देवाजवळ नेलें: आणि वाघाच्या हस्तें मुलें सोडवून आणल्याबद्दल त्याची स्तुति केली.

यानंतर कंसानें एक जळासुर नामक दैत्य कृष्ण वधार्थ पाठविला. त्याणें यमुनेंत आपलें ठाण दिलें. हें कृष्णानें जाणून त्याच तटाकीं खेळ खेळण्यास सर्व गोपाळांस आणून डाव आरंभिला. कांहीं वेळानें कित्येक गोपाळ तृषित होत्साते पाणी पिण्यास त्या स्थळीं जाऊन, जलास स्पर्श करतांच त्या जळासुरानें बहुतेकांस आंत ओढून नेलें. कृष्णानें हे पाहून आपला हात लांब करून त्या असुरास पाण्याबाहेर ओढून काढून मारिलें. व त्याचें विशाळ प्रेत सर्वांकडून ओढवून नंद यशोदेस दाखविण्यास गोकुळांत नेलें.

जळासुर निमाल्यानंतर कंसाकडून सुरासुर नामें एक महा प्रबळ राक्षस कृष्ण वधार्थ आला. तो कृष्णाजवळ येऊन फारच वरळूं लागला, व इतके राक्षस मारल्याबद्दल मीच सूड घेईन अशी प्रतिज्ञा करूं लागला. त्या वेळीं त्याचें कांहींसे अंगमर्दन मात्र कृष्णानें केलें, परंतु त्याचें मरण हनुमंताच्या हस्तानें होतें ह्मणून त्याचें स्मरण करून तो आल्यानंतर त्याच्या हातानें त्या राक्षसाचा वध करविला.

एके वेळीं कृष्ण संवगडयांसह खेळत असतां कंसाकडील कित्येक रंगारी उत्तम वस्त्रें रंगवून व कित्येक माळी सुवासिक पुष्पमाळा व गुच्छ असा सरंजाम तयार करून मथुरेस नेत होते. तें पाहून कृष्णानें त्यांस प्रथम समजून सांगितलें की, या माळा व तुरे या गोपाळांस देऊन, व हीं उत्तम वस्त्रें त्यांच्या अंगावर घालून त्यांचा आशिर्वाद जर तुह्मी घेतलात तर तो तुह्मांस मोटा श्रेयस्कर होईल. हें ऐकून त्यांणीं या भाषणाची फार निर्भत्सना करून, कृष्णास व रामास वाईट शब्द बोलून पुढें चालूं लागले. त्यावेळीं कृष्णानें गोपाळांकडन त्यांस टोकून त्यांनीं आणलेलीं फुलें, हार, तुरे व वस्त्रप्रावर्णें सर्व गोपाळांस पांघरविलीं. हा प्रकार त्या माळी व रंगारी यांणीं कंसास सांगितल्यावरून त्याचें भय दुणावलें व त्याची झोंपही कृष्णानें नेल्यासारखी झाली.

इकडे कृष्णास येशोदेनें असे वेडे चाळे केले असतां कंसास फार राग येईल, व त्याचा दुस्तर परिणाम आपल्यास भोगावा लागेल असें सांगितलें. कृष्ण ह्मणाला आई, त्याजविषयीं तूं अगदीं काळजी बाळगूं नको. कंसास राग तर काय परंतु संताप आल्यासही भीति नाहीं.

# अध्याय १४ वा.

## अघासुर, धेनुकासुर इत्यादि वध.

एकदां कंसाकडून मोठ्या कठीण प्रतिज्ञेनें कृष्ण वध करण्याकरितां अघासुर या नांवाचा एक भयानक राक्षस आला. त्याणें कृष्ण, गोपाळ व गाई रानांत ज्या मार्गानें जावयाच्या त्याच मार्गावर भयंकर अजगर रूप धरून तोंड पसरून बसला. त्या तोंडांत कृष्णासह सर्वत्र गेले. ज्या वेळीं त्यानें तोंड मिटलें त्यावेळीं गोपाळांस वाटलें कीं, आपण सर्व राक्षस मुखांत आहों. त्यावेळीं सर्वांनीं कृष्ण स्तुति केली. कृष्णानें आपलें मोठें विराट रूप प्रगट केलें, तेणेंकरून त्या अजगराचा फक्त जबडाच उघडला असें नाहीं; परंतु सर्व अंग दुभांग होऊन तो उलथून पडल्यानंतर गाई व गोप सर्वत्र मोकळे झाले.

यानंतर कंसानें धेनुकासुर नांवाचा दैत्य पाठविला. त्याणें एका सुंदर गाईचें रूप घेऊन एका आड रस्त्यावर बसला. त्याचा बेत असा कीं आपली गाई चुकली असें कृष्णास वाटून तो जवळ येईल व येतांच त्यास एका एकीं शिंगें मारून ठार करावा. परंतु तो प्रकार विपरीत होऊन त्याच्याच प्राणावर प्रसंग आला. तो असा कीं ती धेनु कृष्णानें पूर्ण ओळखून आपल्या वेणूच्या मंजुळ ध्वनीनें त्या गाईस मोहित केलें. तें इतकें कीं मी कोण व कृष्ण कोण याचें त्यास अगदीं विस्मरण झालें. अशा संधींत कृष्णानें त्या गाईजवळ जाऊन तिचीं शिंगें धरिलीं तों असुर ध्यानीं आली, तेव्हां त्याच क्षणीं त्यास गतप्राण केला.

यानंतर कृष्णावर केशी या नांवाचा एक राक्षस कंसाज्ञेनें आला. त्याणें आपला देह कपट विद्येनें स्थूल करून सर्व गोकुळास वेढा घातला व तें एकदांच उपटून मथुरेस नेण्याच्या तयारींत होता, इतक्यांत कृष्णानें त्याचे पाय धरून त्यास आपटून ठार मारिलें.

पुढें प्रलंबासुर नांवाचा दैत्य कंसानें पाठविला. त्यानें समोर लढण्याचें न करितां युक्तीनें कार्य साधण्याचा निश्चय करून एका पाड्याचें रूप धरिलें, आणि नित्य यथेच्छ गो भोजन करूं लागला. ती बातमी कांहीं दिवस कोणास कळली नाहीं, परंतु कृष्णानें एके दिवशीं त्यास ओळखून आपटून मारिलें, व सर्व मृत गाई जीवंत केल्या.

यानंतर शंखासुर व चृडासुर या दोघांस राम कृष्णांनीं आपटून मारिलें व त्याचप्रमाणें वत्सासुरासही त्यांच्या भेटीस यमसदनीं पाठविलें.

कोणे एके वेळीं कृष्ण हा पूर्णावतारी आहे किंवा कसें ही प्रतीति पाहण्याकरितां नंदास वरुणानें पाताळीं नेऊन ठेविलें. नंदाचा सर्वत्र शोध चालला तेव्हां कृष्णानें गुप्तपणें पाताळास जाऊन मोठ्या आनंदानें नंदास आणिलें व वरुणाचा गर्व हरण केला.

एके वेळीं वन भोजनाकरितां नंद, गोपाळ, कृष्ण व राम हे गेले होते. तेथें भोजनोत्तर कोणी निजले व कोणी खेळत बसले, अशा संधीस नंदास एका अजगरानें निजल्या ठिकाणींच गिळण्यास प्रारंभ केला. त्यावेळीं नंद मोठ्यानें ओरडूं लागला. तेव्हां सर्व सावध होऊन त्या अजगरास कोणी काठ्या व कोणी धोंडे मारूं लागले. परंतु त्याणें नंदास न सोडितां गळ्यापर्यंत ग्रासिलें. कृष्ण कांहींच न

भितां हा चमत्कार पाहत होता. नंदानें त्यास हांक मारितांच धांवत जाऊन त्या अजगराचे दोन तुकडे केले आणि नंदास बाहेर काढिलें. इकडे नंद उठून बसला, तों त्या अजगर देहांतून एक सुदर्शन नांवाचा गंधर्व निघून पुढें हात जोडून उभा राहिला. व कृष्ण स्तुति करून आपला शापग्रस्त झाल्याचा व अशी अपराधाची गोष्ट करण्याची संधी साधण्याचा व त्याच प्रकारें उशाप मिळाल्याचा वृत्तांत कृष्णास कळवून परत स्वस्थानीं जाण्यास त्याणें निरोप मागितला. कृष्णानें त्यास आशिर्वाद देऊन स्वर्गीं पाठविला.

एके वेळीं नारद स्वामी कंसाकडे गेले, कंसानें पूजन केल्यानंतर त्यास सांगितलें कीं, प्रसंगोप्रसंगीं यशास प्राप्त करणारीं कृत्यें मी तुला सुचवित गेलों, व त्याप्रमाणें तूंही बहुत प्रयत्न केलेस; परंतु दुर्दैव योगानें सर्व गोष्टी अजून विपरीतच घडत आहेत. ह्मणून तूं आतां असें न करितां तुझ्या वैऱ्यास फारच दीर्घ उपायानें मारण्याचें करावं. तुला वाटत असेल कीं तो यःकश्चित गवळ्याचा पोर पण त्याणेंच तुझे महापराक्रमी राक्षस मारिले. तेव्हां अग्नीच्या ठिणगीस लहान ह्मणून उपेक्षा करून जर गवतांतच टेविली तर तिजपासून मोठा प्रळयाग्नि. उत्पन्न होण्यास विलंब लागेल काय? इतकें बोलून नारद स्वस्थानीं गेले.

नारद स्वामी गेल्यानंतर बाणासुर, वज्रासुर, भौमासुर, शिशुपाळ, काळयौवन व वक्रदंत इत्यादिकांसमागमें बहुत सैन्य देऊन कंसानें पृथ्वीवरील ब्रह्मस्थल भंग, तप विध्वंस, धर्मनाश, व घोर हत्यादि करण्याची धुमाळी माजविली.

इकडे नारदानें या वर्तमानाचा खुलासा कृष्णास कळविला, त्यावरून एके वेळीं सर्व लोकांस गोकुळ सोडून

वृंदावनास वस्ती करण्याचें कृष्णानें सांगितलें. परंतु तें कोणीच ऐकेनात तेव्हां गीर्वाण भाषेत राम कृष्ण यांणी कांहीं भाषणें करून कृष्णानें आपले पांच चार केंस तोडले, त्या सरिसें सर्व शहरांत लांडगे उत्पन्न होऊन लोकांस फक्त त्रास देऊं लागले. यामुळें शेवटीं त्या सर्वांस गोकुळ सोडून वृंदावनास कांहीं दिवस जाणें लागलें.

एकदां कंसाकडून प्रलंबासुर या नांवाचा दैत्य आला. त्याणें एका गोपाळाचा वेष धारण करून सर्वांसमागमें खेळूं लागला. ज्यावर डाव येई त्यास खांद्यावर बसवून गरगरां फिरवीत असे. असे सर्व गोपाळ त्रासले, परंतु उपाय चालेना. कोणास त्याची ओळख ही पटली नाहीं. त्याणें आपला मतलब साधण्याची संधि पाहून एके दिवशीं बळरामाशीं डाव खेळत असतां आपल्यावर डाव घेतला. तेव्हां बळराम लागलाच त्याच्या खांद्यावर बसला. त्यास घेऊन तो असुर कांहीं लांब जाऊन मागें परतावें ते न करतां एकदम मथुरेची वाट धरिली. हें पाहून बळरामानें त्याच्या मस्तकावर एक वज्रमुष्टीचा प्रहार करून त्यास तत्काळ यमलोकीं धाडलें.

यावर कंसानें बकासुर दैत्य पाठविला. त्याणें बगळ्याच्या रूपानें जाऊन यमुनेंत वस्ती करून पक्षी व जळचरें यांचा बराच संहार केला. हें जाणून कृष्ण यमुनातटीं गेला. दैत्यानें त्यास पहातांच सगळा गिळला. सर्व संवगडी यांणीं हें पाहून कृष्णासाठीं फारच आक्रोश मांडला. इतक्यांत कृष्णानें आपलें आंग फुगविलें. त्या योगानें व्याकूळ होऊन तो बकासुर प्राणास मुकला. व कृष्ण सर्वांस भेटून

गोकुळांत गेला. याचप्रमाणें कृष्णानें अरिष्टासुर दैत्याचाही प्राण वज्रमुष्टीनें घेतला. नंतर कंसानें कागासुरास पाठविलें. त्याशीं रामानें व कृष्णानें कांहीं वेळ मल्लयुद्ध केलें. परंतु त्याचें मरण वीरभद्राच्या हातून होणें ह्मणून त्याचें स्मरण केलें. स्मरण करितांच तो कृष्णासमोर उभाराहिला. तेव्हां त्याकडून त्या दैत्यास मारून टाकिलें. याच रीतीनें चिटग्रासुराचाही संव्हार केला.

एका मागें एक मोठमोठे प्रबल दैत्य पाठविले परंतु त्या सर्वांस मृत्युद्वारीं जावें लागलें, व कांहीं केल्यानें शत्रूचा नाश होत नाहीं ह्मणून कांही तरी युक्ति योजून रामकृष्णास मारावें असें कंसाच्या मनांत येऊन, त्याणें सर्व प्रबल व प्रळयी दैत्यांची एक सभा करून त्यांत याविषयीं फारच भवति नभवति केली. तेव्हां कित्येक शहाण्या असुरांनीं असें ठरविलें कीं, कांहीं तरी मोठें अवघड कोडें नंदाकडे पाठवावें ह्मणजे त्यास तें उलगडणार नाहीं. नंतर त्याबद्दल नंदाकडून राम व कृष्ण घ्यावे. मूर्ख मंडळींस ही युक्ति मान्य झाली, आणि त्याप्रमाणें लहान तोंडाच्या चार मोठ्या घागरी आणवून, तसेच मोठे चार कोहळे आणवून व त्या घागरींत कांहीं वाळू भरून दैत्यासमागमें त्या घागरी गोकुळास नंदाच्या घरीं पाठविल्या. आणि असें सांगून पाठविलें कीं कंसासुरानें हे कोहळे ह्या घागरींत घालून ह्या घागरी त्या वाळूच्या दोऱ्यांचा शिंकीं वळून त्यांत घालून मथुरेंत फार जलद मागितल्या आहेत. आणि जर हें तुमच्यानें न होईल तर तुमचे राम व कृष्ण दोघे मुलगे मथुरेस पाठवून द्यावे. मथुरेहून कोणीच दैत्य गोकुळास फार दिवसांत आला नाहीं, या मुळें कंसानें कृष्णाकडे लक्ष्य

कमी केलें, असे विचार चालले होते; इतक्यांत या घागरी व निरोप श्रवण करितांच सर्व चिंतासमुद्रांत पडले.

नंद, यशोदा व कित्येक नागरिक जन अशा चिंतेंत असतां नंदानें धीट मन करून हें कोडें चार दिवसांच्या आंत उलगडून पाठवितों असा परत निरोप तर दिला, व त्या सेवकांनी नंद यशोदेस ह्या कोड्याच्या भरीस न पडतां तुह्मी आपलीं मुलें कंसाचे हस्तगत करावीं, त्यांस कंस राजा मोठ्या उत्साहानें ठेवील असें कळवून ते मथुरेस जाण्याच्या बेतांत होते इतक्यांत, राम व कृष्ण तेथें खेळत आले. त्यांणीं हें पहातांच नंदास सांगितलें कीं या कोड्यास चार दिवस कशाला पाहिजेत! आतांच आह्मी उलगडून देतों. असें बोलून त्या कंस सेवकांच्या समक्ष कृष्णानें एकेक कोहळा एकेका घागरीच्या तोंडावर ठेवितांच ते चारही कोहळे घागरींत गेले व त्याच रीतीनें वाळूच्या दोऱ्या वळून त्यांचीं शिंकीं केलीं व त्यांत त्या घागरी ठेवून त्या सेवकांच्या हस्तें त्या घागरी लागल्याच मथुरेस पाठविल्या. व नंदाच्या नांवानें कंसास सांगून पाठविलें कीं हें कोडें तर कांहींच नाहीं परंतु आणखी कितीही असतील तितकीं पाठवून द्यावीं. सेवकांनीं हें पाहून मनांत निश्चय केला कीं आतां मात्र कंसाचा आयुष्यसमुद्र निःसंशय आटला व मथुरेचे राज्य रसातळास जाणार. असा त्या उभय मुलांचा प्रताप पाहून सेवकांनीं त्यांस वंदन करून मथुरेस प्रयाण केलें. हें कोडें उलगडणार नाहीं व निदान आठ दिवसांनीं तरी आपण सुखी होऊं अशा स्वस्थ मनानें कंस बसला होता, इतक्यांत वाळूच्या शिंक्यांत त्या घागरी आणल्याचें वर्तमान त्यास कळलें. व हजारों लोक राजवाड्यासमोर

तो चमत्कार पहाण्यास सेवकांच्या मागें जमले आहेत असेंही कळलें. कंसानें तो प्रकार प्रत्यक्ष पाहून तर त्याचें सर्व आंग भयानें थरथरां कांपूं लागलें.

एके वेळीं कृष्णासह गोपमंडळी गोवर्धन पर्वतावर खेळत असतां कंसानें असुरांकडून त्या पर्वतास चहूंकडून अग्नि लाविला. तें शुष्क गवत लागलेंच पेटून अग्नीचा एकच भडका झाला. तेव्हां सर्व घाबरल्यानंतर कृष्णानें सर्वांस डोळे मिटण्यास सांगितलें. त्याप्रमाणें करितांच एकंदर मंडळी त्या संकट स्थानांतून आपोआप निर्भयस्थानीं आलीं व सर्वांस आनंद झाला.

---

# अध्याय १५ वा.

## देवकीस कृष्ण भेट, व गोपी वस्त्रहरण.

कंसाचा तर कृष्णवधाविषयीं कांहींच उपाय चालेनासा झाला. रात्रंदिवस तो चिंतातुर असतां त्याचे अनुयायी इतर राक्षस हे सर्व भूमंडळावरील जनास त्रास देत होतेच. बंदीशाळेंतील वसुदेव देवकीचे तर फारच हाल होऊं लागले. एके वेळीं देवकी सचिंत असतां तिच्या मनांत असें आलें कीं, कृष्ण आपल्या उदरीं येऊन गोकुळांत नानाप्रकारें खेळ करितो आणि आपल्यास त्या सुखाचा लेशही नाहीं ह्मणून एक वेळ तरी त्याची भेट व्हावी; कारण आतां लवकरच मरण येणार, ह्मणून मरणकाळीं जर पुत्र दर्शन होईल तर दुःखांत कांहीं सुख तरी होईल. अशा विचारानें कृष्ण स्मरण करितांच तेथें कृष्ण प्रकट झाला. त्याचें देवकीनें मोठ्या प्रेमानें चूंबन घेतलें व वसुदेवानें आनंदानें आपल्या मांडी-

वर घेतलें. एक प्रहर पर्यंत त्यांची प्रेमाचीं भाषणें चालली होतीं. माझ्या पोटीं येऊन यशोदे जवळ तूं गेलास आणि मला तुझा लाभच नाहीं, असें देवकीच्या भाषणांत आ- त्यावरून कृष्णानें आईस विनंती केली कीं, ज्या कारणा- करितां मी जन्मास आलों आहें त्या कृत्यासाठीं मला गो- कुळांतच असण्याची अवश्यकता होती. आपल्यास सुख जर माझ्याकडून न झालें तर मग व्हावें कोणापासून? आ- पण स्वस्थ असावें. मी थोडक्याच दिवसांत येथें येऊन कं- सास मारीन व तुमची सुटका करीन व सर्व प्रकारें तुह्मांस सुख देईन. तोंपर्यंत ज्या ज्या वेळीं आपण माझी आठ- वण कराल त्या त्या वेळीं मी येऊन तुह्मांस भेटेन. आपण मजविषयीं कांहींमात्र काळजी वाळगूं नये. अशा प्रकारें एक प्रहरपर्यंत बंदिशाळेंत कृष्ण वसुदेव देवकीशीं बोलून त्यांचें समाधान करून निघून गेला. हें वर्त- मान नारदमुखें कंसास कळतांच त्यानें वसुदेव देवकीस श्रृंखलांसह आपल्याजवळ सेवकांकडून आणविलीं. व तीं येतांच मोठ्या रागानें त्यांच्या अंगावर धांऊन गेला, आणि शस्त्र वर उचलिलें तों त्या दोघांभोंवतीं असें सुदर्शन फिरत आहे कीं ज्यांत मुंगीही शिरकण्यास वाट नाहीं मग शस्त्र कोठून चालणार असें पाहिलें. तेव्हां आपण मागें सरू- न आपल्या सरदारांस आज्ञा केली कीं तुह्मी यांस ठार मारा. परंतु त्या सर्वांचीं शस्त्रें हस्तासुद्धां गळून जमीनीवर पडलीं. व एका क्षणांत हजारों शस्त्रासह वीर त्या स्थळीं पडले. हे पाहून कंसास अशी भीति पडली कीं, न जाणो आपलीही तीच दशा होईल ह्मणून त्याक्षणींच तो सभेंतून पळून जाऊ- न वसुदेव देवकीस परत बंदिखान्यांत पाठविलीं.

एके वेळीं कित्येक गोपींनीं कात्यायनीव्रत आचरण करून तत्सांगताप्रीत्यर्थ यमुना स्नानास आल्या होत्या. आणि आपल्या चोळ्या व लुगडीं तीरावर ठेवून आपण जलक्रीडा करीत होत्या. ही संधी कृष्ण संवगड्यांनीं साधून कृष्णास त्या स्थळीं आणिलें. कृष्णानें सर्व वस्त्रें गुंडाळून एका कदंब वृक्षावर नीट दिसतीं ठेवून आपणही तेथें स्वस्थ बसला. इकडे गोपी स्नानें करून वर आल्या आणि लुगडीं नाहींत असें पाहून खिन्न होत्सात्या चहूंकडे नग्नच फिरूं लागल्या, तों त्यांच्या दृष्टीस लुगडीं घेऊन कृष्ण झाडावर बसला आहे असें पडलें. त्यावेळीं दीन वाणीनें कृष्णाची प्रार्थना केली कीं, आपण व आह्मी कोण याचा विचार करून आह्मांस अपराधाची क्षमा करावी. कृष्ण बोलला आतां मी तुह्मांस वर्मी धरून बसलों आहें. आणि जसा माझ्या खोट्या चहाड्या सांगतेवेळीं तुम्ही विचार केला नाहीं तशी प्रस्तुत मलाही तुमची करूणा येत नाहीं. तुह्मी येथून चालत्या व्हा. तुह्मांवर आज हा प्रसंग आला आतां तुह्मी लाज कां धरितां? आणि लज्जास्थळावर तरी एक हात कशाकरितां ठेविला आहे? गोपींनीं विनंती केली कीं ज्यांची वस्त्रे तूं हरण केलींस त्यांची लाज तुझ्याशिवाय कोण राखील? कृष्ण ह्मणाला जर तुह्मांला आपलें कार्य करून घेण्याचें असेल तर आतां दोनही हातांनीं सुर्यास नमस्कार करा. ह्मणजे तो तुह्मांस ह्या संकटापासून सोडवील. नंतर गोपी सुर्यास दोन्ही हात जोडून ह्मणाल्या कीं महाराज आतां आपण आमच्या मनांतील हेतु पुरवावा आणि आमचे इच्छेप्रमाणें आमची कामशांती करून आह्मांस आमचीं वस्त्रें द्यावीं. नंतर कृष्णानें त्यांचीं ठेवलेलीं वस्त्रें त्यांस परत देऊन आपण

खालीं उतरला. आणि त्यांस वचन दिलें कीं शरदऋतुच्या आनंदकारक चांदण्यांत मी येऊन नियमीत स्थळीं आपली मुरली मंजुळ स्वरानें वाजवीन. त्या खुणेवर तुह्मीं विलंब न लावितां सर्व गोपींनीं मजजवळ यावें, ह्मणजे मी तुमचे मनोरथ पूर्ण करीन. त्या सर्व गवळणींत राधा प्रमुख होती. तिणें ही गोष्ट मान्य केल्यावर सर्वांनीं कृष्णाचा निरोप घेतला. आणि कृष्णही सवंगड्यासहवर्तमान खेळण्यास दुसरीकडे गेला.

---

# अध्याय १६ वा.

## गोकुळवासी ब्राह्मण गर्वहरण.

श्रीकृष्ण परमात्म्याचें पूर्ण स्वरूप न नकळतां अविचारानें गोकुळांतील सर्व ब्राह्मणांस एकदां असें वाटलें कीं कृष्ण हा हलकट जातीचा असून सर्व गोकुळांत भ्रष्टाचार करितो, व आपणासही त्याचा स्पर्श झाल्यायोगानें आपल्या सर्व ब्रह्मकर्मास भ्रष्टपणा येतो ह्मणून आपण गोकुळ सोडून रानांत जावें आणि तेथें निर्विघ्नपणें स्नान संध्यादि कर्मे करावीं. त्याप्रमाणें सर्व ब्राह्मण आपल्या कुटुंबासहवर्तमान वनांत झोपड्या बांधून राहिले. कित्येक दिवस असे लोटल्यानंतर एके दिवशीं ज्या रानांत हे ब्राह्मण होते तेथें कृष्ण सवंगड्यांसह खेळण्यास गेला व दोन प्रहरीं भुकेचें निमित्त करून त्या ब्राह्मणाच्या यज्ञशाळेंत जाऊन क्षुधा शमनार्थ त्यांजवळ कांहीं अन्न मागितलें. त्यांणीं हवनकरण्या पूर्वीं तें अन्न गवळ्यांस देणें युक्त नाहीं असें निक्षून सांगितलें. [illegible] णानें सर्वांचा जीव मिळून एकच आहे त्यास भेदाभेद नाहीं इत्यादि नीति सांगूं लागतांच ब्राह्म

णांनीं कृष्णास ताडण करून तेथून परत लाविलें. यानंतर कृष्णानें कित्येक संवगड्यांस आपला निरोप देऊन त्यांच्या स्त्रियांकडे मागील दारानें पाठविलें. तो निरोप कळतांच त्यांणीं उत्तर पाठविलें कीं आपण स्वस्थ बसावें, आह्मी आपणांस अन्न आणून पोंहोचवितों. कृष्ण संवगड्यांसह वनांत खेळत आहे इतक्यांत इकडे ब्राह्मणस्त्रियांनीं नानाप्रकारचीं षड्रस पक्वान्नें तयार करून त्यांच्या पराता भरून व त्या आपल्या मस्तकावर घेऊन मागील वाटेनें रानांत चालत्या झाल्या. व त्यांनीं वाटेनें नीतीपर व वेदांतपर संवाद चालविले. इकडे मागें हवन समयीं अन्न सिद्धता नाहीं ह्मणून जो तो ब्राह्मण आपल्या स्थळीं गेला आणि पहातो तों घरांत बायका नाहींत. मात्र अन्न कित्येक स्थळीं तयार आहे. इतक्यांत त्यांच्यांतील एक स्त्री चुकल्यामुळें मागून जात होती. ती कांहीं लांब गेली नाहीं इतक्यांत तिच्या नवऱ्यानें तिला धरून आणून ताडण केलें, तों ती लागलीच गतप्राण पडली. इकडे या सर्व स्त्रिया कृष्णाजवळ पोंचून पाहतात तों जी स्त्री मागें राहिली होती, व जिच्याविषयीं वाटेंत भाषणें चाललीं होतीं ती कृष्णाजवळ परातेसुद्धां सर्वांच्या पहाण्यांत आली. याचें सर्वांस परमाश्चर्य वाटून त्यांनीं एक चित्तें ईश्वर स्तुति केली. कृष्णानें तें अन्न सर्व गोपांस विभागून देऊन आपणही भक्षण केलें. व त्यांस आशिर्वाद दिला व जाण्याची आज्ञा दिली. घरची जाचणी होईल ह्मणून स्त्रियांनीं प्रार्थना केल्यावर त्यांस कृष्णानें अभय देऊन तुह्मास काळाचीही भीति नाहीं असें सांगून लावून दिल्या. परंतु प्रथम आलेली स्त्री मात्र गुप्त रूपें तेथेंच होती. इतक्यांत ब्राह्मण मंडळी क्रोधयुक्त होत्साती

आपल्या बायकांस ताडण करण्यासाठीं तेथें धांवत आली. व कृष्ण व गोपाळ जेवीतच आहेत असें पाहून तर त्यांस फारच संताप आला. जे दांडगे दांडगे होते ते पुढें येऊन ह्मणाले, कृष्णा, आमच्या बायका मोठ्याच नशीबवान कीं, त्या आह्मांस वाटेंत न आढळतां आड मार्गानें घराकडे गेल्या. असो. त्यांचा सूड घरीं गेल्यावर घेतां येईल. परंतु तूं मोटाच भ्रष्टपणा करतोस ह्मणून त्या त्रासानें आम्हीं घर सोडून रानांत आलों. तेथेंही तुझे ढंग आहेतच. कंसाकडे जावें तर त्याणें पृथ्वीवर प्रळय मांडला आहे. आतां करावें तरी काय! कृष्ण बोलला कीं, कृष्ण हा परमात्मा परमेश्वर जाणून तुमच्या स्त्रियांनीं त्याजवर भक्ति ठेविली हें पातकाचरण झालें नाहीं. मनांत कांहीं विचार करा. ज्या ब्राह्मणानें आपल्या स्त्रियेस बांधून ठेविलें होतें तो बोलला, कृष्णा, हें तूंच वेड लाविलेंस. कसला परमात्मा व त्या खुळ्या बायकांस कळलें तें काय? उगाच तुझ्या भरीं पडल्या आणि अन्न घेऊन आल्या. माझ्या बायकोस मी ताडण करून बांधून ठेविली तेव्हां तो परमात्मा कोठें गेला? कृष्ण बोलला जर तिचें ध्यान मी परमात्माच आणि माझ्या ठिकाणीं खरेंच लागलें असेल तर तिला बंधन बाधेल कसें? तो बोलला कीं मी पंचवीस जणा देखत तिला बांधून ठेविली आहे. तुझा एवढा दिमाख कशास पाहिजे? हें ऐकून कृष्णानें त्या ब्राह्मणाचे बायकोस पुढें बोलावितांच तिणें येऊन प्रथम कृष्ण चरणीं मस्तक ठेवून नंतर सर्व ब्राह्मणांसह पतीस वंदन केलें. तिला पहातांच सर्वांचा गर्व हरण झाला. इतक्यांत आकाशवाणी हो झाली कीं "कृष्ण हा सर्व कर्ता, हर्ता व मोटा पूर्णावतारी आहे. याविषयीं भ्रांति असल्यास सोडावी.

तुमच्या बायका पवित्र आहेत." नंतर कृष्ण चरणीं सर्वांनीं मस्तक ठेविलें आणि ह्मठलें कीं बायकांमुळें आमचा भ्रम गेला, नाहीं तर संशयांत व्यर्थ गुंतलों असतों. कृष्णानें सांगितलें कीं तुमच्या स्त्रिया पवित्र आहेत, त्यांस वाईट शब्द बोलूं नका. व त्या स्त्रीच्या पतीस सांगितलें कीं, तुझ्या स्त्रीच्या देहास मात्र बंधन आहे. त्या निर्जीव देहास तूं नीट समजावून तुझा राग नाहीं असें सांगून येथील कांहीं खुणा सांग ह्मणजे लागलीच ती उठेल. हें ऐकून ते सर्व आपापल्या घरीं गेले.

मार्गानें ते सर्व कृष्ण स्तुति करीतच चालले होते, आणि आजपासून नित्यशः श्रीकृष्णासह गोपाळांस प्रथम अन्न देऊन नंतर आपण देवास अर्पून गृहण करावें असा निश्चय केला. कृष्णवचनाची प्रतीति पहाण्याकरितां सर्व ब्राह्मण ज्याची बायको बांधून टेविली होती त्याकडे गेले, आणि पहातात तों ती स्त्री अन्नाच्या परातीकडे लक्ष्य लावून गतप्राण पडली आहे. सर्वांनीं नानाप्रकारें तिची स्तुति केली, व पतीनेंही काकुळती करून तिला कृष्णाकडील सर्व हकीकत सांगितली, परंतु ती उठेना असें पाहून सर्व निराश झाले. परंतु तिच्या नवऱ्याचा पूर्ण विश्वास होता. त्यामुळें तो तिला ह्मणाला कीं माझे सर्व उपाय राहिले, व कृष्णाकडील सर्व वर्तमानही सांगितलें. आतां तूं सिद्ध असें जाणून पायां पडणें मात्र राहिलें आहे. असें ह्मणून तिच्या पायांवर मस्तक जों ठेवणार तों ती खडबडून उठून पति चरणीं मस्तक ठेवून पूर्ववत अन्न तिकडे घेऊन जाण्याची तिनें परवानगी मागितली. त्यावरून सर्व चकित झाले. व सर्वांनीं आपल्या बायकांस शाबासकी दिली, व नित्यशः कृष्णास अन्न पोंहोचविण्यास आज्ञा दिली.

# अध्याय १७ वा.

## रासक्रीडा.

वाचकांस आठवतच असेल कीं गोपींजवळ क्रीडा करण्याविषयींचा संकेत कृष्णानें केल्याचें मागें लेखन केलें आहे. त्याप्रमाणें शरदऋतूंतील निर्मळ व आल्हादकारक चांदण्यांत त्यानें एकदां संकेत स्थानीं जाऊन मध्यरात्रींच्या समयास आपल्या मुरलीचा मधुर ध्वनि केला. त्या वेळीं कित्येक गोपी नवऱ्याजवळ बोलत होत्या. कांहीं घर काम करीत होत्या. कित्येक जणीं निजल्याही होत्या. परंतु त्या सर्वांच्या कानांत तो ध्वनि गेल्याबरोबर सर्व सावध झाल्या. व मागील संकेतित गोष्टींचें स्मरण होऊन त्यांस कामोद्दीपन झालें. आणि सर्व गोपी मोठ्या त्वरेनें कृष्णाजवळ आल्या. कृष्णानें गोपींसमागमें नानाप्रकारें खेळ केले, व प्रत्येक गोपीजवळ एक एक कृष्ण असे हजारों कृष्ण झाले. त्यांत रासक्रीडा, नवनारी कुंजर इत्यादि बहुत प्रकारचे खेळ झाले. त्यांत कित्येकींजवळ सतत कृष्ण नसल्यामुळें दुःख व असल्यानें आनंद व गर्व झाला. कृष्णानें गोपीजवळ नानातऱ्हेनें विषयोपभोग भोगून त्यांचीं मनें आनंदित केलीं. हे खेळ पाहण्यास सर्व देवगण व गंधर्व आले होते तितक्यांसही आनंद झाला. या नंतर कृष्णानें सर्व गोपींस घरोघर जाण्यास आज्ञा दिली व आपणही घरीं जाऊन निजला.

---

# अध्याय १८ वा.

## अक्रुरागमन व गोपी विलाप.

ज्या वेळीं कंसासुरानें पाहिलें कीं पदरच्या मोठमोठ्या बलवान दैत्यांचा नाश झाला व असेच बाकी राहिलेलेही

नाश पावतील आणि शेवटीं रणांगणीं आपणास एकट्यास बाहेर पडावें लागेल, त्या वेळीं त्यानें मोठमोठ्या प्रबल व चतुर दैत्यांस जवळ बलावून त्या सर्वांचीं मनें मिळवून एक अशी युक्ति काढली कीं मथुरेंत एक मोठा धनुर्याग करावा. आणि नवखंडांतील राजे, ऋषी, ब्राह्मण इत्यादिकांस तो चमत्कार पहाण्यास बोलवावे. व त्याच वेळीं राम कृष्णास बलावून आणून कांहीं कपटानें त्यांस ठार मारावें. ही युक्ति सर्वांस मान्य होऊन आपला कार्य भाग आतां सफळ होईल असें कंसास वाटलें. आणि दुसऱ्या दिवशींच त्या यागाची तयारी केली. सर्वांस सन्मानानें बोलावणीं पाठवून राजे, संस्थानीक इत्यादिकांस मोठ्या थाटानें आणल्या नंतर अक्रूरास गोकुळांत जाऊन राम कृष्णासही घेऊन येण्यास आज्ञा केली. त्या वेळीं अक्रूरानें कंसास नानाप्रकारें बोध करून चाललेले व पुढें होणारे प्रकार त्यास समजाविले. परंतु उपड्या घड्यावर जसें पाणी ठरत नाहीं तसा कंसास कांहींच बोध होईना ह्मणून रथ घेऊन कंसाज्ञेनें अक्रूर गोकुळास गेला.

अक्रूराचा रथ नंदाच्या घराजवळ येतांच हजारों लोक तेथें जमून नानाप्रकारचे तर्क करूं लागले. अक्रूराचा नंदानें मोठाच सन्मान केला. अक्रूरानें नंदास कंसाचा निरोप कळविल्यानंतर त्या सर्वांस मोठा विचार पडला. नंदानें अक्रूरास व आणखीं कित्येक सुज्ञांस बलावून एकांतीं त्यांचा या गोष्टीविषयीं विचार घेतला. व शेवटीं असा विचार ठरविला कीं अक्रूर हा मायबापासारिखा आहे. जरी कंसाचा सेवक आहे तथापि त्याची भक्ति आपणावर विशेष आहे, याकरितां त्याच्या विचारास जी गोष्ट येईल ती करावी. अक्रूरानें

नंदास एकच गोष्ट कळविली कीं, कृष्ण हा परब्रह्म अवतार व दुष्ट संहारार्थ अवतरला आहे. शिवाय मथुरेंतन जे जे राक्षस आले त्यांची व्यवस्था काय झाली तो प्रकार तुह्मांस ठाऊकच असून तुह्मी एवढे संशयांत कां आहांत. तीच अवस्था कंसाची होणार. व त्याच्या मृत्यूनेंच कृष्णास हें पाचारण केलें आहे. तुह्मी निःसंदेह या उभयतांस मजसमागमें मथुरेस पाठवावे. त्यांस मीच परत आणून पोंचविण्यीचें पतकरितों. यावरून नंदानें कंसाकडे राम कृष्णास अक्रूरासमागमें प्रातःकाळीं पाठविण्याचें ठरविलें. त्यावेळीं नंद अक्रूरास ह्मणाला कीं पहा, ज्यावेळीं राम वनास जावयास निघाला, अथवा याग रक्षणार्थ विश्वामित्राकडे जावयाची तयारी झाली, त्यावेळीं विश्वामित्रास, राजास व सर्वांस राम हा कोण व याचा पराक्रम काय हें कळत होतें. परंतु माया जाळामुळें जसें त्यांचें अंतःकरण खिन्न झाल्याशिवाय राहिलें नाहीं, त्याचप्रमाणें राम कृष्णासाठीं आज आह्मांस वाईट वाटतें आहे. अक्रूरानें यशोदेचीही समजूत केली.

पहांटेस उठून यशोदेनें राम कृष्णास न्हाऊं माखूं घातलें. व खावयास पक्वान्न देऊन त्यांच्या आंगावर वस्त्रें भूषणें घालून अक्रूरासमागमें त्यांस रथावर बसविलें. कांहीं अंतरापर्यंत आपण नंदासह त्यांस पोंचविण्यास गेली, व मोठ्या खिन्नतेनें अक्रूराची आज्ञा घेऊन परत आली. त्यावेळीं अक्रूरानें तिची समजूत चांगल्या प्रकारें केली, व आपण रथ पुढें चालविला.

इकडे सर्व गवळणींनीं उद्यां पहांटेस राम कृष्णास मथुरेस पाठविणार असें रात्रीं ऐकिलेंच होतें. त्यावरून त्या सर्व रथ येण्याच्या रस्त्यावर चातकाप्रमाणें वाट पहातच उभ्या

होत्या. त्यांनीं तो रथ त्या स्थळीं येतांच चहूंकडून एकदांच येऊन रथा भोंवती वेढा घातला. आणि कृष्णास न नेण्याविषयीं अक्रूरास विनंती केली, आणि असें सचावल कीं, कृष्ण हा आमचें जीवन व प्राण आहे. हा गेला ह्मणजे आह्मीं व्यर्थ व दीन होऊं. अक्रूरानें त्या गोपींस ज्ञानोपदेश करून त्यांची संमती मिळविली, परंतु ज्या वेळीं अक्रूरानें रथ हांकला त्या वेळीं त्या वाटेवर मोठ्या दीनपणें पडून ह्मणाल्या कीं, जर तूं आमचा भाऊ व कृष्णाचा आप्त ह्मणवितोस तर कृपा करून हा रथ आतां आह्मां सर्वांच्या आंगावरून घेऊन जा; ह्मणजे आमचे देह तरी पावन होतील. कृष्ण या गोपींची अशी अवस्था पाहून अक्रूरास ह्मणाला कीं, अशानें ह्या कधींही समजणार नाहींत. कांहीं निर्दयपणा करावा तर तीही गोष्ट युक्त नाहीं; ह्मणून आज येथेंच कपटानें रहाणें करून पहांटेस यांस निद्रिस्त टाकून आपण चालतें व्हावें. याशिवाय दुसरा इलाजच नाहीं. अक्रूरास ती गोष्ट मानवली आणि गोपींस तो ह्मणाला कीं तुमच्या कृष्णास मी नेत नाहीं, आज येथेंच राहून उदयीक गोकुळास परत जाऊं. गोपींस हें ऐकून फारच आनंद वाटला, आणि सर्वांनीं तेथेंच रानांत वस्ती केली. इतक्यांत गोकुळांतील बहुतेक लोक कृष्ण विरहानें वेडे होऊन गोकुळ सोडून धांवत धांवत त्या स्थळीं आले, आणि राम कृष्ण व अक्रूरास भेटून कृष्णास गोपींनीं राहविला असें कळल्यानंतर सर्वांनीं गोपींचे आभार मानिले. नंतर सर्व लोक रात्रीं गोष्टी सांगत सांगत आनंदांत निमग्न होऊन झोंपीं गेले. परंतु गोपी तशाच जागत बसल्या होत्या, असें पाहून तीन प्रहर रात्रपर्यंत त्यांशीं आनंदानें राम कृष्णांनीं भाषणें करून

नंतर त्यांवर मायापाश योजून त्यांस निद्रिस्त केलें. आणि अक्रूरासमागमें मथुरेस चालते झाले. जाते वेळीं गोकुळांत परत गेले असें सर्वांस वाटण्याकरितां रथाचा मार्ग पहिल्यानें गोकुळाकडे दाखवून नंतर मथुरेकडे फिरविला. सूर्योदया-पर्यंत सर्व मंडळी निद्रिस्त होती. ती एकदांच जागृत होऊन पाहते तों राम, कृष्ण, अक्रूर आणि रथ कोठें दिसेना. लोक अति चिंताग्रस्त होऊन इकडे तिकडे फिरूं लागले. आणि गवळणी तर ज्या ठिकाणीं राम कृष्ण बसले होते त्या ठिकाणची माती तोंडांत घालघालून रडूं लागल्या. व त्या रथचक्राचा मार्ग गोकुळाकडे पाहून त्याही गोकुळास चालल्या. व लोकांसही वाटलें कीं, रथ गोकुळांत गेला. परंतु बऱ्याच अंतरावर जाऊन पुढें रथ चक्रें मथुरा मार्गाकडे वळलीं असें पाहून राम कृष्ण मथुरेस गेले अशी त्यांची खात्री होऊन ते तर निराश होऊन गो-कुळांत गेले. गवळणी तर त्याच ठिकाणीं सायंकाळपर्यंत रडत बसून अस्तमानीं शहरांत गेल्या. व तेथें हें वर्तमान नंद यशोदेस कळविलें. तेव्हां त्यांसही फार दुःख झालें.

इकडे कृष्ण, बळराम व अक्रूर हे त्रिवर्ग बोलत असतां कृष्णानें आपलें मन गोपींविषयीं फारच विव्हळ झाल्याचें कळविल्यावरून, अक्रूर कृष्णास ह्मणाला कीं आपण कोण, पराक्रम कसा केला तोही मी डोळ्यांनीं पाहिला, व पुढें काय होणार हें तर मी पूर्णपणें जाणतों, परंतु मायाजाळरूपानें मथुरेंतील भय माझ्या मनांत येऊन मी आपणास अशा प्रसंगांत नेऊन टाकण्याकरितां मुद्दाम घेऊन चाललों आहें, ह्मणून माझ्या मनास फारच दिलगिरी वाटते. याकरितां जर माझीही भ्रांती फेडाल तर माझें अंतःकरण याविषयीं

निर्भय होईल. हें सर्व मनांत आणून कांहीं पुढें गेल्यावर एक रमणीय सरोवर पाहून कृष्णानें अक्रूरास सांगितलें कीं, आपण येथें स्नानसंध्यादि कर्मे उरकून नंतर पुढें जाऊं. यावरून अक्रूरानें रथ सोडवून त्रिवर्ग तेथें स्नानास उतरले. स्नान करीत असतां अक्रूरानें पाण्यांत बुडी मारिली आहे अशी संधी पाहून कृष्णानें आपली माया अक्रूरास दाखविली. तेहतीस कोटी देव कृष्णास हात जोडतात. ब्रह्मा विष्णू महेश हे जवळ उभे आहेत. देव, गाई, ब्राह्मण, व ऋषिमंडळ कृष्णास राक्षस संहार करण्याविषयीं विनंती करीत आहेत. कृष्ण त्यांस आश्वासन देत आहे. गोपींची समजूत कृष्ण वरचेवर करीतच आहे. आणि कोट्यावधि राक्षस तळ हातानें कृष्ण रगडीतच आहे; असें त्याणें पाण्यांत असतां पाहिलें. आणि दुसरा चमत्कार असा पाहिला कीं कंस सिंहासनावर बसला असतां कृष्णानें त्यास खालीं ओढून त्याच्या केंसट्या धरून मारला. बळरामानें चाणूरास मारला. आणि उग्रसेनास राज्यावर स्थापून वसुदेव देवकीस बंदींतून सोडविलें. इतका चमत्कार पाहिल्यानंतर कृष्णावर पुष्पवृष्टी होत आहे अशा समयांस एकाएकीं अक्रूर सावध होऊन वर आला आणि राम कृष्ण जवळ उभेच आहेत असें पाहिलें. त्या वेळीं अक्रूरानें कृष्णचरणीं मस्तक ठेवून विनंती केली कीं, आतां मात्र महाराज मी या मायापटलांतन अगदीं वेगळा झालों, आणि सर्व गोष्टीविषयीं निर्भय आहें. मजसमागमें आपलें येणें, अगर धनुर्यागाचें कारण, हीं सर्व केवळ निमित्तें आहेत. काळाचेंही शासन करणार असा तूं त्या तुला कंस ह्मणजे पदार्थ काय ? व्यर्थ हे चमत्कार लोकांस दाखविण्याचे मात्र आहेत. अशी प्रा-

र्थना करून त्या ठिकाणीं स्नान संध्यादि कर्मे उरकून मथुरेस आले. आणि जें योग्य व सुशोभित स्थळ कंसानें तयार करून ठेविलें होतें त्या स्थळीं त्या उभयतांस ठेवून आपण कंस सभेस वर्तमान सांगण्याकरितां गेला.

---

## अध्याय ११ वा.

### कंसवध.

कंसानें कृष्णास राहण्यास स्थळ मात्र करून ठेविलें होतें, परंतु तो येईल असें त्यास वाटलें नव्हतें, ह्मणून कृष्ण वधार्थ जे दीर्घ प्रयत्न ते चालूच होते. इतक्यांत अक्रूरानें राम कृष्णास मोठ्या भुलथापीनें आणल्याची वर्दी दिली. त्या वेळीं कंसास प्रथम आनंद तर झाला, परंतु मागाहून त्याचें मन फारच भीतिग्रस्त झालें. आणि सभास्थानांतून एकटाच मोठ्या त्वरेनें एकांत स्थळीं जाऊन विचार करीत बसला. तात्पर्य मथुरावासी सकल जनांस कृष्ण आगमनाचें संतोषजन्य दुःख, वसुदेव देवकी, देव, ऋषि इत्यादिकांस वेळ फार जवळ आल्यामुळें महानंद, आणि कंसासुरास भयप्रद दुःख असें प्राप्त झालें. प्रातःकाळीं ज्यावेळीं रामकृष्ण उभयतां राजवाड्याकडे चालले, त्यावेळीं त्यांचीं स्वरूपें पाहून नागरिक स्त्रिया केवळ गर्क होऊन, अगदीं शोक करत्या झाल्या; आणि ह्मणूं लागल्या देवा, अशीं मदनासारखीं रूपें आमच्या दृष्टीस आतां पुनः कोठून पडतील? या चांडाळाच्या हातून हे वांचतील तरी कसे? आमची विनंती यावेळीं देवानेंच ऐकिली तर सुख; असें स्त्रिया बोलत आहेत, व सर्व जनही भयाभित होऊन कंसास शिव्या देत आहेत, हें जाणून त्या उभयतांनीं आपलें धैर्य आपल्या

बीनधास्त चालण्यांतच विशेष दाखवून जन मनें शांत केलीं. त्यामुळें सर्वांस असेंही वाटूं लागलें कीं, अशांच्याच हातानें दुष्ट संहार करविण्याचा हेतु देवाचा नसेल तरी कशावरून? ज्या मार्गानें ते गेले, तेथील स्त्रिया आरत्या घेऊन कृष्ण व बळीरामास ओंवाळीत होत्या. त्यांच्या मुद्रा म्लान पाहून कृष्णानें त्यांस आश्वासन दिलें. पुढें ते उभयतां यागस्थळीं गेले. तेथें कंसानें एक प्रचंड धनुष्य आणून ठेविलें होतें, तें मोडून त्या उभयतांनीं त्याचीं दोन खंडें आपल्या हातांत घेतलीं, आणि त्यांनीं कित्येक राक्षस त्याच स्थळीं मारिले. ही बातमी कंसास पोंचली. त्याणें एक हजार बळवान दैत्य तें स्थान संरक्षणार्थ पाठविले. ते येतांच रामकृष्णानें त्या सर्वांसही यमसदनास पाठविलें. ही बातमी कंसास कळतांच तो भयानें मूर्छित होऊन धरणीवर पडला. प्रधानानें त्याची समजूत करून अंतर्गृहांत नेला व सावध केला. इकडे राम कृष्ण यांणीं कित्येक असूर मर्दन करून पुढें न जातां आपल्या स्थळास परत गेले. तेथें देव, ऋषि व गंधर्व कृष्णास भेटले, व उदयीक तुमचा कार्यभाग करितों असें कृष्णानें कबूल केलें. कंसानें त्या रात्रीं झोंप न घेतां दहा सहस्र वीर यागकुंडानजळ, आणि कोठ्यावधि राजवाड्याच्या आसपास रक्षणार्थ ठेविले. आणि एका रणतुंबल नामक दैत्याच्या हाताखालीं कांहीं प्रबळ राक्षस सैन्य देऊन कृष्ण राहण्याच्या स्थलावर चाल करण्यास सांगितलें. इतकें करूनही त्यास झोंप लागलीच नाहीं. इकडे प्रातःकाळीं धनुष्यखंडें हातांत घेऊन उभय बंधू राजवाड्याकडे जात असतां, भयंकर सैन्य जवळच आपल्या आंगावर चालून येत आहे असें पाहिलें, तेव्हां लागलाच त्या सैन्या-

चा संहार त्या धनुष्यखंडांनीं केला. आणि पुढें यागस्थळींही तेथील प्रबल सैन्यास मारून राजवाड्याजवळ पोंचले व तेथीलही सैन्य मारिलें. ही बातमी ऐकून कंसानें आपला एक मोठा बलाढ्य व भयंकर हत्ती त्या दोघांच्या आंगावर घालण्यास आज्ञा केली. तो येतो असें पाहून त्याची कृष्णानें शेंपटी धरून त्यास वीस वेळ गरगरां भोंवडून जमीनीवर आपटून मारलें. नंतर दुसरा हत्ती सोडविला परंतु तो कृष्णाच्या आंगावर जाईना, असें कंसानें ऐकिल्यानंतर त्यावरील महाताची लबाडी असेल असें जाणून पुष्कळ महात बदलले. शेवटीं त्या हत्तीस मारल्यानंतर ते उभयतां निःशंकपणें राजवाड्यांत शिरले. तेथें चाणूर व मुष्टिक मल्ल युद्ध करण्यास रामकृष्णासमोर उभे राहिले, त्यावेळीं चाणुरास ओढून त्याच्या मस्तकीं मुष्टी मारून त्यास कृष्णानें ऐहिक दुःखांतून सोडविलें. आणि रामानें मुष्टिकास मारलें. यानंतर शल, तोशल इत्यादि शतशः मल्ल होते त्यांसही मारून टाकिले. ज्यावेळीं कुवलय हत्ती मारला त्या वेळीं त्या उभयतांनीं धनुखंडें टाकून त्या हत्तीचे दांतच हातीं घेतले, व त्यांणीं बहुत सैन्य व मल्ल मारिले. याच वेळीं कृष्णानें कंसास सिंहासनावरून ओढून त्याचा प्राण घेतला. कंसास मारिला हें पाहून सर्व राहिलेले दैत्य पळाले. व कित्येक कृष्णास शरण येऊन त्याजवळ क्षमा मागूं लागले. त्या सर्वांस त्यानें क्षमा करून राजसेवेंत ठेविलें. व तत्क्षणींच कृष्णानें वसुदेव देवकीस वस्त्रें भूषणें देऊन समक्ष आणविलीं. तीं उभयतां प्रथम अगदीं निस्तेज सर्वांस दिसलीं. परंतु ज्यावेळीं कृष्णाचा हस्तस्पर्श झाला, त्या समयीं तीं तेजस्वी झालीं. कृष्णानें त्यांच्या चरणीं

मस्तक ठेऊन त्यांचे हाल झाल्याविषयीं क्षमा मागितली. आणि उग्रसेनास राज्यासनीं स्थापन करून मथुरेचा सर्व बंदोबस्त केला. त्यावेळीं आकाशवाणी निघाली कीं 'आतां सर्वांचें कार्य झालें.' या वेळीं वाद्यांचा मोठाच गजर व उल्हाट यंत्रांचा भडिमार अस्तमानपर्यंत चालून सुस्वर मंगळ वाद्यें वाजत असून नृत्य गायन इत्यादि शुभसूचक समारंभ सर्व रात्रभर होत होता. सर्व मथुरेंतील लोकांस अति आनंद झाला. या वेळीं गोपी, गोप, नंद यशोदा यांच्या मोठ्या समारंभानें त्याच ठिकाणीं भेटी झाल्या. कृष्णानें वसुदेव देवकीस नंद यशोदेला भेटवून, त्या उभयांचें सख्य करून दिलें.

या वेळीं अशी शंका साहजिक उत्पन्न होणार कीं, या सर्वांच्या याच ठिकाणीं भेटी कां झाल्या? आणि नंद यशोदा, गोप गोपी, मथुरेंत याच वेळीं कोठून आल्या? त्यांतील प्रथम शंकेचें समाधान इतकेंच कीं, ज्या स्थानीं कंसादि दुष्टांचा संहार, देव गंधर्व दर्शन व शुभसूचक आकाशवाणी झाली त्याच ठिकाणीं या भेटीस स्थान योग्य ह्मणून कृष्णानें ही योजना केली. आतां दुसऱ्या शंकेचें समाधान असें कीं, ज्यावेळीं त्या रानांत राम कृष्णाचा शोध लागेना ह्मणून गोप गोपी गोकुळांत जाऊन, त्यांणीं नंद यशोदेस तें वर्तमान सांगितलें त्याच वेळीं सर्वांचा मथुरेस जाण्याचा निश्चय झाला; व गोप गोपी समागमें यशोदा नंद मथुरेस निघाले. व ते कंसाचा प्राण घेण्याच्या संधीसच मथुरेस पोंचून निर्भयपणें त्या स्थानीं येऊन कृष्णास भेटले.

असोः या दिवशीं घरोघर मथुरेंत गुढ्या उभारल्या. कंसानें जे राजे कारागृहांत ठेविले होते ते सोडवून, त्यांस

वस्त्रं भूषणें देऊन जेव्हां आणिलें, तेव्हां सर्वांनीं कृष्णचरणीं मस्तक ठेविलें. त्यावेळीं राजांच्या मुकुटास मुकुट थडकून जे अमुल्य हिरे जमिनीवर पडत होते त्या योगें पहाणारांचे नेत्र दिपत होते.

वसुदेव देवकी यांणीं नंद यशोदादिकांस तसेंच सर्व राजांस मोठ्या सन्मानानें कांहीं दिवस राहवून राम कृष्णाचें समुहूर्त्त पाहून मौंजीबंधन केलें. नंतर नंद यशोदा, गोप गोपी मोठ्या आनंदानें गोकुळांत परत गेल्या. तीं सर्व गोकुळांत पोंचल्यानंतर येथील सर्व वर्तमान तेथें राहिलेल्या लोकांस कळतांच मोटाच आनंद होऊन गुढ्या तोरणें उभारून मोटाच मंगलोत्साह गोकुळांतही झाला.

---

## अध्याय २० वा.

### कृष्ण, बळराम व सुदामा विद्याभ्यास व गुरुदक्षणा.

श्रीकृष्ण, बळराम व सुदामा हे अवंती नगरींतील एका सांदीपन नांवाच्या ब्राह्मणाकडे विद्या शिकण्यास राहिले. तो ब्राह्मण महा विद्वान व ज्याची कीर्ति फारच प्रख्यात असून तो शिक्षण देण्याच्या कर्मांत फार निष्णात होता. त्याणें फारच प्रीतीनें त्या त्रिवर्गांस विद्या शिकविली. हे त्रिवर्ग असे बुद्धिमान होते कीं, गुरु मुखांतून निघतांच त्यांणीं शब्द ग्रहण करावे; व त्यांचें कधींच विस्मरण होऊं नये. त्यांणीं अल्प काळांतच सर्व विद्या अवगत करून घेतल्या. सांदीपनानें त्या त्रिवर्गांवर शिष्याप्रमाणें नव्हे परंतु पुत्राप्रमाणें लोभ ठेविला होता. याविषयीं एक उदाहरण असें आहे कीं, एके दिवशीं गुरुपत्नीनें बायकांच्या आर्षे चाली-

प्रमाणें या त्रिवर्गांस लांकडें आणण्यास सांगितलें. व त्या सरिसेंच ते त्रिवर्ग अरण्यांत गेले; परंतु हें सांदीपन गुरूस कळतांच त्यांणीं रानांत धांवत जाऊन त्यांस परत आणलें. आणि बायकोस सांगितलें कीं, हे शिष्य नव्हत पुत्र आहेत; ह्मणून आपण त्यांवर पुत्रासारखा लोभ ठेविला पाहिजे.

या त्रिवर्गांची विद्या पूर्ण होऊन त्यांची गुरूनीं परीक्षा घेतल्यानंतर त्यांस घरीं जाण्यास आज्ञा दिली. परंतु कांहीं तरी गुरुदक्षणा मागण्याविषयीं त्रिवर्गांनीं विनंती केल्यावरून, राम व सुदामा या उभयतांकडून आपली इच्छित दक्षणा घेऊन सांदीपनानें कृष्णास सांगितलें कीं, तुझ्याकडील दक्षिणेची मला गरज नाहीं. कृष्ण हात जोडून बोलला कीं महाराज, आपलें तर ठीकच आहे; परंत मला माझें कर्तव्यकर्म केलें पाहिजे. ह्मणून आपण मला कांहीं तरी आज्ञा करावी हीच आपणास माझी विनंती आहे. हें ऐकून सांदीपन बोलला कीं, जर तूं मला दक्षणा देणारच तर माझा एकुलता एक मुलगा मृत्यु पावला आहे तो मला आणून दे. कृष्ण गुरूचे चरण वंदन करून ह्मणाला कीं, हें कार्य मला कठीण नाहीं. त्यास आतांच मी एका क्षणांत आणून देतों. असें ह्मणून आज्ञा घेऊन निघाला. व त्रैलोक्यांत त्या पुत्राचा शोध करीत असतां तो मुलगा समुद्रांत आहे असें ऐकून एका मत्स्यास विचारलें. त्याणें तो पुत्र शंख दैत्यानें खाल्ला असे कळवितांच कृष्णानें शंखास धरून विचारतांच त्याणें तो वर स्वर्गीं गेला आहे असें कळविलें. तें ऐकून त्याचा देह हातांत घेऊन कृष्ण यमधर्माकडे गेला. आणि त्याकडून तो पुत्र घेऊन मथुरेस आपल्या गुरूस आणून दिला आणि त्याचें मन सुप्रसन्न केलें. नंतर

ते त्रिवर्ग गुरूची आज्ञा घेऊन मथुरेस आले. कृष्ण व बळराम महा विद्वान् होऊन आले व लोकांस भेटले या योगानें तेथील सर्वत्रांस हर्ष झाला.

---

## अध्याय २१ वा.

### उद्धवाचें गोकुळीं प्रयाण व शांतवन.

कृष्ण व बळराम विद्या शिकून आल्यानंतर, आह्मीं गोकुळ सोडल्यास फार दिवस झाले, आपलीं मातापितरें, गोप गोपी इत्यादिक आपल्या विरहानें त्रस्त असतील, त्यांचें जर आपण समाधान न केलें तर कदाचित् प्राणत्यागही करतील, यासाठीं कांहीं तरी युक्ति योजावी असा बेत करून महा विद्वान उद्धव यास बोलावून कृष्णानें आज्ञा केली कीं, त्वां गोकुळांत जाऊन नंद यशोदा जीं मजकरितां अति क्षीण व दीन झालीं असतील त्यांस भेटावें. नंतर सकळ गोपाळ व गोपींस भेटावें. मातापितरांस तत्वज्ञानामृत प्राशन करवून त्यांचीं मनें शांत करावीं. नंतर गोपी ज्या मजकरितां प्राण त्याग करण्यास तयार झाल्या असतील त्यांचें समाधान करावें. व नंतर सर्व गोपाळांचेंही शांतवन करावें. मजवर कृपा करून एवढें कार्य त्वां करून यावें ह्मणजे माझें अंतःकरण स्थिर होईल. हें ऐकून उद्धवानें कृष्णास वंदन करून गोकुळास प्रयाण केलें.

प्रथम उद्धव नंद यशोदेस भेटला, आणि पहातो तों त्यांचें अस्थिचर्म मात्र राहिले आहेत. या उभयतांचें उद्धवानें बहुत प्रकारानें शांतवन केलें, परंतु कोणत्याही प्रकारें त्यांची खात्री होईना; तेव्हां त्यांस उद्धवानें वेदांत ज्ञानोपदेश केला. त्या वेळीं त्यांस उत्तम ज्ञान प्राप्त होऊन चित्तवृत्ति संतुष्ट

होऊन कृष्णास लवकर पाठवावें असें सांगून उद्धवास निरोप दिला. यानंतर कित्येक विप्र मंडळी व त्यांच्या स्त्रिया यांच्याही अनेक प्रकारें समजुती केल्या. त्याचप्रमाणें गोपांस भेटून त्यांसही नानाप्रकारच्या गोड गोड गोष्टी सांगून त्यांच्याही समजुती केल्या. पुढें सर्व गवळणींची समजूत करण्यास तर उद्धवाचें सर्व चातुर्य खर्च झालें; तेव्हां कांहींशी समजूत झाली. परंतु ज्यावेळीं रथावर बसून उद्धव मथुरेस चालला त्यावेळीं सर्व गोपी आर्त दुःखित होऊन विगलित मनानें त्या रथामागून धाऊं लागल्या, व उपवनांत त्याच्या रथा पुढें पडल्या. मागें कृष्ण मथुरेस जाते वेळीं जसें झालें त्याचप्रमाणें आतांही त्यांची अवस्था झाली. त्यावेळीं उद्धव अगदीं विस्मित झाला. व रथाखालीं उतरून गोपींस त्याणें फारच उपदेश केला. परंतु त्या गोपी कृष्णासाठीं फारच वेडया झाल्या आहेत असें पाहून त्याणें त्या उपवनांत चार महिने वस्ती केली. तेथें तो नित्य त्या गवळणींस ज्ञानोपदेश करी तथापि त्यांचीं मनें श्रीकृष्णचरणीं दृढ लपेटलीं होतीं. त्या केवळ भ्रमिष्टच झाल्या असें नाहीं परंतु पूर्ण तत्वीं मिळाल्या आहेत अशी त्याच्या मनाची खात्री झाल्यामुळें शेवटीं त्याणें श्रीकृष्ण वरदोहस्त त्यांच्या मस्तकीं ठेऊन जेव्हां त्या सर्वांत ब्रह्मोपदेश केला, त्यावेळीं सर्वांची समजूत होऊन उद्धवास मथुरेस जाण्यास संमती मिळाली.

---

# अध्याय २२ वा.

## जरासंध पराभव व काळयवन वध.

कृष्णानें मथुरेचें राज्य उग्रसेनास दिलें. आणि तें संरक्षण करण्याकरितां मोठमोठे बंदोबस्त केले. कंसासुराच्या

वेळेंच जें सैन्य व जे कित्येक शरण आलेले सरदार होते त्या सर्वांस रक्षक ठेविलें. वसुदेवासहि एक मुख्य सेनापति करून ठेविला. कंसाचे जे कोणी आप्त व सरदार होते, त्यांचा मान मरातब कायम राखून कंसाच्या स्त्रियांचा बंदोबस्त उत्तम ठेविला. परंतु त्या स्त्रियांच्या अंतःकरणांत रात्रंदिवस दुःखाग्नि पेटून कृष्णास मारण्याविषयीं त्यांचेही प्रयत्न चालले. कंसस्त्रियांचा पिता जरासंध जो महा बलाढ्य होता, त्याकडे त्यांणीं जाऊन सांगितलें कीं, तुझ्यासारखा पराक्रमी पिता असतां आह्मी आमच्या पतीच्या वैऱ्याचें मेलेलें अन्न खाऊन असावें, त्यापेक्षां आमचा शिरच्छेद तूं आपल्या हातानेंच कां करीनास? गवळटाच्या धर्माचें अन्न खाण्यापेक्षां मृत्यु फारच चांगला. जरासंध हे शब्द ऐकतांच प्रळय सागरासारखा खवळून प्रतिज्ञेनें बोलला कीं, तुह्मी आतां मथुरेस जा. तेथें तुह्मी पोंचत आहां तोंच मी सदळ मथुरेवर येऊन त्या दोघांही पोरांस मारून त्या उग्रसेनास राज्यभ्रष्ट करितों. तुमचा सूड उगविण्यास क्षण एक मी विलंब करणार नाहीं. त्या स्त्रिया गेल्यावर जरासंधानें आपल्या प्रचंड वीरांस बोलावून आज्ञा केली कीं, निवडक सैन्य घेऊन लवकर मथुरेवर गेलें पाहिजे. त्यांणीं अक्षौहिणी सैन्य तयार करून लागलेंच ध्वजारोपण केलें. अशा अफाट स्वारीनिशीं जरासंध मथुरेवर येऊन त्याणें सर्व शहराभोंवता वेढा दिला. हें वर्तमान उग्रसेनास कळतांच तो भयाभित झाला. इकडे कृष्णानें जितकें सैन्य होतें तितकें कडेकोट तयार करून शहराबाहेर काढिलें. आणि कित्येक पदाति, रथी व महारथी, रथ, हत्ती, घोडे वसुदेवासमागमें देऊन त्यासही शहराबाहेर युद्धास पाठ-

विलें. इकडे आपण उभय बंधु चरण चालीनें बाहेर येऊन आकाशाकडे पाहिलें तों आकाशमार्गानें दोन सशस्त्र तेजस्वी रथ खालीं उतरले त्यांत वसून शत्रुसैन्याचा वध आरंभिला.

ज्यावेळीं राम व कृष्ण हातांत लहान गोजीरवाणीं शस्त्रें ह्मणजे चक्रें व सुदर्शनें घेऊन असंख्य दळ संहार करीत आहेत असें वसुदेवानें पाहिलें, त्यावेळीं तोही त्यास्थानीं मोठ्या शौर्यानें लढून शत्रूकडील प्रबळ योध्ये व बहुत सैन्य मारिलें. कृष्णानें असंख्य वीरांचा संहार केला. आणि बळरामानें तर त्या युद्धांत सरसावून सर्वांच्या पुढें जाऊन जरासंधाच्या रथावर आरोहण करून त्यास धरिलें. व त्याचा संहार करण्याकरितां शस्त्र उचलणार परंतु इतक्यांत कृष्ण-संकेतावरून त्यास सोडलें. तो पळून स्वदेशीं गेल्यावर त्याचे मित्र शिशुपाळ, वक्रदंत यांणीं त्यास चढावर देऊन सतरा वेळ मोठ्या प्रचंड सैन्यानिशीं मथुरेवर पाठविलें. तितक्याही वेळीं कृष्णानें वरचेवर त्याच्या सर्व सैन्याचा वध करून त्याला पळविलें. शेवटचे वेळीं बळरामानें त्याचा वध करण्याकरितां सुचविलें होतें, परंतु कृष्णानें त्यास जिवंत सोडला. तो त्यावेळीं जीवच देणार होता परंतु त्याचे मित्र शिशुपाळ, वक्रदंत यांणीं आत्महत्या न करण्याविषयीं बोध केल्यावरून तो स्वराज्य सोडून वनांत भ्रमिष्टासारखा हिंडू लागला. तो असा भटकत असतां एके दिवशीं त्याच मार्गानें नारदमुनीही तेथें आले. त्यांस पाहून जरासंधानें म्लान मुखानें नमस्कार केला. व पुढें हात जोडून उभा राहतांच नारदानें सचिंत होण्याचें कारण विचारतांच त्याणें तें सांगितलें. तें ऐकून नारदानें सांगितलें कीं काळयवनास जर तूं साह्य आणशील तर तुझा कार्य—

भाग होईल. हें वाक्य हितकर मानून लागलाच त्याणें काळयवनास गांठून आपलें दैन्य त्यास सांगितलें. त्याणें तीन कोटी सैन्यासह जरासंधसमागमें मथुरेवर येऊन शहरास वेढा दिला. कृष्णानें पुढें घडणारा कार्य भाग ध्यानांत आणून आपलें सैन्य व सर्वत्र मंडळी गुप्त रूपें योगमायेनें द्वारकेस नेली. आणि बळरामासही सुचना करून तेथेंच पाठविला. नंतर आपण एकटा शहरा बाहेर त्या काळयवनासमोर आला. काळयवनानें सर्व मथुरा ओस पडली आणि एकटा कृष्ण समोर आला हें पाहून ह्मटलें कीं, अरे काळ्या, त्वां कपटानें सर्वांस अदृश्य करून कोठें लपविलें आहेस तें मी जाणतों; परंतु तें तुर्त मी कांहीं मनांत न आणतां प्रथम तुला मारून नंतर तुझे लपविलेलें मंडळ बाहेर काढून त्यांसही मारून मी जरासंधास राज्यावर बसवितों. असें ह्मणून कृष्णास धरावयास धांवला. काळयवन आपल्या आंगावर लोटला असें पाहून कृष्णानें तेथून पळ काढली. अशा रीतीनें वनोवनीं कृष्ण पळतो व तो त्यास धरण्यास धांवतो असा क्रम चालला. मथुरेपासून पुष्कळ लांबीवर पश्चिमेकडील एका पर्वताच्या गुहेंत कृष्ण शिरतांच काळयवनही आंत शिरला. जो कृष्ण कोणासच धरिला जाणार नाहीं व दिसणार नाहीं तो काळयवनाच्यानें कसा धरवेल? त्या प्रमाणेंच झालें. तें असें कीं, त्या गुहेंत मांधाता राजाचा पुत्र मुचुकुंद हा झोंपीं गेला होता. त्यास इंद्राचा असा वर होता कीं, जो कोणी त्याला स्पर्श करील तो भस्म होईल. हें कृष्णास मात्र ठाऊक होतें. तेथें एकाएकीं कृष्ण येऊन आपला पीतांबर त्यावर घालून आपण गुप्तरूपें जवळच

लपून राहिला. काळयवन कृष्ण पळाला कोठें दिसत नाहीं असें पाहून इकडे तिकडे पहात फिरू लागला. इतक्यांत पीतांबर पांघरून कोणी एक मनुष्य गुहेंत गाढ निद्रेचें मिष करून घोरत पडला आहे असें त्यानें पाहिलें. व हा कृष्ण एकाएकीं कपटानें गुप्त होऊन आणि अशा बिकट स्थलांत आपल्यास शोधावयास कोण येतो असें त्याच्या मनांत येऊन हा निर्भय पडला आहे असें त्यास वाटलें. नंतर तो जवळ जाऊन ह्मणाला, अरे चोरा, मला चुकवून तूं येथें निर्भयपणें निजलास काय? आतां तुला मारून टाकितों. असें ह्मणून मुचुकुंद राजाच्या अंगावरील पीतांबर काढण्यासाठीं हात टाकला. तों हात स्पर्शतांच लागलीच काळयवनाची राख होऊन एक लहानसा डोंगरच होऊन त्या स्थळीं पडला. मुचुकुंद राजाही खडबडून उठून बसला परंतु जवळ कोणीच नाहीं असें पाहून चकित झाला तों कृष्ण दर्शन झालें. मुचुकुंद राजास कृष्ण दर्शन होण्याचाही वर होता.

या मुचुकुंदाच्या निद्रेविषयीं अशी कथा आहे कीं एकदां ज्यावेळीं देव दैत्यांशीं युद्ध प्रसंग चालला होता, त्या वेळीं मुचुकुंदाने आपल्या पराक्रमानें देवांचें रक्षण केलें होतें. त्या वेळेस त्याला फार श्रम झाले, ते जाण्याकरितां निद्रा घेण्यास इंद्राजवळ त्याणें विनंती केली असतां, इंद्रानें त्यास त्या गुहेंत निजावयास सांगितलें. आणि जो त्याची निद्रा भंग करील तो तेथेंच भस्म होईल असा वर देऊन अंतीं कृष्ण दर्शनही होईल असें सांगितलें. त्याप्रमाणें काळयवनाचा बळी तेथें पडून कृष्णाचें दर्शन झाल्यावर मुचुकुंद राजा स्वस्थानीं गेला.

कृष्ण हा कार्यभाग उरकून विवराबाहेर आला तों बळि-रामही त्यास शोधीत त्याच ठिकाणीं आलेला भेटला. ते उभयतां कांहीं गोष्टी बोलत आहेत, तों जरासंधाचें प्रबळ सैन्य कृष्ण शोधार्थ आलें. त्यांतील कित्येक वीरांनीं राम कृ-ष्णास पहातांच जरासंधास सचविलें कीं, अशा प्रतापी मुलांशीं समोर लढून कांहीं होणें नाहीं. त्यावरून त्या पर्वतास चहूंकडून अग्नि लाविला. चहूंकडून पर्वत एकदम पेटला आतां दुसरा कांहींच इलाज न करितां सर्वांदेखत या अग्नींतून उडून जावें हेंच कृष्णास चांगलें वाटून त्याणें त्या स्थानीं गरुडाचें स्मरण केलें, तों तो हात जोडून पुढें उभा राहिला. त्यावर बसून उभयतांही सर्वांदेखत उडून गेले. अशी स्कंधपुराणांत कथा आहे. आणि कोठें असें लेखन आढळतें कीं, कृष्ण व बळिराम जरासंधाच्या मनांत दुष्ट कामना उत्पन्न होण्याकरितां तेथेंच गुप्त झाले. कोठें असाही लेख सांपडतो कीं ते उभय बंधु भीमकाच्या रथां-तून निघून गेले. परंतु एकंदरीनें पहातां पर्वतास अग्नि ला-गतांच कृष्ण व बळिराम तेथून निघून गेले.

श्रीकृष्णनाथानें त्या गुहेबाहेर पडतांच सुदर्शनानें जरा-संधाचें व काळयवनाचें सकल सैन्य सव्हारिलें. नंतर कंसाचें भांडार फोडून सर्व द्रव्य द्वारकेस नेण्याची तयारी केली. त्या कृत्यास जरासंध आडवा आला. त्या वेळीं बळरामास त्या द्रव्यासोबत पाठवून आपण जरासंधाशीं युद्ध करून त्याचा पुन्हा पराभव केला. आनर्तदेशाधिपती रेवत राजा याणें आपली कन्या रेवती बळीरामास देऊन मोठ्या उत्साहानें लग्न केलें. त्या मंगलोत्साहानंतर श्रीकृ-ष्णनाथ व बळराम हे रेवतीसहवर्तमान द्वारकेस गेले.

# अध्याय २३ वा.

## रुक्मिणी हरण.

विदर्भदेशाचा भीमक नामें राजा जो महासमर्थ त्याची एक अत्यंत सुरूप भीमकी या नांवाची कन्या लग्न करण्यालायक उपवर झाली होती. ती कन्या कोणास द्यावी, या विषयीं राजाचें मन रात्रंदिवस सचिंत होतें. एके दिवशीं राजा आपल्या सभेंत विराजमान असून भीमकीही आपल्या दासीसह सभास्थानच्या एकांतस्थानीं सभा चमत्कार पहात बसली असतां, अकस्मात, कीर्तिमुख या नांवाच्या एका ब्राह्मणानें त्या सभेंत राजास विनंती केली कीं, महाराज, मी एक गोष्ट आपणास सांगतों ती जरी माझ्या मुखानें ऐकण्यास योग्य नाहीं, तथापि आज्ञा असल्यास कळवितों. राजानें आज्ञा दिल्यावर त्याणें सांगितलें कीं, महाराज, आपल्या कन्येस तिच्या लावण्यास शोभणारा असा एक श्रीकृष्ण नांवाचा वर माझ्या पहाण्यांत आला आहे. त्याचें रूप, गुण, कीर्ति आणि पराक्रम वर्णन करण्यास माझी तर कथा काय परंतु सहस्र मुखांचा जो शेष त्याच्यानेंही होणार नाहीं. मी एवढेंच मात्र सांगतों कीं तो जर नवरा आमच्या बाईसाहेबास मिळेल तर द्वारकावासी श्रीकृष्णनाथ आणि विदर्भ नृपकन्या भीमकी हीं उभयतां उत्तम प्रकारें वधुवरें शोभतील; व आपली कन्या त्रिभुवनांत धन्य होईल. यानंतर त्या ब्राह्मणानें श्रीकृष्णरूपाचें एकंदर जें यथार्थ वर्णन केलें, तें ऐकतांच राजा व सर्व सभासद तटस्थ झाले.

भीमकीचा ह्मणजे रुक्मिणीचा बंधु रुक्मया याचें मन श्रीकृष्णवैभवावर, रूपावर तसेंच गुणावर मोहित न होतां

शिशुपाळास ती आपली बहीण आर्पण करण्याचा त्याचा फार दिवसाचा निश्चय होता. त्याप्रमाणें त्यानें शिशुपाळास या लग्न निश्चयाचें पत्र लिहिलें. व वक्रदत, जरासंध इ० शिशुपाळाचे मित्र यांसही तो लग्नसमारंभ सुशोभित करावा आणि प्रसंग पडल्यास कृष्णाशीं सामना करण्याची शिशुपाळास मदतही करावी असही कळविलें होतें. त्यावरून तो शिशुपाळ आपल्या मंडळीसह मोठ्या थाटानें लग्नाकरितां विदर्भ नगरीं आला. त्या सर्वांचा आदर रुक्मयानें उत्तम प्रकारें करून त्यांस मोठ्या तत्परतेनें एका उत्तम स्थळीं ठेविलें.

इकडे भीमकीनें त्या कीर्तिमुख ब्राह्मणाचे हातीं श्रीकृष्णास देण्याकरितां सात श्लोकांचें एक पत्र दिलें. त्या पत्रांत आपलें मन श्रीकृष्णचरणीं लीन आहे व तुजवांचून मला दुसरा पती वरणें नाही, असें दर्शविलें. त्यावरून श्रीकृष्णही आपलें सैन्य घेऊन विदर्भ नगरीं शेजारील अंबिकापुरीं येऊन राहिला.

त्यावेळेस रुक्मिणीस हळद लागली व कृष्णही आला नाहीं असें पाहून शिशुपाळ आतां आपला खास पती होतो असें तिला मोठें भय पडलें. व तिला अन्न पाणीही गोड न लागून ती रात्रंदिवस कृष्णाचें चिंतन करूं लागली. इतक्यांत कुलधर्माप्रमाणें लग्न लागण्याचे पूर्वीं रुक्मिणीस गांवच्या सिमेबाहेरील अंबिकेच्या देवळांत देवीच्या पाया पडविण्यास नेलें. तिजबरोबर मोठें सैन्य होतें. कृष्णही तेथें आसपास तयारच होता. ती दीनपणें देवीच्या चरणावर मस्तक ठेऊन तिला प्रदक्षणा करीत आहे, व कृष्णाचा समुखानें धांवा करीत आहे तों कृष्णानें एकदम तिला

आपल्या रथांत उचलून घेतली, व तिनेंही देवीनें दिलेली निलोत्पल माला आनंदानें कृष्णाच्या गळ्यांत घालून चरणावर मस्तक ठेविलें: त्यावेळेस सकल देवांनीं स्वर्गीहून पुष्पवृष्टि केली. सकल सैन्यावर कृष्णानें मोहिनीअस्त्र घातल्यामुळें त्यांचीं शस्त्रें हातांतून गळून ते अगदीं मुर्च्छित पडले होते.

---

# अध्याय २४ वा.

## रुक्मिणी स्वयंवर.

मागील अध्यायांत कृष्णानें रुक्मिणी हरण केल्याची कथा झाली. आतां पुढें असा वृत्तांत झाला कीं, ज्या वेळीं रुक्मिणी हरण करून नेली असे सर्व वीरांनीं ऐकलें, त्या वेळीं एकच कल्होळ झाला. आणि एकंदर सरदार रुक्मिणी कोठें आहे याचा शोध करूं लागले. तें पाहून रुक्मिणीच्या सख्या असें ह्मणूं लागल्या कीं, मूर्खांनों, तुह्मी एवढे दिग्विजयी वीर जागृत व हुशार असून तुह्मां देखत कृष्णानें रुक्मिणी हरण करून नेली हें तुह्मांस दिसलें नाहीं काय? त्या वेळेस तुमचे पराक्रम कोठें गेले होते? असें ऐकून रथारूढ होऊन बहुत वीर दशदिशा तिच्या शोधार्थ धावूं लागले.

इकडे श्रीकृष्ण, बळिभद्रादिकरून एकंदर यादव वीर युद्धास उटावले. त्या वेळेस त्या उभय सेनेचा मोटा संग्राम झाला, आणि त्यांत बळीभद्रास फार कोप येऊन तो आपले नांगरानें असंख्य वीरांचा संव्हार करीत चालला. जरासंध वक्रंदत आदिकरून मोटमोटाले राजे आपल्या असंख्य सैन्यानिशीं कृष्णावर चाल करून गेले. तसेंच अंग, वंग,

कलिंग देशींचे नृपति शाल्व पौंड्रक व केशिक हेही आपल्या सैन्यानिशीं निकरानें लढूं लागले. परंतु तितक्याही सर्व लष्कराचा संहार एकटा । बळिरामानें केला. आणि रणांत शत्रु सैन्यास जणूं कृतांतासारिखा दिसूं लागला. असें पाहून जरासंध फारच भयाभीत झाला आणि ह्मणूं लागला कीं आतां समय बरा दिसत नाहीं. ज्या वेळीं रुक्मयाच्या अगणित सैन्याचा संहार होऊं लागला, त्यावेळीं रुक्मिणीनें असें मनांत आणिलें कीं, दोन्ही दळांचा जरी संहार झाला तथापि एकीकडे सासरें व एकीकडे माहेर मिळून दुःख आपल्यासच. अशा विचारानें कृष्णाकडे दीन वदनानें पाहिलें. त्यावरून कृष्णानें तिला पोटाशीं धरून तिची समजूत केली.

इतक्यांत शिशुपाळ लग्नाचे तयारीनें बाहेर निघाला. त्यास वाटेंत नानाप्रकारचे अपशकुन झाले. त्यांच न तो काळजी करीत आहे, इतक्यांत जरासंधानें निरोप आणला कीं कृष्णानें रुक्मिणी नेली व दुर्दैवानुसार आपल्या सर्व सैन्याचा पराभव झाला. हें ऐकतांच सर्व राजे आपापल्या स्थानीं पळून गेले. रुक्मिणीचा बंधु रुक्मया ज्याची पूर्ण प्रीति शिशुपाळावर त्या वराचा कार्यभंग झाला आणि आपल्या सर्व वीरांचा संहार झाला असें ऐकून भयंकर आरोळी देऊन आपल्या सेनेसहवर्तमान कृष्णाशीं युद्ध करण्यास गेला. त्याणें बाणांची वृष्टि अशी चालविली कीं आपल्या शौर्यानें यादवांस दशदिशा पळविलें. हें पाहून कृष्णानें एक तीव्र बाण मारून रुक्मयाचे घोडे व सारथी मारले. आणि दुसऱ्या बाणानें त्याचा मुकुट खालीं पाडिला. आणि हातांत गदा घेऊन आपल्यावर धांवत आला असें पाहून धनुष्यकोटीनें रुक्मयास आपल्या रथाशीं ओढला, आणि त्याचा शिर-

च्छेद करणार तों रुक्मिणीनें म्लान वदन केलें. त्यावरून त्याचा वध न करितां त्याचे पांच पाट काढून रुक्मिणीस सांगितलें कीं, आतां आपल्या विजयी बंधूस आरती ओंवाळ. इतक्यांत बळरामही सेना संहार करीत तेथें आला. त्याच्या शिफारशीवरून रुक्मयास कृष्णानें सोडलें. तेव्हां त्यानें जाऊन एक नवीन भोजकट या नांवाचें नगर वसवून, तेथें राहिला. कृष्ण सोरटीसोमनाथाजवळ राहिला. तेथें भीमक येऊन कृष्णास लग्नाकरितां वैदर्भ नगरीं येण्याचा आग्रह केला. परंतु उभयतांच्या संमतानें तेथेंच विवाह करण्याचें ठरल्यावरून कृष्णानें वसुदेव, देवकी, उग्रसेन, सुभद्रा आणि रेवती इत्यादि सर्व वऱ्हाडी द्वारकेहून आणविलें.

रुक्मिणीस भीमकानें आपल्या रथांतून घरीं नेली, व तिला कृष्णाकडील आलेली उष्टी हळद लाविली, कृष्णानें दान धर्म फार केला. रुखवत येऊन श्रीकृष्ण भोजनास बसले. नतर शुद्धमतीनें तें उच्छिष्ट ताट आपल्या मंडपीं नेलें. तेथें भीमकाच्या हातीं कृष्णाची मुद्रिका घातली. त्यानंतर श्रीकृष्ण घोड्यावर बसून लग्नास चालले. उग्रसेन, वसुदेव आणि बळराम मागाहून थाटानें येत होते. असे सर्व वधूच्या मंडपांत आले. तेथें श्रीकृष्णचरण भीमकानें प्रक्षालन केले व त्यास वस्त्रालंकार दिले. नंतर दहीं, मध व तूप एकत्र करून श्रीकृष्णाच्या हातावर दिलें. भक्षण करतेवेळीं कांहीं थट्टेचीं भाषणें झालीं. इतक्यांत शेवटची लग्नघटका भरत आहे तों अंतरपाट धरिला, व मोठ्या समारंभानें लग्न झालें. नंतर कृष्णानें नवरी कडेवर घेऊन बहुल्यावर टाकिल्यानंतर देवकी सूनमुख पहावयास आली.

या वेळींही थट्टा फार झाली. नांवें वगैरे एकमेकांचीं एकमेकांनीं घेतलीं. यादवांनीं कृष्णास ह्मटलें कीं, जसा आपण रुक्मयाचा सन्मान केलात तसा आपला होत नाहीं ह्मणून इतर मेहुणे आपल्यावर रुसले आहेत. या थट्टेवरून सर्व शालक मंडळीस वस्त्रालंकार कृष्णानें दिले. यानंतर हळद घेऊन रुक्मिणीच्या अंगास कृष्णानें मर्दन केली, त्यावेळीं रेवतीनें कृष्णास थट्टेनें ह्मटलें कीं ज्या हस्तानें आपण 'तिकडे' मर्दन केलें तसें येथें न करितां किंचित् हलका हात असावा. अशा रीतीनें चार दिवस लग्नसोहळा झाल्यानंतर शुद्धमती रुक्मिणीची आई इनें भीमकी देवकीच्या पदरांत घातली. यानंतर सर्व यादवांस शेले पागोट्या व उत्तम भूषणें देऊन षड्रसान्न भोजन दिल्यानंतर भीमकानें जे कोणी देव ऋषि व मोठमोठे राजे लग्नाकरितां आले होते त्या सर्वांचा गौरव करून त्यांस सन्मानानें स्वस्थानीं लावून दिलें. यानंतर सैन्य व वऱ्हाडी सहवर्तमान भीमक राजा आपल्या नगरास परत आला. आणि श्रीकृष्णभगवान रुक्मिणीसहवर्तमान सर्वांस घेऊन द्वारकेस आले. त्याठिकाणीं येतांच उग्रसेनानें द्रव्य भांडार फोडून अमित धन याचकांस दिलें. त्यानंतर द्वारकेंतील महान शिष्ट शिष्ट यांस भोजनें व वस्त्रभूषणें कृष्णानें दिलीं. यावेळीं देव गंधर्व सहस्त्रावधि ऋषि व ऋषिपत्न्या आपापले सुखासनीं विमानारूढ होऊन द्वारकेस श्रीकृष्ण व रुक्मिणीच्या दर्शनास आल्या. त्या वेळीं रुक्मिणीनें लक्ष्मी पूजन केलें. कृष्णानें सर्वांच्या आग्रहावरून वधूनामोच्चारण आणखी कांहीं थट्टासूचक समारंभ करून सर्वांस लावून दिलें.

# अध्याय २५ वा.

## स्यमंतक मणी व नारद गर्व परिहार.

मागील अध्यायांत रुक्मिणीसह कृष्ण द्वारकेस गेल्याची कथा झाली. आतां कथा अशी कीं मागध देशीच्या सत्राजित राजानें सूर्यास प्रसन्न करून त्यापासून नित्य अष्टभार सुवर्ण उत्पन्न होई असा एक देदीप्यमान स्यमंतक मणी मिळविला. तो मणी राजा नित्य आपल्या गळ्यांत घालीत असे. एके दिवशीं सत्राजित राजा कृष्णाच्या भेटीस आला असतां कृष्णानें त्याचा बहुमान केला. व त्याच्या गळ्यांत देदीप्यमान मणी पाहून कृष्णास फारच आनंद झाला. इतक्यांत तेथें नारदानें येऊन कृष्णास सांगितलें की तो मणी तुह्मासच योग्य. परंतु कृष्ण बोलला, तो मिळेल कसा ? मग नारदानें राजाजवळ जाऊन कृष्णास तो मणी देण्या विषयीं सांगतांच त्यास मोठा राग येऊन त्याणें ह्मटलें कीं, तो गवळी नीच जातीचा, त्यास हा मणी योग्य नसून मिळणारही नाहीं. नंतर नारदानें कृष्ण कीर्ति फारच वाखाणून त्यास उपदेशही केला, परंतु सत्राजितास तें न मानवून तो मणी त्याणें स्वनगरास आल्यानंतर देव्हाऱ्यांत ठेविला व नित्य त्याची पूजा करूं लागला.

एके दिवशीं सत्राजिताचा बंधु प्रसेनवीर अरण्यांत शिकारीस जातांना त्याणें तो मणी आपल्या गळ्यांत घातला. त्याणें बहुत दळभार आपल्या समागमें नेला होता. तो त्या घोर रानांत जाऊन एका मोठ्या भयंकर सिंहामागें लागला असतां त्यावर भाला मारलेला चुकून अकस्मात तो सिंह मागें फिरून त्याणें लागलाच राजपुत्रास फाडून खाल्ला. अशा रीतीनें राजपुत्राचा नाश होऊन तो मणी सिंहोदरांत गेला.

पुढें त्या सिंहाचो व जांबुवंताची ज्यावेळीं गांठ पडली त्यावेळीं त्यानें त्या सिंहास मारून तो मणी काढून घेतला.

ज्यावेळीं कृष्णावर तो स्यमंतक मणी नेल्याचा व प्रसेन वीर यास मारल्याचा व्यर्थ दोषारोप आला, त्यावेळीं कृष्णानें हें अपेश आपणावर न यावें असे मनांत आणून, त्या मण्याच्या शोधास्तव अरण्यांत गेला. तेथें त्यानें जांबुवंतास गांठून त्याशीं मोठें युद्ध करून त्याचा पराभव केला. आणि तो मणी त्याजवळून घेऊन सत्राजितास परत नेऊन दिला; आणि सांगितलें कीं राजा, मजसाठींच हा मणी त्वां भीतीनें देव्हाऱ्यांत ठेविल्यानें असा अनर्थ होऊन, त्यांत व्यर्थ तझा बंधु मात्र मृत्य पावला. परंत ज्या मण्याकरितां हें दुःख तला झालें, ता मणी मी जांबुवंताशो युद्ध करून त्याजवळून आणून दिला आहे. हा घेऊन त्वां स्वस्थ रहावें. राजानें त्याचवेळीं कृष्णचरणीं मस्तक टेऊन विनंती केली कीं, हे देवाधिदेवा, तूं जे श्रम यःकश्चित मण्याकरितां घेऊन मला माझा मणी परत आणून दिला आहेस त्याअर्थीं तझे उपकार माझ्यानें कधींच फि   ार नाहींत. माझा बंधु मेला हें दुःख तुझे चरण दर्शनान तत्काळ परिहार झालें. आणिआतां माझी विनंती एवढीच आह कीं, माझी सत्यभामा नांवाची सुलक्षणी कन्या मी अत्यादरपूर्वक आपल्या चरणीं अर्पण करितों. इचा आपण कृपा होऊन अंगिकार करावा. कृष्णाने लागलेंच सत्राजिताचें भाषण मान्य करून सत्यभामेशीं लग्न मोठ्या उत्साहानें केलें. तो मंगलोत्सव चार दिवस झाल्यानंतर तोच स्यमंतक मणी सत्राजितानें कृष्णास आहेरादाखल अर्पण केला. पण कृष्णानें तो मणी त्याचा त्यास परत केला. आणि त्यास सांगितलें कीं, आ-

पण मला ... यभामेसारखें दिव्य रत्न दिलेत तेणेंकरूनच मला फार आनंद झाला.

जांबुवंताशीं कृष्णाचें तंवळ युद्ध झालें असें वर लिहिलें आहे. त्याविषयींची पूर्व कथा अशी आहे कीं, रामावतारीं मर्कट सैन्यांत जांबुवंत या नांवाचा एक मोठा सरदार होता. तो रामाच्याच पक्षाचा असल्यानें त्याशीं युद्ध रामाचें न होतां, आणि दंडकंडूही शमन न झाल्यामुळें शेवटीं आपल्याच स्वामीजवळ युद्ध भिक्षा मागितली होती. त्यावेळीं रामचंद्रानें त्यास असें सांगितलें होतें कीं, यावेळीं तर युद्ध करवत नाहीं; तथापि तं खिन्न न होतां स्वस्थ असावें. कृष्णावतारीं तुझ्याशीं मी युद्ध करून तुझी इच्छा तृप्त करीन. त्याप्रमाणें कृष्णानें मण्याचें निमित्त करून मल्लयुद्धांत त्यास जिंकलें व त्याचा पराभव केला. अशा रीतीनें पराभव झाल्यावर जेव्हां जांबुवतास मागील अवतारांतील रामचंद्रानेंच कृष्णावतार धारण केला आहे असें समजलें, तेव्हां त्यानें अति आनंदित होऊन आपली प्रियकर व सुलक्षणी कन्या जांबुवंती जी उपवर झाली होती ती कृष्णचरणीं अर्पण करण्याचा आपला मनःपूर्वक हेतु कृष्णास दर्शविला या कृत्यास रुकार देण्यापूर्वी कृष्णानें याविषयीं सर्वांस विचारिलें, त्यावेळीं जनावराशीं लग्न करण्यास सर्वांनीं आपली नाखुशी दर्शविली. तथापि कृष्णानें सर्वांची समजूत करून तिशीं लग्न करण्याचा निश्चय केला. त्यावरून जांबुवंतास फारच हर्ष होऊन त्या लग्नाची तयारी करविली. तो लग्न थाट तर मागील सर्व मंगल कृत्यांपेक्षांही अधिक चांगला झाला. यावेळीं बहुत जांबुवंत स्त्रिया व पुरुष हेच प्रमुख वऱ्हाडी व व्याही असल्यामुळें तो समारंभ फारच स्तुत्य

झाला. व सर्वांस फारच हर्ष झाला. अशा संधींत कृष्णानें नारदास सांगितलें कीं या समारंभांत मिरवणूक, शोभा, नकला व जेवणखाण इत्यादि प्रकार फारच चांगले झाले असून, फक्त एक गायन प्रकार या मंगलोत्साहांत नसल्यामुळें किंचित उणेपणा वाटतो. ह्मणून आपण कृपाकरून ती इच्छा परिपूर्ण करावी. नारदानें विनंती केली कीं, देवा, या मर्कट मंडळीस रुचेल असें गाणें मला येत नाहीं ह्मणून माझ्या गाण्याचा येथें उपहास मात्र होईल. कृष्णानें सांगितलें कीं नारदा, ही मंडळी गायन कलेंत फारच निष्णात व चतुर आहे असें मला ठाऊक आहे. यापुढें सामान्याचा टिकाव लागणार नाहीं, आपलेंच गाणें पसंत पडेल. नारदानें विनंती केली कीं, देवा, असें जर आहे तर त्यांच्या तोंडचींच दोन अक्षरें ऐकण्याचा माझा हेतु आहे. व त्यांचें झाल्यावर मग मीही वेडे वांकडे दोन शब्द गाईन.

नारदास काय तो सुस्वर गाणारा मीच असा फारच गर्व झाला होता, तो त्याचा गर्व परिहार करावा असें कृष्णाच्या मनांत येऊन जिकडे दृष्टि गेली तेथील एका मर्कटास सांगितलें कीं उठा, आणि नारदाचाच विणा घेऊन कांहीं मधुर गायन ऐकवा. इतकें कृष्ण मुखांतून निघतांच एक माकड नाचत नाचत कृष्णासमोर येऊन साष्टांग नमस्कार घालून पुढें उभें राहिलें. त्यास नारदाचा विणा घेण्याची आज्ञा होतांच, तसेंच नाचत तें नारदाजवळ जाऊन उभें राहिलें. नारद ह्मणाला देवा, आतां मला विणा तर देणें अवश्य आहे, व तो मी देतों; परंतु तो चांगल्या रीतीनें पुन्हां परत येईल किंवा कसें याविषयीं मला मोठाच संशय आहे. ह्मणून तुह्मी कृपा त्या विण्यावर तरी या प्रसंगीं मुख्यत्वें असूं द्या. असें

ह्मणून त्या माकडाच्या हातीं तो विणा दिला, तो घेउन ए-का उडीनें ता माकड कृष्णासमोर गाण्याच्या थाटानें जाउन बसला. इतक्यांत एक मो ा रीस जवळच एक मृदंग होता तो घेऊन त्याच्या जवळ उडी मारुन बसला, आणि गाण्यांस प्रारंभ केला. त्यावेळीं प्रातःकाळचा समय असल्यामुळे त्या रीसानें त्याच वेळचे उत्तम राग ह्मटले. तें गाणें ऐकून नारद तर काय परंतु या प्रसंगीं चमत्कार पहाण्य स जे देव यक्ष व गंधर्व स्वर्गांहून या महान अरण्यांत आले होते, ते देखील अगदीं तल्लीन होऊन सर्वांस मूर्च्छना आल्यासारखी होऊन त्यांचा मति गुंग झाली. नारद तर ब्रह्मानंदांत सर्पासारिखा डोलूं लागला. तें गाणें ऐकण्यास सर्प इत्यादि रानांतील एकंदर लहान थोर घातक जनावरें तेथें येऊन आपला वैरभाव सोडून आनंदानें डुल्लत होतीं. कृष्णानें ज्या वेळीं पाहिलें कीं सर्वांचीं चित्तें लब्ध झालीं व नारद डोलूं लागला त्या वेळीं आपल्या चमत्कारिक कर्तत्वानें असें घडविलें कीं ज्या भूमीवर तो रीस गावयास बसला होता, ती जमीन त्या गायन रागान मेणासारखी मृदु होऊन शिथील झाल्याने त्या रीसाच्या हातीं जो विणा होता तो त्या जमिनींत अर्धा पुरल्यासारखा झाला. हे कृष्णाने पहातांच लागलेंच गाणें पुरे करण्यास सांगितलें. हें ऐकतांच तो रीस लागलाच उठून एकीकडे जाऊन बसला. व दुसरा रीस येऊन तो विणा काढून नारदास देऊं लागला, तों तो विणा जमिनींत रुतून जमीन पूर्ववत झाली. कृष्णानें नारदास त्या जाग्यावर जा-ऊन गावयास सांगितलें. नारदानें विनंती केली कीं माझ्यानें एक अक्षरही या अशा उत्तम गाण्यावर काढवत नाहीं. कृष्ण बोलला कीं, महाराज, बरें तर आपला विणा तरी आणावा.

नारदानें तेथें जाऊन प्रयत्न केले परंतु तो तंबुरा वर येईना. तेव्हां कृष्णासमोर साष्टांग नमस्कार घालून विनंती केली कीं देवा, मी हुशार गाणारा असा जो मला गर्व होता तो आतां गेला आणि "सानुकूलो जगन्नाथो विपरीतः सुपरीतो भवेत्" हें वचन अक्षरशः खरें वाटलें. रीस हा तर जीव आहे परंतु निर्जीवाकडूनही सजीव कृति घडवून मोठ्यांचा गर्व परिहार करवशील; तर आतां दया करून माझा हा वीणा मला देववावा. कृष्णास दया आली, आणि दुसऱ्या एका रीसास तेथें जाऊन गाण्यास आज्ञा केली. ती होतांच त्याणें जाऊन गाण्यास आरंभ केला आणि कांहीं वेळानें पुनः ती जमीन पातळ झाली. तेव्हां नारद तस होण्याची वाट पहातच होता. त्याणें तत्क्षणींच जाऊन तो वीणा वर उपटला. इतक्यांत कृष्णानें गाणेंही आटपण्यास आज्ञा दिली. गाणें आटपतांच लागलीच जमीन पूर्ववत झाली. यावेळीं कृष्णावर देवांनीं पुष्पवृष्टि केली. व ते सर्व यक्षकिन्नरांसह स्वस्थानीं गेले. नंतर नारदही आज्ञा मागून गेला. नंतर सत्राजित राजास मोठ्या संतोषानें कृष्णानें बलावून तो मणी त्यास परत दिला.

या अध्यायांत दुसरें असें निरूपण आहे कीं, आपण गणेश चतुर्थीच्या दिवशीं चंद्र पाहिला ह्मणून आपल्यावर कित्येक वेळां गोकुळ वृंदावन इत्यादि स्थानीं चोरीचे व दुसरेही कित्येक अपराधाविषयीं नसते आळ आले. ह्मणून कृष्णानें सर्वांस श्री गणपतीची फारच चमत्कारिक कथा सांगितली. असो.

कोणी एक शतधन्वा नांवाचा यादव ज्यास सत्राजित राजानें पूर्वीं आपली कन्या सत्यभामा द्यावयाची केली होती;

परंतु ती नंतर कृष्णास दिली. यावरून त्याणें मनांत कोपायमान होऊन, चालेल त्यावेळीं आपला सूड उगवून तो मणी सत्राजिताकडून आपण हिसकावून घेण्याविषयीं प्रयत्न करीत होता. त्या यादवाचें कृष्णापुढें तर सामर्थ्य चाललेंच नाहीं. परंतु ज्यावेळीं सत्राजितास तो मणी कृष्णानें परत दिला, ती संधि पाहून कृष्णाकडून तो राजा आज्ञा मागून स्वनगरीं परत गेल्यानंतर एके दिवशीं मोठ्या सैन्यानिशीं शतधन्व्यानें येऊन त्या राजासमागमें युद्ध करून त्यास ठार मारून तो मणी घेऊन गेला. त्यावेळीं सत्यभामा माहेरीं होती, तिला हें दुख फारच दुःसह होऊन ती लागलीच कृष्णदर्शनास निघाली. त्यावेळीं श्रीकृष्णनाथ हस्तनापुरास पांडवांच्या समाचारास आले होते. त्यास्थळीं ती येऊन हा वृत्तांत सांगतांच तेथून कृष्ण निघाले, व तिला द्वारकेस पाठवून आपण त्या शतधन्व्यास वाटेंत गांठून त्याचें मस्तक सुदर्शनानें उडविलें. शोधा अंतीं त्याजवळ तो मणी नाहीं असे पाहून श्रीकृष्ण द्वारकेस परत आले. व असा डांगोरा पिटाविला कीं तो मणी कोणाजवळ असेल त्याणें आणून द्यावा. अक्रूराजवळ तो मणी होता. त्याणें तो घेऊन वाराणसीस पळून गेला. अक्रुरानें मणी नेला व तो पळाला असें हर मुखानें ऐकून त्याच्या भेटीविषयीं कृष्ण अगदीं आसक्त झाला. नित्य आठ भार सोनें तो मणी जें प्रसवतो, तें घेऊन अक्रूर दानधर्म करून वाराणसीस सुखरूप आहे असें ऐकलें. द्वारकेंतून अक्रूर गेल्यापासून १२ वर्षें अवर्षण पडलें. पुढें आकाशवाणी झाली कीं, अक्रूरास येथें आणावा ह्मणजे हा सर्व अनर्थ टळेल. त्याप्रमाणें कृष्णानें वाराणसीहून त्यास द्वारकेंत आणवून मोठ्या प्रीतीनें

व सन्मानानें त्याची भेट घेतली. त्याच वेळीं त्याणें तो मणी कृष्णास दिला. कृष्णानें उत्तम वस्तुच्या योगें केव्हां केव्हां अनर्थ होतात असे दर्शवून व सत्राजिताचा संव्हार या मण्यानें केला याविषयीं सर्वांस सुचना करून तो श्री कृष्णानें आपल्याच गळ्यांत अक्षयीं घातला.

---

# अध्याय २६ वा.

## मित्रवृंदादि स्वयंवर व पारिजातकाख्यान.

पंचवीसावे अध्यायापर्यंत श्रीकृष्णाचें बालचरित्र वर्णन झालें. येथपर्यंत बाललीला, साहस कृत्यें, आणि अचाट कर्में हीं वाचणारांच्या लक्षांत आलींच असतील. आतां या अध्यायापासून भारती कथेस ह्मणजे कौरव पांडव वृतांत व कृष्णाच्या प्रौढपणाच्या कथा निरूपण करण्यांत येतील.

कंसासराचा दंगा मोडल्यावर कांहीं काळानें पृथ्वीवर पुन्हा दैत्य उत्पन्न होऊन साधु जनांस त्रास होऊं लागला. त्या वेळीं कृष्णनाथास तिकडे लक्ष द्यावेंसें वाटलें. या वेळीं पृथ्वीवरील चांडाळ प्राण्यांपैकीं धृतराष्ट्राचे दर्योधनादि शंभर पुत्र होत. धृतराष्ट्र राजा हा वाष्णेय गंधर्वाचा अवतार असतां हे त्यास पुत्र झाले. ते राक्षसाचे अंश. जशी पौलस्ती ऋषीपासून दशाननादि दुष्टांची उत्पत्ति त्याच-प्रमाणें हे कौरव समजले पाहिजेत. रावण कुंभकर्ण इत्यादि जय विजयांचे अवतार जसे शाप योगानें या योनींत आले, तसेच शिशुपाळ, वक्रदंत जरासंध, काळयवनादि करून कित्येक दुष्ट दैत्यांचे अंश घेऊन जन्मास आले. आतां त्या दुष्टांतच परंतु उत्तम अवतार भीष्म, जो गंगेच्या पोटीं सुवीर्य अंशानें झाला. तसाच गुरुद्रोण, हा बृहस्पती-

चा अवतार. कृपाचार्य हा रुद्रगणाचा अंश, व याचा जन्म गौतमवीर्यें करून झाला. अश्वत्थामा हा शिवाच्या कोपाचा मूर्तिमंत अवतार होता.

वरील दुष्ट राक्षसांशाचे जे अवतार सांगितले ते केवळ पृथ्वीच्या नाशास्तव झाले. परंत कर्ण, द्रोण, भीष्म इत्यादि सौम्यावतार ज्यांनीं वरील दुष्टांच्याच संगतींत असून सुष्टांचें कल्याण केलें. ह्मणून ते दुष्ट वधार्थच अवतार ह्मटले पाहिजेत. यम, वायु, इंद्र व अश्विनौदेव यांचे पूर्ण अवतार धर्म, भीम, अर्जुन, नकुळ व सहदेव मिळून पांडव होत. पृथ्वीवरील भार उतरण्याच्या हेतूनें या वेळीं श्रीकृष्णनाथानें पांडव नांवाच्या पांच दिवट्या हातीं धरून उत्तम प्रकारचा गोंधळ घातला. आणि त्या गोंधळांत दुर्योधनादिक दुष्टांच्या रणयज्ञांत आहुति दिल्या. अथवा यादव व पांडव सैन्य यांचे हातांत कृष्णानें कुऱ्हाडी देऊन राक्षसवनाचा संहार करविला. असो.

कोणे एके वेळीं अर्जुन सहजगत्या श्रीकृष्णाच्या भेटीकरितां द्वारावतीस गेला. पुढें ते उभयतां शिकारीच्या हेतूनें वनांत गेले. तेथें विश्रांतीकरितां कालिंदीतटीं गेले असतां एक सुंदर स्त्री पाहिली. तिचें मन आपल्याबरोबर लग्न करण्याचें जाणून कृष्णानें अर्जुनाच्या मध्यस्तीनें त्या स्त्रीशीं द्वारकेंत जातांच लग्न केलें.

अवंतीनगरीचा राजा मित्रवृंद याला एक मित्रवृंदा नांवाची उपवर कन्या होती. या मित्रवृंदेचें लग्न करण्याचा ज्या वेळीं निश्चय झाला, परंतु तिचें मन कृष्णचरणीं आहे असें जाणून तिच्या चौघां बंधूंनीं लग्न न करितां स्वयंवर करण्याचा ठराव केला. परंतु यांतही कांहीं मतें भिन्न पडल्यामुळें

शेवटीं असा निश्चय झाला कीं, हत्तीणीच्या सोंडेंत माळ देऊन ती ज्यास घालील त्या पुरुषाशीं इचें लग्न करावें. त्याप्रमाणें पृथ्वींतील सर्व राजे बलावून मोठा मंडप सिद्ध केला. त्यांत सर्वांस बसवून हत्तीणीच्या सोंडेंत माळ देऊन तिला सभेंत मोकळी सोडली. हें वर्तमान पूर्वीच कृष्णास कळून तोही यादवसैन्यांनिशीं त्याच वेळीं तेथें आला, आणि सर्व राजे जेथें बसले होते त्या मंडपांत धिटाईनें जाऊन उभा राहिला. इतक्यांत हत्तीणीची नजर कृष्णावर पडतांच तिणें लागलीच श्रीकृष्णाच्या गळ्यांत ती माळ घातली. त्याच वेळीं त्या स्त्रियेस जोरावरीनें कृष्णानें स्वरथीं नेली आणि चौघा मेहुण्याबरोबर युद्ध करून त्यांचें सर्व लष्कर मारून टाकलें. ही दुर्दशा पाहून ते बिचारे चौघेही पराङ्मुख होऊन पळून गेले.

यज्ञजित राजाची याज्ञजिती या नांवाची एक कन्या होती. जिचें लग्न समयीं बापानें असा निश्चय केला होता कीं, जो कोणी सात वृषभांस आकळून वेसण घालील अशा साहस कर्त्यासच मी ही कन्या देणार. त्यासाठीं त्याणें सर्व राजांस निमंत्रणें करून त्यांचें आदरातिथ्यही फारच चांगले केलें. त्या वेळीं दुर्योधन, कर्ण वगैरे बहुत कौरवांनीं तेथें येऊन ती पण सिद्धीस नेण्यास बहुत खटपटी केल्या. परंतु त्या सर्व व्यर्थ गेल्या. असें पाहून तो पण श्रीकृष्णानें सिद्धीस नेला. व त्या स्त्रियेशीं लग्न केलें.

या नंतर कोणी एक लक्ष्मणसेन राजाची लक्ष्मणा नामें कन्या होती. तिच्या लग्नाविषयीं तिच्या बापानें मत्स्ययंत्र भेदण्याचा पण केला होता. त्या वेळीं तेथें त्याच्या आमंत्रणांवरून कीर्तिमान व शूर राजे पुष्कळ जमले होते. त्यांत

दुर्योधनादि कौरव व अर्जुनही आला होता. तो पण पाहून सर्व राजांच्या मनांत निराशा झाली. परंतु कर्णाच्या मनांत आवेश चढून तो पुढें आला व तें धनुष्य तर उचलिलें परंतु मत्स्ययंत्राचा भेद आपणास होणार नाहीं असें मनांत आणून तें धनुष्य तसेंच टाकून तेथून गेला. तेंच धनुष्य उचलून अर्जुनानें शरसंधानही केलें परंतु नेम चुकल्यामुळें तोही निराश झाला. तें पाहून श्रीकृष्णानें तें शरसंधान करून मत्स्ययंत्र भेद केला. त्यावेळीं एकच जयजयकार होऊन मोठ्या समारंभानें या स्त्रियेशीं कृष्णाचें लग्न झालें पुढें भद्रराजाची कन्या भद्रावती इशीं कृष्णानें लग्न केलें. श्रीकृष्णाच्या लग्नाच्या अष्टनायका झाल्या, त्यांचीं नांवें; रुक्मिणी, सत्यभामा, जांबुवंती, कालिंदी, मित्रवृंदा, याज्ञजिता, भद्रावती आणि लक्ष्मणा. लक्ष्मणा इशीं विवाह झाल्यानंतर श्रीकृष्ण द्वारकेस गेले.

एके दिवशीं कृष्णनाथ सभेंत बसले असतां अकस्मात नारद ऋषि तेथें आले. त्यांचें आगतस्वागत करून, वृत्तांत विचारल्यावर ऋषीनें इंद्रलोकचा वृत्तांत सांगून, एक पारिजातकाचें पुष्प कृष्णाच्या हातीं देऊन त्याची फार तारीफ केली. नारद गेल्यानंतर तें फूल कृष्णानें रुक्मिणीजवळ दिलें. तें वर्तमान सत्यभामेस कळून तिला फारच राग आला. कृष्णानें तिची समजूत पुष्कळ रीतीनें केली, तथापि तिचा राग जाईना; तेव्हां तुझ्या दाराशीं तो पारिजातक वृक्षच आणून लावितों असें सांगून तिची समजूत केली.

कांहीं काळानें इंद्र अकस्मात कृष्ण सभेस येऊन त्यानें विनंती केली कीं, नरकासुर नांवाच्या दैत्यानें फारच उन्मत्त

होऊन स्वराज्य विस्तार करण्याच्या हेतूनें सर्व देवांस त्रास दिला आहे व आमचीं कुंडलें व मुकुट हिरावून नेलीं. आतां आमचा अधिकार आह्मांस चालविण्याची शक्ति नाहीं ह्मणून त्वां ता आपल्या स्वाधीन घ्यावा. यावरून कृष्णानें लागलाच इंद्र लोकीं युद्धास जाण्याचा निश्चय केला. त्यावेळीं सत्यभामाही आग्रहानें कृष्णासमागमें गेली. कृष्णानें त्या दैत्याशीं मोठाच युद्ध प्रसंग केला व त्यास मारून त्याच्या भगदत्त नामें पुत्रास राज्य दिलें. व कुंडलें आणि मुकुट इद्रास परत देवविलीं. या प्रसंगीं सत्यभामेनेंही कित्येक वेळां कौतुकानें युद्ध केलें.

या नरकासुरानें आपलें लग्न करण्याकरितां मोटमोट्या प्रचंड राजांच्या लहान लहान सोळा हजार मुली आणून आपल्या कारागृहांत ठेविल्या होत्या. त्या सर्व मोकळ्या करून नरक पुत्रानें कृष्णास अर्पण केल्या. त्या सर्वांशीं विवाह करण्याचा निश्चय करून त्या सर्वांस कृष्णानें द्वारावतीस पाठवून दिल्या. आणि सत्यभामेनिशीं आपण द्वारकेस येत असतां वाटेवर पारिजातक पुष्पाचें झाड आढळलें तें गरुडावर घेतलें. आणि द्वारकेस आल्यानंतर तो वृक्ष सत्यभामेच्या गृहांगणांत लाविला. त्यावेळीं वृक्ष सत्यभामेच्या आंगणांत परंतु पुष्पें रुक्मिणीच्या आंगणांत पडतात अशी चहाडी सांगून नारदानें रुक्मिणी व सत्यभामेसीं द्वैत करून कलह लावून दिला. परंतु कृष्णानें दोघींस समजावून ती गोष्ट दोघींसही आवडती केली. आणि नारदास कांहीं दिवस तेथेंच ठेवून घेऊन सोळा हजार स्त्रियांशीं मोठ्या मंगलोत्साहानें लग्नें लाविलीं. त्यावेळीं सोळा हजार मंडप निराळे घालून तितक्याही मंडपांत निरानिराळीं मंगल वाद्यें, व सह-

स्नावधि इष्ट मित्र आप्त वऱ्हाडी रूपानें आपणच नटला. आणि जागोजाग वसुदेव देवकी, नारद, देव आणि ऋषि इत्यादि स्वरूपेंही आपणच घेऊन बळिरामासहवर्तमान श्रीकृष्णनाथ हा तितक्याही ठिकाणीं निरंतर होता. अशा सुखानंदांत तो लग्नसोहळा पार पाडल्यानंतर नारदास स्वस्थानीं पाठवून दिलें.

---

# अध्याय २७ वा.

## तारकासुर वध.

एके दिवशीं रुक्मिणीच्या घरीं सर्व कृष्णस्त्रिया जमून आपापला वृत्तांत सांगूं लागल्या. त्यांत प्रत्येकीच्या भाषणांत मुख्य भाग इतकाच कीं, मजवर सर्वांपेक्षां कृष्णाची अधिक प्रीति आहे. अशीं भाषणें सर्वांचीच असल्यामुळें एक नवरा आणि सोळा हजार आठ बायका, आणि सर्वांच्या घरीं निरंतर कृष्ण जाईल कसा? असा त्या भांडणामध्यें संशय उत्पन्न होऊन त्यास्थळीं विनोद झगडा झाला. व त्याचा परिणाम असा झाला कीं, सर्व स्त्रिया भ्रमिष्टासारख्या झाल्या. त्यावेळीं रुक्मिणीनें अधिष्टानीं बसून सर्वांस आत्मज्ञान सांगितलें कीं, श्रीकृष्ण हा अनादिसिद्ध परमेश्वर आहे. जो सर्वव्यापक असण्यास व आह्मां सोळा हजार बायकांच तर काय परंतु त्रय जगतांत वास करणारे जन त्या सर्वांचेही आळ पुरविणारा समर्थ आहे अशी त्यांची खात्री करून दिली. नंतर सर्वांनीं डोळे मिटून स्तब्धपणें श्रीकृष्णध्यान केलें तों सर्वत्र स्थल कृष्णरूपानें भरलेलें आहे असें सर्वांनीं पाहिलें व सर्वच चकित होऊन साश्चर्यलज्जित झाल्या.

एके दिवशीं श्रीकृष्णनाथ सर्व स्त्रियांच्या घरोघर हिंडून प्रत्येकास असें विचारलें कीं, तुमची इच्छा केव्हां केव्हां पर

पुरुषावर जाते किंवा नाहीं? तेव्हां आपापल्या बुद्धीनें कांहीं-नीं कृष्णास आर्जवाचीं आणि कित्येकींनीं वेडेपणानें तऱ्ह-तऱ्हेचीं उत्तरें दिलीं. परंतु ज्यावेळीं रुक्मिणीला हा प्रश्न विचारला त्यावेळीं ती केवळ निरुत्तर होत्साती स्तब्ध रा-हिली. तिला आणखी चाळवावी ह्मणून श्रीकृष्णानें कौत-कानें ह्मटलें कीं, प्राणप्रिये, तुझी इच्छा अझून दुसऱ्यास वरण्याची असली तर अद्यापि संधि आहे; जाऊं देऊं नको. मजपेक्षां मोठमोठे पराक्रमी राजे आहेत; तुझें कल्याण होईल. मी केवळ मवाळ व हलका आहें. हें ऐकतांच एकाएकीं रुक्मिणी गतप्राणवत भूमीवर मूर्छित पडली. तें पाहतांच कृष्णानें डोळ्यास पाणी लावून तिला सावध केली. रुक्मि-णीनें तें स्थळ एकांत पाहून उत्तम पुत्रोत्पत्तीची इच्छा दर्शि-विली. तें ऐकून कृष्णानें एक वर्षपर्यंत सदाशिवाची आराधना करून मदन पोटीं येईल असा त्याजकडून आशिर्वाद मिळविला. तो वृत्तांत रुक्मिणीस कळतांच ती आनंदांत फारच निमग्न झाली.

या मदनाच्या जन्माचा वृत्तांत सांगण्यापूर्वी सदाशिवानें मदन दग्ध केल्याचा वृत्तांत सांगून नंतर पुनरोत्पत्तीचा प्रकार सांगतों. पूर्वी दक्षाच्या यज्ञांत पार्वतीस कोप येऊन तिणें होमकुंडांत उडी टाकल्याची कथा शिवपुराणान्वयें सर्वांस माहीत आहे. ती पार्वती भस्म होतांच शंकरास फार वाईट वाटून त्याणें हिमपर्वतावर मोठी तपश्चर्या आरंभिली. तेव्हां पार्वती हिमाचलाच्या पोटीं अवतरून तिणें शंकरास वरिलें. त्यां पासून महा पुरुषार्थी तारकासुर नामें दैत्य उत्पन्न झाला. त्यानें त्रैलोक्यांतील नरवर व सुरवर या उभयतांसही पीडा दिली. ह्मणून सर्व देव संकटांत पडून त्याच्या संव्हारार्थ

युक्ति योजण्याविषयीं मोठा विचार चालविला. तो दैत्य अनिवार कोणासही ऐकणार नाहीं असें वाटून बृहस्पतीनें सर्वांस सांगितलें कीं जर कोणत्याही उपायानें शंकर कामातुर होईल तर त्याचे पोटीं दुसरा पुत्र उत्पन्न होऊन त्या हस्तें तारकासुर संव्हार होईल. आतां शंकर कामातुर होण्याचें काम करणार कोण ? असा विचार चालला असतां बहु मतानें तें कार्य मदनास द्यावें असें ठरवून मदनाची सर्वांनीं प्रार्थना केली, व त्याप्रमाणें त्याणेंही सर्वत्रांचें भाषण मान्य केलें. मग पार्वतीसमागमें मदन शिवाजवळ जाऊन पार्वतीच्या मागें उभा राहिला. मदनास हें कृत्य सांगण्याचा मूळ उद्देश एवढाच कीं, तो फारच सुंदर होता; त्याचें रूप पहातांच शरीरांत कामोद्दीपन व्हावें. परतु एवढें जरी होतें, तथापि मदनाची शंकरासमोर उभें रहाण्याची शक्ति होईना. त्यांतून शंकर तपश्चर्येस बसलेले, कदाचित् राग आला तर घात होणार आहे हें भय त्यास होतें. तथापि जग तारणार्थ मदनानें आपला अमोलिक प्राण अर्पण करण्याचा निश्चय करून पार्वतीसमागमें गेला. अशा प्रकारानें पार्वतीही मनांत सभय परंतु त्रैलोक्य ताप निवारणार्थ आपल्या जीवास न भितां शंकरापुढें हात जोडून उभी राहिली. व तिच्या मागें मदनही उभा राहिला. पार्वतीनें आपल्या येण्याची कांहीं तरी कल्पना शंकराच्या मनांत यावी या हेतूनें कित्येक चिन्हें सूचित केलीं. त्यावरून शंकरानें आपले नेत्र उघडिले, तों पार्वतीमागें आपल्यास व्यत्यय आणण्याकरितां मदन उभा आहे असें जाणून क्रोधानें आपला तृतिय नेत्र उघडिला व त्याकडे पाहिलें. ती दृष्टी पोंहोचतांच नेत्रांतून अग्नीच्या ज्वाळा निघून मदनाच्या आंगावर गेऊन

त्याचें एका क्षणांत भस्म झालें. मदन भस्म होतांच हें कृत्य पहाण्याकरितां जे कित्येक देव, मुनी, यक्ष व गंधर्व लपून होते त्यांणी तेथून पलायन केलें. पार्वतीनें चरणावर मस्तक ठेवून शंकर स्तुति केली व कृत कर्माची क्षमा मागून मदनाची स्त्री रती तिला पुढें उभी केली. तिचा अलोट शोक व नेत्रीं अश्रूंचे पूर पाहून आणि मदनाच्या रूपाची आठवण क शंकराचें मन प्रीतीनें व्याप्त होऊन रतीस सांगितलें कीं, तूं स्वस्थ ऐस. तुझा पती रुक्मिणी उदरीं अवतरून पुन्हां तला मिळेल. ती रती अरण्यांत एकटी शोक करीत असतां सह-जगत्या एक शंबर (तारकासुर) नामें दैत्य त्या वनांत विहारार्थ आला असतां त्यास दया येऊन कन्या ह्मणून त्याणें तिला घरीं नेऊन आपल्या स्त्रियेजवळ ठेविली.

इकडे श्रीकृष्ण द्वारकेस मोठ्या आनंदांत असतां रुक्मि-णीच्या उदरीं मदन पुत्र अवतरला. त्याच्या जन्माचा सो-हळा कृष्णानें फारच मोटा केला. रुक्मिणी व सत्यभामा या दोघींमध्यें वांकडें असल्यामुळें सत्यभामेनें असा कांहीं पण केला होता कीं जर रुक्मिणीस पुत्र माझ्या पूर्वीं होईल तर मी अमुक हरेन. आणि ती तर वेळ आली. व रुक्मिणीशीं तर प्रतिज्ञा केलेली ह्मणून मनांत फारच खिन्न होऊन आतां काय करावें या विचारांत आहे तों अकस्मात नारद स्वामी तेथें प्रकट झाले. त्यांच्या चरणारविंदीं मस्तक ठेवून तिणें आपल्या मनांतील हेतु त्यांस सांगितला व विनंती केली कीं महाराज, हा मुलगा जर येथून नाहींसा होईल तरच माझा जीव राहील. नारदानें तिचें शांतवन करून लागलाच शंबरासुरा-जवळ गेला आणि त्यास सांगितलें कीं तुला मारण्याकरितां श्रीकृष्णाच्या उदरीं मदन अवतरला आहे. तेव्हां सर्प

लहान असला अगर अग्नीची एक ठिणगी असली, तथापि अनर्थास कमी नाहीं असें जाणून त्याचा बंदोबस्त सुज्ञ त्वरित करितात. तद्वत असुरा, तो पुत्र लहान आहे, त्याच्यानें आपलें काय होणार, असें मनांत न आणितां त्या मदनाचा तूं होईल त्या रीतीनें लवकर संहार कर. दैत्यानें नारदाचा याजबद्दल महदुपकार मानून मोठाच सत्कार केला. नारद गेल्यानंतर आपण गुप्त रूपानें द्वारकेस येऊन मदनास उचलून नेला व महा सागरोदरांत त्यास टाकून दिला. तो पुत्र एका मत्स्यानें भक्षण केला व पुढें होणार भविष्याप्रमाणें तोच मासा एका कोळ्याच्या जाळ्यांत सांपडला. असा मासा दुसऱ्या कोणास द्यावा कीं त्यापासून इच्छित द्रव्य लाभ होईल असें त्या कोळ्याच्या मनांत येऊन तो त्याच शंबरासुरास दिला. त्याणें घरांत पाठविला. तो मासा पाक निष्पत्तीसाठीं रतीच्याच हातीं आला. तिणें तो चिरतांच त्यांतून एक देदीप्यमान पुरुष निघाला. तों तिणें हा आपलाच पति असें ओळखून यास ठेवावा कुठें अशा भ्रांतींत पडली. इतक्यांत नारद तेथें येऊन तिला आश्वासन देऊन कांहीं मंत्रोपदेश केला, कीं ज्या योगानें तो मुलगा गुप्त रूपानें वाढत चालला. तो घरांत खेळत असून सदोदीत जरी पाहिजे तेथें घरभर फिरत असे तरी रतीशिवाय दुसऱ्या कोणाच्याच दृष्टीस तो पडला नाहीं. कांहीं दिवसांनंतर मदन मोठा झाल्यावर रति व मदन या उभयांचें नारदानें लग्न लाविलें.

इकडे रुक्मिणीचा पुत्र अकस्मात कोठें गेला यामुळें तिला फारच वाईट वाटून तिणें अति शोक आरंभिला. परंतु कृष्णानें तिला खात्रानें सांगितलें कीं जें होत आहे तें

माझ्या आज्ञेनेंच होत आहे. तूं कांहीं काळजी करूं नको. अकरा वर्षांनंतर तुझा पुत्र तुला मोठ्या आनंदानें सुखरूप भेटेल. त्यावरून ती स्वस्थ बसली. इकडे शंबरासुरास असें वर्तमान कित्येकांनीं सांगितलें कीं, तुमची मानलेली कन्या रति गुप्त रूपानें पर पुरुष भोगीत असते. त्यास प्रथम हें खरेंच वाटलें नाहीं; परंतु चहुंकडून बोभाट ऐकल्यावर तो रतीचा फारच छळ करूं लागला. एके दिवशीं तर तिजवर मोठा प्रळयच गुदरला. तारकासुर बोलला कीं, माझ्या कन्येजवळ असा जो कोणी चोर येतो तो जर माझ्या दृष्टीस पडेल तर त्याचे मोहरी एवढे तुकडे करीन. त्याणें चोरा प्रमाणें गुप्त न राहतां माझ्या समोर यावें. त्यानें रतीसही सांगितलें कीं जर तो चांडाळ दोन तीन दिवसांत माझ्या समोर न आला तर मी तुझा शिरच्छेद करीन. यावरून रतीसही मोठें भय पडलें. आणि तिणें हें वर्तमान मदनास निवेदन केलें. त्याणें तिची खात्री करून सांगितलें कीं शंबरासुरास मारण्याकरितांच माझा अवतार आहे. तूं भिऊं नको. दुसरे दिवशीं शंबरासुर रतीस रागानें बोलत असतां मदनानें तत्क्षणीं तेथें प्रगट होऊन शंबरासुरास सांगितलें कीं दुष्टा, तुझ्या आयुष्याचा घडा भरला. आतां तुझी इच्छा असल्यास रणांगणांत येऊन आपल्या दंडाची व शस्त्राची कंडू निवारण करून घे. त्या सरिसाच शंबरासुर आंगणांत उभा राहून मदनास हांक मारिली. ती ऐकून लागलाच मदन रणांगणीं येऊन त्याच्या समोर उभा राहिला. त्या वेळी दोघांचें महान युद्ध झालें. त्यांत शंबरासुराचा मदनानें वध केला. ज्या वेळीं शंबरासुराचें मस्तक शरीरापासून भिन्न झाले, त्यावेळीं देवांनीं लागलेच मदना-

वर पुष्पवृष्टि केली; व सर्वांनीं मिळून मदनाचा स्तव केला. व आपल्या वरील सर्व संकटें परिहार झाल्याचें जाणवून सर्व स्वस्थळास गेले.

शंबरासूर वधानंतर मदनानें रतीस सांगितलें कीं आपला कार्यभाग करणें मनांत होतें आणि त्याच्या आयुष्याचे दिवस भरण्याचो बाकी होती त्यामुळें गुप्तरूपानें आजपर्यंत आपण काळ काढला. परंतु आतां द्वारकेस जाऊन मातापितरांची भेट घेण्यास विलंब लावावा हें चांगलें नाहीं. मग त्या नगराचा बंदोबस्त करून मोठ्या सैन्यानिशीं तो द्वारकेस निघाला. मदन ज्यावेळीं द्वारकेस येऊन मोठ्या उत्साहानें गृहांत आला त्यावेळीं जितक्या स्त्रिया त्या जागीं होत्या तितक्याही कृष्णनाथच आले असें जाणून उठून उभ्या राहिल्या. इतकी भूल पडण्याचें कारण एवढेंच कीं, कृष्णासारखेंच अप्रतिम व अवर्णनीय मदनाचें रूप होतें. परंतु तो आल्याबरोबर त्याणें सर्वांच्या पायांवर मस्तक ठेवून सर्वांच्या भ्रमाचें निरसन केलें. तो मदन ज्यावेळीं रुक्मिणी समोर आला त्याचवेळीं तिच्या स्तनास पान्हा फुटला. यानंतर कृष्णनाथानें मदन भेटल्याविषयींचा मोठाच उत्साह केला व सर्वांस आनंद झाला. कृष्णानें अनुक्रमानें आपल्या पुत्रास सर्वांस भेटविलें. त्याचप्रमाणें रतीसही रुक्मिणीनें सर्वांस भेटविली.

---

## अध्याय २८ वा.

### अनिरुद्ध उषा विवाह.

मदन व रती द्वारकेंत येऊन राहिली असतां पुढें कांहीं काळानंतर मदनास अनिरुद्ध या नांवाचा एक सुंदर पुत्र

झाला. त्यावेळीं तर श्रीकृष्णानें फारच मंगलोत्साह केला. तो अनिरुद्ध वाढत चालला व त्याच्या लग्नाविषयींचे द्वारकेंत नानाप्रकारचे विचार होऊं लागले. अनिरुद्धास कोणाची कन्या करावी याविषयीं कोणाच्या मतास कोणाचें मत मिळून एक विचार ठरेना.

इकडे शोणितपुर नगरांत एक बाणासुर नामें शिववरदी दैत्य, जो जगांतील वीरश्रेष्टांस अनिवार होता, त्यास एक उखा या नांवाची परम लावण्य कन्या झाली. तीही कळी सारखी दिवसेंदिवस वाढत चालल्यानें ही कोणास द्यावी याविषयीं बाणासरास मोठी काळजी पडली. व बाणासुर तिला वर मिळविण्याच्या खटपटींतच होता.

एके दिवशीं उखा आपल्या चित्ररेखा नामें दासीस समागमें घेऊन कैलासास शिव दर्शनास गेली. तेथें शिव पार्वती सोंगड्या खेळत होतीं असें पहातांच उखेस असें पतिसमागमें खेळणें फारच बरें असें वाटलें. आणि कित्येक चेष्टेचा प्रकार पाहिल्यानें उखेस आपणासही पति असण्या विषयींची फारच उत्कंटा झाली. परंतु लाजल्यासारखी होऊन शंकरा पुढें हात जोडून उभी राहिली. शंकरानें तिच्या मुखाकडे पाहून पार्वतीस खूण केल्यामुळ पार्वती बोलली कीं उखे, आह्मांस उभयतांस त्वां खेळतांना पाहून तझें मन भ्रमण झालें असून आपल्यासही उत्तम पति असून आपणही असेंच विलास करावे, असा उद्देश तझ्या मनांत आलेला म्यां जाणला आहे. शिवानें सांगितलें कीं कन्ये, अशीच जर तुझी इच्छा आहे, तर स्वस्थ ऐस. वैशाख शुद्ध द्वादशीच्या दिवशीं जो पुरुष तुझ्या स्वप्नांत येईल त्याच पुरुषाशीं तुझें लग्न होईल. आणि असा सुंदर पति तुला

मिळाल्याच्या योगानें तूं आजन्मपर्यंत सुखी राहशील. उखेस हे शब्द केवळ अमृततुल्य लागले. आणि आपल्या मनांत आनंद मानून लागलीच शिवशंकर चरणीं मस्तक ठेवून घरीं जाण्याची आज्ञा घेतली.

इकडे बाणासुरास आपण प्रतापी असा गर्व होऊन शिव स्तवन केलें. व प्रसन्नता करून वर माग ह्मटल्यानंतर प्रार्थना केली कीं, मी अनावर बलवान असल्यामुळें माझ्या सहस्र भुजांस कंडू आली आहे ती शमविण्याकरितां मज बरोबर कोणी तरी युद्ध करणारा पाहिजे एवढेंच माझें मागणें आहे. शंकराची बाणासुरावर प्रीति फार ह्मणून त्यास उपदेश केला कीं, अद्यापि तूं शुद्धीवर येऊन आपली वाचा पालटून दुसरें कांहीं उत्कृष्ट मागणें माग. त्या बाणासुरानें ह्मटलें हत्तीचे दंत एक वेळ बाहेर आले ह्मणजे पुनः आंत जात नाहींत, तद्वत् जें म्या एकदां मागणें मागितलें तेंच मला पाहिजे. शंकरानें ह्मटलें कीं फार चांगली गोष्ट. तसाच तुला योद्धा मिळेल, व तुझी कंडूही शमेल.

इकडे उखा घरीं आल्यावर रात्रंदिवस मोठ्याच चिंतेंत पडली. कांहीं दिवस लोटल्यानंतर वैशाख शुद्ध द्वादशी प्राप्त झाली. त्या दिवशीं तर उखा मोठ्या आनंदानें शृंगार करून रात्रौ सख्यांस सभोंवतीं बंदोबस्तानें ठेवून निजली; तों तिला एक स्वप्न पडलें. त्यांत एक पुरुष येऊन तिला आनंद झाला. इतक्याच संधीस ती जागी झाली. आणि तिची जिवलग सखी चित्ररेखा जी स्वस्त निजली होती तिला उठवून तें स्वप्न सांगितलें. स्वप्नाचा वृतांत व त्या पुरुषाच्या स्वरूपाचें निरूपण ऐकून चित्ररेखेनें विनंती केली कीं बाईसाहेब, आपण स्वस्थ असावें. शिववराप्रमाणें तो

च पुरुष आपल्यास पति होईल. उखा ह्मणाली सखे, हें ब्रह्मज्ञान त्वांच मला सांगितलें पाहिजे असें नाहीं. मला सर्व समजतें. परंतु स्वप्नांत आलेला पुरुष जर माझ्या दृष्टीस न पडला, तर माझा प्राणच राहणार नाहीं. लग्न होणार व तो मिळणार त्यावेळीं मिळो, परंतु मोठें साहस प्रथम माझा प्राण वांचविण्याविषयीं तुला केलें पाहिजे. चित्ररेखेनें तिची नानाप्रकारें समजूत केली, परंतु कांहीं केल्या तिचें मन राहिना. घरांत बोलण्याचीही चोरी असल्यानें निरुपायी होऊन तिणें अन्नपाणी टाकिलें. बाणासुरानेंही असें होण्याविषयीं फारच शोध केला. व प्रकृति वैद्यांसही दाखविली, परंतु कांहीं केल्या गुण पडेना. चित्ररेखा ही केवळ उखेची दासीच होती असा अर्थ नव्हता, परंतु तिची उखेवर पोटच्या पोरीसारखी प्रीति होती. ह्मणून तिणें तिला शेवटची प्रार्थना केली कीं, तुझ्या स्वप्नांत जो पुरुष आला तो जर माझ्या ओळखीचा असेल, अगर तूं त्याच्या कांहीं खुणा तरी कळविशील तर माझी शक्ति इतकी आहे कीं, सर्व पृथ्वी धुंडून त्यास येथें चित्ररूपानें किंवा प्रत्यक्ष आणीन. परंत जर त्याविषयीं कांहींच ओळख पटली नाहीं, तर माझा तर काय परंतु कोणाचाच उपाय चालणार नाहीं. उखेनें सांगितलें कीं, प्रियसखे, तुझ्या मनांत खूण पटण्याजोगा उपाय मजजवळ तर नाहीं, परंतु त्रयजगांतील सुंदर व पराक्रमी पुरुष तूं सर्व जाणतेस: आणि लेखन व चित्रविद्येंत तूं फार कुशल आहेस. जर मला तूं चित्रें काढून दाखविशील, तर लागलाच मी त्यांतून आपला प्रियकर ओळखून काढीन. चित्ररेखा ही चित्रें काढण्याच्या कामांत फारच निष्णात होती. तिणें हातांत कलम घेऊन भिंतीवर प्रथम स्वर्ग

मृत्यु व पाताळ यांतील प्रसिद्ध शहरें, पट्टणें, अधिष्ठानें यांतलि महान महान् पराक्रमी पुरुषांच्या तसाबिरा काढून दाखविल्या. ह्मणजे देव, ऋषि, गंधर्व, दैत्य, राक्षस, व मनुष्यें. नंतर इंद्र-लोक, ब्रह्मलोक, कैलास, वैकुंठ आदिकरून पाताळांतीलही चित्रें रेखिलीं. तथापि खूण जेव्हां कोठेंच पटेना, तेव्हां चित्ररेखा ह्मणाली कीं, जीं स्थानें मला माहित आहेत तीं तर सर्व काढून दाखविलीं; परंतु त्यांत तुझा प्रियकर नाहीं हें पाहून जीवास खिन्नता प्राप्त झाली आहे. आणि हें कृत्य चांगल्या रीतीनें माझ्या हातून पल्लयास जाईल असेंही वाटत नाहीं. परंतु आतां फक्त एक द्वारका मात्र तुला काढून दाखविण्याची उरली आहे. तींत जर तुझा प्रियकर आढळला नाहीं, तर मग मात्र माझा निरुपाय आहे. उखेनें ह्मटलें कीं सखे, तुझा शेवटील उपाय काय असेल तो कर आणि द्वारका काढून मला दाखीव्. माझाही जीव अगदीं धडग्यावरच प-डला असून माझा मनोरथ पूर्ण होईल न होईल याविषयीं फारच संशय आहे. यासाटीं, सखे, तूं आतां विलंब न लावितां जर द्वारका काढून दाखविशील तर कायतो निवाडा होईल. मग माझ्या दुर्दैवानें जर त्यांतून कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं तर माझा प्राण महत् संकटांत पडणार आणि बहुशः मी व तं सदोदित दुःखी असणार. चित्ररेखेनें जेव्हां द्वारका चि-तरून दाखविली, तेव्हां त्यांत वसुदेव देवकी, रुक्मिणी, सत्यभामा, बळराम इत्यादि पाहून उखा थोडीशी विस्मित होऊन सानंदित झाली. व ह्मणाली कीं प्रियसखे, या प्र-संगीं माझा कार्यभाग होईल असें मला वाटतें. इतकें बोलत आहे तों श्रीकृष्ण मूर्ति काढून दाखविली. ती पाहतांच उखे-नें चित्र रेखेच्या पाठीशीं लपाल्यासारखें केलें, व ह्मणाली

कीं, ओळख पटत चालली. इतक्यांत मदन मूर्ति पाहिली तेव्हां लाजून दासीस सांगितलें कीं ही तसबीर माझ्या मामंजीची. नंतर चित्ररेखेनें रतीची तसबीर रेखून दाखविली. ती पाहून तोंडावरून पदराचा बुरखा ओढला आणि बोललो कीं, ह्या माझ्या सासुबाई. आतां गडे लवकर लवकर राहिलेलीं चित्रें काढून दाखीव. नंतर चित्ररेखेनें अनिरुद्ध मूर्ति काढून दाखविली. ती पहातांच उखा लागलीच लाजून पळाली. चित्ररेखेनें ह्मटलें अग बाई, तूं तर शर्थच केलीस. अग वेड्यासारखें चित्रास पाहून असे चाळे काय कारितेस? हेचका तुझे प्राणनाथ? उखेनें होय ह्मटल्यानंतर लागलीच लेखणी खालीं ठेवून उखेस सांगितलें कीं आज रात्रौ तुझ्या प्राणप्रियास मी आणून तुला भेटवितें. तूं कांहीं चिंता करूं नको. रात्र होतांच उखा उत्तम प्रकारचा शृंगार करून आपल्या महालांत बसली. आणि चित्ररेखा तिची आज्ञा घेऊन द्वारावतीस आली. आणि गुप्त रूपानें आंत प्रवेश करणार तों द्वारकेभोंवतें सुदर्शन फिरत आहे असें पाहिलें. तिणें नाना प्रकार केले परंतु आंत प्रवेशच होईना असें पाहून, मति कुंठित झाल्यासारखी होऊन ती तेथेंच स्तब्ध उभी राहिली.

अशा विचारांत ती असतां अकस्मात नारदस्वामींची स्वारी तेथें आली. ऋषि दर्शन होतांच वंदन करून चित्ररेखेनें आपलें हें सर्व वर्तमान त्यांस सांगितलें. ऋषीनें पुढील कार्यभाग जाणून तिला सांगितलें कीं, त्या सुदर्शनास माझी शपथ घाल ह्मणजे तूं आंत निर्विघ्नपणें जाशील. व येते वेळींही तसेंच कर ह्मणजे तुझा कार्यभाग सिद्धीस जाईल. चित्ररेखेनें तसें केलें व आंत जाऊन मोहि-

नी मंत्रानें बेशुद्ध करून अनिरूद्धास मंचकासह उखेच्या रंगमहालांत आणलें.

चित्ररेखा येण्याची वाट उखा एकसारखी पाहतच होती. इतक्यांत मंचकासह चित्ररेखा आलेली पहातांच महदानंदांत व्याप्त होऊन ती सामोरी धांवत आली. व निद्रिस्त पतीच्या मुखाकडे पाहून प्रथम उपकारकर्ती जी चित्ररेखा तिच्या पायावर मस्तक ठेविलें. चित्ररेखेनें मोठ्या प्रेमानें तिला उचलून आलिंगन देऊन तिला महालांत लोटून दार लावून घेतलें. व पहाट होतांच तिनें पुनः अनिरूद्धास द्वारकेस नेऊन पोंचविला. याप्रमाणें तिनें नित्य क्रम चालविला असतां उखेस नित्य पतिसुख व अनिरूद्धास सुंदर स्त्रीसुख निरंतर मिळून उभयतांचा जीव चित्ररेखा प्रसादानें अत्यानंदांत निमग्न असे. ज्या वेळीं प्रथम अनिरूद्धास चित्ररेखेनें उखेचे रंगमहालीं आणिला त्याच वेळीं त्याच्यावर टाकलेलें मोहनास्त्र काढून त्या उभयतांचा नारदानें गुप्तपणें विवाह लाविला होता.

एके रात्रीं अनिरूद्ध व उखा आनंदानें विषयोपभोगाच्या गोष्टी निःशंकपणें बोलत असतां, त्यांचें कांहीं शब्द बाहेर सेवकांस ऐकूं आल्यावरून दुसऱ्या दिवशीं पहारेकऱ्यांनीं बाणासुरास कळविलें कीं, नित्य रात्रीं कोणी एक पुरूष उखेच्या महालांत येत असतो व त्यांचे बोलत असतांना कांहीं शब्दही बाहेर ऐकूं येतात. बाणासुरानें ह्या गोष्टीचा शोध करून पाहिला, तों कोणत्याच प्रकारें त्याची खात्री होईना. त्यास आपल्या बळाची मोठी घमंडी असल्यामुळें त्रैलोक्यांत कोणताच पुरूष अशा कर्मास प्रवृत्त होईल असें त्यास वाटेना. तशांत उखेविषयींही त्याच्या मनांत दृढ विश्वास असल्यामुळें आपल्या कन्येस निरर्थक गोष्टीविषयीं

बोलून तिचें मन दुखवावें हें त्यास न आवडून ती गोष्ट मनांत तशीच ठेविली. एके रात्रीस मला गर्भ राहिला असे उखेच्या तोंडचे अनिरुद्धाजवळ बोललेले शब्द बाहेरील रक्षकांच्या कर्णीं आल्यावरून त्यांणीं पुढील कर्मास भिऊन पुनः बाणासुराजवळ ऐकलेल्या गोष्टीची सुनावणी केली. त्यावरून, आणि उखा गरोदर आहे हा एक जड शब्द असल्यामुळें बाणासुरानें आपल्या जवळील एका परम विश्वासु दासीस युक्तीनें ती चवकशी करण्याविषयीं सांगून तें वर्तमान खरें असल्यास कळविण्याविषयीं, अगर खोटें असल्यास ती गोष्ट गुप्त ठेवण्याविषयीं आज्ञा केली.

नंतर त्या दासीकडून उखा खरोखर गरोदर आहे असें समजल्यामुळें, बाणासुरानें कन्येच्या महालामध्यें जाऊन तिला कठोर शब्दांनीं ताडण केलें. आणि असा कोण दुष्ट येथें येतो त्यास व तुला एकदम मारून टाकीन असें त्यानें सांगितलें. आणि उखेच्या मंदिराभोंवतीं मोठा कडक पहारा ठेविला. परंतु चित्ररेखा शक्तिमान् असल्यामुळें सर्वांस मोहनास्त्रानें बांधून नित्य अनिरुद्धास आणीत असे. जरी बाणासुर रात्रंदिवस टपत होता, तथापि त्याचीही दृष्टि चुकवित असे.

एके रात्रीं कोणी बाणासुरास असें कळविलें कीं चित्ररेखा आपल्या मंत्रविद्येनें नित्य त्या पुरुषास रात्रौ आणून प्रातःकाळीं परत पोंचविते. हा मजकूर बाणासुरास संशयित वाटून व त्याणें पाळत ठेवून आंतून कांहीं शब्द उभयांचे येत आहेत असें ऐकतांच लागलीच चित्ररेखेस प्रतिबधांत ठेविली. महालाच्या दरवाज्याचा सैन्याकडून चांगला बंदोबस्त केला. आपल्या घरांत शिरणारा चोर हा कोणी तरी मोठाच पराक्र-

मी असेल, सामान्याचें एवढें धारिष्ट होणार नाहीं, असें ंत आणून बाणासुर सशस्त्र दरवाज्या बाहेर उभा राहून बोलला कीं, चोरा, तुझ्या आयुष्याचे दिवस आज भरले. सिंहाच्या घरांत कोल्हा शिरण्यासारखी गोष्ट त्वां केलीस; ह्मणून मी तुला सांगतो कीं, तूं जर वीर असलास तर बाहेर पडून युद्ध कर. नाहींपेक्षां दरवाजा फोडून तुला आतांच त्या दुष्ट कन्येसह ठार मारितों. हे शब्द ऐकतांच उखा घाबरून तिणें पतीच्या गळ्यास मिटी मारली व रडूं लागली. अनिरुद्धानें तिची समजूत करून तिला स्वस्थ ठेवून मोठ्यानें गर्जून उत्तर दिलें कीं, बाणासुरा, तुझा गर्व हरण होण्याची हीच वेळ आहे. व आजच समरंगणीं काय होईल तें दिसेल; ह्मणून आतां घरांत न राहतां जर वीर ह्मणवीत असशील तर बाहेर दंड ठोकून उभा रहा.

बाणासुर अगोदर रागानें संतप्त होताच; त्यांत हे मार्मिक शब्द ऐकतांच दंड ठोकून बाहेर उभा राहिला, आणि हांक मारिली. तेव्हां अनिरुद्ध विद्युल्लतेसारखा बाहेर येऊन बाणासुराशीं युद्ध करूं लागला. अनिरुद्धानें फारच युद्ध केलें व दैत्याची अगणित सेना मारिली, परंतु तो महा प्रबळ, त्यापुढें उपाय चालेना. त्याणें लागलाच अनिरुद्धास कैद करून प्रतिबंधांत टेविलें. आणि अनिरुद्ध व उखा या उभयांस मारण्याविषयींची तयारी केली.

नारदस्वामी हें वर्तमान जाणून लगबगीनें द्वारकेस गेले. आणि कृष्णास सांगितलें कीं यःकश्चित बाणासुर, त्याणें तुझा नातु अनिरुद्ध यास प्रतिबंधांत टाकलें, व कांहीं वेळानें त्याचा शिरच्छेद करणार ही गोष्ट तुह्मांस मोठी लांछनिय आहे. कृष्णानें हें सर्व वर्तमान ऐकून अगणित सैन्य व प्रचंड

वीर समागमें घेऊन मदनासह शोणीतपुरास गेला. हें प्रचंड दळ शोणीतपुरावर उतरत आहे असें पाहून बाणासुरानेंही युद्धाची तयारी केली. इतक्यांत सकळ सैन्यासह कृष्ण रणभुमीवर आला. त्यास पाहून असुर ह्मणाला कीं, अरे काळ्या, तूं कपटानें काळीं कृत्यें काय काय केलीं आहेस तीं सर्व मला माहित झालीं; तर आतां तुला समरभूमीवर कोणी युद्ध करण्यास शिकविलें असेल तर त्याचा मजपाशीं झाडा दे. अरे तुझें कूळच व्यभिचारी. तूं बहुत निंद्य कर्में आचरलास. आतां तुझा पुत्र मदन तर व्यभिचाराचें झाडच अवतरलें. आणि 'यथा बीजं तथांकुरः' याप्रमाणें पहातां जो चोर मीं कन्येच्या महालांत धरला तो त्या मदनाचाच पुत्र. अरे गवळटा, मी त्यास व्यभिचार कर्मांत धरिला असतां त्याच्या कैवारानें तूं मजबरोबर युद्ध करण्यासाठीं आला आहेस. पण या रणांगणांत कांहीं भलताच योग होणार आहे. कृष्ण ह्मणाला, असुरा, मृत्यूच्या तोंडांत सांपडणाऱ्या मनुष्यास वायु होऊन तो अंतसमयीं ज्याप्रमाणें बडबडत असतो त्याप्रमाणें तुझी सर्व तयारी होऊन राहिली आहे. अनिरुद्ध आणि उखा कोण, हें ज्या वेळीं तुझे डोळे पुरते उघडतील, त्या वेळीं दिसेल. त्यांचें लग्न झालें आहे किंवा तीं त्याशिवाय रममाण होत आहेत तोही तुला विचार शेवटीं समजून येईल. आणि तूं जो शंकराजवळ वर मागितलास तो परिपूर्ण होण्याची वेळही नजीक आली असेंही तुला वाटेल. याप्रमाणें ते उभयतां युद्धांत मिसळले. मदन आदिकरून वीरांनीं युद्ध करून असुराचें सैन्य बहुत मारिलें, परंतु तो काळासारिखा प्रचंड असुर आटपेना त्या वेळीं श्रीकृष्ण सशस्त्र पुढें आला.

आतां कृष्णाची व बाणासुराची मोठी लढाई होणार तथापि परिणाम चांगला व्हावा या हेतूनें नारद लागलाच कैलासास गेला. आणि शंकरास विनंती केली कीं, अनिरुद्धास बाणासुरानें प्रत्यक्ष उखेच्या महालांत पाहिल्यावरून युद्ध करून त्यास प्रतिबंधांत ठेविलें. अशा वाईट कर्मांत सांपडलेल्या अनिरुद्धाच्या कैवारार्थ यादव सैन्यासह श्रीकृष्ण तुझ्या प्रिय भक्त बाणासुराशीं लढाई करून त्यास शासन करण्यास आला आहे. तेव्हां या वेळीं त्यास आपण जर साह्य न केलें तर मोठेंच दुःख त्यावर पडणार. नारदाच्या मुखांतून हीं भाषणें पुरतीं निघालींही नाहींत तों कोट्यावधि गणासहित शंकरानें शोणितपुरास जाण्याची सिद्धता केली.

नारद आपला कार्यभाग झाला असें जाणून कृष्णाकडे धांवत आला. आणि कृष्णास सांगितलें कीं, येथील बातमी शंकारास पोंचून शंकर गणसैन्यासह बाणासुराच्या कैवारार्थ निघाले आहेत. मी हें तुला कळविण्याकरितां मुद्दाम आलों. असें सांगून नारदस्वामी बाणासुराकडेही गेले आणि त्यास कळविलें कीं, तूं कृष्णास भिऊं नको. शंकरमहाराज तुझ्याच कैवाराकरितां गणसैन्यासह यावयास निघाले आहेत. इतकीं भाषणें होत आहेत तों रणभूमीवर शंकर ससैन्य आले. आणि युद्धांत मिसळले. शंकर व कृष्ण यांचीं रणसंबंधीं कांहीं भाषणें झालीं. त्यांतच कृष्णानें शंकरास कळविलें कीं आपण जो दैत्यास भुजा कंडूशमनार्थ वर दिला आहे त्याच्या परिपूर्णार्थच मी येथें आलों आहें.

इकडे बाणासुर चवताळून युद्ध करितां करितां एकाएकीं कृष्णाच्या आंगावर कोसळला. त्यास कृष्णानें पुष्पासारिखा वर उडवून खालीं आल्यावर एकदम सुदर्शनानें त्याच्या

दोन भुजा राखून बाकीच्या सर्व छेदून टाकिल्या. परंतु दीनासारखा तो पुढें उभा आहे असें पाहून शंकर तेथें धांवत आले, आणि बाणासुरास कृष्ण चरणावर घालून सांगितलें कीं, शिव व कृष्ण हे दोन नव्हत आणि झालें तें कृत्य तझ्या इच्छेप्रमाणें ठीकच झालें; कां कीं, तुलाही ह्या भुजांचा व्यर्थ भार होता.

नंतर शंकर, कृष्ण आणि बाणासुर यांच्या प्रेमपूर्वक भेटी होऊन एकमेकांस सन्मानीत आहेत, इतक्यांत नारदस्वामी तेथें आले व त्यांणीं आपण दोघांचें लग्न पूर्वीं लाविल्याचेंही कळविलें. आणि शंकरानेंही अनिरुद्ध रतीचें लग्न मोठ्या डामडौलानें पुनः करण्याविषयीं बाणासुरास आज्ञा केली. त्याप्रमाणें उभयतांस मुक्त करून मोठ्या समारंभानें चार दिवस त्यांचा लग्नसोहळा केला. व जांवयास आंदण कित्येक राज्यें, व विपुल द्रव्य देऊन मोठ्या उत्साहानें सर्वांस द्वारकेस पाठविलें.

---

# अध्याय २१ वा.

## सुदाम चारित्र.

सुदामा या नांवाचा एक अत्यंत दरिद्री ब्राह्मण अवंती नामें प्रसिद्ध नगरींत रहात होता. त्याचें कुटुंब मोठें लहान मुलांबाळांनीं भरलेलें व खाण्याचे घरांत हाल असल्यामुळें तो फारच त्रासला होता. अशा दारिद्र्यांत तो एक एक दिवस ढकलीत असतां, एके दिवशीं त्याच्या बायकोनें त्यास एक अशी युक्ति सांगितली कीं, जो तुमचा परम प्रिय मित्र श्रीकृष्ण द्वारकेंत मोठ्या वैभवानें नांदत आहे, त्याजवळ जर तुम्ही गेलां तर तुमचें हें दारिद्र दूर होईल. कृष्णानें, बळरामानें व तुम्ही

सांदीपन ऋषीचे घरीं एकत्र वेदाध्ययन केलें आहे. सबब तुह्मी एकमेकांचे गुरुबंधू अहांत. असें असून तुह्मी ही डोळेझांक कां आरंभिली आहे? सुदामा ह्मणाला कीं, स्त्रिये, ही गोष्ट खरी आहे; परंतु रिकाम्या हातानें राजा, मित्र, देव, गुरु आणि वैद्य यांच्या भेटीस जाऊं नये. तेव्हां जर कृष्णाच्या भेटीस म्या जाण्याविषयीं योजना केली तर त्यास भेट तरी काय न्यावी? मग उभयतांनीं घरांत शोधितांना एक मूठभर पोहे निघाले; परंतु ते बांधण्यास फडकें नाहीं. कां कीं, सोंवळें भांडें व दुसऱ्या वस्तू तर राहुं द्या परंतु मडक्याविषयींही घरांत खडखडाट. एखादें फडकें असलें तर फाटकें. शेवटीं एक वीतभर फडक्यांत ते पोहे बांधून तयार केले. व सर्व घरांतील वस्त्रें जमा करून सर्वांच्या धडक्या चिंध्या एके ठिकाणीं शिवून सुदाम्यास दोन हात नेसण्यास आणि एक हात पांघरण्यास अशीं दोन वस्त्रें दिलीं. नंतर एक चांगला दिवस पाहून सुमुहूर्तानें सर्वांस विचारून सुदामा द्वारकेस जावयास निघाला.

वाटेनें दारिद्रतापाच्या योगानें सुदाम्यास त्रास फारच सोसावे लागले. अशा संकटानें व्याप्त होत्साता तो द्वारकेजवळ गेला. तेव्हां त्याच्या दृष्टीस द्वारकेंतील कित्येक देवळांचे व राजवाड्यांचे सुवर्ण कळस जेव्हां दिसूं लागले, त्यावेळीं सुदाम्यास आपल्या येण्याविषयीं फारच पश्चात्ताप झाला. आणि त्याच्या मनांत असें आलें कीं, अशा सुंदर नगरींत वैभवानें जो रहाणारा श्रीकृष्ण त्यास आपण दारिद्री मनुष्यानें भेटण्यास कसें जावें? आणि कदाचित् गेलों तरी तेथें आपली दाद लावील कोण? असा विचार करीत तो अगदीं द्वारकेजवळ जवळ आला. आणि कसेंही असो

दरिद्रानें मरावें त्यापेक्षां हिंमत धरून आंत जावें, व मित्रास भेटून कांहीं न साधल्यास मग जीव द्यावा हेंच चांगलें; असा पूर्ण विचार करून तो शहरच्या दरवाड्याजवळ आला. तेथील पहारेकऱ्यांनीं त्यास विचारितां मी अनाथ ब्राह्मण कृष्ण दर्शनास जात आहें असें सांगितल्यावरून आंत जाऊं दिलें.

इकडे श्रीकृष्ण रुक्मिणी आदिकरून कित्येक स्त्रियांसह आनंदानें गोष्टी बोलत भोजनोत्तर सुवर्ण मंचकावर पडले असतां एकाएकीं कृष्णानें गडबडीनें उठून पलंगाखालीं उडी टाकिली आणि रुक्मिणीस सांगितलें कीं माझा परम प्रिय गुरुबंधु सुदामा नांवाचा ब्राह्मण अवंती नगरीहून माझ्या भेटीस येत आहे. तो क्षुधेनें व तृषेनें व्याप्त असा या राजवाड्याजवळ जवळ आला आहे. तो माझा प्रिय मित्र ह्मणून तुह्मी त्यावर सर्वांनीं प्रीति केली पाहिजे. त्याच्याकरितां लवकर उत्कृष्ठ षड्रसान्नें सिद्ध करावीं व प्रथम त्याच्या स्नानाची तजवीज राखावी. कारण तो अगदीं भुकेलेला आहे. हें वचन कृष्णमुखानें ऐकतांच रुक्मिणी सत्यभामा इत्यादि अष्टनायिका यांणीं सर्व सिद्धता करविली, व कृष्णानें तर सामोरे जाऊन त्या ब्राह्मणास आपल्या समागमें राजवाड्यांत आणिलें. एक तर श्रीकृष्णाची आज्ञा आणि त्यांतून पति गुरुबंधू येतात मग त्या मानास काय विचारावें! त्या सर्व वाट पहातच बसल्या. इतक्यांत त्या वृद्ध ब्राह्मणाची स्वारी आली. ती पहातांच त्या एकमेकींच्या कानाशीं लागून सर्व कुजबुजूं लागल्या. तो येतांच त्याच्या अंगावर द्या चिंध्या पाहून कृष्णास फारच वाईट वाटलें. आणि लागलेंच एक उत्तम वस्त्र आणवून त्यास दिलें. त्याणे तें

परिधान करून लागलेंच पूर्वींचें फेंकून द्यावें असें कल्पून तें टाकून दिलें. तें वस्त्र रुक्मिणीआदिकरून स्त्रिया आटपून ठेवण्यास धांवल्या. परंतु श्रीकृष्णानें सर्वां पूर्वीं तें उचलून आपल्या उराशीं धरून नंतर नीट ठेवण्यास रुक्मिणीस सांगितलें. या नंतर अष्टनायकांनीं सुदाम्यास सुवर्ण पाटावर बसवून नाना प्रकारच्या सुगंधी तैलांनीं त्याचें अंग मर्दन केलें व स्वहस्तीं त्यास मंगल स्नान घातलें. इतक्याच अवकाशांत वहिनीनें मला कांहीं भेट दिली कीं नाहीं, असें कृष्णानें विचारल्यावरून त्याणें त्या पोह्यांचें फडकें दाखविलें. कृष्णानें लागलेंच तें फडकें आणून त्यांतील पोहे घेतले व सर्वांस थोडथोडे देऊन आपणही आनंदानें भक्षण केले. इकडे सुदाम्याचें मंगल स्नान संध्यादि कर्म आटोपल्यावर त्यास मिष्टान्न भोजन अत्याग्रहानें दिलें. त्या वेळीं मोठा पीतांवर सत्यभामेनें त्यास परिधानास दिल्हा. सुवर्णताट जेवणाकरितां ठेविलें होतें. फारच आग्रह करून सुदाम्यास भोजन घातलें. नंतर रुक्मिणीनें स्वहस्तें तांबूल दिला. तांबुलानंतर कृष्ण व सुदामा हे उभयतां पलंगावर बोलत बसले. व अष्टनायकादि सर्व स्त्रिया खालीं बसल्या असून, कित्येक कृष्णस्त्रिया सुदामजीचे पादसेवन करीत होत्या. याप्रमाणें वडील बंधुपेक्षांही अधिक सुदामजीस मान मिळाला. आणि एक महिनापर्यंत त्यास कृष्णानें आपल्याजवळ ठेवून घेतलें. तेथील वैभव व कित्येक सुंदर वस्तु पाहून आपणास त्यांतून कांहीं असाव्या अशी इच्छा सुदाम्यास पुष्कळ वेळां झाली. व कांहीं तरी आपल्याकरितां कृष्णाजवळून मागून घ्यावें, असाही त्याणें निश्चय केला; परंतु त्याच्यानें एकही शब्द बोलवेना. शेवटीं आतां जाण्याची आज्ञा तरी मागावी ह्मणजे

12

आपोआप आपले मनोरथ पूर्ण होतील, असा तर्क केला. सुदाम्यास वस्त्रप्रावर्णें व अलंकार कृष्णानें इतके अमोलिक दिले होते कीं, एकादे वेळीं त्याच्या मनांत असें येई कीं कांहीं दुसरें न देतां आंगावरील दागिनें जरी राहिले, तरी आपलें जन्म दारिद्र नष्ट होईल.

सुमारें महिना भरत आल्यावर एके दिवशीं सुदाम्यानें जाण्याची गोष्ट काढली, त्यावेळीं कृष्णानें पट्टराण्यांकडे त्यास नित्यशः मेजवानीचा समारंभ चालविला. आणि मोठ्या आग्रहानें त्यास आणखीं कित्येक दिवस राहविलें. परंतु एकांत पाहून एके दिवशीं सुदाम्यानें पोराबाळांस भेटण्याची इच्छा झाली आहे असें सांगितल्यावर त्यास कृष्णानें घरीं जाण्यास आज्ञा दिली. त्या दिवशीं सर्व इष्ट आप्तांसह त्याच्या पंक्तीस बसण्याकरितां मोठाच समारंभ करविला. व सर्वांस सुदाम्याची ओळख करून दिली. भोजनानंतर रात्रीं सर्व रात्र त्याच्या सेवेंत राहून प्रातःकाळीं त्यास स्वनगरीस जाण्याकरितां आज्ञा दिली. जाते वेळीं, मार्गांत कदाचित् चोरांची गांठ पडल्यास तुह्मास लुटतील, याकरितां तुह्मी आपल्या आंगावरील नूतन दिलेले अलंकार व वस्त्र प्रावर्णें परत देऊन आपल्या प्रथमच्याच वेषानें घरीं जावें, असें कृष्णानें सांगून सर्व वस्त्र भूषणें परत घेऊन त्यास लावून दिलें. जातेवेळीं आपण दोन कोश शहराबाहेर त्यास पोंचवायास गेला. घरांतून निघतेवेळीं सर्व कृष्णस्त्रियांनीं व सर्वत्रांनीं आदरातिथ्याची पराकाष्टाच केली. परंतु सुदाम्यास तर असें झालें कीं, मी जर आलों नसतों तर फारच चांगलें झालें असतं. चालत जाण्यायेण्याचे श्रम तरी चुकले असते. कृष्णाची आज्ञा

घेण्यापूर्वीं सुदाम्यास असें वाटत होतें कीं, कृष्ण परत जाते वेळीं तरी कांहीं वस्तु मला देईल व त्या योगें माझें दारिद्र नाश पावेल. परंतु त्या बिचाऱ्याची तीही आशा नष्ट झाली. आणि कृष्णानें एक कवडीही न देतां त्यास तसाच त्याच्या पूर्वीच्या फाटक्या वस्त्रानिशीं वाटेस लावून आपण परत आला.

याप्रमाणें सुदामा सर्व प्रकारें निराशहोत्साता द्वारकेंतील भोगलेलें सुख व स्वगृहांत होणारें दुःख आठवीत आपल्या अवंती नगरीस चालला. तो कृष्णास शिव्या देत व आपले दुर्दैवास दोष लावीत मोठ्या दिलगिरीनें मार्ग क्रमीत होता. तो ज्यावेळां गांवाजवळ जवळ आला त्यावेळीं समोरून सोन्या रुप्याचे कळस दिसूं लागले. व मोठमोठ्या इमारतीही सुवर्णाच्या दिसल्या. त्या पाहून त्यास मनांत वाटलें कीं पुनः आपण द्वारकेंतच आलों. व फिरून मागें जाऊं लागला पण लक्षपूर्वक पहातो तों आपण खचीत मार्ग चुकलों नाहीं. परंतु दुसरें एखादें नवीन शहर निर्माण झालें असावें असें त्यास वाटून पुन्हां आपल्या नगरीकडे चालला. आणि ग्रामदुर्गाजवळ जाऊन पहातो तों त्यावरील पहारेकऱ्यांनीं त्यास लवून रामराम करून मोठ्या सन्मानानें आंत घेतला. पुढें किंचितही वेळ गेला नाहीं तोंच हत्ती, घोडे व पालख्या इत्यादि वहनें घेऊन कारभारी व मुत्सद्दी आले आणि सुदामदेवास आरूढ होण्याविषयीं विनंती करूं लागले. सुदाम्यानें त्यांस ह्मटलें, अरे, तुह्मी चुकलां असाल. तुमचा धनी दुसरा कोणी असेल तो पहा. मला उगीच नेऊन पंचायतींत घालूं नका. त्यांणीं त्याचें कांहींच न ऐकतां त्यास पालखींत बसविलें, आणि घरीं

नेलें. वाटेंत सुदाम्याच्या मनांत नाना प्रकारच्या गोष्टी आल्या. त्यास असेंही वाटलें कीं ज्या कृष्णानें मला सुखांत निमग्न करून या पंचायतींत टाकिलें त्याणेंच कांहीं तरी हा नूतन विभु रचिला आहे व मला पुढें पूर्ण पश्चात्तापांत पाडणार. अरे चांडाळा कृष्णा, मी काये तुझा असा मोठा अपराध केला! कोणत्याच कृत्याविषयीं मी तुझ्या टवाळ्या ढवाळ्याच्या आड आलों नसतां, व्यर्थ रे कां मला तूं छळतोस? असो प्रारब्ध. असें दुःख करीत असतां घराजवळ येतांच आनंद वाद्यांची एकच ध्वनि ऐकिली. उल्हाट यंत्रांचे भडीमार ग्रामदुर्गावरून होऊं लागले. अशा मोठ्या सन्मानानें सुदामास खालीं उतरल्यावर, त्याची पत्नी चरणांगुष्टापासून तों मस्तकापर्यंत रत्नजडित अलंकार आंगावर घालून व भरजरी पैठणी नेसून उभी राहिलेली हातांत पंचारती घेऊन स्वपती सुदामा यास ओंवाळण्याकरितां पुढें आली. तिलाही न ओळखून आणि मी तुमची पत्नी आहे असें ती सांगत असतांही तो व्यर्थ भ्रमांत पडला. शेवटीं तिणें हात धरून त्यास आदरपूर्वक महालांत नेल्यावर त्याचीं मुलें ज्यावेळीं मांडीवर बसून खेळूं लागलीं, त्यावेळीं त्यास ते सर्व खरें वाटलें. आणि आपण कृष्ण निंदा केली व त्यास व्यर्थ शिव्या दिल्या ह्मणून पश्चात्ताप पावून आपल्या तोंडांत फडाफड मारून घेतल.

सुदामास त्याच्या कृतीचा खरोखर पश्चात्ताप होऊन एकसारखा कृष्ण ध्यानांत निमग्न झाला व कृष्णदर्शनाशिवाय हा प्राण कधींही टिकणार नाहीं अशी निश्चयपूर्वक प्रतिज्ञा केली. तेव्हां कृष्ण कृपाळू होऊन तेथें प्रकट झाला व सर्वांस दर्शन दिलें. सुदामास आपलें सर्व कपटकृत्य करण्याचा

हेतु सांगून त्यास श्रम दिल्याची उलट त्याजवळ क्षमा मागितली. आणि सर्वांस विचारून कृष्ण द्वारकेस गेले.

---

# अध्याय ३० वा.

## कृष्णदान.

एके दिवशीं मित्रवृंदेच्या घरीं कृष्णाची जाण्याची पाळी असून तो साहजिक सत्यभामेच्या घरीं आला. त्यावेळीं आपल्याच स्वरूपास कृष्ण लुब्ध आहे असें तिला वाटून मोठा गर्व झाला, आणि बोलली कीं, आजचा दिवस दुसरीकडे जाण्याचा असून इकडे येणें कसें झालें? कृष्ण ह्मणाला कीं ज्या स्थळीं मजवर जसजशी भक्ति तसतसें माझें चित्त त्या ठिकाणीं अधिकाधिक रममाण होतें. भामेनें विनंती केली, देवा, भामेचें रूप, तेज व तिची प्रीति जी आहे तो प्रकार कांहीं विलक्षण आहे. ह्मणून एकदर नाद सोडून तुमचें मजकडे निरंतर ध्यान असावें. सोळा सहस्र स्त्रिया तर केवळ तुमच्या चरणीं लीन आहेत. आणि आह्मी अष्टनायका ज्या आहों त्या सर्वांचीही भक्ति तुमच्या चरणीं आहे व निरंतर त्या चरणरजाची धूळ आपल्या आंगावर पडण्याचीच सर्व इच्छा बाळगून आहोंत. परंतु रुक्मिणीस मात्र किंचित् गर्व झाला आहे. तिला असें वाटते कीं आपण वडील, आपण सर्वांत श्रेष्ठ, आपण कृष्णाचें चित्त हरून घेतलें आहे आणि इतर सात नायका या केवळ आपल्या दासी आहेत. ह्मणून देवा इतःपर ते सर्व नाद सोडून मजवर तुह्मी विशेष प्रेम ठेवावें अशी माझी निरंतर आशा आहे. कृष्ण ह्मणाला, भामे, तूं रुक्मिणीची एवढी स्पर्धा कां बरं करतेस? माझी दोनही ठिकाणीं कि-

बहुना सर्वत्र सारखी प्रीति आहे. तुह्मी व्यर्थ स्पर्धा आपापसांत करून व्यर्थ आपापल्या मनास दुःख करून घ्यावें हा अप्रशस्त मार्ग. भामा ह्मणाली, देवा, कसेंही तुह्मांस वाटलें, तथापि रुक्मिणीची आपणावर खास कपट भक्ति आहे. हें भाषण जरी कृष्णास रुचलें नाहीं, तथापि सत्यभामेच्या मनाप्रमाणें तिचा गौरव केला व कांहीं वेळ बोलून निद्रा येण्याचें निमित्त करून पलंगावर शयन केलें. इतक्यांत नारदाची स्वारी तेथें आली.

नारदास पाहून भामेनें मंचकाखालीं उडी टाकिली, आणि ऋषींचे पाय धरिले; व त्यांचें भक्तीनें पूजन करून चरणावर मस्तक ठेवून सन्मुख उभी राहिली. नारद ह्मणाले कीं, आज मला मोटाच आनंद झाला आहे कीं तुझ्या घरीं अवेळीं श्रीकृष्णचरण लागले. भामा ह्मणाली, महाराज आपल्या चरणाजवळ एवढीच विनंती आहे कीं, जरी कृष्णाची प्रीति मजवर परिपूर्ण आहे, तथापि त्याचें मन सदोदित सारखें नसल्यामुळें कधीं कधीं चलनवलन कांहीं निराळ्याच' प्रकारचें होतें. तसें न होतां सदां मजवरच त्याची प्रीति असावी असा कांहीं तरी उपाय सांगून तो सिद्धीस जाण्याविषयींचा मला आपला पूर्ण आशिर्वाद असावा. मीच ह्मणून या कृष्णास आपल्या कबजांत ठेविला आहे. नाहींपेक्षां या कृष्णास थाऱ्यावर आणण्यास दुसऱ्याची शक्ति नाहीं. स्वामीमहाराज, दुसरें तर काय सांगू पण यास मी आपल्या मायापाशानें बांधून ठेविलें आहे. नारद बोलला बाई, तुमचें सामर्थ्य विलक्षणच दिसतें. कांकीं कृष्णास आपलेंसें करून घ्यावें याबद्दल आह्मासारख्याचाही उपाय हरला. त्या देवास तूं आकलन करून ठेविलास हें पाहून नवल वा-

टतें. आणि असें जर खरेंच असेल तर तुजजवळ कृष्ण निरंतर राहण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं. भामा ह्मणाली कीं, महाराज, या कृत्यास कांहीं तरी दैविक इलाज सांगावा, ह्मणजे त्याप्रमाणें मी करीन. नारदानें सांगितलें कीं, ज्या वस्तूवर आपली विशेष भक्ति असून ती आपणास निरंतर असावी अशी इच्छा ज्याची असेल त्याणें अगर तिणें ती वस्तु दान केली पाहिजे. त्याप्रमाणें जर त्वां एकदां कृष्णाचें दान केलेस, तर ह्याचा तुला निरंतर लाभ घडेल. भामा ह्मगाली ती गोष्ट खरी, परंतु या कृष्णास दान घेणारा समर्थ कोण आणि त्यास विचारिल्याशिवाय देणार तरी कोण? नारद बोलले कीं घेणारा मी आहें. आतां देण्याविषयीं त्वां पाहिजे तो यत्न करावा.

भामेनें कृष्णास उठवून मोठ्या लाघवीपणानें तें वर्तमान सांगून विनंती केली कीं मी आपल्यास नारदस्वामीस दान देणार ह्मणजे निरंतर मला आपल्या चरणाचा लाभ घडेल. कृष्णानें सांगितलें कीं, प्रिये, तुह्मां स्त्रियांमध्यें कांहीं कलह होत नसला ह्मगजे मला याविषयीं कांहींच अडचण नाहीं. भामा ह्मगाला, प्राणनाथ, त्या गोष्टीचा विचार मला आहे. मी तुह्मास दान देतें. याप्रमाणें नारदाचें पूजन करून त्याच्या हातावर कृष्णाचे दानाविषयीं उदक सोडिलें. तें उदक हातावर पडतांच नारदऋषि कृष्णास आपल्यासमागमें घेऊन बाहेर चालले. भामेनें जरी म्लान मुख केलें तथापि आतां या कृष्णावर तुझी सत्ता नाहीं असें ह्मणून कृष्णासह पुढें चालले. कृष्णानेंही भामेस सांगितलें कीं आतां नारदस्वामीच्या आज्ञेशिवाय एक पाऊलही मला टाकवत नाहीं. भामेनें नारदाची बहुत प्रकारें विनवणी केली, तथापि तें कांहींच न ऐकतां

त्यानें कृष्णास रुक्मिणीच्या मंदिरांत घेऊन गेलें. नारद आल्याचें वर्तमान रुक्मिणीनें ऐकतांच पुढें धांवत येऊन पाय धरले. आणि त्यास श्रेष्ठासनीं बसविल्यावर श्रीकृष्णास पलंगावर बसण्याची विनंती केली. कृष्णानें सांगितलें कीं भामेनें मला नारदास दान केलें आहे ह्मणून आतां तुमची कोणाचीच मजवर सत्ता नाहीं. हें वर्तमान ऐकतांच रुक्मिण बेशुद्ध होऊन पडली. इतक्यांत त्या स्थळीं सर्व स्त्रिया जमल्या व सर्वांस हें वर्तमान कळतांच त्यांनीं एकच आकांत केला. अशा समयीं मित्रवृंदा पुढें येऊन तिणें नारदाच्या चरणीं मस्तक ठेऊन विनंती केली कीं, जें भामेनें दान केलें तें आह्मीच केल्यासारखें आहे : कारण कीं कृष्णानें तो पूर्वींच आपल्या शब्दांत उलगडा केला आहे. परंतु या सर्वांच्या तर्फेनें मी आपणास विनंती करितें कीं जर कृपाकरून आपण आह्मांस दया दृष्टीनें अवलोकन कराल आणि कृष्णनाथास परत द्याल तरच आह्मी सुखी होणार. व हा सर्व आमचा लाज राखणें आपल्या हातीं आहे. यावर नारद ह्मणाले कीं कांहीं जरी करणें झालें तथापि त्यांत मला लाभ पाहिला पाहिजे. ह्मणून कृष्णास नुसत्या तुमच्या शब्दावर परत देणें हें मला अमान्य आहे. हें ऐकून भामा पुढें आली आणि लोटांगण घालून बोलली कीं, महाराज, ज्या पक्षीं हा अपराध माझा आहे, त्यापक्षीं आपली मीच ऋणी आहे. नारदानें सर्वांचा आक्रांत पाहून भामेस सांगितलें कीं कृष्णाच्या भारंभार सोनें मला द्यावें ह्मणजे मी यास तुह्मांस परत देतों. भामा ह्मणाली कीं, ज्यापेक्षां मुर्खपणा मीच करून सर्व स्त्रियांमध्यें आपल्या वदनास कलंक लावून घेतला आहे, त्या पेक्षां हें सुवर्ण मी स्वतांचेंच देत्यें. असें ह्मणून तिणें तराजू आणविला आणि

ग्रंथ

एका पारड्यांत कृष्णास घालून दुसऱ्या पारड्यांत सुवर्ण आणून घातलें. तथापि कृष्णाचें पारडें जमिनीवरून एक अंगुलहि हाललें नाहीं. हें पाहून तर तिणें आपल्या जवळ जितकें होतें तितकें सोनें आणविलें व पारडींत घातलें. शेवटीं आपलें आंगावरील सर्व अलंकार भरीस घातले तथापि कृ-ष्णसम तोलेना. हें पाहून सर्व स्त्रियांनींही आपापले अलं-कार आणून घातलें तथापि कांहीं होईना. त्यावेळीं नागरीक नरनारी यांसही फारच वाईट वाटून नगरांत एकही गुंज सुवर्ण न ठेवितां सर्व कृष्णनाथाच्या प्राप्तीकरितां भरीस घातले; तथापि नारदाच्या द्रव्याची भर होईना. तेव्हां रुक्मिणी पुढें आली व सांष्टांग नमस्कार घालून बोलली कीं, ज्या कृष्णाच्या प्रत्येक रोमरंध्राच्या टायीं अनंत कोटि ब्रह्मांडाची घडामोड होते, त्या देवाची आह्मास तुळा कशी होईल ? ब्रह्मा, विष्णु, हर, ऋषि, देव, गणगंधर्व यांच्यानें ज्या कृष्णास पूर्णपणें ध्यानांतही आणविलें नाहीं, त्या कृष्णास आह्मीं तोलणार हा सर्व व्यर्थ भ्रम आहे. जगदीश्वराचीच जर इच्छा असल तर ही गोष्ट होणें आहे. ह्मणून मी हें एक तुलसीपत्र सद्भक्तीनें या पारड्यांत टाकित्यें जर सर्वांच्या पुण्याईनें श्रीकृष्ण तुळा झाली तर चांगलें. नाहींपक्षीं परमे-श्वराची इच्छा. इतकें बोलून पुनः ईश्वरास सांष्टांग नमस्कार घालून सर्व सुवर्ण परत काढवून त्या जागीं आपले हातांतील फक्त एक तुलसीपत्र टाकिलें. तें टाकतांच कृष्णाचें पारडें वर उचलून दोन्हीं समान झालीं. हा चमत्कार पाहून नागरीक जनास तर अत्यानंद, कृष्ण स्त्रियांस ब्रह्मानंद व रुक्मिणी तर आनंदमूर्छितच पडली. सत्यभामेनें मात्र खालीं मान घातली. आणि कृष्णाच्या चरणीं मस्तक

ठेविलें आणि ह्मणाली माझ्या मनांत जो गर्व होता तो सर्व हरण झाला. आतां कृपाकरून मला कृतापराधाची माफी असावी. असें ह्मणून रुक्मिणीच्याहीं चरणावर मस्तक ठेविलें. हें पाहून भामेस कृष्णानें जवळ घेऊन तिची समजूत केली. नारदानें रुक्मिणीची प्रशंसा करून सर्व स्त्रियांस तिच्या आज्ञेंत रहाण्यास आज्ञा केली.

---

## अध्याय ३१ वा.

### गरुड व भामा गर्व हरण.

रुक्मिणी ही पूर्णावतारी आहे असें नारदानें भामेस सांगितलें. त्याप्रमाणें कृष्णमुखेंही तिणें ऐकून तिच्या अंतःकरणाचीही खात्री झाली होती. परंतु तिच्या मनांतील स्पर्धा व स्वरूपाभिमान हा कधींही नष्ट झाला नव्हता. कारण ती वारंवार कृष्णाजवळ याच गोष्टीविषयीं विनोद करीत असे. आणि कोणत्या तरी वेळीं तिचा पुर्तपणीं भ्रांती फेडावी असा कृष्णाचाही हेतु होता.

एके वेळीं नारदस्वामी स्वेच्छेनें दक्षिण तीर्थें करीत करीत श्री रामेश्वरीं आले. तेथें मारुती त्यास भेटला. परस्परें क्षेमालिंगनें व वंदन झाल्यावर नारदानें त्यास कित्येक तीर्थें करण्याचा व साधूंच्या भेटी घेण्याची सुचना करून आपण श्री द्वारकेस आले. तेथें क्षेमकुशळ व पुजनानंतर हनुमंत भेटीचा वृतांत नारदानें कृष्णास सांगितला. व हनुमंताची फारच प्रशंसा केली. त्या वेळीं रामावतारांतील हनुमंत ह्मणजे माकड अजून वांचलें कसें या गोष्टीचा कित्येक बायकांनीं उपहास केला. त्यावर कृष्णानें त्याच्या रामभक्तीविषयींच्या व सामर्थ्याच्या बहुत गोष्टीही त्यांस सांगितल्या; तथापि

त्या बायकांच्या मनाची कोणत्याही रीतीनें खात्री होईना. तथापि मारूती ह्मणजे अकरावा रुद्र व तो सदाशिवाचा अवतार आहे असें सांगून ती गोष्ट तशीच ठेविली.

इकडे तीर्थें करावीं व साधु दर्शनें घ्यावी अशी जी बुद्धि हनुमंतास नारदानें सांगितली, ती त्याच्या हृदयांत पुर्ती ठसून, त्याप्रमाणें तो तीर्थें करीत व महान् साधूंचीं दर्शनें घेत घेत द्वारावतीस आला. येथें उपवनांत क्रीडत असतां, कित्येकांस या नगरीच्या राजाचें नांव काय ह्मणून विचारितां, लोकांनीं येथें बळरामराजा राज्य करित आहे असें सांगितलें. तें ऐकण्याबरोबर हनुमंतास क्रोध येऊन त्यास असें वाटलें कीं एक सीतापति राम होऊन गेला, त्याणें एका सीतेसाठीं दशकंठादिक दुष्टांचा संव्हार करून भूभार हरण केला, व आपणही त्याच रामाचे चिरंजीव सेवक आहों. या लोकांत हा दुसरा राम कोठून आला ? यास नाहींसा करावा, असा त्याणें मनांत विचार आणून कित्येकांस सांगितलें कीं, पाहिजे त्या राजाचें दुसरें नांव त्यास द्या, पण राम व बळिराम वगैरे शब्द उच्चारण्याचें सोडा. जर न सोडाल तर तुह्मांस मारून या नगरीचें स्वप्रतापें निर्दालन करीन. तें ऐकतांच विचारे लोक पळाले व त्यांणीं हें वर्तमान कृष्णास सांगितलें.

इकडे मी बळवान व प्रतापसूर्य असा अहंकार गरूडास झाला होता. तो काढून टाकण्याची संधि रामकृष्ण पहातच होते. इतक्यांत ही वेळ बरी आली असें पाहून उभयतां बंधूंनीं विचार करून भामेचा व गरूडाचा गर्व परिहार करण्याचा निश्चय केला. त्यांणीं कित्येक लोकांस सभेंत बोलावून त्यांस हें वर्तमान विचारिल्यानंतर, लागलेंच गरू-

डास बोलावून आज्ञा केली कीं, त्या वानरास येथें बलावून आण. गरुडानें विनंती केली, महाराज, धन्यानें चाकराची सेवा जाणावी, व योग्य बक्षीस द्यावें, अगर त्यास हिंमत नसल्यास त्याचा उपहास करावा. तसा प्रकार न होतां, मज-सारख्या प्रतापवंत, व साहसी अशा विश्वासु व प्रिय सेवका-स ही असली हलकी कामगिरी देतां काय ? कृष्णानें आज्ञा केली कीं एकवेळ तूं जा आणि त्यास बळराम तुला बो-लावितो ह्मणून सांग; आणि जर त्याणें तें ऐकून तो न आला तर तूं परत ये. दुसरी अशी आज्ञा केली कीं जो रामावतारीचा विश्वासु सेवक त्याचा अपमान होऊं नये असें माझ्या मनांत आहे. असें सांगतांच गरुड एकाच भ-रारीनें जेथें हनुमंत होता त्या उपवनांत गेला.

हनुमंत तर रामनामस्मरण करीत ध्यानस्थ बसला आहे, व डोळे मिटले आहेत, अशा संधीस गरुडानें त्याजवळ येऊन मोठ्यानें ओरडून सांगितलें कीं, अरे माकडा, तुला बळराम बोलावित आहे. गरुडानें हनुमंत ध्यानस्थ आहे असें पाहून त्याच्या समोर उभा राहून पुन्हां एकदां मोठ्यानें ओरडला. शेवटीं त्याच्या कानाजवळ येऊन ओरडून पुन्हां तींच अक्षरें सांगितली. तें ऐकतांच कानाशी कोणतरी कटकट करीत आहे असें त्या मारुतीस वाटून रागानें एक चपराक मारिली ती गरुडाच्या श्रीमुखांत बसतांच लागलाच व्याकूळ होऊन जों आपोआप उडाला, तों घायाळ होत्साता गतप्राण होऊन राजवाड्यासन्मुख राजांगणांत येऊन पडला. त्या वेळीं मोठा ध्वनि झाल्याच्या योगानें कित्येक स्त्रिया, जन आणि बळराम व कृष्ण हेही त्या ठिकाणीं आले व पहातात तों गरुड घायाळ होऊन मुखांतून भडभडां रक्त वाहून वि-

गालित दंत होत्साता अरंबळत पडला आहे असें पाहिलें. तें वर्तमान ऐकिल्यानंतर कृष्णानें ह्मटलें, गरुडा, तूं खोटें बोलतोस, व ढोंग करितोस. गरुडानें आपलें तोंड दाखवून गालावर चपेटा लागलेला वळही दाखविला. तेव्हां पुन्हां त्याच्या कानांत बळरामानें सांगितलें कीं, तूं आतां त्याजवळ जा व त्याला सांग कीं, " सीतापति राम तुला बोलावीत आहे. " हे शब्द ऐकिल्यावर मग तो तुला अगदीं मारणार नाहीं. गरुडानें देवाच्या पायावर मस्तक ठेवून विनंती केली कीं, जर प्राण घेणें तर, महाराज आपणच घ्यावा, परंतु मला तेथें पुन्हां पाठवून त्या माकडाच्या हातून मारवूं नका. श्रीकृष्णानें गरुडाची पाट थोपटली व त्यास निर्भय केलें. मग गरुड लागलाच श्रीकृष्णास वंदन करून निघाला. तो भरारी मारीत मारुतीपासून बऱ्याच अंतरावर त्याचा हात न पोंचे अशा बेतानें उभाराहून, तेथून बोलला कीं, " हे महासमर्था, तुला सीतापती राम भेट घ्यावयाकरितां बोलावित आहे. " इतके शब्द गरुडानें उच्चारिले आणि जरी निर्भय होता तथापि एकदम मागें द्वारकेकडें भरारी मारिली.

इकडे प्रथमच्या त्रासानें मारुती क्रोधयुक्त होऊन आपल्या शेपूटाकडून वन विध्वंस करवीत असून शहरांतही घरोघर पुच्छ शिरवून जे जे कोणी अभिमानी होते त्यांस बंधन केलें. त्या दुःखापासून मुक्त व्हावें ह्मणून, कृष्णपुत्र व पौत्र यांणीं मोठ्या शूरत्वाचे नाना यत्न केले; परंतु ते सर्व निरर्थक झाले. मारुती रामस्मरणांत निमग्न असतां अकस्मात सीतापती हे शब्द कर्णीं आले; ते ऐकतांच डोळे उघडिले. तथापि जवळ कोणी दिसेना, परंतु एक पक्षी पळत पळत द्वारकेकडे जात आहे असें पाहिलें; तेव्हां हात

किंचित लांबवून त्या गरुडास जवळ आणून पोटाशीं धरिलें आणि त्याचें मुख कुरवाळून विचारिलें, सख्या, तूं माझा प्राणप्रिय व सुख उत्पन्नकर्ता आहेस. मित्रा भिऊं नको. माझा राम कोठें आहे तो दाखीव. गरुड बोलला, महाराज, एक वेळ आपण मला जीवदान द्यावें ह्मणजे हा मार्गच मी सोडतों. पुन: स्वर्गप्राप्ति असली तथापि मला येथें येणें नाहीं. मारुती ह्मणाला, सख्या, भिऊं नको. त्वां माझें मन आनंदित केलेंस व कर्णेंद्रियें रघुनाथ नाम श्रवणें करून पावन केलीस; तेव्हां असा जो प्राणी त्यास माझ्यापासून भय कल्पांतींही होणार नाहीं. आतां कृपा करून मला रघुवीर चरण दाखवावें, असें ह्मणून गरुडास पोटाशीं धरून नगराकडे चालला.

इकडे मारुती गरुडास घेऊन राजवाड्यांत येत आहे अशी बातमी छडीदाराकडून कृष्णास पोंचतांच त्यास महदानंद झाला. भामाआदिकरून स्त्रियांस मारुतीदर्शनाची मोठी उत्कंटा लागली. सर्व नागरीक नरनारी यांचे समुदाय मारुती दर्शनार्थ जमूं लागले, परंतु त्या विचाऱ्या गरुडाचा जीव मात्र मोठ्या यातनेंत पडला. कारण, त्यास असें वाटलें कीं मारुतीनें मोठ्या लोभानें मला हृदयाशीं धरिलें आहे; परंतु आतां जर त्या हनुमंताच्या दृष्टीस सीतापति न पडले तर माझा जीव जाणार. असो. अशा प्रकारें मारुती अगदीं निकट येत आहे व गरुड तर धाकानें गतप्राणासारखा झाला आहे, असें जाणून कृष्णानें 'रामाचें रूप धारण केलें व आज्ञा होतांच बळरामानें लक्ष्मण रूप घेऊन जवळ बसला. त्याप्रमाणें शंख चक्रांनीं भरत शत्रुघ्नाचे अवतार घेऊन चामरें वारण्याचा क्रम चालविला.

सिंहासनावर राम, त्याच्या पायाजवळ लक्ष्मण, व दोहों बाजूस भरत शत्रुघ्न उभे राहिले. इतका प्रकार झाल्यानंतर श्रीकृष्णानें भामेस सीता होऊन येण्यास आज्ञा केली तें ऐकतांच तिणें नवीन वस्त्रालंकार धारण करून जवळ आली. तें पाहून कृष्ण हास्यवदन करून ह्मणाला कीं, तूं आपणाकडून तर फार नटलीस; परंतु सीतेचें खरें रूप दिसत नाहीं. कदाचित आह्मी जरी तुझ्या आग्रहानें ह्मटलें तथापि मारुतीला भ्रम पडेल. तेव्हां भामेनें नानाप्रकारें थाट करून वरचेवर आपलीं रूपें पालटून दाखविलीं. परंतु कृष्ण व भरत शत्रुघ्नांनीं ह्मटलें कीं सीतेच्या व तुमच्या रूपांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. शेवटीं निरुपाय होऊन भामा ह्मणाली फार चांगलें; आतां कोणती राणी हुबेहुब सीता होऊन येते तें तरी मी पाहीन. मी आपली वाईट. तेव्हां कृष्णानें रुक्मिणीस सीता होण्यास सांगितलें. तें ऐकतांच रुक्मिणी आंत जाऊन आंगावरील पदर मात्र किंचित फिरविल्यासारखा करून लागलीच सीता रूप घेऊन आली व रामा सन्निध बसली. तें रूप पहातांच भामेचें वदन म्लान झालें आणि तिणें साष्टांग नमस्कार सर्वांस घालून रामास विनंती केली कीं, आजपासून अभिमान हा दुर्गुण मी आपल्या हृदयांतून काढून टाकला. रुक्मिणी ही आदिमाया अवतार आहे असें मी आतां पूर्णपणें जाणलें.

अशा प्रकारें भामेचा गर्व हरण होऊन त्या सर्व स्त्रिया अंतरगृहांत गेल्यावर कृष्णानें आपल्या योगमायेनें कांहीं असा चमत्कार केला कीं, जितके सभासद होते, तितक्यांस नळ, नीळ, जांबुवंत, सुग्रीव, सुशेष व बिभीषण इत्यादि

वीरांची रूपें दिलीं. इतक्यांत गरुडानें हनुमंतास हातीं धरून तेथें आणिलें. नगराचा थाट अयोध्यावत झाला; सर्व लोकही तद्वतच झाले; व आसमंतात् वानर सैन्याचे पाळेच्यापाळे दिसूं लागले. हें पहातांच प्रथम गरुडास असें वाटलें कीं आपण नगराची वाट चुकून भलत्याच मार्गानें दुसऱ्या नगरास आलों. दुसरा प्रकार असा झाला कीं जे जे कोणी गरुडास भेटत ते ते वानररूपी अगर राक्षसरूपी रामसेवकच आहेत असें त्यास वाटे. हें पाहून त्याचें तर मन भयग्रस्त झालें, परंतु मारुतीनें ह्मटलें कीं, मित्रा तुझी मुद्रा भ्रमित कां झाली आहे? मला तर येथें सर्व ओळखीचा प्रकार दिसतो. प्रिया आतां मला एकवेळ रामदर्शन करीव. गरुड जरी मनांत खिन्न होता तरी धीटपणानें तसाच मारुतीसहवर्तमान राजद्वारासमीप आला. तेथें पाहतो तों नित्याचे द्वारपाळ नसून कित्येक राक्षस व वानर आणि कित्येक देवासारखे सुंदर दिसले. त्यांणीं मारुतीस पहातांच वंदन केलें. व चोपदारांनीं येऊन मारुतीस गरुडासुद्धां आंत नेलें. मारुतीनें राम, लक्ष्मण, सीता, भरत व शत्रुघ्न सिंहासनारूढ पाहून " जयरघुवीर " ह्मणून साष्टांग प्रणिपात केला. तदनंतर बिभीषणास क्षेमालिंगन दिलें व नळनीळादिकांच्या भेटी घेतल्या. हा सर्व प्रकार गरुड खालच्या मानेनें पहात असून मनांत भीति युक्त आश्चर्य पावला. त्याणेंही रामचंद्रजीस साष्टांग नमस्कार घातला, परंतु ही रचना येथें अशी कशी झाली, व या पुढें आपणास श्रीकृष्ण परमात्मा भेटतील किंवा नाहीं अशी त्यास भीति पडली. रामचंद्रानें मारुतीस कुशलवृत्त विचारून त्यास जवळ बसविलें. मारुतीनें विनंती केली कीं आपण मला मागील

रामावतारीं एकवेळ भेट देण्याचा संकेत केल्याप्रमाणें आज मला दर्शन देऊन पावन केलें; त्या योगें मला फार आनंद झाला आहे. याप्रमाणें कांहीं वेळ मारुतीशीं श्रीरामचंद्रजी लंकेंतील गोष्टी बोलत बसले असतां अंतर्गृहांत पूर्वरूप पालटल्याशिवाय त्या सर्व स्त्रिया होत्या, त्यांस कांहींसें आश्चर्य वाटलें कीं, कृष्ण व बळिराम गेले कोठें व हें झालें काय ? व पुढें आपणांस परिणाम काय पहावा लागेल? इतक्यांत अकस्मात अशी गोष्ट घडली कीं सर्वत्रांस पूर्वरूपें येऊन रुक्मिणी अंतर्गृहांत बसली आहे व सर्व स्त्रियाही आपापल्यांत संवाद करीत आहेत, ह्मणजे सर्वत्र पूर्व स्थिति झाली, आणि हनुमंतास निरोप दिला. त्यानें स्मरण कराल त्यावेळीं प्रगट होऊन साह्य करण्यास येईन असें कबूल केलें. व राम आणि कृष्ण हे एकच आहेत अशी मारुतीची खात्री झाली, व तो अंतर्धान पावला. नारदस्वामींनीं भामेस असा उपदेश केला कीं रुक्मिणी ही आदिमायेचा अवतार आहे, याकरितां सर्व स्त्रियांनीं तिच्या मनास किंचितही उद्विग्न करूं नये. नारदाची आज्ञा सर्वत्रांनीं वंदन केली व रुक्मिणीच्या चरणावर सर्वांनीं मस्तकें ठेविलीं. हें पाहून नारदास मोठा संतोष झाला. नंतर त्यांणीं गरुडासही चांगला उपदेश करून सांगितलें कीं तुमच्या आमच्या बलाबलाचा विचार जो आहे तो सर्व दैवाधीन आहे. तला मीच कायतो बळवान असा अभिमान झाला आणि त्या कारितांच हें सर्व कृत्य घडून आलें. हे वचन ऐकतांच गरुडानें म्लान मुख करून अश्रुपूरित नयनानें श्रीकृष्णाकडे पाहून विनंती केली कीं महाराज, मी आपल्या अभिमानानें फुगलों होतों; परंतु त्याचें मला यथायोग्य शासन

झाल्यामुळें मी आतां आपणांस शरण आलों आहें. कृतापराधाची क्षमा करणें आपल्या आधीन आहे. कृष्णानें गरूडास पोटाशीं धरून त्याचें शांतवन केलें.

---

# अध्याय ३२ वा.

## सुभद्रा विवाह व नारद गर्वहरण.

लावण्यवल्ली नांवाची रुक्मयाची कन्या त्याणें प्रद्युम्नास दिली, त्या वेळीं श्रीकृष्णासह सर्वांनीं भोजकोट नगरांत जाऊन चार दिवस मोठ्याच समारंभानें तो उत्साह केला. त्याचप्रमाणें रुक्मयाचा पुत्र रुक्मध्वज याणें आपली कन्या जी रूपानें रतीसारखी होती ती अनिरुद्धास दिली. त्या लग्नाचा समारंभहीं मोठ्या थाटानें झाला. या वेळीं रुक्मध्वजाच्या आग्रहानें श्रीकृष्णासह सर्व मंडळी त्याच्या नगरास गेली होती. व त्या समारंभास शाण्णव कुळींचे मोठमोठे राजे बलाविले होते.

एके वेळीं रुक्मया व बळिराम हे उभयतां पण लावून द्यूत खेळण्यास प्रवृत्त झाले. त्या वेळीं कृष्णानें कित्येक अन्य प्रकारच्या गोष्टीनें द्यूताचा निषेध केला. परंतु बळरामदादास तो उपदेश न आवडून त्यांनीं खेळास आरंभ केला. त्यांत प्रथमचा डाव रुक्मया जिंकला, व दुसरा डाव बळिराम जिंकला; त्यामुळें भाषणावरून भाषण होतां होतां शूरत्वावर गोष्ट येऊन त्यापासून युद्ध निर्माण झालें. तेव्हां एकाच प्रहारानें बळिरामानें रुक्मयास ठार मारिलें. त्या वेळीं मोठीच गडबड होऊन रुक्मिणीसही फार वाईट वाटलें. तें पाहून कृष्णानें तिचें शांतवन केलें व त्याचा पुत्र रुक्मध्वज यास राजासनीं स्थापन करून आपण द्वारकेस निघून आले.

दुर्योधनानें आपली कन्या उपवर झाली ह्मणून मोठमोठे क्षत्रिय राजे बलावून तिचें स्वयंवर आरंभिलें. व त्या ठिकाणीं कांहीं कलह उत्पन्न न व्हावा याकरितां सैन्याचा फारच बंदोबस्त ठेविला होता. तथापि कांहीं स्वल्प कारणानें त्या जमलेल्या राजांत युद्ध उत्पन्न झालें. ते सर्व राजे आपापसांत लढत असतां कृष्णपुत्र सांब याणें त्या चक्रांत जाऊन एकट्यानें पराक्रम करून ती कन्या हरण केली. परंत सर्वांनीं त्या प्रसंगीं एकोपा करून सांबास धरून कारागृहांत ठेविलें. ही बातमी द्वारकेस कळतांच बळिरामास राग येऊन तो एकटा हस्तनापुरास आला आणि नांगर भूमींत रोवून हस्तनापुर पालथें घालूं लागला. तें पहातांच आतां आकांत होईल असें सर्वांस वाटून ते भयभित होत्साते बळिरामास शरण आले व दुर्योधनानें क्षमा मागून त्या सांबाचा आपल्या कन्येशीं मोठ्या समारंभानें लग्न सोहळा केला. आणि जावयास कित्येक दास, दासी, हत्ती, घोडे व नाना प्रकारचीं अमुल्य रत्नें आंदण देऊन मोठ्या आनंदोत्साहानें द्वारकेस पाठविलें.

पांच पांडवांची एक स्त्री द्रौपदी तिला पति सान्निध्य करण्यास नारदानें दिवस वांटून दिले त्या अन्वयें प्रत्येक वर्षीं दोन मास आणि बारा दिवस प्रत्येकाच्या वांटणीस येत. असा एक पतीचा नियमित वेळ सरल्यावर तिनें अग्नीकुंडांत पडून शुचिर्भूत होऊन दुसऱ्या पतीची संगत धरावी. आणि धर्माचे दिवस ज्या वेळीं येतील त्या वेळी चौघां बंधूंनीं तिला मातोश्री प्रमाणें मानावी. एके दिवशीं धर्म व द्रौपदी एकांतांत असतां एक ब्राह्मण अर्जनाजवळ धांवत आला आणि सांगितलें कीं माझ्या

गाई दैत्यांनीं वळून नेल्या. या वेळीं आपण जर धांवाल तर माझें कार्य होईल. तें ऐकून पार्थ आपलीं शस्त्रें ठेवण्याच्या खोलींत गेला. तेथें त्यानें धर्म व द्रौपदीस एकांतांत क्रिडत असतां पाहिलें. पुढें अर्जुन धनुष्य बाण घेऊन त्या ब्राह्मणाचें कार्य करून आल्यावर गुरूस हा वृत्तांत सांगून ह्या कर्मास दोष काय असें विचारल्यावर गुरूनें सांगितलें त्या आज्ञेप्रमाणें तीर्थें करीत हिंडूं लागला. त्यानें केदार, हरिद्वार, ज्योतीर्लिंगें इत्यादि पाहून काम्यक अरण्यांत आला. तेथें एका शिवाच्या स्थानांत शिव नसतां तेथें बसला. अर्जुन ध्यानस्थ आहे तों तेथें शंकर आला, आणि तं येथें माझ्या स्थानांत कां बसला आहेस असें विचारल्यानंतर अर्जुन बोलला कीं तुझें स्थान ह्मणजे कांहीं आंखलेलें नव्हे. यावरून शिवास राग आला आणि उभयतांचें मोठें युद्ध होऊन व अर्जुनाचें आनिवार्य शौर्य पाहून शंकर प्रसन्न झाला. आणि हा अर्जुन आहे असें शंकरास समजल्यावर त्यास त्याणें किरीट व कवच दिलें. मग तेथून फिरत फिरत अर्जुन रामेश्वरीं आला. तेथें सेतु पाहून जवळच मारुती होता त्यास विचारिलें कीं हा सेतु कोणीं बांधिला? मारुतीनें सांगितलें कीं या मार्गानें राम लंकेस गेला त्याणें हा बांधिला. यावरून अर्जुन बोलला कीं बाणानें सेतू बांधणें सोडून राम पराक्रमी असतां समुद्रांत शिळा सेतू कां बांधला? मारुतीनें उत्तर केलें कीं एकेक वानर पर्वता एवढा धिप्पाड त्या सेतुवर जर पडला तर भंगेल. याजवर अर्जुन बोलला की मजसारखा असता तर बाणांचाच बांधिला असता. यावरून हनुमंतास राग येऊन पाहिजे त्या रीतीनें बळकट सेतु बांध व मी तो मोडतो असें अर्जुनास सांगि-

तलें. अर्जुनानें तत्क्षणीं एक योजन सेतु बांधून पाहिजे तितकें बळ खर्च करून तो मोडण्याविषयीं मारुतीस सांगितलें, व प्रतिज्ञा केली कीं जर हा सेतु मोडला तर मी अग्नीकाष्टें भक्षण करीन. हनुमंतानेंही अशी प्रतिज्ञा केली कीं जर मी न मोडला तर मी तुझ्या ध्वजस्तंभावर बसेन. इतकें होतांच अर्जुनानें एक प्रज्वळीत बाण सोडून तो सेतु मजबूत केला. हनुमंतानें गगनांत जाऊन त्या सेतवर अशी एक उडी मारिली कीं तत्काळ त्या सेतूचें चूर्ण झालें. यानंतर प्रतिज्ञेप्रमाणें अर्जुन अग्नींत उडी घालण्याकरितां तयार होत आहे इतक्यांत, ब्राह्मण रूपानें श्रीकृष्ण त्या ठिकाणीं येऊन सहजावृत्या अर्जुनास विचारिलें कीं, बाबा, अग्नीकुंडांत प्रवेश करण्याचें कारण तरी काय? अर्जुनानें झालेलें सर्व वर्तमान सांगितलें. तें ऐकून ब्राह्मण बोलला कीं, कोणताही पण साक्षीशिवाय पुरा होत नाहीं. मजदेखतां जर अशी गोष्ट होईल तर मी ही गोष्ट खरी मानीन. अर्जुनानें पुनः सेतु बांधिला. परंतु त्या खालीं श्रीकृष्णानें आपलें सुदर्शन गुप्त रूपानें स्थापन केलें. नंतर जेव्हां हनुमंतानें उडी मारिली त्या वेळीं सेतवर आदळून तो एकीकडे पडला पण सेतु मोडला नाहीं. अर्जुनानें कृष्ण ओळखिला. कृष्णानें राम रूप दाखवून हनुमंतास सांगितलें कीं रामावतारीं तूं बहुत सेवा करून मला सुख दिलेंस; आतां तूं, मी आणि अर्जुन हे एकत्र मिळून दुष्टांचा संव्हार करूं. हा अर्जुन तुझा आहे. याचें तूं साह्य कर. इतकें बोलून कृष्ण द्वारकेस गेला.

बळीरामाची बहीण सुभद्रा जी प्रथम अर्जुनास देऊं केली होती, परंतु अर्जुन संन्यास घेऊन फार दिवस तीर्थ-

यात्रेस गेला असें पाहून, तो बेत फिरवून ती दुर्योधनास देण्याचा निश्चय बळीरामानें केला. परंतु अर्जुनाकडे कृष्णाचें पूर्ण मन असल्यामुळें हा बेत त्याच्या मनास आला नाहीं. ह्मणून बळीरामानें नंतर असा निश्चय केला कीं अर्जुन जों आला नाहीं तों ही दुर्योधनास द्यावी. कृष्णास असें वाटलें कीं अशा प्रसंगीं अर्जुन येथें येऊन पोंचावा. ही सर्व हरीचीच लीला; त्याप्रमाणें अर्जुन तीर्थें करीत करीत द्वारावतीस आला. असा तापसी शहरांत आल्यासरसें श्रीकृष्णास हेरांनीं बातमी दिली. श्रीकृष्ण ज्या देवळांत तपस्वी उतरला होता तेथें जाऊन त्यास भेटले, आणि एकमेकांस मनांत ओळखून आनंद पावले. श्रीकृष्णानें घरीं येऊन सर्वांस वृत्तांत सांगितल्यावरून बळिरामानें सन्याशाची प्रार्थना करून त्यास आपल्या घरीं बलावून आणिलें. एकदां अर्जुन व कृष्ण एकत्र असतां व सभद्रा महाशक्तीचे यात्रेस जातांना अकस्मात पार्थाची दृष्टि तिजकडे जाऊन त्यानें हास्यवदन केलें; त्यावरून कृष्णानें थट्टेनें अर्जुनास विचारिलें, आपण तापसी असून असें भलतीकडे आपलें चित्त कां गुंततें? अर्जुनानें ह्मटलें कीं दृष्टीचें काम दृष्टि करिते. नंतर कृष्णानें पार्थास सुचना केली कीं यात्रेहून परत येतांना माझ्या रथावर बसून हें दिव्य रत्न ( सुभद्रा ) हरण करावें.

रेवताचळावर सर्व पोहोंचल्यावर देवीचें पूजन झालें व तेथें सर्वांचीं भोजनें झालीं. समय पाहून श्रीकृष्णानें खूण करतांच अर्जुनानें सुभद्रेस आपल्या रथीं बसवून तो रथ इंद्रप्रस्थाकडे त्वरेनें चालविला. मागें हांकाहांक होऊन यादववीर पाठीमागें लढाईस आलेले पाहून अर्जुनानें रथ मागें

फिरविला. त्या वेळीं ध्वजस्तंभीं हनुमंत आहे असा सर्वांनीं पाहिला. यानंतर अर्जुनानें मोठी बाणवृष्टि चालविली व सैन्याची वाताहात केली. हें पाहून बळरामास क्रोध येऊन तो युद्धास सरसावला. व श्रीकृष्णास फार लावून बोलला. परंत त्यानें सांगितलें कीं अर्जुनापेक्षां दुसरा चांगला वर कोण? आतां याशीं युद्ध करितां हा प्रळय करील. बळी-भद्रानें हें ऐकून आपला कोपाग्नी शांत केला. इतक्यांत वसुदेव, देवकी यांनींही येऊन बळिभद्राचें समाधान केलें. त्यावरून बळिभद्रानें सांगितलें कीं सुभद्रा मी पार्थास दिली. आतां पाहिजे त्या रीतीनें यथाविधी लग्न करावें. यानंतर पार्थास मोठ्या सन्मानानें बोलावून आणून त्याचा सुभद्रेशीं मोठ्या समारंभानें विवाह लाविला. उग्रसेनानें भांडारें फोडून याचक सुखी केले आणि अर्जुनास पुष्कळ आंदण देऊन एक वर्ष सुभद्रेसहवर्तमान पुष्करक्षेत्रीं श्रीकृष्णाज्ञेनें ठेविलें. आणि या योगें तीर्थ यात्रेचीं बारा वर्षें तेथें पुरीं झाल्यावर तीं उभयतां धर्मास भेटून त्यास झालेलें सर्व वर्तमान सांगितलें. नंतर अर्जुन सुभद्रेस हातीं धरून द्रौपदीच्या महालांत गेला, तेव्हां तिच्या अंतरीं जरी फार संतोष होता तरी बाह्यात्कारें रुसून विनोदानें बोलली कीं आतां इकडे येण्याचा तमचा कांहींच कार्यार्थ नाहीं. कारण, नूतन वस्त्र सांपडल्यावर जुन्यास कोण विचारितो? नंतर द्रौपदीनें सुभद्रेस क्षेमालिंगन दिलें.

एके दिवशीं नारदऋषि फिरत असतां एक मत्स्य व मात्सिणी रतिसंग करतांना त्याच्या दृष्टीस पडलीं. त्या वेळीं त्यास असें वाटलें कीं या संसार सुखांत व विषयोप-भोगांत जी मजा आहे, ती विणा घेऊन भजन करण्यांत

नाहीं; ह्मणून आपणही स्त्री करून संसार करावा. आप त्यास स्त्री पाहिजे तर ती आपल्या कृष्णाजवळ पुष्कळ आहेत त्यांतून एखादी मिळेल. अशा विचारानें नारद कृष्णाजवळ आला आणि त्यास हें आपलें मन कळवून ह्मटलें कीं, हजारों स्त्रिया देवा तुला आहेत; त्यांतून आपल्या नारदास एक द्या ह्मणजे त्याची संसारेच्छा तृप्त होईल. रुक्मिणी आदिकरून सर्वांनीं त्याचें तारतम्य फारच राखून पूजा केली. परंतु यास आतां वेड लागलें असें त्यांनीं ठरविलें. कृष्णानें नारदास सांगितलें कीं, स्वामीमहाराज, आपलें मागणें मी मोठ्या प्रीतीनें कबूल करतों. परंतु असें करा कीं, ज्या घरीं मी नसेन ती स्त्री आपली. नारदानें विचार पाहिला कीं, हरि जरी लाघवी आहे तथापि इतक्या वायकांच्या घरीं तो कुठें जाणार आहे? कोणतें तरी घर हरिवांचून सांपडेल. अशा विचारानें हातांत विणा घेऊन फिरण्यास निघाला.

नंतर एका स्त्रियेचे घरीं गेला तों तेथें कृष्ण लग्नाच्या खटपटींत आहे; कोठें दानें देत आहे; कोठें भोजन; कोठें मुलांचे व्रतबंध; कोठें गाणें; कोठें नाचणें; कोठें सोहळे; कोठें जप, तप, व्रतें व अनुष्ठानें; कोठें सोंगट्या खेळत असून कोठें निजले आहेत. याप्रमाणें जेथें नारद गेला तेथें त्याचा सन्मान झाला. परंतु मनांतील इच्छा तृप्त होत नाहीं असें पाहून नारदास फारच दुःख झालें; आणि गंगेंत स्नानास गेला. तेथें स्नान करून पाण्याबाहेर निघत आहे तों नारदाची स्त्री आकृति झाली. इतक्यांतच एक देदिप्यमान पुरुष आला. त्यास पाहून नारदी मोहित झाली. पुढें रतिसंग होतांच गरोदर झाली. गृहस्थाश्रम केला व पोटीं

साठ पुत्र झाले. तेव्हां पश्चात्ताप पावून हरि स्मरणानंतर सर्व नष्ट होऊन सर्व अरिष्ट शांततेस पावलें; आणि श्रीकृष्ण दर्शनानें पावन झाला.

---

# अध्याय ३३ वा.

## जरासंध वध, भीम गर्वहरण इत्यादि.

मागील अध्यायीं सुभद्रा हरणाची कथा झाली. त्या पुढील वर्तमान असें झालें कीं, एके वेळीं नारदाची स्वारी सहज फिरत फिरत यमलोकास गेली; तेथें त्याचें आगत-स्वागत यमानें फारच चांगलें केलें. त्या स्थळीं ऋषीस पंडूराजा भेटला. त्याणें त्यास सांगितलें कीं, महाराज, आपण इंद्रप्रस्थास जावें आणि माझ्या पुत्रांस राजसूययज्ञ करण्याविषयीं माझी आज्ञा त्यांस सांगाल तर मजवर आपले फार उपकार होतील. कारण येथें यमधर्म माझा पुष्कळ सन्मान करितो, परंतु दुसऱ्यांना येथें होत असलेली यमपीडा व कुंभपाकादि यातना पाहून जें मला दुःख होतें तें राजसूययज्ञाच्या योगानें जेव्हां इंद्र मला आपल्या शेजारीं जागा देईल तेव्हां टळेल. नारदानें इंद्रप्रस्थास येऊन तें वर्तमान धर्मराजास कळविलें. त्यानें ऋषीचें आदरातिथ्य करून षोडशोपचारें पूजन केलें. नंतर पांचही बंधूंनीं एकत्र बसून विचार केला कीं, पित्राज्ञा वंदन करावी, व त्यास सुख द्यावें, हा पुत्रधर्म; कारण मातापित्यास परलोकीं सुख होण्याबद्दल पुत्रांनीं हीं शास्त्रोक्तकर्मे करावीं, व त्यास मोक्ष प्राप्ती करवावी. असें सर्वानुमत्तें ठरल्यानंतर राजसूययज्ञ करण्याचें ठरविलें. परंतु श्रीकृष्णभगवानाच्या इच्छेखेरीज कोणतेंच कर्म सि-

द्धीस पावणार नाहीं ह्मणून पूर्वी त्यांस बोलवावें अशा विचारानें श्रीकृष्णास एक पत्र लिहिलें. नंतर तें पत्र धर्म-मुद्रांकित करून द्वारकेस दूतांकरवीं पाठविलें.

इकडे बावीस सहस्र राजे जरासंधाच्या बंदींत पडले होते. त्यांणींही कृष्णास आपल्या मुक्ततेविषयीं विनंतीपत्र पाठविलें होतें. व त्या अन्वयें कृष्णानें धर्माकडे जाऊन हा कार्यभाग साधण्याचें ठरविलेंच होतें.

यानंतर मोठें सैन्य सिद्ध करून चौघां बंधूस समागमें देऊन धर्मानें त्यांस चार दिशेस रवाना केले. पूर्वेस भीमास पाठविलें; त्याणें त्या दिशेकडील राजे जिंकून अपार द्रव्य आणिलें. उत्तरेस अर्जुन गेला; त्याणें तेथील राज्यांकडून करभार आणिला. दक्षिणेस सहदेवास पाठविलें; त्याणें-ही तेथील करभार आणिला. पश्चिमेस नकुळ गेला; त्याणें सकळ राजे जिंकून पुढें द्वारकेस जाऊन श्रीकृष्णास पत्र नगराबाहेरून पाठाविलें. कृष्णानें तें पहातांच शिर-सावंद्य करून, नकुळास बाहेर येऊन सर्वांस भेटून अपार द्रव्य दिलें; व त्यास धर्माकडे रवाना केलें. व मीही लव-करच येतों ह्मणून निरोप पाठविला. नकुळ येऊन धर्म-राजास तें वर्तमान सांगत आहे तों भगवानही येऊन दाखल झाले. इंद्रप्रस्थास कृष्ण आल्यावर त्याची पूजा करून त्यास धर्मराजानें सर्व वर्तमान कळवून सांगितलें कीं, नव खंडांतील सर्व राजे जिंकून इतकें द्रव्य आणिलें आहे कीं सहस्र वर्षें नित्यशः सहस्रावधि हत्ती भरून नेलें तथापि तें संपणार नाहीं. परंतु कृष्ण बोलला कीं, जर जरासंधास जिंकून त्याच्या बंदींत असलेले राजे जर मुक्त केले नाहींत तर मग सर्व जिंकून उपयोग काय? या प्रमाणें

विचार झाल्यानंतर पार्थ व भीम यांस समागमें घेऊन श्रीकृष्ण मागधपुरास जावयास निघाला.

ज्या वेळीं त्रिवर्ग मागधपुराजवळ आले, त्यावेळीं सर्वांनीं ब्राह्मण वेष घेऊन ग्रामदुर्ग सोडून मधूनच शहरांत शिरले. पुढें मोटमोठे नगारे भेरी लागल्या होत्या त्या भीमानें फोडून टाकिल्या व राजद्वारीं यज्ञशाळेंत जाऊन ते बसले. जरासंध त्या वेळीं काकबळी टाकण्यासाटीं बाहेर आला. आणि त्यांस पाहून त्यानें नमन केलें. परंतु ते कोण व कोठून आले किंवा काय पाहिजे तें जेव्हां कांहींच बोलेनात, तेव्हां जरासंधानें प्रार्थना केली कीं, महाराज तुह्मीं जर कांहींच बोलला नाहीं तर म्यां तरी काय जाणावें? तर कृपा करून आपली इच्छा काय आहे तें सांगितल्यास मी तें शक्तिनुसार अनुकूल असेल तें पुरवीन. कृष्णानें उत्तर दिलें कीं, आह्मां तिघांतून एका समागमें तूं युद्ध करावेंस हीच युद्धभिक्षा तुजजवळ मागणें आहे. जरासंधानें प्रथम न्याहाळून पाहून त्यास हे ब्राह्मण नव्हत असें जाणून ह्मटलें कीं, मी तुह्मांस तुमचें इच्छित दिलें. आतां तुह्मीं कोण आहां तें मला सांगावें. असें बोलतांच तिघांनींही आपलीं रूपें प्रकट केलीं. तीं पाहून जरासंधानें ह्मटलें कीं, कृष्ण तर कपटी व गवळी, तो युद्ध करण्याच्या उपयोगी नाहीं. दुसरा अर्जुन, तो पातळांगी; मजबरोबर टिकणार नाहीं. राहिला तिसरा तो मात्र मजबरोबर कांहीं वेळ लढेल असा वीर दिसतो. त्याशीं मी युद्ध करीन.

यानंतर भीम व जरासंध हे समरांगणांत येऊन प्रळयी मल्लयुद्धांस मिसळले. अर्जुन व श्रीकृष्ण जवळ उभे राहिले. एकमेकांस नानाप्रकारें डाव करून पृथ्वी तलावर पाडीत

व मूर्छित करीत. व वर्म पाहून एकमेकांस हाणीत. या युद्धांगणीं तर कोणाची उभें राहण्याची शक्तीच नव्हती. सर्व भूगोलावर थरथराट होऊन दणदणाट झाला. असें श्रीकृष्णानें पाहून हातांत दोन गवताच्या काड्या घेऊन भीमास संकेत दाखविला कीं, या जरासंधास पिंजून टांक. त्याप्रमाणें भीमानें दोन चार वेळां केलें. परंतु पुनः तो एकत्र होऊन भीमाशीं युद्धास येई. असें पाहून पुनः श्रीकृष्णानें दोहों हातांत दोन काड्या घेऊन उजवी डावीकडे आणि डावी उजवीकडे अशा रीतीनें जरासंधास द्विधा करून टाकण्यास दर्शविलें. त्याप्रमाणें भीमानें करतांच जरासंध गतप्राण झाला. नंतर सर्व बंदींतील राजे सोडवून तेथील सर्व भांडारांतील द्रव्य इंद्रप्रस्थास पाठवून सहदेवनामें जरासंधाचे पुत्रास राज्यावर स्थापन केला. व मागाहून आपण सर्व निघून आले. तदनंतर श्रीकृष्ण द्वारकेस गेला.

धर्मराजानें राजसूययज्ञ कोणत्या रीतीनें करावयाचा तो निश्चय करून सर्व नृपतींस बोलावण्या करितां पत्रें तयार केलीं. हस्तनापुरास द्रोणाचार्य, भीष्माचार्य, धृतराष्ट्र, कृपाचार्य, आदिकरून महान वीरश्रेष्ठ व प्रतापसूर्य, तसेच दुर्योधनादि सर्व बंधु, त्याचप्रमाणे विदुर इत्यादि महा ज्ञानी यांसही पत्रें तयार केलीं. प्रथमारंभीं द्वारकेस पाठविण्यासाठीं श्रीकृष्णास पत्रिका लिहिली. ती पत्रिका घेऊन सेवक जात आहेत तों त्या पूर्वीच श्रीकृष्ण परमात्मा नगराजवळ येऊन पोंचले. हें धर्मास कळल्यानंतर बंधुंसमवेत ससैन्य धर्मराजा कृष्णास सामोरा जाऊन त्यास व त्या समागमें छपन्न कोटी यादव, तितक्याच बायका व मुलें, त्याचप्रमाणें कृष्णाचे साठ हजार मुलगे, कन्या व

सुना इत्यादि जो समुदाय आला होता, त्या सर्वांस बहुमानानें आपल्या नगरींत आणून त्यांचा धर्मराजानें मोठाच सत्कार केला. पुढें धर्मराज आणि कृष्ण परस्परें भेटले. त्या वेळीं कृष्णानें थट्टेनें ह्मटलें कीं आज तूं दीक्षित, आज आह्मी तुझी अवश्य पूजा करावी. असें ह्मणून बंधुसहवर्तमान धर्मराजाची यथासांग पूजा केली. आणि द्वारकेंतून जे चवदा हजार हत्ती, द्रव्य व अलंकारानें भरून आणिले होते ते त्यास अर्पण केले. जरासंधाच्या बंदींतून मुक्त केलेले जे बावीस हजार राजे त्यांणींही धर्मराजास करभार अर्पण केला. हा सर्व चमत्कार स्वर्गाहून देव विमानारूढ होऊन पहात होते. कुबेरानें या समयीं बहुत धन धर्मास पाठविलें. इतकें झाल्यानंतर धर्मानें अठ्याऐशीं सहस्र ऋषींची पूजा केली. लंकाधीश बीभीषण आणि हस्तनापुराहून कौरव हेही सर्व तेथें आले होते. या सर्व मंडळीस नाना रत्नजडित शीबीरें उभारून त्यांची मोठी बरदास्त ठेविली होती. कृष्ण व भीष्म एकासनीं बसवून भीमानें त्यांच्या चरणीं मस्तक ठेवून विनंती केली कीं या कार्यास सामुग्री मनासारखी आहे, परंत कोणास कोणतें कार्य सोंपावें याविषयींचा विचार आह्मी लेंकरें ह्मणून आपणच सांगावा. कृष्ण बोलला कीं मी गुरेंराख्या; आमचा धर्म दुसऱ्याची सेवा करावयाची; त्याप्रमाणें पहातां ऋषीस इच्छिलेले पदार्थ पुरवून सर्वांचीं उष्टीं काढण्याचें काम मी पतकरितों. आणखीं ऋषींची बरदास्त अश्वत्थाम्यानें ठेवावी; द्रव्य विदुरानें पुरवावें: राजांची पूजा संजयानें करावी; राजांचीं अपार सैन्यें यांची भोजनाची व इतर बरदास्त दुःशासनानें ठेवावी; दक्षणा देण्याचें काम द्रोणाचार्यांनीं करावें; व सर्व राजे अलंकार,

धन व रत्नें जीं आणतील तीं पाहून भांडारांत ठेवणें हें काम दुर्योधनानें करावें. अर्जुनानें या यज्ञास जीं विघ्नें येतील ती दूर करावीं; ब्राह्मणांची भोजन समयीं प्रार्थना भीमानें करावी; गंध, फुलें, अक्षता व धूपदीपादि परिमळ द्रव्यें नकुळानें पुरवावीं. तूप, दूध, दहीं इत्यादि भीष्मानें पुरवावें; पंक्तीत द्रौपदीनें वाढावें; सुगंध जल पांडव पुत्रांनीं पुरवावे; विडे धृष्टद्युम्नानें द्यावे; आणि धर्मराजानें अगस्ती, व्यास, नारद, आणि याज्ञवल्की यांस मुख्य नेमून सकल ऋषी समुदायांच्या साह्यानें यज्ञकर्म करावें. याप्रमाणें धर्मराजानें ही आज्ञा शिरसावंद्य करून कृष्णाज्ञेनें ऋषी मंडळीसहवर्तमान यज्ञशाळेंत हवन करण्यास बसला. एक संवत्सर पर्यंत हा यज्ञ चालला होता. तणेंकरून अग्नीनारायण तृप्त झाला. ह्या यज्ञांत एकही पदार्थ न्यून न पडतां सर्वांचें इच्छित हेतु पूर्ण होत होते. घृत धारांचा तर यज्ञकुंडात पर्जन्यच पडत होता. सर्व देवांनीं पुष्प वृष्टि केली. लहान मोठे राजांस भोजनाकरितां रत्नाचीं ताटें त्या यज्ञ समारंभांत होतीं. ब्राह्मण जेवीत असतां भीमानें अति आग्रह करून अन्न वाढावें; आणि अन्न टाकल्यास माझा स्वभाव तुह्मांस ठाऊकच आहे असें बोलावें. अशा धाकानें षड्रस अन्न ब्राह्मण नित्यशः भक्षण करीत असतांही कृश्य होत कां चालले, हें कृष्णानें जाणून एक दिवशीं भीमास बोलावून सांगितलें कीं, एक महान तपस्वी पानऋषि या नांवाचा गंधमादन पर्वतावर रहात असतो, त्यास येथें आणण्याचें फार अगत्य आहे. त्यास आणण्या करितां जर दुसरे कोणाची योजना करावी तर तें काम त्यास होणार नाहीं; ह्मणून तूंच जाऊन त्यास घेऊन ये. भीमाच्या मनांत असें

आलें कीं, आशा बिकट स्थळीं जाण्यास काय तो मीच पराक्रमी आणि ह्मणूनच तें काम श्रीकृष्णानें मजकडे सोंपविलें अशा अभिमानानें भीमसेन निघाला. तो जात असतां एका मोठ्या पर्वताच्या मध्यभागीं वाटेंतच एका वृद्धाचा वेश धरून आपलें शेंपूट आडवें टाकून भीमसेनाचा मार्ग रोधून मारुती बसला होता. इतक्यांत त्या वाटेनें येतांना भीमानें तें शेंपूट पाहून त्या वृद्ध कपीस ह्मटलें कीं, अरे माकडा, मला मोठ्या कार्याकरितां गंधमादन पर्वतीं जाणें आहे. तर तें आपलें शेंपूट काढून मला मार्ग दे. मारुतीनें ह्मटलें कीं बाबा, मी आतां वृद्ध झालों यासाठीं माझ्यानें तें उचलवत नाहीं, तर कृपाकरून तूंच एवढें कार्य करशील, तर मजवर फार उपकार होतील. तूं भीमसेन मोठा बलसागर आहेस असें ऐकण्यांत आहे.

भीमसेनास हें वचन मानून त्याणें तें पुच्छ उचलून एकीकडे ठेवण्याविषयीं नाना यत्न करून शेवटीं नव सहस्त्र नागांचें बळही खर्च केलें परंतु तें जड शेंपूट त्यास उचलेना. असें पाहून, मारुती गदगदां हंसून बोलला कीं, भीमसेना, तुला बळाचा गर्व झाला हें नीट नाहीं. तं जगदात्मा जो श्रीकृष्ण त्यास निरहंकार शरण जा. तेव्हां भीम गर्वरहित होऊन हनुमंताची आज्ञा घेऊन, गंधमादन पर्वतावर गेला. तेथें पाहतो तों तो ऋषी दुर्गंधीनें व्याप्त आणि कांती सुवर्णाची असा त्या पर्वतावर आहे. त्यास दूर उभें राहून भीमानें कृष्णाचा निरोप सांगितला. त्याणें सांगितलें कीं, भीमसेना, कृष्णाचा निरोप मला मान्य आहे, व मीं यावें खरें; परंतु हें डुकरासारखें तोंड व दुर्गंधी व्याप्त मी तेथें यावें हें मला वाईट दिसतें. भीमानें विचारिलें,

महाराज, आपली ही अशी अवस्था होण्याचें कारण काय? त्या ऋषीनें ह्मटलें कीं मी महान सधन असतां आपल्या हयातींत मोठीं दानें व धर्म केला; परंतु ब्राह्मणांस कठोर वचनें फारच बोललों त्या योगें माझी ही दशा झाली. भीमसेना, या यज्ञ समारंभांत जर तुझ्या स्वाधीन ब्राह्मण परामर्ष घेण्याचा कारभार असेल तर ब्राह्मण सेवेंत किमपिही तूं न्यून न पडूं देतां त्यांस कठोर भाषणांनीं ताडण करूं नको.

भीमसेनास मोठा पश्चात्ताप होऊन खालच्या मानेनें हें सर्व कृत्य जाणून कृष्णाजवळ आला. कृष्णानें त्यास कांहींच विचारिलें नाहीं निरोप मात्र ऐकून घेतला. दुसरे दिवशीं ज्या वेळीं भीम ब्राह्मणांची प्रार्थना करूं लागला, त्या वेळीं त्याचा नम्रपणा पाहून ब्राह्मणांनींच त्यास ह्मटलें कीं, महाराज, आज आपली बुद्धि अशी प्रसन्न कां बरें झाली.

त्या राजसूययज्ञांत धर्माचें ऐश्वर्य पाहून दुर्योधनास फारच वाईट वाटून हें कृष्णकृपेनें सर्व होतें अशी त्याची खात्री झाली. एके वेळीं हा संताप त्यास दुःसह होऊन कृष्णास त्या वेळीं विचारिलें कीं, कृष्णा, तूं परब्रह्मरूपी देव आणि निःपक्षपाती ह्मणवितोस, मग मी आणि धर्म या उभयतांमध्यें कपट भाव ठेवून एकाचेंच साह्य कां करितोस? कृष्णानें उत्तर केलें कीं, दुर्योधना, मी सर्वांस समान आहे. सर्वांची मात्र समान दृष्टि मजवर पाहिजे. याबद्दल प्रचिती पहाणें असल्यास तुला कळेल. परंतु पूर्वीं दोघेही मिळून माझा एक कार्यभाग करा, असें ह्मणून दोघांसही एक महा योग्य ब्राह्मण दान देण्यासाठीं निवडून काढण्यास सांगितलें. दोघेही सर्व ऋषी पाहून परत आले.

दुर्योधनानें हात जोडून विनंती केली कीं, कृष्णा, दान देण्यासारखा एकही ब्राह्मण मला या मंडळींत दिसत नाहीं. सर्व मूढ असे दिसतात. मागाहून धर्मराजानें येऊन विनंती केली कीं, देवा, एकही ब्राह्मण मला वाईट न दिसतां सर्वच सुज्ञ दिसतात. हें धर्मांचें भाषण कृष्णानें दुर्योधनास सांगितल्यावरून दुर्योधन खालीं मान घालून उभा राहिला.

त्याच वेळीं अशी एक चमत्कारिक गोष्ट घडली कीं, जान्हवी तीरीं कोणी एक तपस्वी अरण्यांत गुंफा तयार करून स्त्रीसह तेथें राहून तप करीत होता. त्या पुण्यामुळें नित्य कैलासाहून त्यास विमान येई व तो तेथें स्त्रीसह जाऊन परत गुंफेंत येत असे. एके दिवशीं कैलासाहून येत असतां एक सुंदर वन पाहून माध्यान्ह समयीं स्त्रीस भोग देण्याची त्यास इच्छा झाली. स्त्रियेनें कितीही प्रतिबंध केला, तथापि तिचें कांहीं न ऐकतां त्या वनांत येऊन त्यानें आपली मनकामना पूर्ण करून घेतली. इतक्यांत एका सर्पानें दंश करून त्या ऋषीचा प्राण घेतला. त्या दुःखानें ती रडत असतां अकस्मात तेथें नारद ऋषी आले. त्या जवळ तें दुःख सांगतां त्यांनीं तें प्रेत व ती स्त्री समागमें घेऊन इंद्रप्रस्थास उतरून तिजकडून तें प्रेत धर्मराजाचे मंडपांत टाकविलें आणि आपण निघून गेले. ब्राह्मणस्त्रीनें तें प्रेत टाकून दुःखानें हांक मारिली कीं मोठमोठे समर्थ ऋषि या स्थानीं आहेत: तर सर्वांनीं कृपाकरून माझ्या पतीचें प्रेत उठविलें पाहिजे. असें पाहून सर्व चिंताग्रस्त झाले. शेवटीं धर्मराजानें दीन वदन करून कृष्णास विनंती केली कीं या यज्ञाचा कर्ता हा अधिकार मजकडे बिलकूल नाहीं. हा सर्व विचार आपल्यास आहे ह्मणून

आपण पाहिजे तसें करून हें प्रेत सजीव करावें. कौरवादि सर्व दुर्जन त्या स्थळीं बसले होते. त्यांस यज्ञांत विघ्न झालेलें पाहून परमानंद होऊन आपापसांत ह्मणूं लागले कीं, मेलेल्या मनुष्यास प्राण येणें हें कोणाच्या हातीं नाहीं; ह्मणून या कार्यांत हें मोठेंच विघ्न आलें आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं. याचें निवारण आतां कसें होतें तें पाहूं या! असें ह्मणून एकमेकांच्या हातावर हात देऊन टाळ्या मारीत आहेत, तों श्रीकृष्ण आपल्या हातांत पाण्याची झारी घेऊन त्या प्रेताजवळ आले. आणि हातांत उदक घेऊन ह्मणाले कीं, जर मी जन्मापासून बाळब्रह्मचारी असेन तर हें प्रेत आतां उठेल. 'बाळब्रह्मचारी' असें ह्मणतांच सर्व कौरव बोलूं लागले कीं, गोकुळांतील गवळ्यांच्या बायका याणें सोडल्या नाहींत. त्याशिवाय याला सोळा हजार बायका आहेतच. तेव्हां हा कोणत्या रीतीचा ब्रह्मचारी. याच्या पुण्याचें पाणी प्रेताच्या तोंडांत जाऊन त्या प्रेतानें उठावें तरी कसें असें एकमेकांजवळ ते कुजबुजत आहेत, तों अकस्मात तें प्रेत खडबडून उठलें. तें पहातांच देव, ऋषि, आणि सर्व राजे व इतर जन या सर्वांस अत्यानंद होऊन त्यांणीं एकच जयजयकार केला.

यानंतर धर्मानें श्रीकृष्ण आज्ञेवरून त्या विप्रास पुष्कळ धन देऊन स्त्रीसह विमानांत बसवून स्वस्थानीं पाठविलें. इतक्यांत त्या यज्ञकुंडांतून एक कोल्हा बाहेर पडून कुंडबंदिकेवर बसून असें मनुष्य वाणीनें बोलला कीं, या सभेंत एकाचा शिरच्छेद होईल. व पुढें कौरव पांडवांत इतका विरोध माजेल कीं येथें जितके राजे जमले आहेत, त्या सर्वांचा नाश होईल. इतकें बोलून तो अदृश्य झाला.

# अध्याय ३४ वा.

## द्रौपदी लज्जा रक्षण व शुक भेट.

मागील अध्यायांत जंबुकानें भाकीत केल्याचा कथा भाग झाला. पुढें कथा अशी झाली कीं, या यज्ञांत नित्य ऋषि, ब्राह्मण, राजे ईत्यादि सर्वांस मिष्टान्न मिळे तें अन्न इतकें रुचकर असे कीं, तो स्वाद इंद्रादि देवांस दुर्लभ. अशा मोठ्या पंक्तींत द्रौपदी एकटी वाढणारी होती व ती सर्वांस अन्न पूरवीत असे. तो चमत्कार धर्मराज व श्रीकृष्ण हे उभयतां पहात असत. द्रौपदी ज्या वेळेस पंक्तींत भोजन वाढून श्रमित होई त्या वेळीं कृष्णाचें रूप मात्र पाहिलें ह्मणजे तिचा सर्व श्रम परिहार होई.

एके वेळीं ती कौरव पंक्तींत वाढीत असतां, अकस्मात तिच्या चोळीचें बिरडें सुटलें; त्या वेळीं सर्व कौरव आपसांत हसून थट्टा करूं लागले आणि ह्मणूं लागले कीं, आतां ही फजिती कोणत्या रीतीनें सांवरेल ती पाहूं. इतक्यांत कित्येक थट्टेनें ह्मणाले, वहिनी, आह्मांस जिलबी वाढा. कित्येक ह्मणाले लाडू आणा. अशीं नानाप्रकारचीं थट्टासूचक भाषणें ऐकून द्रौपदीच्या आंगावर तर दुःखाचे शहारे उभे राहिले. अशा संकट समयांत तिणें श्रीकृष्ण मुख पाहिलें आणि ह्मणाली कीं, भगवंता, या समयीं जर तुझी सत्ता अमलांत न येतां अपेशाची यत्ता झाली मग काय इलाज ? असें ह्मणतांच श्रीकृष्ण कृपेनें असा चमत्कार झाला कीं, अकस्मात द्रौपदीला चार हात झाले. त्या दोहों हातांनीं चोळीचें बिरडें घालून दोहातांनीं वाढूं लागली.

ज्याप्रमाणें शुंभ निशुंभास मारून भवानी विजयी

झाली, त्याप्रमाणें द्रौपदीला आनंद होऊन इच्छिलेला पदार्थ तिणें सर्वांस आग्रहानें वाढिला. भीमास तर त्या वेळीं असा क्रोध आला कीं, तो उघडपणे कौरवांस बोलला, अरे, जर तुह्मी एक पदार्थ पानावर टाकाल. तर तुमच्या शेंड्या उपटून टाकीन. कौरव भयानें खालीं पाहूं लागले. भीमानें कौरवांस असेंही सांगितलें कीं, ही भवानी तुमचा कुलक्षय करणार आहे. द्रौपदी आंत आल्यावर तिणें कृष्णचरणीं मिठी घातली व धर्मानें श्रीकृष्णाची फार स्तुति केली. याप्रमाणें एक संत्वसरपर्यंत नित्य किती पात्रें झालीं याची गणती करवत नाहीं. नित्य रात्री सर्वांचीं जेवणें झाल्यावर श्रीकृष्ण, कुंती, पांच पांडव, व द्रौपदी अशी आठ जणें जेवीत. नित्य ब्राह्मणांचीं उष्टीं कृष्ण काढीत असे. एके पंक्तीस लक्ष ब्राह्मण अशा अमित पंक्ती नित्य बसन अशी कोट संख्या झाली ह्मणजे एक घंटेचा नाद स्वर्गीं व्हावा. हा चमत्कार पहाण्यासाठीं शुक्र ऋषि तेथें आला. त्यानें मनांत असें आणिलें कीं, धर्माचें यज्ञांतील उच्चिष्ट अन्न आपण एक वेळां तरी सेवन करावें. परंतु मंडपांत येण्यास कोठूनच रिघाव होईना तेव्हां, शुकाचें रूप धरून तो एका उष्ट्या पत्रावळीवर बसला; त्या वेळीं स्वर्गीं घंटेचा एकसारखा नाद होऊं लागला. त्या वेळीं धर्मानें कृष्णास असें होण्याचें कारण विचारितां त्यांणीं सांगितलें कीं, धर्मराजा, कोणी तरी महान ब्रह्मवेत्ता येथें येऊन जेवला; त्यामुळें असें होतें. शंभर सामान्य ब्राह्मणांपेक्षां एक वेदवेत्ता श्रेष्ट; शंभर वेदवेत्यांपेक्षां एक वेदार्थ वेत्ता; त्याहून अनुष्ठानी श्रेष्ट; त्याहून इंद्रीयजीत; त्यापेक्षां सत्यार्थी श्रेष्ट; व त्यापेक्षां शतपटीनें ब्रह्मवेत्ता श्रेष्ट

होय. असे ब्रह्मवेत्ते या पृथ्वीवर चार आहेत. कपिल, याज्ञवल्की, शुक, व चौथा दत्तात्रय. धर्मानें मोठा आग्रह धरिला कीं असा जो ब्रह्मवेत्ता या मंडपीं जेवला तो मला दाखवावा. कृष्णानें धर्मास बाहेर आणून दाखविलें तों शुकाच्या रूपें व्याससुत उच्छिष्ट भक्षण करीत आहेत. तें दाखवितांच धर्मानें लागलेच त्याचे चरण धरिले. मग शुकानें कृष्णास पाहून रूप पालटून धर्मास आलिंगन दिलें. कृष्णानें त्यास हातांत धरून व्यासाजवळ यज्ञ मंडपांत बसवून षोडषोपचारें त्याचें धर्माकडून पूजन करविलें. याप्रमाणें एक संवत्सर होऊन यागाची समाप्ति झाली. यानंतर मयासुरानें जी अवर्णनीय सभा केली होती ती धर्माज्ञेनें सर्वांस दाखविली.

---

## अध्याय ३५ वा.

### शिशुपाळ व वक्रदंत वध.

पुढें कथा अशी झाली कीं श्रीकृष्णास अग्रपूजा समर्पण केल्याचा विधी पाहून दुर्जन कौरवांस तर राग आला, परंतु शिशुपाळास फारच संताप येऊन तो उठला व बोलला कीं, मूर्खा धर्मराजा, तुला कांहींच ज्ञान नाहीं. त्वां भलत्यास भलतेंच दान द्यावें तद्वत केलेंस. हा चोर, जार, लबाड तसाच कपटी, विश्वासघातकी, अहंकारी व अविचारी असें असूनहीं जातीचा गवळी, असें असतां तूं मोठमोठे शिष्ट सोडून, या चोरास पूजादान प्रथम केलेंस असा दोष दिला. आतां तुमचीं पांडवांचीं शिरें मी छेदितों. त्यासमयीं कौरवांतीलच कित्येक सुज्ञ पुढें येऊन बोलले कीं, कोणाची पूजा कोणी केली ह्याचा राग आह्मांस आला

नाहीं मग तुलाच कां यावा? यावर शिशुपाळानें फारच कोपयुक्त होऊन निरर्थक सर्वांची निर्भत्सना केली, व द्रोण, भीष्म, कर्ण इत्यादिकांसही ह्मणाला कीं, तुह्मी संमत असतां या मूर्खांनीं हा अनर्थ केला ही तुह्मांस लाज कशी वाटत नाहीं? भीष्म बोलला कीं, अरे राजा, तूं व्यर्थ वल्गना कां करितोस? स्वस्थ रहा. या कृष्णाची बरोबरी करणारा या ब्रह्मांडांत दुसरा कोणी नाहीं. अग्रपूजेस सत्पात्र तरी कोण हें येथें सर्व ऋषी, राजे इत्यादि तुज पुढें बसले आहेत त्यांस तरी विचार? शिशुपाळ बोलला कीं, अरे वृद्धा षंढा, अरे हे सगळे षंढच आहेत ह्मणून यांस अग्रपूजा घेण्याचा अभिमान नाहीं. हें अभिमानाचें काम आहे. भीष्म बोलला कीं, तूं मूर्खासारखा बोलतोस कारण, तुझा नाशसमय जवळ आला आहे. शिशुपाळानें गर्जून सांगितलें कीं, अरे कौरवांनो, सर्व उठा आणि या ह्मातार्‍यास जीवंत तळून काढा. भीष्मानें उत्तर केलें कीं असें जर केलेंस तरच तूं खरा वीर, नाहींपेक्षां तूं महायातना पितरांसह भोगशील.

नंतर भीष्मानें शिशुपाळाचें जन्मकथन सांगितलें, तें असें कीं, हा ज्या वेळीं जन्मला त्या वेळीं यास चार हात व तीन डोळे ह्मणजे कपाळावर तिसरा डोळा होता. त्या वेळीं मातेस फारच काळजी लागली. तिणें त्याचें जातक पहातां जोतिषानें तिला असें सांगितलें कीं, हा कुलक्षयी पोर तूं सर्वांस दाखवित जा. आणि ज्याच्या दृष्टीनें याच्या दोन भूजा व एक डोळा गळेल, त्याच्याच हातानें यास मृत्यु. दुसर्‍यांकडून याला अगदीं मरण नाहीं. याप्रमाणें ती सर्वांस दाखवित असतां ज्या वेळीं श्रीकृष्णदर्शन

झालें, त्या वेळीं दोन हात व एक डोळा गळाला. त्याच वेळीं मातोश्रीनें कृष्णास नमन करून विनंती केली, तूं याचें रक्षण करावें. हें तुमचें लेंकरूं आहे. कृष्णानें तें कबूल केलें. पण अशी अट केली कीं, शंभर शिव्या मला हा देईल तोंपर्यंत यास त्याच्या अन्यायाची मी क्षमा करीन; नंतर मारीन. ही कथा भीष्मानें सर्वांस सांगून म्हटलें कीं, हाच दुराचारी मागील अवतारीं रावण होऊन जनक सभेंत सीता हरण करावयास आला होता. आतां याचा मरण काळ भरत आला आहे.

हें ऐकून शिशुपाळास राग येऊन तो भलतें सलतें बरळूं लागला. सहदेव बोलला कीं आह्मी श्रीकृष्णास अग्रपूजा दिली. व येथें जो कोणी आड येईल त्याचा संव्हार केला जाईल. हें ऐकतांच शिशुपाळास अधिकच राग येऊन कृष्णास बोलला कीं, अरे चोरा, रुक्मिणी अगोदर मला देऊं केली होती व तिला मी मनांतच भोगिली; आणि तूं आतां माझें उच्छिष्ट भोगतोस. त्याच प्रमाणें तुझ्या अनेक उखाळ्या पाखाळ्या आहेत त्या मी काढीत नाहीं. जर तूं मूर्खा गडबड करशील, तर येथें तुझा वध करीन. मी धर्मास करभार उगीच भिक्षे दाखल दिला. हें ऐकतांच कृष्णास कोप आला व शंभर शिव्या होतांच सुदर्शनानें त्याचा शिरच्छेद केला. नंतर श्रीकृष्ण सहपरिवार द्वारकेस गेले. येथून वक्रदंत जो पळाला त्याणें शिव विमानारूढ होऊन पौंड्रकासहससैन्यानें द्वारकापट्टण घेरलें. इतक्यांत श्रीकृष्णही तेथें आले. त्यांणीं लागलेंच सुदर्शनानें वक्रदंताचा त्या ठिकाणीं वध केला. व पौंड्रकाचाही सैन्यासह नाश केला. इतकें झाल्यानंतर कृष्णानें ह्मटलें कीं आतां आपलें बहुतेक

अवतार कृत्य समाप्त झालें. आतां पुढें पार्थाच्या रथीं सारथ्य करून सर्व दुष्ट संव्हार करीन.

---

# अध्याय ३६ वा.

## गृहणयात्रा, गोकुळजन भेट व ग्रंथ समाप्ति.

मागील अध्यायांत शिशुपाळ व वक्रंदत वध झाल्याची कथा झाली. त्या पुढें असा कथाभाग आहे कीं, श्रीकृष्णानें आपलें अवतार कृत्य संपविल्यावर गोकुळवासी जनावर कृपा करून असें मनांत आणिलें कीं, गोकुळांतील सर्व गोपी आपल्या विरहांत असतील; व गोपांस फारच वाईट वाटलें असेल; कां कीं, गोकुळाहून मी येऊन बरेच दिवस झाले असून येथील वर्तमान तेथें अगदीच कळलें नाहीं. आणि मी मथुरेस येतेवेळीं गोपींनीं फारच अनर्थ केला होता. ह्या सर्व गोष्टी मनांत आणून गोकुळवासी जनास मथुरेंतील सर्व वर्तमान कळविण्यासाठीं श्रीकृष्णानें बळिरामास पाठविलें. त्यानें तेथें जाऊन सर्वांचें समाधान केलें. अंग, केशी, प्रलंब इत्यादि दैत्य कसे मारिले तें वृत्त त्यांना सांगितलें. नंतर अष्ट नायका कृष्णानें कशा मिळविल्या, त्या लग्नाचें वृत्त आणि राजसूययज्ञाचा थाट सांगितला. व मयसभेचें वर्णन केलें. शिशुपाळ वध झाल्याचें वृत्त, तसेंच वक्रंदताचें शीर उडविण्याचाही मजकूर निवेदन केला. हें वर्तमान ऐकतांच गोपींस व गोपांस इतका संतोष झाला कीं, त्या सर्वांची वृत्तीच कृष्णस्वरूपीं तल्लीन झाली. व श्रीकृष्ण केव्हां भेटेल याविषयींचा सर्वांस मोठा ध्यास लागला.

कित्येक गवळी समागमें घेऊन कुंजवनास श्रीकृष्णाच्या क्रीडास्थानीं बळीराम गेले, व तेथील बहुत स्थानें विलोकिलीं. त्या वेळीं माध्यान्हीं सूर्य आला असून यमुनेंत कांहीं वेळ जलक्रीडा करण्याचें बळरामाच्या मनांत आल्यावरून यमुना दूर वहात होती तिला जवळ येण्याची विनंती केली. परंतु, यमुना आली नाहीं असें पाहून बळरामास राग येऊन त्याणें आपल्या नागर मुसळांनीं तिला बळजोरीनें आपल्याजवळ ओढिली व प्रवाह जवळ आणून यथेच्छ जलक्रीडा केली व परत गोकुळास आले. नंतर चार महिने तेथें मोठ्या उत्साहानें राहिल्यावर पुढें द्वारकेस जाऊन श्रीकृष्णास गोकुळांतील सर्व वर्तमान निवेदन केलें. पुढें सूर्यग्रहणपर्व आलें. त्यासमयीं ग्रहणयात्रेस कुरुक्षेत्रीं जाण्याचा कृष्णानें निश्चय केला. आणि छपन्न कोटि यादवांनिशीं वसुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध, अक्रूर, उद्धव, सांब, भानुवंत, उग्रसेन हेही बरोबर घेतले. देवकी, रोहिणी, रेवती व रुक्मिणी, सत्यभामा, कालिंदी इत्यादि अष्ट नायका व सोळा सहस्र बायका याही समागमें निघण्यास तयार झाल्या. कोट्यावधि वहनें त्यांत हत्ती, घोडे, उंट, रथ तयार केले; व स्वारीचा थाट तयार झाला. पुढें पायदळ, मागें घोडेस्वार, त्या मागें हत्ती घोडे, त्या मागें पालख्या, त्या मागें रथ वगैरे वहनें अशा थाटानें बहुत नृपांसहवर्तमान निघाले. ज्याप्रमाणें ओळीनें पर्वत असतात त्याप्रमाणें ती अफाट सेना चालली. ही सर्व मंडळी कुरुक्षेत्रीं पोंचत आहे तों तेथें शिबिरें सर्वांस निरनिराळीं केलींच होतीं. त्या प्रमाणें सर्व उतरले व गंगातीर पाहून तिकडे कृष्णासमागमें जे राजे आले होते त्याणींही आपली छावणी दिली.

त्या ठिकाणीं पांडव भीष्माचार्य, कृपाचार्य, द्रोणाचार्य, विदुर, कर्ण इत्यादि श्रीहरीच्या दर्शनार्थ येऊन मोठ्या प्रीतीनें त्यास भेटले. इंद्रादि देवही तेथें आले होते. कृष्णानें पूर्वीच दूत गोकुळास पाठविले होते. त्याप्रमाणें नंद यशोदा गोपगोपी व कृष्णाचे प्राणप्रिय सखे गवळी यांनीं तर बरोबर टाळ मृदंग विणे इत्यादि सरंजामानिशीं हरिलीला गात गात श्रीकृष्ण दर्शनास येऊन लोटांगणें घातलीं. ज्या वेळीं गोकुळची सर्व मंडळी आल्याचें वर्तमान कृष्णास कळलें, त्यावेळीं कृष्णानें रुक्मिणी इत्यादिकांस कळविलें कीं माझीं दोन्ही माता पितरें आणि गोकुळांतील मित्र मंडळी आली त्यांच्या भेटीस मला गेलें पाहिजे. त्या सर्वांस कोणत्या रीतीनें श्रीकृष्ण भेटतात, हा चमत्कार पाहाण्याकारितां सर्व कृष्ण स्त्रियाही निघाल्या. इतक्यांत प्रथम नंद यशोदा वगैरे मंडळी पुढें आली, त्यास कृष्ण पुढें जाऊन भेटला. नंतर तसाच चालत पुढें गोपाळांस भेटण्यास गेला त्या वेळीं सर्वांनीं कृष्ण चरणीं मस्तक टेऊन त्याच्या गळयास प्रेमानें मिठ्या मारल्या व बोलूं लागले कीं, कृष्णा, तूं मोठा चोर व नाटकी आहेस. तूं आमचीं सर्वांचीं मनें चोरून येथें आणलींस. तुझी गरीबी जाऊन आतां तर श्रीमंती आल्यामुळें तूं आमची ओळख देखील सोडलीस काय? अरे, आमच्यासमागमें तूं गाई राखीत होतास, त्या वेळीं तूं आह्मां बरोबर जेवीत होतास व आमच्या शिदोऱ्या आह्मांस टकवून खात होतास; आणि आतां तूं मोठा झालास काय? 'हुमामा हुंबरी हुतूतू' आह्मांसंगें तूं खेळलास. व प्रसंगीं तुझ्या पाटीवर आह्मी बुक्या देखील मारीत होतो. अरे, घरोघरचं गोरस चोरून आह्मांबरोबर तूं खात होतास.

एकही घर असें राहिलें नाहीं कीं ज्या घरीं तूं गेला नाहींस. अरे तूं आतां मोठा, पण आमच्या यशोदेचा तूं कारटा. तुला लोक काय पाहिजे तें ह्मणोत, परंतु आह्मी तुला कान्हा ह्मणत असूं. अरे, तुला उखळास बांधलें होतें ती, व तुला आह्मी मारीत होतों ती आठवण आतां आहे काय? अरे तूं व आह्मीं शिदोऱ्याचा काला करून एकत्र खात असूं; आणि आतां तूं फारच सुकुमार झाला आहेस. त्यावेळीं तुझ्या अंगास शेण माखत होतें; व आतां कस्तुरी, अत्तर, अर्गजा इत्यादि सुवासिक द्रव्यें लागतात. त्यावेळीं तुझ्या आंगावर घोंगडी; पण आतां भरजरी पिंवळा पितांबर. त्यावेळीं मस्तकावर नुसतीं मोरपिसें असत; यावेळीं तर रत्नजडित मुकुट घालतोस ह्मणून आमची कायरे तुला आठवण नसावी! निलाजऱ्या, त्यावेळीं तुझ्या गळ्यांत गुंजफुलें अथवा तुळशीचे हार; आणि आतां दिव्य मुक्तमाला व मोटमोठे रत्नजडीत अलंकार आहेत. तूं यमुनेंत बुडाला होतास; परंतु कालियानें तुला आमच्या हांकामुळें सोडिलें. तसेंच गोवर्धन पर्वतीं सर्वांवर संकट पडलें होतें, त्या वेळीं आह्मी तो गोवर्धन उचलिला; आणि तूं लटकें ढोंग करून एक बोट लावलेंस ही आठवण तुला आहे काय? या आपल्या सवंगड्यांच्या गोष्टी कृष्णानें ऐकून सर्वांस ह्मटलें कीं, गड्यांनो मला सर्व आठवण आहे. मी विसरेन अशी गोष्ट मनांतही आणूं नका. माझ्या सर्व भक्तांपेक्षां तुह्मी मला अधिक प्रिय आहां. मी तुमच्या भक्तीकरितां गोकुळांत येऊन खेळ केले. गरीबी श्रीमंती यांत कांहीं भेद न धरितां मी तुमचा दास आहें असें समजा. हें ऐकून सर्व राजे, कौरव, पांडव, अष्टनायकादि सर्व स्त्रिया व देवकी इत्यादि स्तब्ध झाली. ज्या

वेळीं यशोदेस कृष्णानें प्रेमालिंगन दिलें, त्या वेळीं तिच्या नेत्रांतून अश्रुधारा येऊन, स्तनास पान्हा फुटला. हें पाहून तर सर्व बालकांचीं मनें विरालीं व पुरुषांचीं हळहळलीं. इतक्यांत गोकुळांतील गोपी व इतर बायका कृष्णदर्शनास पुढें आल्या. त्यांचीं रूपें रंभा देवांगनासारखीं होतीं. त्यांनीं सप्रेमानें कृष्णचरणीं मस्तक ठेवून हात जोडून पुढें उभ्या राहिल्या आणि विनंती केली कीं, आह्मांस दिव्य सुखाचा अनुभव दाखवून देवाधिदेवा, त्वां प्रथम गोकुळांत येऊन नंतर पुढें द्वारका वसविली. परंतु येथें आपण आह्मांस मुळींच भेट दिली नव्हती. आह्मांवर आपण जी प्रीति केली ती टसा आमच्या अंतःकरणांत कसा उमटला होता, त्याविषयींची खात्री ज्या वेळेस आपण मथुरेस आलां त्या वेळेस झालीच असेल. तो प्रकार सामान्य रीतीचा मानावा तर आमचें समाधान करण्याकरितां, उद्धवास आपण गोकुळास पाठविलें, त्यासमागमें जे जे आपण निरोप पाठविलेत त्यावरून आमची भक्ति आपणावर परिपूर्ण आहे असें दिसून आलें. आणि आपली कृपा आह्मांवर किती आहे याचा तर खुलासा, कृष्णदेवा, उघडच झाला आहे; परंतु आतां तुला ऐश्वर्य प्राप्त झाल्यानें, व आह्मांपेक्षां सुंदर बायका मिळाल्यानें तुमची आह्मांवरून प्रीति उडाली. असे नानाप्रकारचे त्यांणीं विनोदपर संवाद केले. कृष्णानें उत्तर केलें कीं, गोपींनो तुह्मांवरून दुसरें तर काय सांगावें, परंतु प्राणही ओंवाळून टाकावा अशी माझी तुह्मांवर भक्ति आहे. मग तुह्मांस अशी हळहळ कां असावी? तुह्मी कोण, मी कोण, गोप कोण, नंद, यशोदा, देवकी, हीं कोण याचा पूर्णपणें विचार करा.

कृष्णाचा व गोपींचा हा संवाद होत होता, त्या वेळीं बायकांशिवाय दुसरी मंडळी दूर होती. त्या वेळीं सर्व कृष्णाच्या अष्ट नायकादि स्त्रियांनीं आपले मनांत ह्मटलें कीं या गोकुळींच्या स्त्रिया धन्य होत. यानंतर यशोदा कृष्णाजवळ येऊन बोलली कीं, अरे कृष्णा, मजवरील माया टाकून तूं अजूनपर्यंत द्वारकेंत कसा राहिलास. तुझी बाळलीला आठवून आमचे पंचप्राण तुझ्याठायीं गुंतून राहिले आहेत. माझ्या ह्या कठोर हातांनीं मी तुला बहुत वेळ मारिलें, व एकदां उखळाशींही बांधिलें, परंतु त्यामुळें तूं मला सोडून येथें यावेंस व मजवरील ममता अगदीं सोडावीस हें तुला योग्य नाहीं. कृष्ण ह्मणाला कीं, जननी, ही गोष्ट तूं काय सांगतेस. मी आपली बाळलीला दाखविण्याकरितांच तुझ्या उदरीं आलों; मग त्या शासनासाठीं मला कां बरें राग येईल? असें ह्मणून कृष्णानें यशोदेस हातीं धरून वसुदेव देवकीजवळ आणिलें. यशोदेनें त्यांस प्रेमालिंगन दिलें व त्यांनींही तिची भेट प्रेमानें घेतली. इतक्यांत अष्टनायका आणि सोळा सहस्र स्त्रिया यांनीं येऊन यशोदेच्या चरणावर मस्तकें ठेविलीं. तिणेंहा सर्वांस आशिर्वाद दिला. नंतर रुक्मिणीनें येऊन यशोदेस नमन केलें व तीं परस्परांस भेटलीं. ज्याप्रमाणें कौसल्येनें सीतेस आलिंगन दिलें त्याचप्रमाणें येथें रुक्मिणीवर यशोदेनें आपली प्रीति दाखविली.

यानंतर एके ग्रहणपर्वसमयीं सर्वांनीं स्नानें करून कृष्ण, बळिभद्र, रुक्मिणी, वसुदेव, उग्रसेन आदीकरून सर्वांनीं मोठमोठा दानें केलीं. कृष्णानें द्रव्य भांडार फोडून याचक जन सुखी केले. व गोकुळच्या सर्व लोकांस दिव्य अलंकार व उंची वस्त्रें देऊन त्यांची चांगली संभावना

केला. या समयीं रुक्मिणी आदिकरून अष्टनायकांनीं कृष्णास विनंती केली कीं, गोकुळींच्या ज्या गोपी आल्या आहेत त्यांस चांगले रीतीनें मान देऊन त्यांचा उत्तम गौरव करावा. हें ऐकून श्रीकृष्णानें स्वहस्तानें सर्व गोपींस पुन्हां वस्त्रालंकार दिले. हें पाहून सर्व इतर बायका हसूं लागल्या आणि थट्टेनें ह्मणूं लागल्या कीं, बाळपणीं जी लीला त्यांबरोबर केली असेल त्या सर्वांची आज आठवण करावी. नंतर श्रीकृष्णानें नंद यशोदेचें पूजन केलें. व त्रैलोक्यांतील अमोल्य अलंकार त्या उभयतांस प्रेमानें अर्पण केले. देवकीनें यशोदेस ह्मटलें कीं, तूं धन्य आहेस कीं कृष्णनाथाचे बाळपणांत त्यास स्तनपान करविलेंस. बाई माझीं सहा बाळें कंसानें मोठ्या क्रोधें करून शीळेवर आपटून मारिलीं. हाय! हाय! तें त्या वेळचें दुःख आठवून नेत्रांस दुःखाश्रु येतात आणि सर्व अंगावर शहारे उभारतात. व कृष्णास ह्मणाली अरे, तूं सदय होउन गुरुपुत्रास यमलोकींहून एकदां आणून गुरूस दिलेंस आणि तुझे जेष्ठ सहोदर मृत्यु सदनीं कसे ठेविलेस? ते जर तूं मला आणून देशील तर माझा आनंद जगत्रयांत मावणार नाहीं.

कृष्णानें मातोश्रीचें हें भाषण ऐकून त्याचें मन स्नेहानें फार द्रवलें, आणि देवकीस ह्मणाला कीं, माते, आतांच तुझे साहाही मृत पुत्र तुला भेटवितों. मग लागलीच यमास आज्ञा करून ते पुत्र आणण्यास सांगितल्यावरून त्यानें तत्काळ साही बाळें आणून कृष्णास दिलीं. त्यानें तीं देवकीजवळ देतांच सर्वत्रांस अत्यानंद झाला. तीं सर्व बालकें देवकीनें मोठ्या प्रेमानें आपल्या हृदयीं धरिलीं हें पाहून देवकी आणि यशोदा यांस मोठाच हर्ष झाला.

याप्रमाणें पांच दिवस तेथें कृष्णानें राहून नित्य गोकुळवासी जनासंगातें भोजन केलें व सर्वांस आनंदीत करून त्यानें त्या सर्वांची पाठवणी केली. नंद, यशोदा व गौळी यांनीं श्रीकृष्णाची आज्ञा घेऊन ते सर्व गोकुळास गेले आणि श्रीकृष्ण, सहकुटूंब सहसैन्य द्वारकेस आले.

एके दिवशीं यादवांसहित कृष्ण कुमर चेंडूफळी खेळत खेळत एका रानांत गेले. खेळतांना अकस्मात चेंडू उडून एका विहीरींत पडला. कृष्णपुत्र व यादव हे त्या कुपांत पाहात असतां चेंडू त्यांस दिसेना, फक्त विहीर कोरडी असून त्या जागीं एक मोठा भयंकर सरडा मात्र त्यांनीं पाहिला. तें वर्तमान त्यांणीं कृष्णास कळवितांच कृष्ण, बळराम व दुसरे कितीएक त्या कुपाजवळ धांवत आले. कृष्णाची दृष्टि त्या सरड्यावर पडतांच सरडा आपलें रूप बदलून दिव्य पुरुष बनला; आणि कृष्णा पुढें हात जोडून उभा राहिला. कृष्णानें त्यास विचारिलें कीं, तूं कोण आहेस? त्यावरून त्याणें सांगितलें कीं, मी नृग या नांवाचा राजा. मी आपल्या हयातींत मोठमोठीं दानें केलीं व परोपकारानें सर्व सृष्टींत कीर्ति मिळविली. एके दिवशीं एका पर्वकाळांत एक सहस्र सवत्स गाईंचीं दानें ब्राह्मणांस दिलीं; परंतु दुर्दैवानें, त्यासमयीं अशी गोष्ट घडली कीं, एका विप्रास दान दिलेली गाई तेथून पळून आपल्या कळपांत परत आली आणि दुसरे दिवशीं ज्या गाई दिल्या त्यांत तीही गाय दुसऱ्या ब्राह्मणास दिली. ती गाय पहिल्या ब्राह्मणानें ओळखून, ही माझी गाई, ती मला दे ह्मणून भांडूं लागला. आणि दुसरा ह्मणे कीं, ती मला राजानें दान दिली ती मी देणार नाहीं. याप्रमाणें दोघांचा वाद होऊन तें प्रकरण

मजजवळ आलें. मी त्यांची बहुत प्रकारें समजूत केली. मी दोघांही ब्राह्मणांस एकेक सहस्त्र गाई दुसऱ्या देण्यास सिद्ध झालों; परंतु दोघेही आपला हट्ट सोडिनात. शेवटीं त्यांचा वाद न तुटल्यामुळें सरडा होण्याविषयींचा मला त्यांनीं शाप दिला. परंतु मी निरपराधी असून मजवर इतकी अवकृपा झाली ह्मणून, कांहीं तरी उशापाची दया व्हावी अशी त्या दोघांजवळ मी विनंती केली; तेव्हां मला असा उःशाप दिला कीं, 'श्रीकृष्ण परमात्मा पूर्ण अवतार त्याची दृष्टि तुझ्यावर पडतांच तुझा उद्धार होईल.' त्याप्रमाणें कृष्णनाथा, आज मी तुझ्या कृपादृष्टीनें उद्धारलों. असें ह्मणून कृष्णचरणीं मस्तक ठेवून नगराजास स्वर्गाहून जें विमान आलें त्यांत बसून तो इंद्रभुवनीं गेला.

कोणी एक ब्राह्मण द्वारकेंत राहत होता. त्याच्या बायकोस आठ मुलें झालीं परंतु तीं सर्व पांचवेच दिवशीं मेलीं. तिला कांहीं दिवसांनीं एक नववा पुत्र झाला. तेव्हां लागलाच तो ब्राह्मण कृष्णाजवळ आला आणि बोलला कीं, माझें प्रत्येक बालक पांचवे दिवशीं मरतें. आतां कृपाकरून हा तरी माझा मुलगा आपण राखावा. हें वर्तमान सांगितलें त्यावेळीं कृष्णाजवळ अर्जुन होता. त्यानें परभारें उत्तर केलें कीं, मी हा तुझा मुलगा राखतों. असें ह्मणून तो ब्राह्मणाचे घरीं गेला, आणि मुलाजवळ बसला. सर्वांस सांगितलें कीं मी येथें असतां बालक नेण्याची यमाची काय पुण्याई आहे? जर या पुत्रास यमानें नेला तर मी अग्नीकाष्ठ भक्षीन. असें बोलून त्या घरा भोंवती अर्जुनानें बाणाचा कोट करून मंत्रसामर्थ्यानें दिग्बंधन केलें; आणि हातांत धनुष्य बाण घेऊन

तेथें बसला. पांचवा दिवस प्राप्त होतांच त्या मुलाचा प्राण एकाएकीं गेला. तें पाहून मुलाची आई वक्षस्थळ बडवूं लागली आणि ह्मणूं लागली कीं अर्जुना, माझा पुत्र गेला. अर्जुनानें तिला आश्वासन देऊन मी तुझा पुत्र तुला परत आणून देतों असें सांगून आपण यमलोकास गेला. परंतु यमानें सांगितलें कीं कपिध्वजा, मी त्या ब्राह्मणाचा मुलगा आणिला नाहीं. त्यावरून चौदा भुवनेंही त्याणें शोधलीं, परंतु तो मुलगा कोठेंही नाहीं असें पाहून पुनः द्वारकेस येऊन अग्निकुंड चेतवून त्यांत उडी टाकणार, इतक्यांत श्रीकृष्णभगवान तेथें प्रकट होऊन विचारितां, पार्थानें सर्व वर्तमान त्याजला श्रुत केलें. नंतर श्रीकृष्णानें रथारूढ होऊन मनोवेगानें सप्त समुद्रां पलीकडे आदिनारायणाचें स्थान आहे त्या स्थानीं अर्जुनास नेऊन उभा केला; आणि आपण त्या स्वरूपांत मिळाला. इकडे पार्थ, कृष्ण गेला असें पाहून व आदिनारायणाचें अद्भुत स्थान व कोटी सूर्य तेजा पेक्षांही अधिक प्रकाशित ज्याची कांती पाहून अगदींच घाबरून ह्मणाला कीं, देवाधिदेवा श्रीकृष्णा, आतां यांतून आपला भक्त सांभाळावा. पार्थानें आदिनारायणाचीही फारच स्तुती केली व कृष्णास उद्देशून ह्मणाला कीं, हे सर्वेश्वरा, क्षीराब्धीजावरा, मुनीमानसहंसा, समरधीरा श्रीरंगा, मला असा इकडे एकटा टाकून तूं गेलास हें चांगलें नव्हे. कृष्णानें सदय होऊन आपलें रूप प्रकट करून अर्जुनाच्या मस्तकावर हात ठेवून अगोचर असें आदिनारायण स्वरूप पहाण्या करितां त्यास दिव्य नेत्र दिले. पार्थानें तें रूप पाहिलें तो मत्स्य कच्छादि सर्व अवतार, तसेच चंद्र, सूर्य व ब्रह्मा, विष्णू, रुद्र इत्यादि तेहत्तीस कोटि देवांसह त्याच स्वरूपांत

मुरलेले दिसून कृष्णस्वरूपही त्यांतच विरून गेल्यासारखें दिसत आहे असें पाहिलें. अर्जुनानें त्या ब्राह्मणाचीं नऊही मुलें त्याच ठिकाणीं खेळत असून पूर्ण तेजस्वी दिसत आहेत अशीं पाहिलीं. मग कृष्णानें नऊही बाळें रथावर घेऊन द्वारकेस आणलीं. •अर्जुनानें ब्राह्मणाची व त्याच्या स्त्रीची पूजा करून तीं त्यांच्या स्वाधीन केलीं. मग त्यांच्या संतोषास काय पारावार? हा प्रकार पाहून ब्राह्मणानें व सकल जनांनीं पार्थाची फारच तारीफ केली. कृष्णाची अर्जुनानें फारच स्तुति केली. परंतु कृष्णानें त्यास सांगितलें कीं सर्व स्वरूपें मीच नटत असतों व कर्ता हर्ता सर्व मीच आहें. अर्जुनानें सर्व अभिमान सोडून निश्चल मन केलें आणि संतोषानें श्रीकृष्ण आज्ञा घेऊन इंद्रप्रस्थास येऊन श्रीकृष्णभक्तींत शांतपणें राहिला.

एके वेळीं इंद्राची राणी शची ही वैकुंठभुवनास गेली असतां तेथें लक्ष्मीसह वैकुंठपति पाहून त्या समोर हात जोडून उभी राहिली. मनांत इच्छा हीच कीं, हरीच्या अर्धांगी बसावें. हें तिचें मन जाणून हरीनें तिजला सांगितलें कीं, तं ही इच्छा पूर्ण होण्यास्तव हिमाचलावर साठ सहस्त्र वर्षें तप कर. मग मी पुढें कृष्ण अवतार धारण करीन त्या वेळीं तं राधा होऊन गोकुळीं जन्म घ्यावा. तेथें मी तुझीही इच्छा तृप्त करीन. जेव्हां मी कंस वधास जाईन तेव्हां तूं गुप्त होऊन द्वारकेस ये. पुढें त्या शचीनें तप करून गोकुळीं राधारूपें अवतरून कुंजवनांत हरीसह रतिसुख अनुभवलें. मग ज्या वेळी कृष्ण मथुरेस गेले त्या वेळीं ती तप करून द्वारकेस आली. ती तेथें येऊन कृष्णास भेटल्यावर कृष्णानें तिला प्रेमानें आलिंगन देऊन आपल्या अंकीं बसविली.

अद्यापि द्वारकेस राधा कृष्णाचें एके ठिकाणीं पूजन होतें तेथें हें सर्वत्रांच्या पहाण्यांत येईल.

एकेवेळीं रुक्मिणी कृष्णदर्शन घ्यावयास येत असतां तिनें कृष्णअंकावर राधेस बसलेली पाहिली. जिच्या देखतां अष्टनायका व सोळा हजार स्त्रिया या पैकीं कोणीही न बसतां ती येतांच सर्वांनीं आदरानें उभें रहावें असा तिचा दर्प सर्वांना असतां, ही राधा रुक्मिणीची कांहींच भीड न धरितां तशीच कृष्णअंकावर बसलेलीच राहिली. यावरून रुक्मिणीला अंतर्यामी बहुत कोप आला; परंतु पुढील भविष्यार्थ जाणून निमुटपणें तेथून दिंडीरवनांत तप करण्यास गेली. रुक्मिणी द्वारकेंतून गेल्यावर तें स्थळ शून्यवत दिसूं लागलें. तिच्या शोधास्तव हरीनें गोकुळांत येऊन बालवेष घेतला. मग पुढें दिंडीरवनांत येऊन तेथें गाई गोपी गोपाळांस ठेवून त्या वनांत येऊन पाहातात तों तेथें रुक्मिणी महान तप करीत बसलेली पाहिली. त्या वेळीं कृष्ण तिजसमोर कमरेवर दोन्ही हात ठेवून तिची नानाप्रकारें समजूत करूं लागला. तेव्हां रुक्मिणीनें कृष्णास सांगितलें कीं येथें मला उगीच त्रास देण्यास कशास आलास? तूं तर मला व्यभिचारी दिसतोस. दुसऱ्याचे स्त्रीयेस आपली बायको ह्मणणारा असा जो त्याचें मला दर्शन नको. मग रुक्मिणीचें कृष्णानें ज्ञानोपदेशानें समाधान केलें.

पुढें पुंडलीक मातापित्याची एकनिष्टपणें सेवा करित होता, त्याची भक्ति पाहून 'मी संतुष्ट झालों वर माग' ह्मणून कृष्णानें त्यास ह्मटलें. त्यानें एक वीट टाकली, तीजवर पंढरीनाथ या नांवानें श्रीहरि उभा राहिला. मग पुंडलीकानें असा वर मागितला कीं, देवा, या क्षेत्राचें नांव आजपासून

पंढरपूर ( दक्षिण द्वारका ) ठेवावें; व आपण ज्या विटेवर आतां उभे आहां, त्याच विटेवर पंढरीनाथ या नांवानें सतत उभे राहून जे सद्भक्त येथें येतील त्यांस प्रेमानें दर्शन द्यावें.

समाप्त.

## पद.

गोविंदा गोपाळा कृष्णा गोपीजननाथा ॥
गोवर्धनधर गोरसरसिका गोड तुझी गाथा ॥ धृ ॥
अहिपतिशयना अंबुजनयना अपारगुणराशी ॥
अमरोद्धारा असुरविदारा अखिलांतरवासी ॥
अगाधचरिता अखंडभरिता अगणितसुविलासी ॥
अद्भुततेजोराशी देवा लागों पायांसीं ॥ गोविं० ॥
पापविनाशक पावननामा पालीतानिजदासा ॥
पामरजन परी पाळनचतुरा पांडवकुळवासा ॥
पापमथनवरदायक देवा पंकजनिभहंसा ॥
पाहि महा भवपाश निवारूनि पयोनिधिवासा ॥ गोविं० ॥
माधवराया माश्रितकाया मुनिमानसहंसा ॥
मायातीता सारमनोज्ञा मारित रिपु कंसा ॥
माझे पूर्ण मनोरथ पुरवीं मोहमदध्वंसा ॥
मागतसे हा सेवक वर हे यदुकुलावतंसा ॥ गोविं० ॥

# श्रीकृष्णाविषयीं ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांच्या कुतर्कांचें खंडण.

या सृष्टींत जे अनेक धर्म चालू आहेत, त्यांजविषयीं कोणीही विचार केला असतां त्याची अशी खात्री होईल कीं, मुळारंभी जगांतील सर्व लोकांचा एक धर्म होता; आणि तो वेदोक्त. परंतु पुढें कालांतरानें कांहीं लोकांची प्रवृत्ति मार्गाकडे अधिक दृष्टि पोंचू लागून त्यांनीं धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्यशास्त्र, गणितशास्त्र, व्याकरणशास्त्र व शिल्पशास्त्र इत्यादि अनेक ग्रंथांचा अभ्यास करून आपलें व्यवहारीक ज्ञान वाढविलें. आणि त्यांत आपली प्रतिष्ठा वाढविण्याकरितां, अनादिसिद्ध वेदोक्त धर्माची निंदा करून त्या वेळच्या अज्ञानी लोकांस आपली सर्वज्ञता दाखवूं लागले. सर्वच लोक शहाणे नसतात या न्यायानें, त्या ढोंग्यांच्या मताला अनुसरून अनेक लोक समाज वेगळे पडले. व खऱ्या वेदोक्त धर्माची निंदा करून खोटीं मतें काढणार असे शेकडों मतवादी झाले. तीं मतें कोणतीं तर बौद्धमत; ज्याच्या पोटीं जैन मत, चार्वाक मत, स्वभाववादि मत, नास्तिक मत इत्यादि अनेक भेद झाले. त्या बौद्धमताच्या लोकांतून याहुदीमत उत्पन्न झालें. व या याहूदी मताच्या लोकांतूनच ख्रिस्ती मत उत्पन्न झालें. त्याचप्रमाणें महंमदी मत, झोरासट्रियन मत व अलिकडे ब्राह्ममत इत्यादि अनेक मतें निघालीं, सध्यां निघत आहेत, व पुढेंही निघतील; परंतु हीं सर्व मतें आमच्या वेदोक्त धर्मांतील—

वेदांत शास्त्रापुढें अगदीं बापुडीं होऊन जातात. असें अगदीं परकीय जे अमेरिकन (थिओसोफिस्टस) इत्यादि लोक तेही कबूल करितात. हीं मतें मागाहून निघालीं हें सहज कळतें. कारण, प्रत्येक इतर धर्मात कांहींनाकांहीं तरी हिंदुधर्माची स्पर्धा केलेली अगर त्या संबंधी दुसरा कांहीं मजकूर लिहिलेला आढळतो; परंतु हिंदुधर्म शास्त्रांत (वेदांत) दुसऱ्या धर्माचें नांव सुद्धां नाहीं. आमच्या वेदोक्त धर्मावर आजपर्यंत सहस्त्रावधि दुष्टांच्या झडपा पडल्या असतांही तो जसाच्या तसाच कायम रहातो याचें कारण तो धर्मच सत्य आणि ईश्वर प्रणित आहे. ह्मणूनच ज्या ज्या वेळीं ह्या मतवादी लोकांनीं हिंदुधर्म बुडविण्याचा प्रयत्न केला, त्या त्या वेळीं अवतार मालिकेंत घालण्यास योग्य अशा आमच्यांतील कांहीं पुरुषांनीं मोठ्या शौर्यानें त्या मतवादी लोकांस पराजित करून वेदोक्त धर्माचें रक्षण केलें! असो. एवढें उपोत्घातादाखल झालें. आतां आपण आपल्या प्रकृत विषयाकडे वळूं. व ज्या गीताशास्त्राकडे पाहून आजकाल सर्व जग मान डोलवित आहे त्या गीतोपदेशक श्रीकृष्णभगवानाविषयीं हल्लींचे तुटपुंजे ख्रिस्ती इत्यादि मतवादि लोक अज्ञानपणानें जे कुतर्क काढतात त्यांचा विचार करूं.

श्रीकृष्णावर ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांचा प्रथम असा एक मोठा आरोप आहे कीं, जर कृष्ण हा खरोखर ईश्वरावतार होता, तर त्यानें परस्त्रिया गौळणी यांच्याशीं जारकर्म कसें केलें? तर आतां यास असें समाधान आहे कीं, श्रीकृष्णानें बाळपणांत त्या गोपिकांबरोबर किंवा अन्य कोणत्याही स्त्रियांबरोबर संग

केलाच नाहीं; असा जो व्यास महाराजांचा लिहिण्यांत सिद्धांत आहे, तो हे अज्ञानी लोक मुळींच समजत नाहींत. ही त्यांची मोठी चूक आहे. तो असा कीं, एका प्रसंगीं श्रीकृष्ण कांहीं गौळणींस नौकेंत घेऊन क्रीडा करावयास यमुनेंत फिरत असतां नौका बुडूं लागली. त्यावेळेस सर्व गोपिका बुडणार इतक्यांत त्यांना स्मरण झालें कीं, श्रीकृष्ण हा ईश्वरावतार आहे व यानें गोकुळांत बहुत चमत्कार केले; यास्तव याची प्रार्थना केली असतां हा आपणांला खचित तारील. असा गोपींनीं विचार करून श्रीकृष्णाची प्रार्थना केली कीं हे श्रीकृष्णा, ह्या वेळेस आह्मीं यमुनेंत बुडत आहोंत, तर आह्मांस तार. त्याजवर तो बोलला कीं अगे गोपींनों, तुमचा मजवर शुद्धभाव नाहीं हें तुमच्या मनांतील मी जाणतों; आणि यामुळेंच तुह्मीं बुडत अहां. त्याजवर गोपिका ह्मणाल्या कीं हे गोपालकृष्णा, तुजवर शुद्ध भाव कसा ठेवावा हें आह्मांस कळत नाहीं; तर कृपा करून तूंच सांग. त्याजवर तो बोलला कीं गोपिकांनों, मजवर शुद्धभाव असा ठेवा कीं, "श्रीकृष्ण हा ब्रह्मचारी आहे" या त्याच्या बोलण्यावर सर्व गोपींस नवल वाटून एकमेकींकडे पाहून ह्मणूं लागल्या कीं हे श्रीकृष्णा, तूं प्रत्यक्ष आमच्या बरोबर रममाण झाला आहेस; असें असून तुला आह्मीं ब्रह्मचारी कसें ह्मणावें? त्याजवर तो बोलला कीं, गोपिकांनों, मी लहान बालक असतां तुमच्याबरोबर रममाण होईन हें तुह्मांस वाटतें काय? त्याजवर गोपिका बोलल्या, हे देवा, तूं तरूण रूप धरून आह्मांबरोबर रममाण होतोस. याजवर तो

बोलला कीं, हे गोपिकांनों, जें तुह्मांस माझ्या देहासारखें तरूण रूप भासलें आणि तुह्मीं ज्या बरोबर रममाण झालांत असें तुह्मांस वाटतें, तें मी लहान असतां तुमच्याच बुद्धीनें माझे जार भावनेनें तुह्मीं ध्यान केलेंत, त्या ध्यानाचें (अति ध्यासाचें) फल तुह्मांस स्वभाच्या रीतिप्रमाणें मिळालें. ही माझी माया होय. तर याजवरून मी तुमच्यापाशीं रममाण झालों असें होत नाहीं. मी बालब्रह्मचारी व अद्याप स्त्रीसंगविरहित आहें; तर अशा शुद्ध भावनेनें मला पहा, व त्याप्रमाणें मुखानें ह्मणा, ह्मणजे आतां ही यमुना दुभांग होऊन तुह्मांस कोरडी वाट मिळेल. त्याप्रमाणें गोपिका बोलतांच यमुनेचा एकाएकीं प्रवाह स्थिर होऊन गोपिकांसाठीं मध्यभागीं एक मोठा खोल कोरडा रस्ता झाला. हें चरित्र पाहून गोपिका सद्गदीत होऊन श्रीकृष्णाची प्रार्थना करून ह्मणूं लागल्या कीं, हे मुकुंदा, तूं साक्षात् ईश्वरावतार असून तुजवर आह्मीं व्यर्थ जार इत्यादि कर्मांचा दोष लाविला होता त्या आमच्या अपराधाची क्षमा कर. आह्मीं स्त्रिया अज्ञान आहों. तूं आमचा त्राता आहेस. त्याजवर तो बोलला कीं, गोपिकांनों जा, आजपासून माझी भक्ति शुद्ध भाव धरून करा. मी तुमच्यावर कृपा केली आहे. याप्रमाणें व्यासाच्या लिहिण्यांत श्रीकृष्णानें बाळपणांत स्त्रीसंग केला नाहीं असा निवाडा आहे. त्यानें जीं चरित्रें केलीं तीं मानवी नव्हत. ईश्वरी चरित्रें आहेत. त्यांजवर अक्कलच चालत नाहीं.

पहा एकदां एका ह्मातार्‍या गौळणीनें श्रीकृष्णास आपल्या सुनेजवळ व्यभिचार करितांना धरून सुनेसह

त्यास यशोदेजवळ आणिलें. इतक्यांत वाटेंतच त्यानें आपलें रूप बदलून तिचा मुलगा झाला, आणि इकडे श्रीकृष्ण यशोदेजवळ तर आहेच; तेव्हां आपलीच सून व आपलाच मुलगा यांस चावडीवर आणिल्या-बद्दल म्हातारीची उलटी फजिती मात्र झाली. तसेंच राधेच्या घरीं श्रीकृष्णानें जाऊन तिला भोगिली, व नवरा येऊन दार उघडण्यास सांगतांच तो दोन वर्षांचा लहान बालक झाला. असो.

श्रीकृष्णाचें रूप श्यामसुंदर, सकुमार व पाहाणा-रांच्या नेत्रांस आनंद देणारें होतें. अशा त्याच्या मोहक रूपाकडे पाहून स्त्रीपुरुषांना मनांत निरनिराळे भाव उत्पन्न होत असत. ह्मणजे व्यास, शुक, वसिष्ट व नारद इत्यादि सकल ऋषींना वाटलें कीं, श्रीकृष्ण हा साक्षात् ईश्वरानें जगदोद्धारार्थ अवतार धारण केला आहे. पांडवांना वाटत असे कीं, श्रीकृष्ण हा आमचा सखा व साह्यकारी आहे. यशोदा, देवकी, नंद, वसुदेव यांना वाटे कीं कृष्ण आमचा पुत्र आहे. सर्व यादवांना वा-टत असें कीं तो आमचा सर्व प्रकारें रक्षण करणारा बंधु आहे. गोपाळांना वाटे कीं हा आमचा खेळगडी आहे. राधा इत्यादि गोपिकांना वाटत असे कीं श्री-कृष्ण आह्मांस पति असावा. कंसाला तर तो प्रत्यक्ष काळच दिसत होता. याप्रमाणें श्रीकृष्णावर लोकांच्या निरनिराळ्या भावना असत. श्रीकृष्णाकडे गोपिकांचें जार भावनेनें मन लागलें हें अंतरसाक्ष जो श्रीकृष्ण-भगवान यास कळतांच आपली योगमाया प्रगट करून हजारों गोपींस एकाच क्षणीं असा चमत्कार दाखविला

कीं, श्रीकृष्ण आपणांस पति मिळाला. प्रत्येक गोपी-जवळ एक एक कृष्ण असा जेव्हां चमत्कार सर्व ऋषींनीं पाहिला, तेव्हां कंस वधार्थ व भूभार हरणार्थ जो श्री-कृष्णावतार, तो यशोदेजवळ बसलेला असून व गोकुळां-तलि गोपी शिवाय करून लक्षावधि ईश्वरी मायेच्या नव्याच गोपिका झालेल्या पाहून ईश्वरी लीला अगाध आहे असें ते बोलूं लागले. अशी जर अनंत शक्ति श्रीकृष्णाजवळ नसेल तर तो ईश्वराचा पूर्णावतार हें कसें ह्मणवेल? गवळ्यांना त्यांच्या स्त्रियांचा वियोग एकही दिवस झाला नाहीं; आणि गोपिकांना तर असें वाटत असें कीं श्रीकृष्णावांचून आह्मांस दुसरा पति ठाऊकच नाहीं. याप्रमाणें साहा महिन्याची एक रात्र अशी केली कीं चंद्र सूर्य इत्यादिकांच्या गति स्थिर क-रून ते दोन्ही समान दिसावे असें केलें. व योगमा-येनें रासक्रीडा व लीला अशी केली कीं, यशोदेजवळून श्रीकृष्ण तर रात्रीं कधींच बाहेर गेला नाहीं. ही अ-जब ईश्वरी माया श्रीकृष्णानें दाखवून लहान थोरांचें ता-रण केलें. या व्यासानें लिहिलेल्या कथेच्या अभिप्रा-याकडे पाहतां असें दिसतें कीं, यांत मानवी कृत्य ह्म-णजे श्रीकृष्णानें जार कर्म केलें असें मुळींच ह्मणतां येत नाहीं.

आतां हे मतवादी कदाचित् असें ह्मणतील कीं, जर कृष्णानें अशीं कर्में केलीं तर आह्मींही तसे वागल्यास कोणता दोष आहे? तर याचें निराकरण एवढेंच कीं जर ह्या कथाच खोट्या असें ते मानतील, तर कृष्णही कोणी नाहीं, गौळणीही खोट्या, व ते अपराधही लटकेच;

तेव्हां त्यांचें समाधान त्यांनींच केल्यासारखें होईल. श्रीकृष्णाच्या संबंधानें त्यानें केलेले अद्भुत प्रकार खोटें मानणें व व्यभिचार व चौर्य कर्म खरें मानून त्याचें ईश्वरत्व मोडणें ह्मणजे एकाचविषयीं त्याच्या संबंधाच्या कांहीं गोष्टी सोडणें व कांहीं खऱ्या मानणें ह्मणजे तर अगदींच अश्लाघ्य होय. आतां श्रीकृष्ण हा परमेश्वर खरा परंतु त्यानें जीं कर्मे केलीं तीं दुराचाराचीं केलीं असा जर ते मतवादि त्यास दोष देऊं लागतील, तर एकही दोष विचाराअंती त्यास लागत नाहीं. कारण त्याची अचाट कृत्यें त्यासच ठाऊक. इतरांस त्याची कल्पनाही झाली नाहीं, व होणेंही असंभाव्य. दरवाजास कुलुपें असतां आंतील दहीं दूध जातें, व फिर्याद झाल्यावर पहावें तों मडकीं पूर्ववत भरलेलीं! गणपतीनें लाडू खाल्ले ह्मणून श्रीकृष्णानें आईस खोटें सांगितलें; पण त्याचा प्रत्यय आपलें तोंड उघडून तिला गणपतीसह ब्रह्मांड दाखविलें! तसेंच सोळा हजार स्त्रियांच्या घरीं एकच वेळीं असणें! ह्या सर्व गोष्टी आह्मां मनुष्यांस असंभाव्य खऱ्या! परंतु ईश्वरास कांहींच कठीण नाहींत! कारण तो सर्व शक्तिमान आहे.

एके वेळीं कांहीं याज्ञिकपत्न्या श्रीकृष्णासाठीं कांहीं खाण्याचे पदार्थ घेऊन येत असतां, यमुनेच्या पूरांतून कसें पार जावें अशी त्यांना चिंता पडली. त्या वेळेस श्रीकृष्णानें त्यांस सांगितलें कीं स्त्रियांनों, यमुनेपुढें उभ्या राहून बोला कीं, "श्रीकृष्णानें आपल्या योगमायेच्या बळानें गोपिकांस चमत्कार दाखवून श्रीकृष्ण त्यांस पति मिळाला असें भासविलें; परंतु वास्तविक

श्रीकृष्णावतारानें गोकुळीं बाळपणांत स्त्रीसंग केलाच नाहीं. कारण, स्त्रीसंग केलेल्याच्या हातून कंसास मरण नव्हतें. ह्मणून श्रीकृष्ण बाळब्रह्मचारी स्त्रीसंग विरहित राहिला आहे; ही गोष्ट जर खरी आहे, तर या यमुनेच्या पूरांतून आह्मांस कोरडी वाट मिळावी. " असें त्याच्या सांगण्यावरून सर्व लोकांच्या समक्ष त्या याज्ञिकपत्न्या बोलतांच यमुनेंत कोरडी जमीन व दोहों बाजूस पाण्याच्या भिंती झाल्या; व त्यांतून त्या स्त्रिया पार गेल्या. हा चमत्कार व्यासानें लिहिला आहे तो ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांनीं पाहून विचार करावा.

योगमायेनें ज्या गोपिकांस त्यांच्या मनोरथाप्रमाणें भासविलें कीं, श्रीकृष्ण आह्मांस पति मिळाला, त्यांना श्रीकृष्णानें स्त्रीसंग केला, आतां कंसाला कोण मारील; असा संशय व भय राहूं नये ह्मणून, श्रीकृष्णानें गोकुळांत अनेक प्रतिज्ञा करून चमत्कार दाखविले. देवकीला तिच्या भक्तिस्तव वरदान दिल्याप्रमाणें एकदम आठ वर्षांचा श्यामसुंदर बालक होऊन, हा आपला पुत्र आहे असें भासविलें. कंसाला मारून उग्रसेनाला राज्यावर स्थापन करून मग अन्य अवतार कृत्यें भूभार हरणार्थ करून भाविक लोकांस तारिलें. ज्या कंसाला स्त्रीसंग झालेल्याच्या हातून मरण नव्हतें, त्या कंसाला त्यानें मारिलें. याजवरून श्रीकृष्णानें व्यभिचार तर राहूं द्या पण बाळपणांत स्त्रीसंग मुळींच केला नाहीं असें सिद्ध होत नाहीं काय?

श्रीकृष्णावर ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांचा दुसरा एक मोठा असा आरोप आहे कीं, त्यानें बाळपणीं

गोकुळांत दहीं, दूध, लोणी इत्यादि चोरून खाल्लें. जर तो ईश्वरावतार होता तर हें नीच कर्म त्यानें कसें केलें? तर त्यांस असें समाधान आहे कीं, एकदां एका गौळणीच्या घरीं श्रीकृष्णानें मायावी बाल्यरूप धरून दहीं दूध लोणी खाऊं लागला. आणि दहीं लोण्याची मडकीं फोडून स्वस्थपणानें हातांत फुटकीं मडकीं घेऊन रांगत रांगत चालला. श्यामसुंदर आंगावर दह्यांचे थेंब पडल्यानें व लोण्यानें तें मुख माखल्यानें कृष्णास मोठी शोभा आली होती. ही मौज त्या गोपिकेनें पाहून त्याला वर उचललें व कडेवर घेऊन मोठ्या प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें; आणि 'अले किस्ना चोला, अले लबाला, दहीं चोलून खातोस ना।' असे बोबडे व लाडके शब्द बोलत बोलत त्याला यशोदेजवळ घेऊन आली, आणि ह्मणाली कीं, "यशोदेबाई, हा तुमचा कृष्ण पहा कसा दहीं लोणी चोरून खात आहे." हें बोलणें ती मोठ्या आनंदानें व त्याच्या तोंडाकडे पाहून हांसून बोलली. तेव्हां यशोदा तिला ह्मणते बाई, माझा कृष्ण तर पाळण्यांत खेळत आहे. असें बोलून यशोदेनें श्रीकृष्णाला पाळण्यांतून कडेवर घेऊन बाहेर आली. यामुळें ती गौळण व यशोदा मोठ्या विस्मयांत पडलीं. व मनांत ह्मणतात कीं, आह्मां दोघींजवळ दोन कृष्ण आहेत हें चरित्र आहे तरी काय? इतका विचार करिता तों तिसरी, चवथी, पांचवी याप्रमाणें हजारों गौळणी हजारों कृष्णांला कडेवर घेऊन यशोदेपाशीं प्रेमानें आल्या; आणि सर्व गोकुळांत व गल्लो गल्लींत लाखों कृष्ण रांगत आहेत असें पाहिलें. त्यावेळेस सर्व गोकुळांतल्या ल्हान थोरांची

खात्री झाली कीं, श्रीकृष्ण हा साक्षात् ईश्वरावतार आहे. आमचीं मनें वेधून घेण्याकरितां ज्या दहीं दुधावर आमचा लोभ त्या लोभाचीच वस्तु त्यानें कृपा करून आपल्या हातांत घेतली आणि मुखांत घातली कीं जेणें करून आमची मनें त्याच्याकडे लागावीं व आह्मीं तरावें. आह्मीं धन्य आहों, आह्मीं धन्य आहों, असें सर्व गौळणींनीं बोलून, श्रीकृष्णानें श्यामसुंदर कमलनयन अशीं जीं अनेक बालरूपें धरिलीं होतीं, त्यांजकडे पाहून व श्रीकृष्णाचे गुण गावून आनंदानें नाचूं लागल्या. त्या वेळेस त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रुधारा चालल्या व संसार प्रपंच विसरून गेल्या. त्यांना प्रेम अनावर होऊन, अहारे बा श्रीकृष्णा, असे शब्द बोलून त्या जमीनीवर लोळूं लागल्या. अशा त्या गौळणी प्रेमाश्रु गाळीत त्यांना दोन हातावर घेऊन मोठ्या प्रेमानें गळ्याशीं धरून नाचत नाचत आपापल्या घराकडे गेल्या. आणि पाहातात तों जी त्यानें दहीं दूधाचीं मडकीं फोडलीं तीं जशींच्या तशींच सर्व दहीं दुधानें भरलीं आहेत असें पाहून ही ईश्वरी माया त्यानें आमच्या तारणासाठीं प्रगट केली अशी त्यांची खात्री झाली. श्रीकृष्णानें गौळणींच्या घरीं दहीं दुधाची चोरी करून मडकीं फोडलीं, यशोदेपाशीं पाळण्यांत तो आहेच, गोपीही अनेक कृष्ण घेऊन आल्या आणि असा चमत्कार पाहून आनंदानें घरीं जाऊन पहातात तों, त्यानें कांहीं नेलें नाहीं, व नाशही केला नाहीं. असा व्यासादि ऋषींचा स्पष्ट लेख असतां, कृष्णानें "चोरी केली चोरी केली," असा ख्रिस्ती इत्यादि मतवादी कुतर्क काढतात याला काय ह्मणावें?

जसें आपण आपल्या एक दोन वर्षांच्या बाळास लाडानें चोरा, लबाडा इत्यादि बोलतों, तसें ज्या ईश्वरावतार श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठीं महान ऋषि तपश्चर्या करतात त्याला बाळपणीं गोपींनीं "अले चोला किस्ना" असे शब्द लडिवाळपणें बोलून खेळविलें, त्या गौळणी सारख्या भाग्यवान कोण आहेत!

कृष्ण हा जर ईश्वरावतार होता, तर त्यानें गोपींचीं वस्त्रें हरण केलीं ही गोष्ट अगदीं अनीतीची केली; हें त्याच्या ईश्वरत्वाला शोभत नाहीं; असें कित्येक अल्पविचारी बोलतात. परंतु श्रीकृष्णानें वस्त्रहरण कां केलें असें जर ते खोल विचार करून पहातील तर त्यांसच खास समजेल कीं, त्यानें जें केलें तें योग्य केलें. कारण, ज्या वेळेस ह्या गौळणी श्रीकृष्ण आपणास पति मिळावा या हेतूनें आपलीं वस्त्रें वाळवंटीवर ठेवून पाण्यांत नग्न व्रत करित उभ्या होत्या, त्या वेळेस श्रीकृष्णानें हें अंतरयामीं जाणून त्यांचीं वस्त्रें आपल्या योगमायेनें कळंबाच्या झाडावर लटकावून दिलीं. व आपणही तेथें मुरली वाजवित बसला. तेव्हां तो मुरलीचा मंजुळ ध्वनि त्या स्त्रियांच्या कानीं पडतांच त्या समजल्या कीं, आम्हीं जो पति मिळावा म्हणून इच्छित होतों तो श्रीकृष्ण येथें कोठें जवळच आहे. चला आपण त्यास पहावयास जाऊं. असा विचार करून त्या पाण्याच्या बाहेर पहातात तों, त्यांचीं वस्त्रें ठेविलेल्या ठिकाणीं नसून तीं एका झाडावर लोंबत आहेत असें त्यांनीं पाहिलें. तेव्हां त्या श्रीकृष्णाकडे पाहून ह्मणूं लागल्या कीं, श्रीकृष्णा, आमचीं वस्त्रें आम्हांस दे. त्या वेळेस तो म्हणाला

कीं, तुम्ही पाण्यांत अशा निर्लज्य होऊन मनांत काय चिंतन करीत होतां तें मला सांगा; ह्मणजे तुमचीं वस्त्रें आपो-आप तुह्मांजवळच आहेत असें पहाल. हें त्याचें भाषण ऐकून त्या गोपी एकमेकींकडे पाहून हास्य वदन करून ह्मणाल्या कीं, देवा, आह्मीं तुजसाठींच आज हें व्रत आरंभिलें होतें; आणि तेणेंकरून तुझी आह्मांस प्राप्तीही झाली. इतकें त्या बोलतांच त्यांचीं वस्त्रें त्यांचे हातांत आहेत असें त्यानें त्या स्त्रियांना चरित्र दाखविलें. तेव्हां त्या स्त्रिया वस्त्रालंकार परिधान करून श्रीकृष्णावर नेत्राचे कामशर सोडूं लागल्या, आणि त्यानें आपणांस काम भोग द्यावा म्हणून अनेक प्रकारें त्यांनीं त्यास हाव भाव दाखविले. परंतु तो मोहित कोठून होणार? कारण तो ईश्वरावतार. परंतु शेवटीं त्यानें असा विचार केला कीं या गोपींनीं मजसाठीं इतका परिश्रम केला असून जर मी यांची इच्छा पूर्ण केली नाहीं, तर ह्या सर्व स्त्रिया प्राण त्याग करतील; मग माझें दयाळूपण तें काय राहिलें? असा विचार करून तो ह्मणाला कीं, स्त्रियांनों, मला कामबाधा होऊन तुमचे मनोरथ पूर्ण व्हावे यतदर्थ तुह्मीं बहुत प्रकारें कामकटाक्ष सोडलेत; परंतु तसें झालें नाहीं ह्मणून तुह्मीं फार दुःखी अहांत, परंतु दुःखी होऊं नका. रासक्रीडेंत मी आपली योगमाया प्रगट करून ज्यावेळेस तीं अनेक श्रीकृष्णरूपें तुमच्या भक्तीस्तव तुह्मांसाठींच प्रगट होतील, त्यावेळस तुमचे मनोरथ पूर्ण होतील. व नंतर ते मनोरथ हळू हळू नाहींसेच होतील. जा, दुःखी होऊं नका. आणि आज पासून अशा निर्लज्यपणानें पाण्यांत नग्न उभ्या राहून-

प्रेमसाठीं असलीं मुर्खपणाचीं व्रतें करूं नका. मात्र शुद्ध भक्तीभाव असला ह्मणजे माझी प्राप्ती सहज आहे हें ध्यानांत ठेवा. हें ऐकून त्या गोपी आपापल्या घरोघर जाऊन श्रीकृष्णाचें थोरपण व उपकार आठवूं लागल्या. याप्रमाणें वस्त्र हरणाच्या निमित्तानें कामाला जिंकिल्याची व ज्या स्त्रिया श्रीकृष्णासाठीं प्राण त्याग करण्यास सिद्ध झाल्या होत्या त्यांचें ज्ञानोपदेश करून रक्षण केल्याची अमोलीक कथा आहे. अस्तु.

व्यास, शुक, नारद वगैरे ऋषि ब्रह्मर्षींची अंतःकरणांतील तगमग ज्याची वर सांगितलेली अवतार लिला श्रवण करून नाहींशीं झालीं, व ज्यांची ब्रह्मानंदी टाळी लागली, त्याच्या लिलांविषयीं कुतर्क काढणें ह्मणजे निवळ खोडसाळपणा नव्हे कां? याचा मतवाद्यानों विचार करा, आणि या दुर्धर भवसागराचें जर तुमच्या मनाला कांहीं भय वाटत असेल, तर वेदोक्त धर्माची निंदा करण्याचें सोडून आपापल्या स्वधर्मानेंच वर्तन करा, ह्मणजे त्यांत तुमचें कल्याण आहे.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

# आश्रयदात्यांची नांवें.

रा.रा. श्रीधर भास्कर.
,, श्रीनिवासराव ना०गुटीकर
,, श्रीपत हरीबाराव झाडीक
,, अनंत डी.
,, अनंत मदनजी.
,, अनंत गणपतजी.
,, आत्माराम निळाजी.
,, आत्माराम वि.पाठगांव०
,, आत्माराम विश्वनाथ.
,, आत्माराम बा०चोंढकर.
,, आत्माराम यादवजी.
,, आनंदराव गणोबा.
,, आनंदराव रा० तालचेर०
,, आनंदराव विनायक.
,, आनंदराव बळवंत.
,, आनंदराव खं०कीर्तीकर.
,, आपा गोपाळ हवालदार.
,, आपा बाजी जोशी.
,, आर. आर. चिवणे.
,, एकनाथ बा०मालवणकर.
,, ए. रामकृष्ण.
,, काशिनाथ बापूजी.
,, का० नागू पाटकर.
,, काशिराम विठोबा.
,, काशिनाथ ग० जोगळेकर
,, कीकाभाय छबीलदास.
,, केशव चुदाजी.
,, केशव वि० मुणगेकर.
,, कृष्णराव आत्माराम.
,, कृष्णराव दामोदरजी.
,, कृष्णराव नारायण काळे.

रा.रा. कृष्णराव सदा० जयकर.
,, कृष्णाजी नारायण.
,, कृष्णाजी बळवंत.
,, कृष्णाजी रामचंद्र.
,, कृष्णा रामचंद्र पिटकर.
,, कृष्णा रणछोड धुमे.
,, कृष्णा सीताराम.
,, कृष्ण द्वारकानाथ.
,, खंडेराव रा० आसलेकर.
,, खंडुजी लिंबाजी.
,, जी. ए. रणजीत.
,, गजानन बा० कीर्तीकर.
,, गजानन शामराव.
,, गजानन केरोबा.
,, गजानन नारायण.
,, गणपत नथूजी.
,, गणपत गोपाळ रेवंडकर.
,, गणपत शि०जालगांवकर
,, गणपत रामचंद्र पै.
,, गणपत एस. बागले.
,, गणपत तलपदे.
,, गणपतराव म०आगास०
,, गणपतराव बापूजी.
,, गणपतराव बाळूजी.
,, गणपतराव चाजीराव राव
,, गणपतराव माधवराव.
,, गणपतराव सदानंदजी.
,, गणेश सदाशिव.
,, गणेश कृष्ण
,, गणेश मुकुंद.
,, गणेश विनायक ढवळे.

रा.रा. गणेश रामचंद्र मेहेंदळे.
,, गंगाधर अनंत साठे.
,, गंगाधर बाबुलजी.
,, गंगाधर देवजी.
,, गंगाधर आनंदराव.
,, गंगाराम विठूजी काळे.
,, गीरधर व्ही०
,, गंगाराम नारायण परकर.
,, गुणाजी तुकाराम.
,, गोविंद बळवंतराव पोंवार.
,, गोविंद राजबा.
,, गोविंद विष्णु मीढे.
,, गोविंद विश्वनाथ.
,, गोविंद महादेव.
,, गोविंद दामोदर.
,, गोविंद मोरेश्वर गुर्जर.
,, गोविंदराव विठ्ठलराव.
,, गोविंदराव दाजीबा काटे.
,, गोपाळ वि० खानोल्कर.
,, गोपाळ बाळाजी.
,, गोपाळ पांडुरंग.
,, गोपीनाथ सखाराम.
,, गोपीनाथ विठोबा.
,, गोपीनाथ एकनाथ.
,, चिमणाजी विठोबा.
,, चिंतामण रघुनाथ.
,, चिंतामण पांडुरंग.
,, चिंतामण सदाशिव.
,, चिंतामण गंगाधरजी.
,, जयराम रघुनाथ.
,, जयराम लक्ष्मणजी.
,, जयराम ध० सीकळकर.
,, जगन्नाथ वामन.
,, जगन्नाथ भास्करजी.
,, जगन्नाथ पांडु० देवकर.

रा.रा. जनार्दन दामोदरजी.
,, जनार्दन दा० कोलटकर.
,, जनार्दन रामचंद्रजी.
,, जनार्दन जगन्नाथ प्रधान.
,, जनार्दन काशिनाथ.
,, तानु बाबुराव साळवी.
,, तुकाराम महादेव.
,, तुकाराम पुताजी.
,, तुकाराम गुणाजी.
,, त्रिंबक राघोबा वड्कडे.
,, त्रिंबक ए. गुप्ते.
,, त्रिंबक
,, त्रिंबक बाळू घोंगे.
,, त्रिंबक आपाजी.
,, दाजी येसु शेट.
,, दादा भास्कर पुरंदरे.
,, दादोबा भास्करजा.
,, दादोबा रामचंद्रजी क्षत्रे.
,, दामाजी दुमेन नाखवा.
,, दादाभाई नारायण.
,, दामोदर पुरुषो० पोवार.
,, दामोदर एस.
,, दामोदर विठ्ठल गुप्ते.
,, दामोदर अनंत.
,, दामोदर अ० चौधारे.
,, दामू नारायण.
,, दिनकर महा० भागवत.
,, दीनानाथ सखाराम.
,, दीनानाथ गंगाधर.
,, दीनानाथ पांडुरंग.
,, धर्माजी नरसू.
,, धनाजी रा० वारीक.
,, धाकल सुंदरजी.
सौ. धोंडीबाई ता० बि.
रा.रा. धोंडू दामोदरजी.

रा.रा. धोंडू महादू का० क०
,, धोंडू शिवाजी.
,, धोंडू विश्व० गांगले.
,, नरसिंह नारायण.
,, नरसू नरसाप्पा.
,, नाना राघोबा चव्हाण.
,, नाना आत्माराम.
,, नानूजी बापूजी.
,, नानाभाई राघोबा.
,, नानाभाई शंकरजी.
,, नानाभाई का० ठाकूर.
,, नारायण पुरुषोत्तमजी.
,, नारायण शिवशंकर.
,, ना० बा० गांगनाईक
,, नारायण बाबाजी वडके.
,, नारायण गं० श्रीधनकर.
,, नारायण मुकुंद काटवे.
,, नारायण गो० भायंडरकर.
,, नारायण दाजी.
,, नारायण रा० राऊत.
,, नारायण आबाजी परेल०
,, नारायण भि० फडके.
,, नारायण बापूजी.
,, नारायण केरोबा.
,, नारायण भिकाजी.
,, नारायण दामोदर.
,, नारायण माधवराव.
,, नारायण वासुदेव.
,, नारायण म० चिटणीस.
,, नारायण सखाराम.
,, नारायण गणेश.
,, नारायण पर० ओवळे.
,, नारायण काशिनाथ.
,, नारायण गोपाळ.
,, नारायण रामजी परकर.

रा.रा. नारायण वासुदेव.
,, परशराम त्रिं० मु० शिंपी.
,, परशराम विश्वनाथ.
,, परशराम निळकंठ.
,, परशराम सखारामजी.
,, परशराम श्रीकृष्ण.
,, पांडू बाळू.
,, पांडुरंग बाबूलजी.
,, पांडुरंग रामनाथ खोटे.
,, पांडुरंग बाळकृष्ण चावड
,, पांडुरंग व्यंकाजी कोठारे.
,, पांडुरंग अनंत भेंडे.
,, पांडुरंग भिकाजी.
,, पांडुरंग दादाजी.
,, पांडुरंग बाबूलजी.
,, पुरुषोत्तम यशवंत.
,, पुरुषोत्तम येसोबा नायके.
,, पुरुषोत्तम विठोबा.
,, पुरुषोत्तम जगन्नाथ.
,, पुरुषोत्तम दामोदरजी.
,, पंढरीनाथ नारायण.
,, फकीर नारायण दांडेकर.
,, बी. ए. बी. कोठारे.
,, बी. त्रिंबक.
,, बी. विनायक रामचंद्र.
,, बळवंतराव कृ. तिवरेकर.
,, बळवंतराव गोविंद.
,, बाळकृष्ण बापू आचार्य.
,, बाळकृष्ण नारायण.
,, बाळकृष्ण गंगाधर.
,, बाळकृष्ण आबाजी.
,, बाळकृष्ण राघोबा.
,, बाळकृष्ण नारायण.
,, बाळकृष्ण गण० राऊत.
,, बाळकृष्ण लक्ष्मणजी.

रा.रा. बाळजी कृष्णनाथजी.
,, बाळ नाक.
,, बाळाजी आत्माजी राणे.
,, बाळाजी विनायक नेने.
,, बाळाजी अनत आपटे.
,, बाळाजी विठोबा कांसार.
,, बाळाराम लिंगु.
,, बाळाराम विठूजी.
,, बाळाभाई जयरामजी.
,, बाजी जिवाजी वैशंपायन.
,, बाजीराव हरजी.
,, बाबाजी गणशेट थरवूल.
,, बाबू नारायण.
,, बापू काशिनाथ दरोबकर
,, बापूजी पांडुरंगजी.
,, बाळू माणिक.
,, भगवतराव बा० घुमरे.
,, भगवतराव सदाशिव
,, भाई गणोबा
,, भाई सुंदरजी कीर्तीकर
,, भाऊ त्रिंबक
,, भाऊ लक्ष्मण राणे.
,, भाऊ कृष्णराव
,, भास्कर श्रीधर.
,, भास्कर निळाजी
,, भास्कर गणोबा
,, भास्कर गोविंद मोहिते
,, भास्कर बाळ० शेलनकर
,, भुमाजी शिवाजी
,, मगनलाल कृ० पंडित.
,, मदन जगन्नाथजी
,, महादेव नारायण बोरकर
,, महादेव परमानंद खर्डे
,, महादेव हिराजी
,, मल्हारराव मुंगाजी राणे

रा.रा. मंगेश नारायण
,, मंगेश रामचंद्र
,, माधवराव नाना
,, माधवराव स० पितळे.
,, माधवराव दामोदर
,, माधवराव बाळमकुंद
,, माधवराव दौ० मानकर
,, माधव विठोबा
,, मारुती बाबाजी पगडबंद
,, म्हादाजी कृष्ण
,, म्हादू पांडू
,, मोरेश्वर कृष्ण देसाई
,, मोरेश्वर नारायण
,, मोरेश्वर पु० कीर्तीकर.
,, मोरेश्वर पुतोबा विजयकर
,, मोरेश्वर माधवराव
,, मोरेश्वर कृष्ण
,, मोरेश्वर श्रीधर साठे.
,, मोरेश्वर भवानराव जोशी
,, मोतीराम बाळूजी मयेकर
,, मोरोबा काशिनाथ
,, मोरो वि० जो०स्मार्त शि०
,, यशवंत बळवंत नाईक
,, यशवंत बाळकृष्ण
,, यशवंत नारायण
,, रघुनाथ कृष्णाजी.
,, रघुनाथ आनंदराव.
,, रघुनाथ लक्ष्मण जोशी.
,, रघुनाथ गोविंद.
,, रघुनाथ रामकृष्ण केणी.
,, रघुनाथ सखाराम.
,, रघुनाथ हरिचंद्रजी गांधी
,, रघुनाथ ग० वागळे.
,, रामचंद्र बाबूराव घाडगे.
,, रामचंद्र ना० [illegible]त्रिकर

रा.रा. रामचंद्र नारायण
,, रामचंद्र कृष्णराव
,, रामचंद्र भास्कर
,, रामचंद्र सदाशिवजी
,, रामचंद्र स० दांडेकर.
,, रामचंद्र बाळूजी कदम.
,, रामचंद्र गणेश प्रधान.
,, रामचंद्र वामन.
,, रामचंद्र सयाजी.
,, रामचंद्र आबाजी देसाई.
,, रामचंद्र त्रिंबक बापट.
,, रामचंद्र हरजी.
,, रामचंद्र गणेश साठे.
,, रामचंद्र भि० गुर्जीकर.
,, रामचंद्र विनायक.
,, रामचंद्र बाणूजी.
,, रामचंद्र गणेश पेंडसे.
,, रामचंद्र त्रि० पनवेलकर.
,, रामचंद्र सख० दात्तर.
,, रामकृष्ण माणिकजी.
,, रामकृष्ण विनायक.
,, रामकृष्ण उत्तम नाडकर्णी
,, रामकृष्ण गो० अथे.
,, रामकृष्ण काशिनाथ.
,, रामजी हि० सावंत देसाई.
,, रामजी विठूजी.
,, रामनाथ काशिनाथ रेळे.
,, रामराव गण० कमलाकर
,, रामराव बाळकृष्णजी.
,, रावजीभाई ना० शि० पा०
,, रावजी गोविंद.
,, रावजी ग० कानिटकर.
,, लक्ष्मण सयाजी झापकर.
,, लक्ष्मण भाऊ.
,, लक्ष्मण माणिकजी.

रा.रा. लक्ष्मण ज० भाटवडेकर.
,, लक्ष्मण रामजी पाटेल.
,, लक्ष्मण रामजी झात्रा.
,, लक्ष्मण धर्माजी भोसले.
,, लक्ष्मण हरी वैद्य.
,, व्ही. ए. आकूत.
,, वामन विठ्ठल शि०
,, वामनराव गणपतराव.
,, वामन नारायणजी.
,, वामन वासुदेव.
,, वामन गोपाळ मथुरे.
,, वासुदेव ल० मोरबाळे.
,, वासुदेव एम. खारकर.
,, वासुदेव अनंत.
,, वासुदेव चिं० आचार्य.
,, वासुदेव बापूजी मंत्री.
,, वासुदेव त्रिंबक.
,, वासुदेव रामचंद्र.
,, वासुदेव हरी खर.
,, विठ्ठल बा० कोरगांवकर.
,, विठ्ठल बाळकृष्ण भाटे.
,, विठ्ठल माणिक.
,, विठ्ठल गण० दरीपकर.
,, विठ्ठल संभाजी मूरकर.
,, विठ्ठल रामचंद्र वाघळे.
,, विठ्ठल नारायण
,, विठू म्हादु गडदे
,, विठू साभाजी
,, विठोबा बाबाजी
,, विनायक क० नगरकर.
,, विनायक रामचं
,, विनायक मा० पितळे.
,, विनायक सुदामजी
,, विनायक महादेव
,, विनायक आ० सातघर.

रा.रा. विनायकराव मोरोबा
,, विनायकराव वि० देसाई.
,, विष्णू गोविंद अर्थे
,, विष्णू एम. मराठे.
,, विष्णु अनंत
,, विश्वनाथ रामचंद्र लेले
,, विश्वनाथ गोपाळ नाईक
,, विश्वासराव शिवशंकर
,, विश्राम देवजी घाणेकर
,, शामराव विठ्ठल
,, शामराव अं० किर्तीकर
,, शामराव गणपतराव
,, शामराव सदाशिव
,, शामराव नारायण
,, शंकर दाजी शास्त्री पदे
,, शंकरलाल भाईशंकर
,, शंकर बाळकृष्ण
,, शंकर गणपत चिंचणकर
,, शांताराम गणेश रेळे
,, शाबा विश्राम
,, शिवराम राम० आरेकर
,, शिवराम वामन साधले
,, शिवराम रामजी
,, एस. बी. देसाई
,, एस. मोरेश्वर
,, एस. रघुनाथ
,, एन. साल्टोमन
,, सी. आत्माराम
,, सखारामजी गो० भोसले
,, सखाराम गोविंद
,, सखाराम मंगश वागळे
,, सखाराम काशिनाथ मूर्ते
,, सखाराम हरी
,, सदानंद जगन्नाथजी
,, सदानंद वामन तळेकर

रा.रा. सदाशिव बंधु
,, सदाशिव शंकर वाघ
,, सदाशिव वि० नारवेकर.
,, सदाशिव गोपाळ
,, सदाशिव विनायक
,, सदाशिव धनाजी
,, सयाजी सायगू कल०
,, सत्येंद्रनाथ आर. जयकर
,, संभाजी मानजी
,, सीताराम धा० वासलेकर
,, सीताराम का० मूरकूटे
,, सीताराम हरिचंद्र
,, सीताराम बाळशेट
,, सीताराम मोरेश्वर
,, सीताराम त्र्यंबक वाघ
,, सीताराम पुरुषो० पितळे
,, सीताराम रामकृष्णजी.
,, सीताराम लक्ष्मणजी
,, सुंदरलाल बाळाजी
,, सुंदरराव मदन पाळकर
,, सुंदरराव पांडुरंग
,, सुंदर दामोदर
,, सोकर गोविंदराव
,, हरी गोपाळ
,, हरी जनार्दन.
,, हरी नारायण
,, हरी सीता० फणसलकर.
,, हरी शंकर दामोदर वा०
,, हरी भास्कर
,, हरिचंद्र दामोदर
,, हरिचंद्र गो० चेंबूरकर
,, हरिचंद्र पांडुरंग
,, हरिचंद्र ना० धैर्यवान
,, हरी त्रिंबक
,, हरिदास पितांबर